मै. जोसेफ मॅझिनीकृत

# मानवी कर्तव्यें

भाषांतरकार

श्री. स. आ. जोगळेकर

"नागरिक या नात्यानें आपल्या सार्वजनिक जीवनक्रमांत अनेक प्रश्न उपस्थित होतात; हे प्रश्न सोडवितांना ज्या तत्त्वांचा आधार घ्यावा लागतो तीं तत्त्वें कोणतीं हें ठरवून देणें एवढाच या निबंधांचा मूळ हेतु आहे; माझें मन मला ग्वाही देत आहे कीं, हे निबंध लिहिण्यांतील माझा हेतु बहुतांशीं सिद्धीस गेला आहे."  [पृ. ११९.

प्रकाशक—गणेश महादेव आणि कंपनी, मुंबई नं. ४

जरी मी नव्हतों पतित । तरि तूं पावन कैंचा येथ ॥
म्हणोनी माझें नांव आधीं । मग तूं पावन कृपानिधि ॥
लोहो महिमा न परिसा । नाहीं तरी दगड तैसा ॥
तुका म्हणे याचक भावें । कल्पतरू मान पावे ॥

---


आवृत्ती दुसरी

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी

६२१ गिरगांवरोड, मुंबई

जानेवारी, सन १९२४

किंमत एक रुपया.

मुद्रकः—गणेश महादेव वारकर, सा[illegible] सेवक छापखाना
९५-९७ गिरगाव बॅकरोड, मुंबई.

प्रकाशकः—ग. म. वरिकर, चालक, गणेश महादेव आणि कंपनी
६२१ गिरगांव रोड, मुंबई नं. ४.

सैतानी सत्तेच्या जुलुमाला ज्या निरपराध
व्यक्तींना बळी पडावें लागलें,
स्वातंत्र्यासाठीं ज्यांनीं आपल्या रक्ताचा अभिषेक केला,
मानवजातीच्या अथवा राष्ट्राच्या कल्याणासाठीं
ज्यांनीं आपल्या आयुष्याचा यज्ञ केला,
त्या परमेश्वराच्या प्रेषितांच्या
परम पवित्र स्मृतीस
समर्पित

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| | प्रयोजन-कथन. ... ... ... | १ |
| १ | इटालियन कामकरी वर्गास. ... ... | १७ |
| २ | परमेश्वर. ... ... ... | ३२ |
| ३ | कर्तव्यविवेकाचें महातत्त्व. ... ... | ४५ |
| ४ | मानवजातीसंबंधीं कर्तव्यें. ... ... | ५६ |
| ५ | राष्ट्रकर्तव्यें. ... ... ... | ६९ |
| ६ | कुटुंबकर्तव्यें. ... ... ... | ७९ |
| ७ | स्वतःसंबंधींचीं कर्तव्यें. ... ... | ८८ |
| ८ | स्वातंत्र्य. ... ... ... | ९९ |
| ९ | शिक्षण. ... ... ... | १०६ |
| १० | संघटना प्रगति. ... ... ... | ११४ |
| ११ | कामकरी वर्गाचा प्रश्न. ... ... | १२१ |
| १२ | उपसंहार. ... ... ... | १४३ |


CHECKED BY

## गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| १ | स्वराज्याचा श्रीगणेशा. | २-४-० |
| २ | स्वराज्याची घटना. | २-४-० |
| ३ | स्वराज्याची स्थापना. | २-४-० |
| ४ | स्वराज्याचा कारभार. | २-४-० |
| ५ | स्वराज्यावरील संकट. | २-४-० |
| ६ | मराठी रियासत, मध्य वि. ३ | २-४-० |
| ७ | ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध. | ३-८-० |
| ८ | श्रीएकनाथ चरित्र. | ०-१२-० |
| ९ | अजिंक्य तारा. | १-८-० |
| १० | निकोलाय लेनिन. | ०-१२-० |
| ११ | ग्रेट ब्रिटनची शासनपद्धति. | ०-१०-० |
| १२ | नवजीवन ( नाटक ) | ०-१०-० |
| १३ | जोसेफ मॅझिनी. | २-०-० |
| १४ | महात्मा गांधी. | २-०-० |
| १५ | मानवी कर्तव्यें. | १-०-० |
| १६ | भक्तिमणिमाला. | १-८-० |

### इतर पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | मराठी रियासत, पूर्वार्ध. | ३-८-० |
| २ | मराठी रियासत, मध्यवि॰ २ | ३-०-० |

# प्रयोजनकथन.

'I slept and dreamt that Life was beauty,
'I woke and found that Life is duty.'

आयुष्य ही चैन आहे हीच कल्पना सामान्य जनतेमध्यें रूढ झालेली असते. मग त्या चैनीकरितां सहजच प्रत्येकाची धडपड सुरू होते. 'चैन' हेंच आयुष्याचें ध्येय, हीच आयुष्याची सार्थकता, इतिकर्तव्यता वाटूं लागली म्हणजे मग साहजिकच ती चैन साध्य करण्याकरतां वाटेल तीं साधनें उपयोगांत आणावयास मनुष्यप्राणि कचरत नाहीं. आणि मनुष्याची प्रगति ज्यावेळीं फक्त येथपर्यंतच झालेली दिसून येते त्यावेळीं मनुष्य आणि पशु यांमध्यें फक्त 'पुच्छविषाणहीन'त्वाशिवाय कांहींच फरक उरत नाहीं. व्याघ्र, सिंह, लांडगे हे जसे केवळ स्वतःची चैन व्हावी ह्याच एका विचारानें कितीहि सुंदर, निरुपद्रवी हरिण असलें तरी त्यांचें भक्षण करून स्वतःच्या क्षुधाशमनाची चैन करून देतात, तद्वतच मनुष्यप्राणीहि चैन हीच आयुष्याची इतिकर्तव्यता मानूं लागल्यावर इतर अनेक निरुपद्रवी परमेश्वरी सृष्टीचा संहार करण्यास मागें पुढें पहात नाहीं. येथपर्यंतच जेव्हां मानुष्याची वाढ असते तेव्हां मनुष्यप्राणि हा क्रूर, हिंस्र व वन्यपशूंपेक्षांहि अधिक भयंकर व संहारक्षम होऊन बसतो. कारण हिंस्र पशूंना जी बुद्धि ईश्वरानें नाकारलेली असते ती दिव्य देणगी या मनुष्यप्राण्याला प्राप्त झाल्यानें त्याच्या अंगांत 'केवळ चैन हेंच ध्येय' हा विचार भरल्यानें तो हिंस्र तर होतोच, परंतु बुद्धीच्या साधनानें त्याचा हिंस्रपणा हा सिंहव्याघ्रांपेक्षां शतपट भयंकर व शतपट संहारक्षम होऊन बसतो. जगामध्यें एक वेळ सगळी हिंस्र पशूंचीच जात पसरली तरी पुरवेल; परंतु, ही अशी 'चैन हेंच ध्येय' बाळगणारी मनुष्यजाति परवडणार नाहीं. आणि मनुष्यजातीची जर उन्नति झाली नसती व मानुष्याची मजल 'चैनी'पलीकडे गेली नसती तर आज मनुष्यजातच सर्व जगांत अधिक भेसूर व भयंकर गणली गेली असती. परंतु मनुष्यजातीच्या

सुदैवानें ह्या पाशवी वृत्तीपासून तिची मुक्तता करणारे तत्त्ववेत्ते व धर्मप्रणेते महर्षि निर्माण होतात व मनुष्यप्राण्याला शिकवितात कीं, ' बाबारे, भ्रांत होऊं नकोस, स्वप्नांत बरळूं नकोस, तुझें आयुष्य हें चैनीकरतां नसून ' कर्तव्य ' करण्याकरतां आहे. जागा हो व तुझें कर्तव्य काय हें पारखून घे. '

आणि ह्या अशा दिव्य मंत्रोच्चारांनीं व मंत्रोपदेशांनींच मानवी समाजाची आजपर्यंतची उत्क्रांति घडवून आणिली आहे. चारी वेद आणि सारीं उपनिषदें ह्याच एका दिव्य शिकवणीनें मनुष्यजातीला प्रथम बजावून सांगतीं झालीं कीं, मानवी आयुष्य हें चैनीकरितां नसून कर्तव्य करण्याकरतां आहे. भगवान् बुद्ध अथवा महंत ख्राइस्ट किंवा महंमद पैगंबर हे सर्व धर्मप्रणेते निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या मानवी समाजाला हेंच एक सूत्ररूप उदात्त तत्त्व शिकवून गेले कीं, ' मानवा, तुझें आयुष्य हें कांहीं खावें, प्यावें, मजा मारावी एवढ्याकरतां नाहीं; तर तुला कांहीं तरी उदात्त ध्येय आहे, तुला कांहीं तरी कर्तव्यें आहेत व हें परमोच्च ध्येय मानवी जातीला शिकविण्याकरतां त्या त्या महात्म्यांनीं त्यांच्या सर्व आयुष्यभर चैन नाकारली. भगवान् बुद्ध एका राज्याचे युवराज असतांना त्यांनीं तें युवराजपद त्यक्त केलें व भिक्षुकवृत्ति स्वीकारून आयुष्य हें कर्तव्य आहे हेंच दिव्य सूत्र मानवी जातीला शिकवूं लागले. महंमद पैगंबरानें देशत्याग पत्करला, महंत ख्राइस्ट फांसावर चढला व त्या देशत्यागाच्या हाल-अपेष्टांतून, त्या फांसावरच्या मरणाच्या जिव्हेंतून सर्व मनुष्यजातीला त्यांनीं जाहीर केलें कीं, ' पहा, आयुष्य हें सुखोपभोगाकरतां नाहीं. आयुष्य हें कर्तव्य-पूर्तीकरतां आहे. '

त्यांच्या या दिव्य शिकवणीचा व प्रखर आत्मत्यागाचा अद्भुत परिणाम तत्कालिक स्वार्थलंपट जगावर झाला व मनुष्यजातीची उत्क्रांति अप्रतिहत वेगानें कांहीं काल घडून आली. परंतु, मनुष्यप्राणि हा अर्धा पाशवी आणि अर्धा दैवी असा बनलेला असल्यानें कालाकालानें त्याची पाशवी वृत्ति प्रबळ होत असते. मनुष्यप्राणि हा पाशवी आणि दैवी यांचा संधिकाल आहे. मनुष्याच्या सृष्टीमध्यें पाशवी सृष्टीची समाप्ति झाली व मनुष्याच्या सृष्टीमध्येंच दैवी सृष्टीची प्रथम उत्पत्ति झाली. मनुष्यप्राण्यामध्यें अज्ञानाचा शेवटचा धागा गोंवला गेला व ज्ञानाच्या प्रथम धाग्याची सुरुवात झाली आणि म्हणूनच मनुष्यप्राणि हा आपल्याला जितका ज्ञानवान् तितकाच अज्ञानमग्न, जितका पशुवृत्तीचा तितकाच देवस्व-रूप, जितका सैतान तितकाच देवदूत असा परस्परविरोधी आढळून येतो. सक्र-

दर्शनीं हें जरी परस्परविरुद्ध असें आढळून येतें, तरी वस्तुतः पाहतां हा विरोध नसून केवळ विरोधाभास आहे. मनुष्य-ज्ञान, अज्ञान, पशुत्त्व, देवत्त्व यांचें चमत्कृतिजन्य असें एक समीकरण आहे; आणि म्हणूनच यांमध्यें कांहीं वेळेला दैवी तर कांहीं वेळेला पाशवी वृत्तीचें स्वरूप प्रतिबिंबित होतें. कधीं तत्त्ववेत्ते निर्माण होतात तर कधीं कुटिल मुत्सद्दी लोकांना संत्रस्त करतात; कधीं बुद्ध, ख्राइस्ट, महंमद असे धर्मप्रणेते धर्मदान करतात, तर कधीं राजे जुलमी राष्ट्रें स्वार्थांधतेनें मानवी समाजचे समाज व राष्ट्रेंच्या राष्ट्रें आपल्या पाशवी सामर्थ्याच्या कराल दाढेंमध्यें रगडून टाकतात.

परंतु जेव्हां जेव्हां अशी पाशवी वृत्ति एकाद्या राष्ट्रामध्यें हैदोस घालीत असते व मानवी कायदे व मानवी हक्क यांवर गदा घालून त्यांना नष्टप्राय करते तेव्हां तेव्हां त्या पतित राष्ट्राला पाशवी सामर्थ्याच्या मगरमिठीमधून सोडविण्याकरतां एक एक देवदूत या अवनीतलावर अवतीर्ण होतो. तो आपल्या दिव्य वाणीनें व दिव्य करणीनें त्या पतित राष्ट्रांतील दैवी शक्ति जागृत करतो व त्याला शिकवितो कीं, ' ऊठ, मानवी आयुष्य हें चैनीकरतां नाहीं, तेव्हां माझी चैन बुडेल या क्षुद्र विचारानें तूं पशुतुल्य सत्तेपुढें मान वाकवूं नकोस; मानवी आयुष्याची अमोल देणगी मातीमोल करून घेऊं नकोस; कारण तुझें आयुष्य हें मुळीं चैनीकरतां नाहींच, तर तें कर्तव्याकरितां आहे. तेव्हां ही मोहनिद्रा टाकून दे व जागृत होऊन पारखून घे कीं, तुझीं मानवी कर्तव्यें काय आहेत. '

इटलीमध्यें ज्यावेळीं गेल्या शतकांत ऑस्ट्रियाचें जुलमाचें राज्य राक्षसीवृत्तीची कमाल करून तेथील लोकांचे स्वातंत्र्याचे हक्क पायाखालीं तुडवीत होतें त्यावेळीं त्या गुलाम-वृत्ति बनलेल्या लोकांस मानवी आयुष्याची खरी कल्पना देणें आवश्यक झालें होतें. ज्यावेळीं कोणतेहि राष्ट्र परतंत्र होतें त्यावेळीं त्या राष्ट्रांतील लोकांचा तेजोवध झालेला असतो. शरीर परतंत्र होण्यावर किंवा एकाद्या लढाईंत पराभव होण्यावर राष्ट्राचें पारतंत्र्य रचलें गेलेलें नसतें, तर त्याचा तेजोवध करून ज्याक्षणीं त्याचें मन परतंत्र होतें, त्या क्षणीं तें राष्ट्र खरें-खुरें परतंत्र होतें. ज्या राष्ट्राचें मन स्वतंत्र, तेजस्वी, स्वाभिमानी बनलेलें असतें तें राष्ट्र जरी परकीय सत्तेखालीं लष्करी सामर्थ्याच्या जोरावर दडपलें गेलें असलें तरी स्वतंत्रच असतें. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आयर्लंडचें; इंग्लंडच्या राक्षसी सामर्थ्यापुढें जरी त्या चिमुकल्या राष्ट्राचा पाड लागत नसला तरी तें मनानें पूर्ण स्वतंत्र आहे व म्हणून परकीय सत्तेला तेथें राष्ट्राची

मान्यता नाहीं, परकीय सत्तेला तेथें स्थायिकता नाहीं. याच्या उलट म्हणजे एकादें राष्ट्र जरी बाह्यतः स्वतंत्र असलें व मनानें तें नादान, तेजोहीन बनलें असलें तरी तें परतंत्रच होय. याला उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आपल्या महाराष्ट्राचेंच; सन १८०० पासून तों १८१८ पर्यंत महाराष्ट्र जरी बाह्यतः स्वतंत्र होतें तरी महाराष्ट्राचें स्वातंत्र्य नानाफडणवीस यांच्या मृत्यूबरोबरच नष्ट झालें होतें. राष्ट्राचें मन त्याच वेळीं नादान, आत्मवंचक, व स्वाभिमानशून्य बनलें होतें. ज्याला त्याला केवळ आपल्या क्षुद्र स्वार्थामुळें, चैनीपुढें मानवी आयुष्याचें दुसरें ध्येयच दिसेनासें झालें व त्यामुळें खरें स्वातंत्र्य लयाला गेलें. इटलीमध्येंहि असेंच झालें व तिचें स्वातंत्र्य लयाला जाऊन ती परतंत्र बनली.

ज्या वेळीं प्रसिद्ध इटालियन देशभक्त, तत्त्ववेत्ता व द्रष्टा मॅझीनी जन्माला आला, त्यावेळीं इटली परावलंबनत्वाच्या महानिद्रेत घोरत असलेला त्याला दिसला. जे कांहीं थोडे देशभक्त ‘ कारबोनरी ’ या संस्थेचे सभासद होते त्यांच्या डोक्यांत इटलीला मुक्त करण्याचे विचार जरी घोळत होते, तरी त्यांनाहि इटलीच्या ध्येयाची व तें साध्य करून घेण्याच्या मार्गाची स्पष्ट कल्पना नव्हती. ऑस्ट्रियाच्या जुलुमाचें जोखड फेकून देण्यास केवळ इटलीच समर्थ झाला पाहिजे ही आत्मप्रत्ययाची तेजस्वी कल्पना त्यांना पटली नव्हती. त्यांची भिस्त स्वतःच्या बलापेक्षां फ्रान्सच्या उदार बुद्धीवर व मदतीवरच जास्त होती. ज्या वेळीं मॅझिनी आपल्या देशाची विपन्न स्थिति समजण्याइतका मोठा झाला त्या वेळीं त्याला जें प्रथम व्यंग इटलीमध्यें आढळून आलें तें हें कीं, इटलीला आत्मश्रद्धा नाहीं. इटलीला जुलुमाचा कंटाळा आला होता; इटलीला अपमान, तेजोभंग असह्य होत होता; इटलीला पारतंत्र्य जाचीत होतें. परंतु इटलीमध्यें आत्मविश्वास नव्हता कीं, इटलीला मुक्त करण्यास इटली—आणि इटलीच केवळ—समर्थ आहे. बाह्य मदतीची अपेक्षा इटली प्रथम करीत होती व मग त्यावर स्वतःच्या उन्नतीचा पाया रचण्यास सुरुवात होत होती. परंतु कोणतेंहि राष्ट्र हें स्वबलावरच उन्नत होत असतें, मुक्त होत असतें. शत्रुपक्षाच्या कमकुवतपणावर आपला विजय अवलंबून नसतो तर तो स्वतःच्या बलशालीपणावर अवलंबून असतो. हें महातत्त्व मॅझिनीनें त्या वेळीं इटालियन लोकांना शिकविलें व यांतच त्याच्या राष्ट्रभक्तीचा जयजयकार झाला. राष्ट्रोद्धारक केवळ देशभक्त असून चालत नाहीं, तर तो तत्त्ववेत्ता असावा लागतो; त्याची राष्ट्रभक्ति तत्त्वांच्या मजबूत पायावर उभारली असावी लागते; केवळ मनोविकारांवर

तिचा भर असून भागत नाहीं. त्याचप्रमाणें राष्ट्रभक्त केवळ तत्त्ववेत्ता असूनहि भागत नाहीं, तर तो द्रष्टाहि असावा लागतो. जो द्रष्टा नाहीं, ज्याला आपल्या तत्त्वाचा भविष्यकालचा जयजयकार वर्तमानकालांत ऐकूं येत नाहीं तो तत्त्ववेत्ता राष्ट्राला आपल्याबरोबर घेऊन जाऊं शकत नाहीं. कल्पनेच्या पंखांवर बसून वर्तमानकाळच्या अनेक संकटांच्या पर्वतांचा उपहास करीत ज्या तत्त्ववेत्त्याची नजर भविष्यकालच्या यशाच्या रम्य प्रदेशावर पोंचली नाहीं त्याचें तत्त्वज्ञान रूक्ष होतें व राष्ट्राच्या कल्पनाशक्तीस विजेचे धक्के देऊन जागृत करण्याचें काम त्याचे हातून होत नाहीं; त्याचें तत्त्वज्ञान त्याच्याजवळच रहातें व जग स्थिरच असतें. परंतु भगवान् मॅझिनीचें तत्त्वज्ञान असें नव्हतें. तें आशेच्या कारंजानें थुय् थुय् नाचत होतें. तें स्वाभिमानाच्या तेजानें विलसत होतें. तें आत्मश्रद्धेच्या बलानें बलान्वित झालें होतें आणि म्हणूनच या तत्त्ववेत्त्याच्या तत्त्वज्ञानाची गंगा जेव्हां इटलीच्या हृदयांमधून वाहूं लागली त्या वेळीं सर्व तरुण इटली पारतंत्र्याच्या ‘ पंचानां सविशेषमनदपरं षष्ठं महापातकम् ’ अशा रीतीनें वर्णन केलेल्या महापातकाच्या मलापासून मुक्त झाली व गर्जून उठली कीं, ‘ नाहीं, नाहीं, परमेश्वराच्या दिव्य करांगुलीनें इटलीच्या भालपटावर ‘परतंत्र’ असें लिहिलें नाहीं; तर इतर राष्ट्रांप्रमाणेंच तिच्या मस्तकावर स्वातंत्र्याचाच मुगुट चढविला आहे ! व जर हा मुकुट कोणी पददलित केला असेल तर इटलीनेंच ह्या अन्यायाचें परिमार्जन केलें पाहिजे. इटलीनेंच स्वतःच्या समर्थ हातानें हा मुगुट उचलून घेऊन पुनरपि आपलें भाग्यशाली मस्तक अलंकृत केलें पाहिजे. ’

अशा रीतीनें आत्मश्रद्धेची, स्वाभिमानाची व राष्ट्रभक्तीची प्रबळ विचारपरंपरा ज्या वेळीं राष्ट्राच्या अंतःकरणांत खळबळ करूं लागली त्या वेळीं मॅझिनीनें या खळबळीला फ्रेंच रेव्होल्युशनप्रमाणें विश्वप्रलयाचें स्वरूप येऊं नये तर विश्वविकासाचें स्वरूप यावें, अनंत कालपर्यंत आसुरी सामर्थ्यानें दडपून टाकलेल्या एका मानवी समूहाची ही जागृति, सुडाच्या बुद्धीनें संहारात्मकच केवळ होऊं नये तर एकाद्या शस्त्रविद्येच्या प्रयोगाप्रमाणें नासकें काढून टाकून पडलेली जखम भरून काढण्यांत व्हावी, या उदात्त हेतूनें मॅझिनीनें राष्ट्राला ‘मानवी कर्तव्यां’चे दिव्य धडे देण्यास सुरवात केली. मॅझीनीची देशभक्ति स्वार्थी नव्हती, ती विश्वव्यापिनी होती. माझा देश स्वतंत्र, समर्थ, संपन्न झाला म्हणजे इतर देश माझ्या पचनीं कसे पडतील ही सैतानी चिंता त्याला लागली नसून, इतर देश माझ्या देशाप्रमाणेंच स्वतंत्र, समर्थ, संपन्न कसे होतील हीच दैवी चिंता

त्याच्या मनश्चक्षूंपुढें उभी होती. मानवी प्राणि एकमेकांचा शत्रू नाहीं तर तो बंधू आहे; मानवी प्राणि एकमेकांचा भक्ष्य नाहीं तर तो पूरक आहे; मानवी प्राणि एकमेकांला दुनियेंतून उठवून लावण्यास आला नाहीं, तर सबंध दुनिया आपल्या निवासानें नंदनवन बनविण्यास अवतीर्ण झाला आहे; ही दिव्य भावना त्याच्या हृदयाच्या प्रत्येक स्पंदनांतून स्फुरत होती; तोंच त्याच्या हृदयांत वाजणारा विश्वबंधुत्वाचा दिव्य वीणा त्यांनीं 'मानवी कर्तव्यें' (Duties of Man) या पुस्तकांत छेडला आहे. मी स्वत: निर्बंध, निर्भय व नि:स्वार्थ कां पाहिजे. ' तर माझ्या देशाचें ऋण मला फेडतां यावें म्हणून. माझा देश स्वतंत्र, मुक्त, वैभव-शाली कां पाहिजे ? तर विश्वसुखाला हातभार लावतां यावा म्हणून, मानव जातीचें ऋण मला फेडतां यावें म्हणून. पाश्चात्य संस्कृतीमध्यें या दिव्यभावनेची जाणीव तिच्या अभावावरूनच अधिक होत असते. पौर्वात्य संस्कृतीमध्यें या भावनेच्या पदोपदीं भासमान होणाऱ्या अस्तित्वापासून तिची जाणीव व ओळख क्षणोक्षणीं पटत असते. परंतु मॅझिनी पाश्चात्य संस्कृतीमध्यें वाढला असूनहि ही विश्वसुखाची चिंता त्याला लागली होती. छे, छे ! इटली स्वतंत्र करूनच केवळ चालावयाचें नाहीं, तर सर्व अवनीवरची लोकशाही मुक्त केली पाहिजे, ही त्या तत्त्ववेत्त्याची महत्वाकांक्षा होती.

कारण, परमेश्वर हा या अवनीचा निर्माता, नियंता आणि रक्षणकर्ता आहे. त्यानेंच निर्मिलेली ही मानवजात, ही कांहीं दु:खी, कांहीं सुखी; कांहीं स्वतंत्र, कांहीं परतंत्र; कांहीं उन्नत, कांहीं अधोगत; अशी असणें योग्य नाहीं, अशी त्याची निष्ठा होती. त्याचप्रमाणें मानवी प्रयत्नाचें ध्येय व सुखांचें अंतिम म्हणजे परमेश्वरप्राप्ति होय हा त्याचा ठाम सिद्धांत होता व म्हणूनच मानवी कर्त-व्यांची मीमांसा करण्याच्या आरंभींच मॅझिनीनें एक सूत्रवाक्य सांगितलें.

' Tne origin of your duties is in God.

' तुझ्या सर्व कर्तव्यांचा उद्गम परमेश्वरामध्ये समाविष्ट झाला आहे. ' हें या महातत्त्ववेत्त्याचें ब्रीदवाक्य आहे. हें ज्यास पटेल व हें ज्यास मान्य असेल त्यालाच मॅझिनीचें तत्त्वज्ञान कळेल. जो नास्तिक व नि:श्रद्ध असेल त्याला त्याचें हृद्गत कळणार नाहीं. भगवान् मॅझिनीच्या तत्त्वविवेचनाच्या फुलबागेमध्यें प्रवेश करण्यास ' ईश्वरनिष्ठा ' हा परवल यावा लागेल. मग त्या बागेंतला सर्व परिमल व सर्व सौंदर्य आपलेंच होईल. जे नास्तिक असतील त्यांना ह्या बागे-मध्यें मज्जाव नाहीं; परंतु त्यांना परिमलसेवनाचें सुख नाहीं. ' They

would deserve not curses,' but tears, असें मॅझिनीच स्वतः म्हणतो. तेव्हां मानवी कर्तव्यांच्या मीमांसेमध्यें प्रथम हें परमेश्वरप्राप्तीचें ध्येय निश्चित झालें पाहिजे. कोणतेंहि कर्तव्य म्हटलें कीं, त्यास प्रथम ध्येयाची अवश्यकता असते. हें ध्येय मॅझिनीनें इटालियन लोकांपुढें ठेविलें व तें इतकें उदात्त भव्य व उच्च होतें कीं, त्यानें इटलीचे राष्ट्रभक्त वेडावून गेले व हे सर्व परमेशाचे दास, जगत्कल्याणाच्या भावनेनें इटली मुक्त करण्यास बद्धपरिकर झाले. महाराष्ट्रामध्येंहि असाच एक रामाचा दास एकदां ' समर्थांचिया सेवकां वक्र पाहे ! असा सर्व भूमंडळीं कोण आहे ! ' अशी आत्मप्रीतीची आरोळी ठोकीत सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून व कडेपठारांवरून गस्त घालीत हिंडत होता. त्याची आठवण कोणा महाराष्ट्रीयाला होणार नाहीं ? असो; अशा रीतीनें मॅझिनीनें भगवत्प्राप्तीच्या उच्च ध्येयावर दृष्टि ठेऊन राष्ट्र स्वतंत्र करण्याचा भगीरथ प्रयत्न केला. सबंध मानवजातीनें उन्नत व्हावें म्हणून निरनिराळ्या समूहांनीं उन्नतिक्षम झालें पाहिजे, म्हणजे प्रत्येक देशानें स्वतंत्र असलें पाहिजे. राष्ट्रांतील प्रत्येक समाजानें राष्ट्रभक्ति जाणली पाहिजे, कारण त्यावांचून परतंत्र राष्ट्र स्वतंत्र होणें शक्य नाहीं. प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच्या कुटुंबाला व स्वतःला स्वतंत्रवृत्तीचे, निःस्वार्थतेचे व निर्भयवृत्तीचे धडे दिले पाहिजेत. ही परंपरा मॅझिनीनें ' मानवी कर्तव्या'च्या उद्घाटनांत ग्रथित केली आहे.

'You are fathers, in order, that you may educate 'men' to worship and unfold God's law. You are citizeus, you have a country, in order, that in a limited sphere, with the concourse of people linked to you, already by speech, by tendencies and by habits, you may labour for the benefit of all men.'

व मनुष्यजातीची उन्नति व प्रगति आपला देश प्रथम स्वतंत्र झाल्याखेरीज, स्वायत्त असल्यावांचून होणें शक्य नाहीं, हा मॅझिनीचा महासिद्धांत होता. मॅझिनी निश्चयानें म्हणतो,

'Without Country, you have neither, name, token, voice, nor rights, no admission as brothers into the fellowship of the Peoples. You are the bastards of Humanity, Soldiers without a banner, Israelites

among the nations, you will find neither faith nor protection ; none will be sureties for you. *Do not beguile yourself with the hope of emancipation from unjust social conditions, if you do not first conquer a country for yourself.*

हा उतारा दिल्याबद्दल वाचकांची क्षमा मागण्याचें कांहीं कारण नाहीं; कारण यामध्यें मॅझिनीच्या शिकवणीची गुरुकिल्ली समाविष्ट झाली आहे व एवढा मानवजातीचा हितकर्ता सर्व जन्मभर स्वदेश मुक्त करण्याकरितां ऑस्ट्रियाशीं निष्ठुरपणानें कां झगडला हें रहस्य यामध्यें ग्रथित झालें आहे. त्याचप्रमाणें आजच्या परिस्थितीमध्येंहि या मॅझिनीप्रणीत तत्त्वांचा प्रत्यय कसा पावलोंपावलीं येत आहे. हें निःपक्षपाती विवेचकांच्या तेव्हांच ध्यानांत येईल. 'शांततापरिषदे'मध्यें जगाच्या शांततची वाटाघाट करतांना ज्या प्रतिनिधींना स्वतःच्या देशाची शांतता पुरी राखतां येत नाहीं, त्यांना बोलण्याचा काय अधिकार आहे ? ज्यांना स्वतःच्या देशामधील ' जालियानवालाबाग ' नाहींसा करितां येत नाहीं व त्या राक्षसी कृत्याचे कर्ते, खुशाल खुशालचेंडूप्रमाणें नाकावर टिचून तुमच्या शिरावर नाचत असलेले शिक्षा पावूं शकत नाहींत, जालियानवालाबागेचा मारेकरी जनरल डायर हा जोंपर्यंत तुमच्या डोळ्यांदेखत तुमचें पेन्शन खाऊन पुन्हां वर शेखी मिरवीत आहे, तोंपर्यंत जगाच्या शांततेच्या गप्पा मारण्याचा व आर्मेनियन लोकांच्या कत्तली बंद करण्याचा अट्टहास करण्यास तुम्हांला काय अधिकार आहे ? आणि अधिकार असण्याचा डौल आणून जर तुम्ही जगाच्या उलाढाली करण्यामध्यें आगंतुकी केली तर त्याला कोण किंमत देणार आहे ? स्वतः दिवाळखोर असलेल्या मनुष्यानें ज्याप्रमाणें बाजारामध्यें पत वाढविण्याच्या सद्गुणावर व्याख्यान द्यावें; लोकांच्या घरीं तुकडे मोडणाऱ्या नादान मनुष्यानें ज्याप्रमाणें स्वावलंबनावर निबंध लिहावे त्याचप्रमाणें ज्यांना देश नाहीं, नाम नाहीं, निशाण नाहीं त्यांनीं जगाच्या शांततापरिषदेमध्यें भाग घेणें म्हणजे अत्यंत हास्यास्पद व आत्मवंचनाचें द्योतक आहे. पंजरबद्ध शुकानें गरुडांच्या समाजांत स्वतंत्र विहाराचा उपदेश मग कां करूं नये ? ज्यांना स्वतःची गादी मिळवितां आली नाहीं, त्यांनीं खलीफाच्या गादीबद्दल काय रागलोभ दाखवावा ? व दाखविलेला रागलोभ कसा फलद्रूप व्हावा ? तेव्हां मॅझिनीचें वरील अवतरण आजहि अत्यंत विचारणीय आहे.

एका पायावर तयार आहें; परंतु एका गोष्टीचा मात्र मला विचार पडला आहे." नामदेवांनीं विचारलें, " देवा! असा कोणता बरं विचार आपल्यास पडला आहे ? रुक्मिणी माता आपल्यास आमंत्रण स्वीकारूं देणार नाहींत कीं काय ? त्यांचं देखील प्रेम मजवर फारफार आहे." देव म्हणाले, " नामदेवा ! तसं नव्हे रे. मी तुमच्या इथें आलों तर इथें माझ्या जागेवर नको कां कुणी रहायाला ? भक्त मंडळी आली म्हणजे त्यांनीं कुणाची बरं पूजा करावी ?" नामदेव म्हणाले, "नारायणा ! आपल्यास कोणती गोष्ट अशक्य आहे. आपण इथेंच राहून आमच्याकडेही पण येऊं शकतां. आजपर्यंत आपण विटेवरच खिळून बसलां अशांतलाही प्रकार नाहीं. आपण ज्या ज्या वेळीं आपल्या भक्तांच्याकडे गेलां त्या त्या वेळीं आपल्या जागेचा अधिकारी कोणास तरी नेमतां असंही कुठें आजपर्यंत ऐकलं नाहीं ! आतां क्षणभर असं जरी गृहीत धरलं कीं, आपण तसंच करीत असतां, तर तीच व्यवस्था आतांही करणं आपल्यास शक्य नाहीं कां ?" देव म्हणाले, " हो; तूं असल्यावर मग ती व्यवस्था करितां येणं कांहीं कठीण नाहीं. नामदेवा ! तूं माझ्या जागीं राहण्यास कबूल असशील तर तुमच्या इथं मी अवश्य येईन," नामदेव म्हणाले, "देवा ! हें काय बरं आपण म्हणतां ?

## अभंग चरण.

**देव पूजूं गेलों ठेवुनियां भाव । तंव जालों देव स्वतः सिद्ध ॥**

असं ज्ञानदेवांनीं एका अभंगांत म्हटलं आहे. तसाच मजवरही प्रसंग येऊं पहात आहे, पण पांडुरंगा ! आपले 'समचरण सरोज' येथून हालल्यावर माझं अस्तित्व कसं बरं शक्य होईल ? आपण सांगतां त्या गोष्टीस मी यत्किंचितहि पात्र नाहीं; तेव्हां आपण दुसऱ्या कोणातरी योग्य माणसाची या जागीं योजना करावी." देव म्हणाले, " नामदेवा ! तूं वेडा तर नाहींस ? अरे, योग्य माणूस जवळच असल्यावर त्यास दुसरीकडून कोठून हुडकून आणण्याची गरजच कोठें राहिली हें तूंच सांग ? "

परदेशांत तुम्हांला मान नाहीं-You are the bastards of Humanity; कारण स्वदेशांत तुम्ही मालक नाहीं. परदेशांत तुमचा अपमान होतो, कारण स्वदेशांत तुम्ही गुलाम आहांत. तेव्हां या सर्व अपायांवर एकच तोडगा व तो म्हणजे स्वदेश स्वायत्त करणें हा होय; हें त्रिकालाबाधित तत्त्व मॅझीनीनें इटलीला शिकविलें. तुमची सामाजिक व्यवस्था शिथिल झाली आहे ? तुमच्या समाजामध्यें अन्याय घडत आहेत ? ठीक आहे, तर मग तुम्ही तुमचा स्वदेश प्रथम स्वायत्त करा म्हणजे तुमच्या समाजाची सर्व व्यवस्था तुम्हांला लावतां येईल. घरामधील निरनिराळ्या खोल्या व दिवाणखाने जर तुम्हांला तुमच्या आवडीप्रमाणें शृंगारावयाचे असतील, घराच्या भिंतीची झालेली पडझड जर दुरुस्त करावयाची असेल, तर प्रथम तुम्ही तुमचें घर ' तुमचें ' करून घ्या. तें घर जोंपर्यंत ' तुमचें ' नाहीं, तोंपर्यंत त्या घराचा शृंगार व डागडुजी तुमच्या हातून होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें ज्या देशामध्यें आपण आपले मालक झालों नाहीं त्या देशामध्यें सामाजिक दुर्दशा सर्वथैव नष्ट करणें शक्य नाहीं. मॅझिनी म्हणतो:—

Do not beguile yourself with the hope of emancipation from unjust social conditions, if you do not first conquer a country for yourself. '

म्हणून परतंत्र देशांतील लोकांचें मूलभूत कर्तव्य म्हणजे आपला देश स्वतंत्र स्वसत्ताक व स्वावलंबी करणें हें होय. या एका कार्यावर राष्ट्रांतील सर्व बुद्धि, सर्व सामर्थ्य, सर्व वृत्ति एकवटून गेल्या पाहिजेत. आपलें पार्थिव शरीर ज्याप्रमाणें आत्म्याचें घर, त्याप्रमाणें आपला देश हें परमात्म्याचें घर होय. शरीर सुस्थित स्वच्छ व निरोगी ठेवल्यावांचून ज्याप्रमाणें आत्मा सुख पावत नाहीं, त्याप्रमाणें स्वदेश स्वायत्त, संपन्न, समर्थ असल्यावांचून परमेश्वर संतुष्ट होत नाहीं. मॅझिनी हेंच निराळ्या शब्दांत सांगतो.

' Your country should be your temple. God at the summit, a people of equals at the base. '

लोकशाही हा पाया, येथून 'मानवी कर्तव्यां'ची सुरवात; परमेश्वरप्राप्ति हा त्याचा शेवट, येथें मानवी कर्तव्यांची पूर्तता. या दरम्यान अनेक प्रकारचीं कर्तव्यें उपस्थित होतात व त्यांच्या कार्याकार्यव्यवस्थितीबद्दल मनांत अनेक प्रश्न येऊं लागतात. ' किं कर्म किमकर्मेति ' या विचारानें कवयोप्यत्र विमोहित होऊन

जातात, मग इतरेजनांची काय कथा ? अशा वेळीं ह्या दोन पायऱ्यांकडे लक्ष असावें लागतें. मानवी आयुष्य हें एक कर्तव्य आहे व त्याचा आरंभ लोकशाहीपासून होऊन त्याचें परम विकसन परमेश्वरप्राप्तीमध्यें होतें. तें तसें झालें पाहिजे हाच मॅझिनीच्या शिकवणीचा सारा कटाक्ष. राजकारण म्हणजे एक जुवेबाजी, राजकारण म्हणजे एक सट्टयाचा धंदा, या राजकारणावरच्या अत्यंत हीन तऱ्हेच्या कल्पना त्यावेळीं व ह्या वेळींहि समाजांत रूढ होत्या. परंतु ह्या महर्षीनें आपल्या दिव्य विचारसरणीनें तरुण इटलीस असें शिकविलें कीं, देशाशिवाय धर्म समर्थ राहणार नाहीं व धर्माशिवाय देश परमेश्वराभिमुख बनून मानवजातीला उन्नतिप्रद होणार नाहीं. देशोद्धारासारखें पवित्र व परममंगल कार्य, परंतु त्या वेळच्या व प्रत्येक वेळच्या कुत्सित कुटिल, व स्वार्थपरायण मुत्सद्यांच्या गुंडगिरींत व पुंडपणांत ज्याला ते strategy 'मुत्सद्दीगिरी' असें संबोधितात तें परममंगल कार्य मांगल्यविहीन झालें होतें व फ्रान्सच्या प्रचंड राज्यक्रांतीनंतर प्रत्येक बंधन तटातट तुटून जाऊन जिकडे तिकडे 'बळी तो कान पिळी' 'Might is right' असा न्याय सुरू झाला होता. त्या अत्यंत निर्दयपणाच्या प्रवृत्तीस, मॅझिनीनें राजकारणाला धर्माच्या पावित्र्याप्रत नेऊन मंगलमय केलें. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर व्यक्तिवैशिष्ट्य येऊन 'माझी पूर्ण चैन हेंच माझें पूर्ण स्वातंत्र्य' असें जें व्यक्तीला, राष्ट्राला व मानव्याला अधोगतीला नेणारें निरीश्वरवादी रूक्ष तत्त्वज्ञान, त्या तत्त्वज्ञानाला मॅझिनीनें आपल्या दिव्य विचारसरणीनें नष्ट केलें व 'आयुष्य ही चैन नसून आयुष्य हें कर्तव्य आहे' असा उज्वळ ज्ञानदीप पाजळला. मॅझिनी म्हणतो,

'You have life, you have therefore, a law of life... To develop yourself, to act to live according to the law of life, is your first, nay, your only Duty.

अशा तऱ्हेनें मानवी आयुष्याचें अत्यंत उदात्त असें स्वरूप त्यानें इटालियन देशभक्तांपुढें ठेविलें व तें इतकें मोहक व अभिलषणीय होतें कीं, इटालियन देशभक्तांच्या झुंडीच्या झुंडी हें अमृतसेवन करून देशसेवेमध्यें जीव कुर्बान करण्याकरतां अहमहमिका करूं लागल्या.

असे हे मानवी कर्तव्याचे' दिव्य धडे देणारे मॅझिनीचे लेख हें केव्हांहि कोणत्याहि मानवी समाजाला अत्यंत बोधप्रद व संजीवन देणारे होतील यांत शंका नाहीं. विशेषत: जेथें जेथें म्हणून देश आणि धर्म याकरतां झगडा सुरू

आहे, तेथें तेथें हे लेख अनेक शंकाचें निरसन करतात. जेथें जेथें लोक निराश बनले असतील त्यांना त्यांना आशेचें चैतन्य देऊन प्रयत्नवादी बनवितात.

आपल्या महाराष्ट्रास या कालीं असल्या वाचनाची व त्याच्या मननाची फारच जरूरी आहे. ' किं कर्म किमकर्मेति ' या संभ्रमानें त्यांचें मन गोंधळून गेलें आहे व त्यामुळें त्यांच्या आयुष्यांतील एक आद्यकर्तव्य मागें पडत चाललें आहे.

सर्व देशामध्यें एक प्रचंड आत्मशुद्धीची लाट उसळली आहे व तिच्या योगानें आजपर्यंतची पारतंत्र्याची ' कोटयानुकोटी ' पातकें धुवून जात आहेत. मॅझिनीनें राजकारणाला धर्माचें अंग करून व धर्म राजकारणावांचून पंगु असें सिद्ध करून ' धर्म ' व ' राजकारण ' यांचा मेळ घालून दिला व आपल्या तत्त्वज्ञानाचा पहिला जयजयकार त्यानें ' त्याच देहीं त्याच डोळां ' पाहिला. आज तेंच धर्माचें राजकारण वा राजकारणाचा धर्म, त्याच्या अधिक उदात्त स्वरूपांत व अधिक सात्त्विक वृत्तींत ' अहिंसे 'चें कवच धारण करून महात्मा गांधींच्या असहकारयोगांत अवतीर्ण झाला. यावेळीं राजकारणशास्त्राचें धार्मिक स्वरूप जितकें मनाला अधिक पटेल तितकें हवें आहे; म्हणून माझे तरुण मित्र श्री.जोगळेकर यांनीं याच वेळीं मॅझिनीच्या 'मानवी कर्तव्या'चें भाषांतर महाराष्ट्रापुढें ठेविलें. त्यांच्या समयज्ञतेबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

ज्यावेळीं त्यांनीं मला प्रस्तावना लिहिण्याचें पत्रद्वारें कळविलें त्यावेळीं तें पत्र वाचतां वाचतांच मला सारखे पुढील चरण आठवूं लागले. ' काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें ! ' भगवान मॅझिनीच्या तेजस्वी लेखांना प्रस्तावना लिहिण्याची योग्यता माझ्या पामराची कसली ? मॅझिनीच्या दिव्य लेखांवरील तेजस्वी प्रस्तावना, एका कालीं, एका समर्थ लेखणीमधून गंगौघाप्रमाणें अनुस्यूत झाली होती. ती लेखणी आज देशभक्तीच्या अघोर व्रताचरणामध्यें मौन धरून बसली आहे ! मॅझिनीच्या आत्मचरित्रांतील राजकारणांतलें दिव्य संगीत, प्रस्तावनेच्या मुरलीनादामध्यें गाणारी लेखणी–आज त्या दुर्दैवी हिंदमातेच्या भाग्योदयाकरितां ध्यानस्थ होऊन बसली आहे ! मला वाटलें कीं, त्या लेखणीनेंच प्रस्तावना लिहावी. ' काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें. ' पुनः पुनः हेच चरण जिव्हाग्रीं येऊं लागले.

तत्क्षणींच जर मीं श्री. जोगळेकरांना उत्तर लिहिलें असतें तर पूर्ण नकारार्थींच लिहिलें असतें. परंतु उत्तर तेव्हांच लिहिलें गेलें नाहीं व त्याचेंच फल ही

' प्रस्तावना ' लिहिली गेली ! कारण मागाहून वाटलें कीं, भगवान् मॅझिनीच्या लेखनगंगेच्या पवित्र तीरावर बसण्याचें महद्भाग्य जर माझ्या पामर लेखणीला लाभलें तर ती पवित्र होईल ! गंगास्नानाला जाणाऱ्या पुण्यवंतांचे पाय लागून लागून ह्या लेखणीचा पादपथ विगतकिल्मिष होईल. दुसरें असें वाटलें कीं, ज्या लेखणीला गुरुस्थानीं पूजिलें व ज्या लेखणीच्या कृपाकटाक्षांनींच केवळ ही माझी पामर लेखणी कांहीं अस्फुट बोबडे बोल काढूं लागली, ती लेखणी ह्याच मॅझिनीच्या लेखांच्या अग्रभागीं एकाकाळीं स्थित झाली होती. प्रत्यक्ष तर त्या दिव्य लेखणीचा सहवास आज एक तप होऊन गेलें; अंतरला. यापुढें तपःपूर्ति झाल्यावर जो पुनः संयोगाचा प्रसंग येईल तेव्हां अगदींच कावरे बावरेपणा न वाटावा म्हणून मॅझिनीच्या लेखनगंगेच्या तटाकीं बसून त्या गुरुमाउलीचा, अप्रत्यक्ष कां होईना, सहवास घडावा म्हणून ' काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें ' हें चरण उद्गारीतच ह्या तटाकीं बसण्याचें निश्चित केलें; वाचकांचे मार्गदर्शक म्हणून नव्हे तर ह्या ज्ञानगंगेमध्यें ते विहार करतां करतां जे तुषार उडतील ते शिरोधार्य करतां यावेत म्हणून.

झालें; येथें ' मी ' असण्याचें प्रयोजनकथन झालें. माझें कार्य संपलें. शेवटीं माझ्या तरुण देशबांधवांना उत्कट विनंति आहे कीं, तुम्ही ही ' मानवी कर्तव्यें ' नीट पारखून घ्या. देशकालपरिस्थितीचें निरीक्षण करून तीं स्वतःच्या आयुष्यामध्यें निस्यंदित करा. तुम्हांलाहि तुमचा देश आहे व तो परायत्त आहे हें विसरूं नका. त्याला आजच्या लाजिरवाण्या जिण्यांतून काढून पुनरपि वैभवसंपन्न, स्वयंशासित, परमेश्वरपरायण केल्यावांचून स्वस्थ बसूं नका. आज लोकसत्तेची प्रभात सर्व जगाच्या क्षितिजावर उजाडली आहे. पंडोलांनों ! जागे व्हा; आकाशाचा अंत घेणाऱ्या आपल्या समर्थ पंखांच्या फटत्कारांनीं निनादित वातावरणांतून उड्डाण करा. म्हणजे ' स्वर्गंगेच्या शीतल तुषारांनीं हर्षपुलकित झालेल्या मंदार वृक्षांची सुमनमाला धारण केलेली स्वराज्यदेवी ' तुम्हांला आपण होऊन सामोरी येईल. मग, तरुण मित्रांनों, त्या स्वराज्यदेवीला हातीं धरून ह्या ' सुजला, सुफला, मलयज शीतला, ' आर्यमातेला भेटवा व मग स्वार्थ अभिमानानें गर्जून उठा कीं—वंदेमातरम्.

दादर मुंबई. }
ता. १५ जून १९२१ } नारायण दामोदर सांवरकर.

# प्रस्तावना.

" Life is a Mission and Duty, therefore, its Highest Law. The Path to Victory lies in Sacrifice, Constancy in Sacrifice. "

*Mazzini.*

प्रस्तुत भाषांतराची दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आणून दिल्याबद्दल, आणि 'मानवी कर्तव्यें' या भाषांतराबरोबरच माझा महाराष्ट्रसरस्वतीच्या मंदिरांत प्रथम प्रवेश झालेला असूनहि महाराष्ट्रवाचकांनीं एका अज्ञात लेखकाच्या पुस्तकास उदार आश्रय दिल्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच होणार आहेत. मराठी वृत्तपत्रकारांनीं विस्तृत व उत्तेजनपर अभिप्राय दिल्यामुळेंच मूळ ग्रंथाचें भाषांतर झालें आहे असें वाचकांस समजून आलें; म्हणून सदरहू वृत्तपत्रकारांचेहि आभार मानले पाहिजेत. मॅझिनीच्या लेखांना साजेल अशी विस्तृत, स्फूर्तिदायक व चर्चात्मक प्रस्तावना लिहून डॅा. सांवरकर यांनीं मला विशेषच उपकृत करून ठेविलें आहे. या यशाचें सारें श्रेय मॅझिनीचेंच आहे हें उघड आहे.

वर्तमानपत्रकारांनीं व मित्रांनीं केलेल्या सर्व सूचनांचा विचार करून दुसऱ्या आवृत्तींत सुधारणा केल्या आहेत. कागद, छपाई व बांधणी यांमधील सुधारणा वरवर पहाणारासहि दिसून येणार आहे. त्याचप्रमाणें मूळ मजकुरांत जागोजाग राहिलेलीं बोजड वाक्यें सरसहा बदलून भाषांतर सरळ व सोपें करावयाचा प्रयत्न केलेला आहे. ग्रंथलेखनाचा व प्रकाशनाचा अनुभव नसल्यामुळें पहिल्या आवृत्तीचे वेळीं झालेल्या अक्षम्य चुकांची माफी करणाऱ्या महाराष्ट्रीयांना ही द्वितीयावृत्ति प्रिय होईल अशी मला आशा आहे.

'मानवी कर्तव्यें' हें इटालियन राज्यक्रान्तीची प्रेरणा देणाऱ्या द्रष्टयाचें तत्त्वज्ञान आहे. इटलीसाठीं आत्मार्पण करणाऱ्या देशवीरांच्या अंत:करणांत हीं तत्वें झळकत होतीं; इटलीसाठीं रणांगणावर विजय मिळविणाऱ्या राष्ट्रवीरांच्या तरवारीच्या अग्रस्थानीं हींच तत्वें अधिष्ठित झालीं होतीं. इटलीवर जुलूम करणाऱ्या राज्यकर्त्यांवर केवळ संख्याबळाच्या जोरावर इटालियनांनीं विजय मिळविला असता तर इटालियन राज्यक्रान्तीला अद्वितीय स्थान प्राप्त झालें नसतें. इटालि-

यनांनीं रणांगणावर आपल्या मनगटाचें सामर्थ्य तर दाखविलेंच पण त्याबरोबरच या लढयांत त्यांनीं आपलें नैतिक व आत्मिक तेजहि प्रकट केलें. या क्रान्तीचें अग्रस्थान मॅझिनीकडे होतें म्हणूनच तिला असें उदात्त स्वरूप प्राप्त झालें; आणि मॅझिनीचें सर्व तत्वज्ञान मानवी कर्तव्यें या निबंधांत साररूपानें ग्रथित झालेलें आहे; म्हणूनच क्रान्तिकारक वाङ्मयांत या निबंधांचें स्थान फार उच्च आहे. इतिहासाचें सिंहावलोकन करून मॅझिनीनें निर्माण केलेलीं तत्वें त्रिकालबाधित सत्यें आहेत. देशकालपरिस्थितीच्या अनुरोधानें त्या तत्वांनुसार कार्य करण्याला पुष्कळ वाव आहे. मॅझिनीचें चरित्र, त्याचे विचार व कार्य यांचा इतिहास अत्यंत मनोवेधक व महत्त्वाचा आहे; म्हणून या विषयाचें त्रोटक विवेचन येथें करतां येणें शक्य नाहीं.

असो. मानवी कर्तव्यांची ही दुसरी आवृत्ति महाराष्ट्रास प्रिय होईल अशी आशा आहे.

मुंबई,
ता. ५।१।१९२४.

स. आ. जोगळेकर.


या पुस्तकाबरोबरच

श्री. स. आ. जोगळेकर यांचें

**जोसेफ मॅझिनीचें चरित्र**

**अवश्य वाचा**

किंमत दोन रुपये

प्रकाशक

**गणेश महादेव आणि कंपनी**

६२१ गिरगांवरोड, मुंबई



**जोसेफ मॅझिनी.**

जन्म ता. २२ जून १८०५ ]　　　　[ मृत्यू ता. १० मार्च १८७२.

# मानवी कर्तव्यें.

## १. इटालियन कामकरी वर्गास.

" महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे ।
जाणते करोनि विखरावे । नाना देशीं ॥ " रामदास.

तुमचीं कर्तव्यें काय आहेत हें मी तुम्हांस सांगणार आहें. मला जें कांहीं मनापासून खरें वाटतें तेंच मी सांगणार आहें. परमेश्वर, मानवजात, पितृभूमि व कुटुंब हीं सर्व अत्यंत पवित्र आहेत असें आपणां सर्वांना वाटतें आणि याच गोष्टींसंबंधानें मी बोलणार आहें. मी तुमच्याशीं प्रेमानें बोलत आहे, तुम्हीहि माझें म्हणणें प्रेमानें ऐकून घ्या. अनेक वर्षें अभ्यास करून व कष्ट सोसून मी माझ्या मतांच्या सत्यतेची खात्री पटवून घेतली आहे. जीं मनुष्यमात्राचीं कर्तव्यें आहेत म्हणून मी सांगणार आहें तीं पाळण्यासाठीं आजवर मी अटोकाट यत्न केले आहेत व यावज्जन्म करीन. माझे हातून चुका होतील; पण मी जें करतों त्याला माझें अंतःकरण साक्ष आहे. मी माझी स्वतःची फसवणूक करून घेईन पण तुम्हांला मात्र खास फसवणार नाहीं, म्हणून भ्रातृभावानें माझें म्हणणें ऐकून घ्या. मग मी जें बोलतों तें खरें आहे कीं नाहीं, हें तुमचें तुम्ही ठरवा; जर तें खोटें आहे असें तुम्हांला आढळून आलें तर त्याचा त्याग करा; पण मी जें बोलत आहें तें खरें आहे अशी जर तुमची खात्री पटली तर मग माझेमागून या. व मी सांगतों तसें वागा. दुर्दैवानें आपल्या हातून चुका होतील व ज्यांचें हातून

चुका घडतील त्यांचेबद्दल आपणांस सहजच वाईट वाटेल; पण सत्य माहीत असूनसुद्धां त्याप्रमाणें वर्तन न करणें हा गुन्हा आहे; आणि स्वर्गांत किंवा मृत्युलोकांत अशा गुन्हेगारांचा धिःकारच होत असतो.

तुमच्या हक्कांचें विवेचन करावयाच्या अगोदर मी तुमच्या कर्तव्यांची मीमांसा कां करीत आहें ? जाणूनबुजून अथवा अजाणपणें सारे लोक तुम्हांवर जुलूम करीत आहेत, मनुष्याचे नैसर्गिक हक्कहि तुम्हांला मिळत नाहींत, फक्त हालअपेष्टा तुमच्या वांटयाला येतात, सुख म्हणून जें मानण्यांत येतें तें इतर वर्गांनाच मिळतें; अशा परिस्थितींत मी तुम्हांला स्वार्थत्यागाचा उपदेश कां करतों आणि अर्थसाधनाचा कां करीत नाहीं ? तुम्ही सच्छील व्हा, नैतिक उन्नति साधा, शिक्षण मिळवा असें सांगतों व ऐहिक सुखें प्राप्त करून घ्या असें कां सांगत नाहीं ? या प्रश्नाचा प्रथम निवाडा लावला पाहिजे; कारण आज युरोपांत प्रचलित होऊं पाहणाऱ्या विचारपद्धतींत आणि आमच्या मतांत जो फरक आहे तो येथेंच दिसून येणार आहे; शिवाय अपेष्टा भोगणाऱ्या कामकऱ्यांच्या भणाणलेल्या डोक्यांतहि हाच प्रश्न प्रथम उपस्थित होतो.

" आम्ही गरीब, ताबेदार आणि दुःखोकष्टी आहों; आमची स्थिति कशी सुधारेल, आम्ही बंधमुक्त व सुखी कसे होऊं याविषयीं चार शब्द सांगा. आम्ही सदासर्वकाळ याच स्थितींत कुचंबत राहणार कीं आम्हांलाहि सुखासमाधानाचे चार दिवस येणार आहेत हें आम्हांला सांगा. आम्हांला एकाद्या यंत्रासारखें वागवणाऱ्या आमच्या धन्यांना व आमचें सर्व सुख हिरावून घेणाऱ्या वरच्या वर्गांना या कर्तव्यांचा उपदेश करा. आम्हांला आमचे हक्क काय आहेत ते समजावून द्या, ते मिळवावयाचे मार्ग दाखवून द्या, आम्हों सामर्थ्य कसें संपादन करावें हें आम्हांला सांगा. आम्ही जिवंत माणसें आहोंत एवढें तरी एकदां मान्य होऊं द्या आणि मग आमचीं कर्तव्यें काय आहेत व आम्हीं स्वार्थत्याग कसा करावा याबद्दल आमच्याशीं बोला. "

गेल्या पन्नास वर्षांत प्रगति आणि सुस्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं व एकतंत्री किंवा आनुवंशिक राज्यपद्धतीविरुद्ध जे प्रयत्न करण्यांत आले ते सर्व "मानवजातीचे हक्क " या तत्त्वासाठीं केले गेले. स्वातंत्र्य हें साधन व सुस्थिति हें जीवनाचें साध्य ह्या दृष्टीनें करण्यांत आलेली फ्रान्समधील राज्यक्रांति, तदनंतर झालेल्या व तिचेंच अनुकरण करणाऱ्या सर्व राज्यक्रान्त्या या "मानवी हक्कांच्या

जाहीरनाम्यामुळें" *झाल्या. ज्या विद्वानांनीं हा जाहीरनामा तयार केला त्यांच्या कार्याचा पाया स्वतंत्रतेच्या आणि मनुष्यमात्राच्या हक्कांच्या तत्त्वांवर होता. त्यावेळचे सारे विचारी लोक म्हणत कीं मनुष्याचा जन्म सुखासाठीं आहे आणि सुख प्राप्त करून घ्यावयासाठीं हव्या त्या मार्गाचा अवलंब करावयाचा मनुष्यमात्रास हक्क आहे; एखाद्या व्यक्तीच्या सुखाच्या शोधांत कोणालाहि अडथळे घालावयाचा हक्क नाहीं; सुखप्राप्तीच्या मार्गावर येणारे सर्व अडथळे उधळून द्यावयाचा हक्क प्रत्येक मनुष्याला आहे. हे सर्व अडथळे दूर करावयाचा प्रत्येकानें यत्न केला, देशादेशांना स्वातंत्र्य प्राप्त झालें, कांहीं देश कित्येक वर्षेपर्यंत स्वतंत्रतेंत नांदले, कांहीं अझूनहि स्वतंत्र राहिले आहेत; पण जनतेची स्थिति सुधारली आहे काय ? तुम्हांला आतां चांगले दिवस येतील अशी ज्यांना आशा लावण्यांत आली होती त्या लक्षावधि मजुरांना त्या सुस्थितीचा अंश तरी प्राप्त झाला आहे काय ?

नाहीं, लोकांची स्थिति सुधारली नाहीं; इतकेंच नव्हे तर प्रत्येक देशांत ती दिवसानुदिवस अधिकाधिक वाईट होऊं लागली आहे. आपल्या देशांत तर महागाई अनावर झाली आहे, कामधंद्यामध्यें मजुरीचा दर उतरत चालला आहे, लोकसंख्या मात्र झपाट्यानें वाढत आहे. जवळ जवळ हरएक देशामध्यें कामकऱ्यांचा जन्म जास्त संकटमय होत चालला आहे; भांडवलवाले व कामकरी यांमध्यें वारंवार लढे उत्पन्न होऊन हजारों लोकांना वरचेवर उपासमारींत दिवस काढण्याचे प्रसंग येत आहेत. एका देशांतून दुसऱ्या देशांत पोटासाठीं जाणारांची संख्या, युरोपमधून जगाच्या पाठीवर कामधंद्यासाठीं गेलेल्या लोकांची संख्या आणि अनाथांना मदत करणाऱ्या संस्थांची संख्या या सर्व आंकड्यांमध्यें दरसाल वाढ होत आहे, हा वरील निष्कर्षाला महत्त्वाचा पुरावा आहे. शिवाय या आंकड्यांवरून असेंहि सिद्ध होतें कीं, जनतेचें लक्ष अनाथांकडे जास्त

* फ्रेंच राज्यक्रान्तीचे पूर्वी दर्जा व मालमता यांच्या अनुरोधानें समाजाची व्यवस्था लावण्यांत आली होती. फ्रेंच क्रान्तिकारकांनीं मानवी हक्क हें तत्त्व निर्माण केलें. मनुष्य या दृष्टीनें सर्वांचे हक्क समसमान आहेत ह्या तत्त्वाच्या पायावर समाजाची नवी घटना निर्माण करावयाचा क्रान्तिकारकांनीं प्रयत्न केला; त्यांनीं मानवी हक्कांचा मसुदा जाहीर केला, मात्र त्या हक्कांना मूर्तस्वरूप द्यावयाचें कार्य हातीं घ्यावयास त्यांना वेळच मिळाला नाहीं.

लागत चाललें आहे; पण ज्या वर्गाला मदत करावी अशी जनतेची प्रामाणिक इच्छा आहे त्याच वर्गामध्यें गरीबीचा जास्त जास्त प्रादुर्भाव होत चालला आहे—यावरूनच हें काम किती अवाढव्य आहे याची योग्य कल्पना येते.

गेल्या पन्नास वर्षांमध्यें समाजाची संपत्ति वाढली आहे आणि सुखसाधनांचीं समृद्धि झाली आहे. व्यापारधंद्याला संघटित स्वरूप आलेलें नाहीं तरी अनेक अडथळ्यांशीं टक्कर देऊन त्याची वाढच होत आहे. प्रवास व मालाची वाहतूक कमी वेळांत, थोडया खर्चांत व जास्त सुरक्षितपणानें होऊं लागली आहे म्हणून मालाची किंमत उतरूं लागली आहे. मनुष्याच्या नैसर्गिक हक्कांची कल्पना आज सर्वमान्य झालेली आहे; ज्या लोकांना कृतीमध्यें या कल्पनेचा स्वीकार करावयाचा नाहीं तेसुद्धां ढोंगीपणानें ती तोंडीं मान्य करीत आहेत. मग लोकांची स्थिति कां सुधारली नाहीं ? युरोपांत उत्पन्न झालेला माल युरोपच्या रहिवाशांमध्यें वांटून दिला जाण्याऐवजीं तो अगदीं थोडया गर्भश्रीमंतांचे हातांतच कां सांठून राहतो ? व्यापार आणि उद्योगधंदा यांमध्यें जें नवीन चैतन्य उत्पन्न झालें त्यामुळें अनेकांना सुस्थिति प्राप्त व्हावयाच्याऐवजीं अगदीं थोडक्यांना मनमुराद चैन भोगावयास सांपडावी, असें कां होतें ?

परिस्थितीचें परीक्षण सूक्ष्मपणें करणारांस या प्रश्नाचें उत्तर स्पष्टपणें आढळून येईल. मनुष्याला ज्या प्रकारचें शिक्षण मिळतें तशीच त्याची वर्तणूक असते. आतांपर्यंतच्या क्रांतिकारकांच्या कृति व्यक्तिमात्राचे हक्क या तत्वावर झाल्या; राज्यक्रांत्यांमुळें अनेक देशांना स्वातंत्र्य प्राप्त झालें; व्यक्तिस्वातंत्र्य, शिक्षणस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, व्यापारस्वातंत्र्य, फार काय, प्रत्येकाला प्रत्येक बाबतींत स्वातंत्र्य मिळालें. पण ज्यांचेपाशीं आपल्या हक्कांचा उपयोग करून घ्यावयाचीं साधनें नाहींत त्यांना त्या हक्कांचा उपयोग तरी काय आहे ? ज्या लोकांना शिकावयास वेळ नाहीं व शिकण्यापासून फायदाहि नाहीं त्यांना शिक्षणस्वातंत्र्याचा काय उपयोग ! ज्यांना भांडवल नाहीं व पतहि नाहीं त्यांना व्यापारस्वातंत्र्याचा काय उपयोग ? ज्या ज्या देशांत या तत्वांचा पुकारा झाला तेथें एका लहानशा वर्गाकडे सारी जमीन, पत व भांडवल यांची मालकी होती व इतरांकडे त्यांच्या मनगटाशिवाय दुसरें कांहींच भांडवल नव्हतें, म्हणून पहिल्या वर्गांतले लोक सांगतील त्या अटींवर कसलेहि कंटाळवाणें काम हवा तितका वेळ केवळ पोटासाठीं करणें त्यांना भाग होतें. या लोकांना

पोटासाठीं ही अशी तडफड करावी लागत होती; अर्थातच त्यांना स्वातंत्र्याची कल्पना अगदीं मृगजळासारखी वाटत होती. ही कल्पना त्यांचे मनांत उत्पन्न करून देण्यासाठीं त्यांना जास्त रोजमुरा, कमी काम, मोफत व सक्तीचें शिक्षण, कामाच्या साधनांची विपुलता व चांगलें काम करणाराला जास्त पगार हीं सर्व भांडवलवाल्या लोकांकडून पुरविलीं जाणें आवश्यक होतें; पण हें तरी त्यांनीं कां करावें ? सुस्थिति हीच आयुष्याची इतिकर्तव्यता नाहीं काय ? इतरांच्या बऱ्यासाठीं त्यांनीं आपली चैन काय म्हणून कमी करावी ? ज्यानें त्यानें स्वतः-साठीं श्रम करावें; व्यक्तीचे हक्क व्यक्तीनें बजावावें; एकदां व्यक्तिस्वातंत्र्य जाहीर केलें कीं मग समाजाचें कर्तव्य संपलें. परिस्थितीमुळें कोणा व्यक्तीला आपल्या हक्कांचा फायदा घेतां आला नाहीं तर या अपयशाची जबाबदारी दुसऱ्या कोणावरहि लादतां येत नाहीं.

वरिष्ठ वर्गांतील लोकांनीं असें म्हणावें हें अगदीं साहजिकच आहे आणि ते असेंच म्हणाले. लक्ष्मीची कृपादृष्टि असलेल्या लोकांचे मनांत गरीबांबद्दल अशा प्रकारची प्रवृत्ति उत्पन्न होते व मग समाजांतला प्रत्येक मनुष्य इतर सर्वांशीं याच भावनेनें वागावयास लागतो. स्वतःचे हक्क व स्वार्थ यांपलीकडे कोणी पाहूं इच्छीत नाहीं; वेगवेगळ्या व्यक्तींच्या परस्परविरोधी हक्कांमध्यें युद्ध जुंपतें तेव्हां रक्तपात होत नाहीं पण सोनेंनाणें व लबाडी यांचीं देवघेव मात्र मोठया प्रमाणावर होते. हें युद्ध रणांगणावरल्या युद्धासारखें धर्मयुद्ध नसतें पण तितकेंच हानिकारक मात्र असतें. येथेंहि ज्यांचेपाशीं युद्धाचीं साधनें व कौशल्य हीं कमी असतात त्यांचा चुराडा उडतो. ह्या अखंड चालू असणाऱ्या युद्धामुळें मनुष्याचे मनांत अहंकार व हव्यास उत्पन्न होतो. हव्या त्या धर्ममतांवर विश्वास ठेवण्याचें धर्ममतस्वातंत्र्य लोकांनीं मिळविल्यामुळें श्रद्धेचा जिवंतपणा नष्ट झाला; हवें त्यानें हवें तें शिकवावें या स्वातंत्र्यामुळे नैतिक अनाचार घडून आले; समाजाला कांहीं बंधन उरलें नाहीं, धर्मनिष्ठा लयाला गेली, ध्येयाची एकवाक्यता नाहींशी झाली, चैनबाजी हाच लोकांचा धंदा होऊन बसला, ज्यानें त्यानें आपलेंच घोडें पुढें ढकलावयास सुरवात केली. मग असें वर्तन करीत असतांना आपला कोणी भाई आपण चिरडीत आहों कीं काय याचा विचारहि त्यांचे मनांत येईनाला झाला; लोक नांवाला मात्र भाऊ भाऊ राहिले, वस्तुतः सारे एकमेकांचे शत्रु बनले; हक्कांच्या तत्वामुळें आज आपण या स्थितीला येऊन पोहोंचलों आहों.

व्यक्तीला हक्क असलेच पाहिजेत. पण जेव्हां व्यक्तीव्यक्तींच्या हक्कांत विरोध उत्पन्न होतो तेव्हां त्यांची तडजोड करावयास हक्कांपेक्षां उच्चतर व मनाला पटणारी अशी एखादी शक्ति जरूर नाहीं काय? राष्ट्राचे हक्क व व्यक्तींचे हक्क यांमध्यें लढा उपस्थित झाला तर त्याचा निवाडा कोणामार्फत करून घ्यावयाचा? सौख्यसाधन हेंच प्रत्येक मनुष्याचें ध्येय समजावयाचें तर मजूर आणि भांडवलवाले यांच्यामधलें भांडण कसें सोडवावयाचें? जीवनार्थ कलहांत जिवंत राहणें हाच जर जीवनाचा मूळ हेतु असेल तर राष्ट्राच्या कल्याणासाठीं व आपल्या बांधवांसाठीं आत्मसमर्पण करावयास कोण व कसा तयार होईल? ज्या लोकांचीं अशीं मतें असतात त्यांची राष्ट्राबद्दल काय कल्पना असते? राष्ट्र म्हणजे एक जमिनीचा तुकडा कीं, ज्यावर आपले हक्क सुरक्षित राहतात; ज्या अनेक व्यक्ति परस्परांचे हक्क परस्परांच्या मदतीनें संरक्षित व्हावे म्हणून आपसांत करारमदार करून एकत्र निवास करतात त्यांच्या समूहाचें नांव समाज—अशीच त्यांची समाजाबद्दल कल्पना असते. पन्नास वर्षें लोकांना हीं मतें शिकविल्यानंतर मग त्यांना सांगावयाचें कीं समाजाच्या कल्याणासाठीं तुम्ही आपल्या हक्कांचा त्याग करा; जरूर पडेल तर जनतेच्या कल्याणासाठीं अविश्रांत श्रम करावयास, तुरुंग व हद्दपारी भोगावयास तयार व्हा; आणि त्यांनीं हें ऐकून तसें वर्तन करावयाचें, हें शक्य तरी आहे काय? सुखप्राप्ति हेंच जीवनाचें ध्येय, असें लोकांना शिकविल्यानंतर तुम्ही देशासाठीं आपल्या सुखावर व जीवावरसुद्धा पाणी सोडावयास तयार व्हा, हें तुम्ही त्यांना सांगू शकाल काय? ऐहिक सुख, संपत्ति व सामर्थ्य ह्यांचा लोभ त्यांचे मनांत उत्पन्न केल्यावर त्याच लोभापासून आपल्या बांधवांना इजा होत आहे हें दिसून येतांच पुढें केलेला हात मागें घ्यावा अशी कल्पना त्यांचे मनांत येणें शक्य आहे काय?

इटालियन कामकरी लोकांनो, माझ्या मनांत हे विचार एकाएकीं आलेले नाहींत. त्यांना वस्तुस्थितीचा आधार आहे. आपल्या काळाचा इतिहास हेंच सांगत आहे; ह्या इतिहासाच्या पानांवरून रक्ताचे थेंब गळत आहेत आणि हें रक्त जनतेचें आहे. ज्या लोकांनीं १८३० च्या राज्यक्रांतीचें रूप बदलून टाकून तिचा उपयोग नुसताच अधिकाऱ्यांच्या बदलाबदलींत केला, तुम्हाला मदत करणाऱ्या फ्रेंच सैनिकांच्या प्रेतांची रास करून तिच्यावरून स्वतः जे अधिकारारूढ झाले, त्यांनाच विचारा कीं मी बोलत आहें हें खरें आहे कीं

नाहीं? १८३० च्या पूर्वीच्या सर्व घडामोडी हक्क याच तत्वामुळें घडून आल्या. या तत्वाचा अंगीकार करणारांपैकीं कोणाचीहि कर्तव्यतत्वावर श्रद्धा नव्हती. आज तुम्ही त्यांना फितूर व धर्मभ्रष्ट म्हणतां. ते आपल्या तत्वांपासून ढळले नाहींत पण त्यांचीं तत्वेंच अगदीं भ्रष्ट होतीं; त्यांनीं दहाव्या चार्लसच्या[१] राज्यपद्धतीला विरोध केला कारण त्यांचा वर्ग व त्यांचे हक्क हे त्या पद्धतीमुळें दडपले जात होते. आपल्याला जितकें सुख असावें असें वाटतें तितकें मिळत नाहीं हें पाहून त्यांनी बंड केलें. हक्कांसाठीं भांडणारांपैकीं कित्येकांचा विचारस्वातंत्र्यासाठीं छळ करण्यांत आला; कर्तृत्वाचे लोक बाजूला ठेवून हलक्या बुद्धीच्या व तोंडपुज्या लोकांना सरकारी जागांवर नेमण्यांत आले, हें पाहून त्यांच्या मनांत लोकांवर होत असलेल्या जुलुमांबद्दल संताप उत्पन्न झाला. नंतर त्यांनीं मनुष्यांच्या हक्काचें विवेचन धीटपणानें करावयास आरंभ केला. कांहीं काळानंतर त्या वर्गाचे बौद्धिक व राजकीय हक्क मान्य करण्यांत आले. त्यांना हुद्याच्या जागा मिळूं लागल्या, त्यांचा सुखाचा मार्ग मोकळा झाला; लगेच ते जनतेचीं दु:खें विसरले. जे लाखों लोक शिक्षणानें व आकांक्षामध्यें त्यांचेपेक्षां कमी दर्जाचे होते आणि जे आपल्या व वेगळ्या प्रकारच्या हक्कांसाठीं वेगळ्या प्रकारच्या सुखप्राप्तीसाठीं भांडत होते त्यांचा त्यांना विसर पडला; त्यांनीं आपलें मन शांत केलें व यापुढें दुसऱ्या कोणाच्या भानगडींत पडावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. मग त्यांना राष्ट्रद्रोही म्हणण्यांत काय अर्थ आहे? त्यापेक्षां त्यांच्या तत्वांना राष्ट्रद्रोही म्हणावयास काय हरकत आहे?

ह्या भानगडी एकीकडे चालल्या असतांना लामेनेस[२] ह्या नांवाचा एक तत्व-

---

१ नेपोलियनला एल्बा बेटांत घालवून दिल्यानंतर व्हिएन्नाच्या मुत्सद्दीपरिषदेनें फ्रान्सचं राज्य बूर्बोन घराण्यांतील दहावा चार्लस याच्या हवालीं केलें. या दुर्बल राजाच्या अमदानींत फ्रान्सची फार दुर्दशा झाली. १८३० सालीं खवळलेल्या लोकमताचा जोर पाहून चार्लसनें राज्यत्याग केला; त्याचेमागून लुई फिलिप राज्यावर आला. लोकशाहीचें तिरंगी निशाण अंगाभोंवतीं गुंडाळणाऱ्या या राजाच्या अनुयायांचे हातीं अधिकारसूत्रें येतांच त्यांनीं साधारण जनतेच्या हक्कांकडे व कल्याणाकडे दुर्लक्ष केलें.

२ लामेनेस:–(१७८२–१८५४) फ्रेंच धर्मगुरु: प्रथम रोमन कॅथलिक पंथाचें पुनरुज्जीवन करूं इच्छिणारा पाद्री (१८११) मग ' परमेश्वर व स्वातंत्र्य '—

घेत्ता फ्रान्समध्यें आपलें लेखनाचें कार्य करीत होता. या महात्म्याला आपण विसरतां कामा नये. हक्कांची मागणी करणाऱ्या लोकांपेक्षां तो अधिक कर्तृत्ववान् होता. तो त्यावेळीं इटली राष्ट्राविरुद्ध होता; तरी कर्तव्य या तत्वावर त्याची श्रद्धा होती. लोककल्याणासाठीं, सत्याच्या शोधासाठीं व विजयासाठीं, मनुष्यानें आत्मयज्ञास तयार असलें पाहिजे असें त्याचें मत होतें. त्यानें आपल्या भोंवतालच्या लोकांचा व परिस्थितीचा मनःपूर्वक अभ्यास केला होता; लोकप्रियतेमुळें तो चढून गेला नाहीं किंवा कार्यवैफल्यामुळें तो निराश झाला नाहीं. लोककल्याणार्थ त्यानें शोधून काढलेला एखादा मार्ग फसे तेव्हां तो दुसरा मार्ग शोधून त्याचा अवलंब करी. अशा अनेक प्रसंगांनंतर त्याला उमगून आलें कीं कर्तव्यनिष्ठा हा एकच मार्ग कार्यक्षम आहे; त्याला असेंहि दिसून आलें कीं, जनतेचे नेते म्हणवून घेणारांपेक्षां खुद्द जनताच जास्त निष्ठावंत व सच्छील असते; हें त्याला आढळून आल्यावर तो आपल्या कार्यांत सामील झाला. या मनुष्याकडे पाहिल्यानंतर तुम्हांला हक्कासाठीं भांडणारा व कर्तव्यासाठीं लढणारा या दोन वृत्तींच्या माणसांमधला फरक तेव्हांच दिसून येईल. हक्कांसाठीं लढणारांना व्यक्तिगत हक्क प्राप्त झाले कीं त्यांच्या कार्याचा सारा जोर ओसरून जातो; पण कर्तव्यनिष्ठेची शपथ घेणाराची कार्यतत्परता जन्मभर प्रचलित राहते.

आणि ज्या देशांतले लोक गुलामगिरींत पूर्णपणें जखडलेले असतात, तेथें या झटापटींत फार भयंकर संकटें येतात. परिस्थिति सुधारावयाच्या कसल्याहि प्रयत्नांत तेथें वीरांना आपलें रक्त ओतावें लागतें; तेथें अन्यायाविरुद्ध होणारी चळवळ मुद्दामच गुप्त ठेवावी लागते; अशी चळवळ करणारांना लोकप्रियतेचें अथवा स्तुतिवर्षावाचें कोरडें समाधानहि मिळत नाहीं, अशा देशांमध्यें वैयक्तिक हक्कांच्या तत्वानें लोकांचें चैतन्य जागृत होईल काय?

—या तत्वानुसार धार्मिक लोकशाही स्थापन करूं पाहणारा प्रचारक (१८३०), आणि नंतर शुद्ध लोकशाहीचा पुरस्कर्ता (१८३७) असें लामेनेसचें आयुष्य परिवर्तन पावत गेलें. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या महातत्वांच्या प्रमुख प्रचारकांमध्यें लामेनेसची गणना होते. १८४० सालीं एका जहाल लेखाबद्दल त्याला एक वर्षाची शिक्षा झाली. लामेनेसचे ग्रंथ फ्रान्समध्यें विख्यात व लोकप्रिय आहेत.

सर्व विचारपद्धतींमधल्या ठोकळ उदाहरणांकडेच पहा. कांहीं विशिष्ट व्यक्ति प्रत्येक ठिकाणीं अपवादात्मक या असावयाच्याच. अन्यायाविरुद्ध उसळणाऱ्या तरुण रक्ताचा आणि उचंबळणाऱ्या मनोवृत्तींचा पहिला बहर ओसरल्यानंतर लोककार्यांत वारंवार अपयश येऊं लागतें तेव्हां निरुत्साह होऊन जनतेनें या युद्धांतून माघार कां घेऊं नये ? आपल्या बांधवांसाठीं धडपड करीत असावयाचें आणि नेहमीं तुरुंगवास, हद्दपारी अथवा फांशी यांची वाटच पहात आयुष्य काढावयाचें—यापेक्षां कोणत्याहि दर्जाचा स्वस्थतेचा आयुष्यक्रम कोणींहि कां स्वीकारूं नये ? आज बरेच इटालियन लोक हेंच करीत आहेत, कारण त्यांच्या डोक्यांत त्या जुन्या फ्रेंच कल्पना अझून जिवंत आहेत. ही फार खेदाची गोष्ट आहे हें खरें आहे, पण ज्या तत्त्वानुसार ते आज वागत आहेत तेंच मुळापासून उपटून टाकल्याशिवाय ही परिस्थिति कशी बदलणार ? संकटें व अपयश यांमुळें मनुष्याला उलटा जास्त जोर चढला पाहिजे हें त्यांच्या हिशोबी डोक्याला कसें पटवून द्यावयाचें ? थोडे दिवस कष्ट सोसा अशी विनंति करणें व ती मान्य होणें हें साधें काम आहे; पण आपल्या बांधवांचे कल्याणासाठीं प्रत्येकानें जन्मभर स्वार्थत्याग करीत राहणें जरूर आहे हें त्या हक्कांसाठीं झगडणाऱ्या व सुखासाठीं तळमळणाऱ्या मनुष्याला कसें पटवून द्यावयाचें ? कित्येकवेळां कांहीं कवडीमोल हक्क मिळविण्यासाठीं जबर किंमत द्यावी लागते; अशा प्रसंगीं हट्टाला पेटून हवें तें मोल देण्याची तयारी करण्यापेक्षां त्या हक्कांचा नाद सोडून देणें हेंच अधिक सोयीचें नाहीं काय ?

सार्वजनिक कार्यांमध्यें भाग घेणें व समाजसुधारणेसाठीं खटपट करणें इष्ट आहे अशी फक्त हक्क या तत्वावर विश्वास ठेवणाऱ्या मनुष्याची खात्री करून देणें शक्य आहे काय ? समाजाचे मताविरुद्ध वागण्याचें ठरवून कोणी म्हणूं लागला, कीं मी समाजनियमनाचे ठराव जुमानीत नाहीं, माझी प्रवृत्ति मला दुसऱ्याच कामाकडे खेंचीत आहे, माझ्या नैसर्गिक शक्तींची वाढ करणें हा माझा पवित्र व अनतिक्रमणीय हक्क आहे, म्हणून मी साऱ्या जगाबरोबर लढाई पुकारावयास सिद्ध आहे—तर केवळ हक्कांवर विश्वास ठेवणाऱ्या त्या मनुष्याला तुम्ही काय उत्तर देऊं शकाल ? त्याच्या मनास येत नाहींत व त्याच्या आकांक्षांशीं जुळत नाहींत असे कायदे केवळ मताधिक्याच्या जोरावर मंजूर करवून ते कायदे त्यानें पाळलेच पाहिजेत असें त्याला सांगावयाचा तुम्हांला काय हक्क आहे ? अशा कायद्यांचा तो भंग करील तर त्याला शिक्षा कराव-

याचा तुम्हांला काय हक्क आहे ? प्रत्येक व्यक्तीचे हक्क अगदीं सारखे असतात; संघटनेमुळें समाजाला अधिक हक्क प्राप्त होत नाहींत. व्यक्तीपेक्षां समाजाला शक्ति जास्त असते, हक्क जास्त नसतात; एका व्यक्तीनें आपली इच्छाशक्ति आपल्या बांधवांच्या–मग ते बांधव त्यांच्या राष्ट्रांतील असोत वा मानवजातींतील असोत—इच्छाशक्तींत सामील करणें इष्ट आहे हें तुम्ही त्याला कसें सिद्ध करून दाखविणार ? तुरुंग व सूळ यांच्याच जोरावर काय ? आजपर्यंत सर्वत्र याच मार्गाचा अवलंब करण्यांत आला आहे; पण हा मार्ग शांतताभंगाचा आहे, आणि आपणांस तर शांतता पाहिजे; हा मार्ग जुलूमजबरदस्तीचा आहे, आणि आपणांस तर शिक्षणाचा मार्ग पाहिजे आहे.

शिक्षण या महत्वाच्या शब्दांत आमच्या सर्व तत्वांचा समावेश होतो. चालू शतकांतला मुख्य प्रश्न शिक्षणाचा आहे. आसुरी मार्गाचा उपयोग करून नवयुगाची संस्थापना करणें हें आपलें कार्य नाहीं; अशा पद्धतीनें स्थापिलेल्या नवयुगांत पूर्वीच्या काळापेक्षां जास्त चांगली व्यवस्था असली तरीहि ती नेहमीं जुलमाच्याच जोरावर चालू ठेवावी लागते, ह्याचा आपणांस विसर पडून चालणार नाहीं. सुधारणेच्या प्रत्येक प्रयत्नाला प्रतिरोध करणाऱ्या दानवी शक्तीला आपण प्रथम उलथून पाडलें पाहिजे आणि मग राष्ट्राला आपलें मत मनमोकळेपणें प्रदर्शित करतां येईल तेव्हां नव्या युगाची ज्या प्रकारची नवी मांडणी झाली असतां जनतेचें कल्याण होईल अशी आपली समजूत असेल ती पद्धत जनतेच्या पसंतीसाठीं तिजपुढें मांडण्यांत येईल आणि त्या नव्या युगपद्धतीचा विकास व्हावा व लोकांनीं तिजप्रमाणें वागावें म्हणून लोकमत शिक्षित करण्यांत येईल. हक्कांच्या तत्वाच्या अनुयायांना संकटें हाणून पाडतां येतील, पण राष्ट्राच्या घटकांना एकजीव करणें व ही एकी चिरस्थायी करणें हें मात्र त्यांच हातून घडणें शक्यच नाहीं. सुखाला ध्येय मानणारे लोक अहंमन्य असतात. ते नवीन युगाच्या वातावरणांत आपले जुने मनोविकार उत्पन्न करतील व नवी पद्धत थोडक्याच काळांत पार रसातळाला नेतील. म्हणून या तत्वापेक्षां उच्च, लोकांना सुस्थितीप्रत नेईल, त्यांना एकनिष्ठा व स्वार्थत्याग शिकवील, एकाच व्यक्तीवर अवलंबून न राहतां आपल्या बांधवांशीं निगडित होऊन सर्वांच्या एकीभूत सामर्थ्यावर त्यांची निष्ठा उत्पन्न करील असें एक शिक्षण–तत्व आपणांस पाहिजे आहे; आणि हें तत्व म्हणजे कर्तव्यतत्व होय. आपण लोकांची खात्री पटवली पाहिजे कीं, आपण एकाच

परमेश्वराचीं लेकरें आहोंत आणि म्हणून प्रत्येकानें स्वत:साठीं नव्हे तर आपल्या बांधवांसाठींहि श्रम केले पाहिजेत, सुखप्राप्ति हें मानवी जीविताचें ध्येय नाहीं तर आपण स्वत: इतर लोकांसह दिवसानुदिवस जास्त चांगला आयुष्यक्रम स्वीकारूं अशा प्रकारें राहणें हेंच जीवनाचें धोरण असलें पाहिजे; अन्याय व प्रमाद यांचेविरुद्ध आपल्या बांधवांच्या कल्याणासाठीं परिश्रम करणें हा व्यक्तीचा नुस्ता हक्कच नाहीं तर हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे; हें व्रत पाळण्याच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारचा आळस करणें हें महत्पाप आहे आणि कर्तव्यपालन हें आजन्म चालविलें पाहिजे अशा प्रकारचें व्रत आहे.

इटालियन मजूर लोकांनों, माझ्या बंधूंनों, मी काय म्हणत आहें हें नीट समजावून घ्या. माझा मुद्दा हा आहे कीं नुस्त्या हक्कांसाठीं भांडत राहण्यापासून चिरस्थायी सुधारणा होत नाहीं; तुम्ही आपल्या हक्कांचा त्याग करा असें माझें म्हणणें नाहीं. कर्तव्यपालनाशिवाय हक्कांचा उद्भवच होत नाहीं—आणि म्हणूनच हक्क मिळविण्यासाठीं कर्तव्यपालनापासूनच आरंभ झाला पाहिजे. सुखप्राप्तीच्या लोभांत गुरफटून राहिल्यानें माणसामध्यें अहंकार उत्पन्न होतो असें मी म्हणतों याचा अर्थ सुखाचा अजिबातच त्याग करा असा नाहीं–त्याचा अर्थ एवढाच कीं सुख हें साधन म्हणून नव्हे तर साध्य म्हणून मनुष्य त्याचेमागें लागतो तेव्हां यापासून फार घातुक परिणाम होतात. रोम बादशाही अंमलाखालीं गेलें तेव्हांपासून रोमन लोक भाजीभाकरी व वेगवेगळया प्रकारचे तमाशे इतक्यावरच तृप्त होऊं लागले, यामुळें ते अत्यंत हीन स्थितीला गेले; त्यांना जुलमाची इतकी संवय झाली होती कीं रोमचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यावर उत्तरेकडल्या रानटी लोकांच्या अमलाखालीं राहण्यामध्यें त्यांना कांहींच कमीपणा वाटेनासा झाला. फ्रान्समध्यें व इतरत्र समाजाच्या प्रगतीला विरोध करणारांकडून लोकांना चैनीची चटक लावण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत; चालू परिस्थितींत बदल होणें हें केव्हांहि वाईटच असा हटाग्रह जनतेच्या मनांत उत्पन्न करण्याचा यत्न करण्यांत येत आहे. तेव्हां आपल्या शत्रूंना आपणच मदत करणें इष्ट आहे काय ? आर्थिक प्रगति हें राष्ट्रीय प्रगतींतील एक महत्वाचें अंग आहे, ती साधावयाचा शक्य तो यत्न आपण करूं; पण मनुष्याला छान छान कपडे व फक्कडशीं घरें असणें आवश्यक आहे म्हणून आर्थिक प्रगति झाली पाहिजे असें मात्र नव्हे; दिवसभर काम व नेहमीं पोटाची चिंता हीं मागें लागलीं असतांना मनुष्याला आपली नैतिक उन्नति करून घेतां येत नाहीं

च जीवनाचा गंभीरपणा भासत नाहीं; म्हणून आर्थिक प्रगतीसाठीं राष्ट्रानें यत्न केला पाहिजे. तुम्हांला रोज दहा ते बारा तास काम करावें लागतें; तेव्हां तुम्हांला शिक्षण घ्यावयास वेळ कोठून मिळणार ? तुमच्या मिळकतीवर तुमचा रोजचा खर्च जेमतेम चालतो; तेव्हां तुम्ही शिक्षणाचीं साधनें कशीं प्राप्त करून घेणार ? नोकरीवर असतां तेव्हां तुम्हांला काम फार पडतें, पण कारखाने बंद पडतात तेव्हां तुम्हांला अगदींच काम नसतें; अशा स्थितींत तुम्हांला व्यवस्थितपणा, काटकशीरपणा, व सतत व्यासंग या संवयी कशा लागणार ? आपल्या मिळकतींतून आपल्या मुलाबाळांना किंवा स्वतःला म्हातारपणीं उपयोगी पडावी या आशेनें कांहीं रक्कम शिल्लक टाकणें तुम्हांला अशक्य आहे; मग तुम्हांला मितव्ययाची संवय कशी लागणार ? मुलाबाळांची निगा राखावयास तुमच्या बायकांना कितीशी सवड असते ? त्या मुलांना चार पैसे मिळवावयासाठीं गिरण्यांमधून शरीराला अपायकारक असें काम करावें लागतें, अशा स्थितींत त्यांना आपल्या कुटुंबाबद्दल आपलेपणा वाटणें शक्य तरी आहे काय ? तुम्हांला मतें द्यावयाचा हक्क नाहीं, जे कायदे तुम्हांला पाळावे लागतात त मंजूर करावयाचे वेळीं तुमचें मत घेतलेलें नसतें, तुम्हांला नागरिकत्वाचे हक्क नाहींत; नागरिकत्वाचा अभिमान, राष्ट्रासाठीं उत्साह व कायद्यांवर प्रीति या भावना तुमच्या मनांत उत्पन्न होणें शक्य आहे काय ! इतर वर्गांना मिळतो तितक्याच निस्पृहतेनें तुम्हांला न्याय मिळत नाहीं, तेव्हां तुम्हांला कायद्यांबद्दल प्रेम कसें वाटणार ? समाज तुमच्याशीं सहानुभूतीनें वागत नाहीं तेव्हां तुम्हांला जनतेबद्दल कळकळ कशी वाटणार ? म्हणून तुमची नैतिक उन्नति व्हावयास तुमची ऐहिक स्थिति बदलली पाहिजे; मनाच्या विकासासाठीं श्रम करावयास वेळ मिळावा म्हणून तुमचे कामाचे तास कमी झाले पाहिजेत; अडचणीसाठीं व रोजची काळजी सुटावयासाठीं चार पैसे बाजूला ठेवतां यावे म्हणून तुमच्या पगारांत वाढ झाली पाहिजे. मग तुमच्या मनांत ज्या सूडाच्या भावना येतात, जो तुम्हाशीं अन्यायानें वागतो त्याच्याशीं आपणहि अन्यायानेंच वागावें असे विचार येतात तेहि नाहींसे होतील, म्हणून या सर्व सुधारणांची प्राप्ति करून घ्यावयाचा तुम्हीं यत्न केला पाहिजे, मात्र हीं सर्व **साधनें** आहेत याच भावनेनें हा यत्न झाला पाहिजे हें **साध्य** नाहीं; हा प्रयत्न करणें हें आपलें **कर्तव्य** आहे याच भावनेनें आपण यत्नमान् झालें पाहिजे, हे आपले **हक्कच** आहेत या भावनेनें नव्हे; तुमच्या सबंध जीवनाचा

विकास व्हावा यासाठीं हीं साधनें प्राप्त करून घ्या. नुसत्या आरामासाठीं नव्हे. तुम्ही असें न कराल तर तुम्हांमध्यें आणि तुम्हांवर जे जुलूम करतात त्यांचे-मध्यें कांहींच फरक राहणार नाहीं. ते जुलमी आहेत, कारण ते तुमच्या कल्याणाकडे पहात नाहींत, कारण चैन व सत्ता यांच्या प्राप्तीवर त्यांची नजर असते.

उच्चतर जीवन हेंच तुमच्या आयुष्याचे ध्येय. आत्मोन्नतीनें मनुष्याला चिरस्थायी शांति प्राप्त होते. एकाद्या विशिष्ट संस्थेसाठीं अथवा फक्त सुखासाठीं तुम्ही भांडूं लागाल तर तुमच्याच पक्षांत अनेक सुलतान उत्पन्न होतील. समाजव्यवस्थेंत फरक झाल्यावरहि तुमच्या डोक्यांत आजचेंच विकार व अहंकार भ्रमण करीत राहतील तर आजची व्यवस्था बदलून न बदलून सारखीच. कांहीं वनस्पति कमीअधिक प्रमाणांत वापरल्या असतां औषधि किंवा विषवत् होत असतात. संस्थांचेहि असेंच आहे; चांगल्या लोकांमुळें वाईट संस्था चांगल्या होतात व वाइटांमुळें वाईट होतात. आज जे वर्ग तुम्हावर जुलूम करीत आहेत त्यांना-त्यांच्या खुषीनें किंवा त्यांना भाग पाडूनहि-सुधारणें व त्यांचीं कर्तव्यें दाखवून देणें हें कार्य आपलें आहे; पण स्वतःची शक्य तितकी सुधारणा घडवून आणल्याशिवाय हें शक्य नाहीं.

म्हणून जेव्हां कोणी तुम्हांला सांगूं लागेल कीं तुम्ही आपले हक्क मागा म्हणजे सामाजिक परिस्थितींत सुधारणा होईल, तेव्हां त्याच्या सद्धेतूबद्दल त्याचे आभार माना; पण तो म्हणतो तसें घडून येईलच असा आग्रह धरूं नका. चांगल्या स्थितींतल्या लोकांना गरिबांचीं दुःखें काय आहेत तें माहीत आहे; मात्र त्यांना त्या दुःखाचे चरके बसत नाहींत. धर्माबद्दल अनास्था व सुखाच्या लोभामुळें उत्पन्न झालेला अहंकार यांचा समाजावर परिणाम असा झाला आहे कीं श्रीमंतांना गरीबांचीं दुःखें हें समाजघटनेचें एक अंगच वाटूं लागलें आहे; ह्याला उपाय शोधून काढण्याचें काम भावी पिढीचें आहे असें त्यांचें मत झालें आहे. हीं मतें चूक आहेत अशी त्यांची खात्री पटवून देणें सोपें आहे; पण सुस्ती घालवून त्यांचेकडून काम करवून घेणें, त्यांना संघटित करणें, तुमचीं दुःखें व त्यांच्या भीति ह्या नाहींशा होतील अशी समाजसंघटना तुम्ही व त्यांनी भ्रातृभावानें सहकार्य करून निर्माण करणें, हीं कामें फार अवघड आहेत. हें श्रद्धेचें कार्य आहे; मनुष्यानें पृथ्वीवर ज्या ज्या कार्यासाठीं यतमान व्हावें अशी देवाची योजना आहे त्या कार्यावर श्रद्धा ठेवणारांचें हें काम आहे; सत्यासाठीं अखंड आत्मयज्ञपूर्वक कार्य करणारांचें हें काम आहे. हक्क व सुख

त्यांच्या हव्यासानें आपसांत तंटे होतात समाजाच्या वर्गावर्गांत भांडणें उपस्थित होतात.

बंधूनों, ख्राइस्टचा अवतार झाला तेव्हां जगाच्या परिस्थितींत फार मोठी घडामोड झाली; श्रीमंतांना हक्क होतेच—त्यांना अर्थातच ख्राइस्टनें हक्कांसाठीं लढा असा उपदेश केला नाहीं; पण गरिबांनासुद्धां त्यानें तसा उपदेश केला नाहीं. कदाचित गरिबांनींहि श्रीमंतासारखाच आपल्या हक्कांचा दुरुपयोग केला असता. स्वार्थ व उपयुक्तता या कल्पनांनीं समाज अगोदरच हीन झाला होता; त्या समाजाला ख्राइस्टनें स्वार्थ व सुख हीं तत्वें शिकविलीं नाहींत. त्यानें लोकांना कर्तव्यतत्परतेचा उपदेश केला; त्याचें वचन आहे कीं, **फक्त सत्कृति करणारांनाच उच्च लेखावें.** मृतावस्थेंत पडलेल्या समाजांत हे विचार प्रसृत होतांच सर्वत्र नवजीवनाचा संचार झालेला दिसावयास लागला, त्याच समाजानें संपूर्ण जगावर आपलें साम्राज्य स्थापिलें आणि मानवजातीच्या शिक्षणांत प्रगति घडवून आणली. इटालियन बांधवहो, आजचा काळ तसाच आहे. बादशाही अंमलाखालीं रोमन समाज सडून गेला होता; इटालियन समाजाची आजहि तशीच स्थिती झाली. आपल्या अंतःकरणांतहि समाजसंजीवनाच्या कल्पना येत आहेत व प्रगतीची उत्कंठा भासत आहे. जनतेमध्यें एकाच श्रद्धेचा प्रसार व्हावा, सर्वांनीं एकच शासन व एकच ध्येय मानावें आणि परमेश्वर निर्मित शक्तींची वाढ मोकळेपणानें व्हावी, जसें स्वर्गांत तसेंच पृथ्वीवरहि परमेश्वराचें अधिराज्य असावें, पृथ्वी हाच स्वर्गाचा पूर्वरंग व्हावा व समाजानें ईश्वराच्या कार्याला हातभार लावावा, अशा इच्छा आज आपल्या अंतःकरणांत उत्पन्न होत आहेत.

ख्राइस्टची ज्या तत्वांवर श्रद्धा होती तीं त्याच्या आचरणांतहि सर्वत्र दिसून येतात. त्याच्या शिष्यांनीं तींच तत्त्वें मान्य केलीं होतीं व त्यांचें वर्तनहि गुरूला साजेल असेंच होतें—त्यांचेसारखे तत्वनिष्ठ व्हा, म्हणजे तुम्ही खास विजयशाली व्हाल. तुमच्या वरच्या वर्गांना त्यांचीं कर्तव्यें काय आहेत हें समजावून द्या आणि तुम्ही स्वतः आपलीं कर्तव्यें पाळा; सद्वर्तन, आत्मयज्ञ आणि प्रीति हीं त्यांना शिकवा आणि तुम्हीहि तसेंच वागा. तुमच्या गरजा व कल्पना धीटपणें जाहीर करा; पण हें करतांना संताप, सूड व धमक्या यांनीं भरलेली भाषा वापरूं नका. जर धमकीच द्यावयाची असेल तर निग्रहपूर्वक भाषण

करा-कारण इतकी जोरदार दुसरी धमकीच नाहीं. आपल्या बांधवांना त्यांच्या भावी स्थितीची कल्पना करून देत असतांना, ज्या भावी राष्ट्रांत त्यांना अन्न, शिक्षण, स्वाभिमान, भरपूर काम व योग्य वेतन हीं प्राप्त होणार आहेत त्याची कल्पना करून देत असतांना, जें युद्ध लढून त्यांना विजयशाली व्हावयाचें आहे त्या युद्धासाठीं त्यांचें तेज प्रज्वलित करीत असतांना, तुम्ही स्वतः आपली उन्नति करून घ्या, आपल्या कर्तव्यांचें शिक्षण घ्या व तीं पाळीत रहा. इटालियन जनतेपैकीं बऱ्याच लोकांना हें अशक्य आहे; सार्वत्रिक शिक्षणाचा कोणताहि कार्यक्रम राज्यक्रांतीशिवाय, लोकांच्या स्थितींत बदल झाल्याशिवाय यशस्वी होणें शक्य नाहीं. प्रथम शिक्षण मिळवा म्हणजे स्वातंत्र्याची पूर्वतयारी झालीच समजा, असें म्हणणारे लोक केवळ निष्क्रियतेचा उपदेश करीत असतात, हें जाणून घ्या. पण तुम्हांपैकीं ज्यांची स्थिति चांगली आहे व ज्यांना परदेशांत चांगल्या प्रकारचें शिक्षण मिळालेलें आहे त्यांना हें काम करणें शक्य आहे आणि म्हणून त्यांनीं हें काम केलेंच पाहिजे. आणि जे थोडे लोक हें काम करतील त्यांना एकदां लोकशिक्षणाचीं तत्वें समजलीं कीं ते त्यांचा प्रसार हजारों लोकांमध्यें करतील; त्या तत्वांमुळें लोकांना सत्य तत्वें कोणतीं व असत्य कोणतीं हें ओळखतां येईल आणि वाचकांची व श्रोत्यांची पद्धतशीर फसवणूक करणारी विचारपद्धति निर्माण करणाऱ्या तत्वज्ञांची हातचलाखी पाहून त्यांच्या नजरेला भूल पडणार नाहीं.

# २ परमेश्वर.

**नैव वाचा न मनसा प्राप्तुं शक्यो न चक्षुषा ।**
**अस्तीति ब्रुवतोऽन्यत्र कथं तदुपलभ्यते ॥**

२॥३॥१२॥ कठ.

परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल तुम्हांला शंका नाहीं आणि म्हणूनच कर्तव्य या तत्वावर तुमचा विश्वास आहे. कर्तव्याची व्याख्या मानवजातीच्या नियंत्रणासाठीं परमेश्वरानें घालून दिलेल्या कायद्यांना धरूनच असली पाहिजे. त्या नियमांचा शोध लावणें व त्यांना व्यावहारिक स्वरूप देणें हें मानवजातीचें कार्य आहे.

परमेश्वराला अस्तित्व आहे हें त्रिवार सत्य आहे. तुम्हांला तें सिद्ध करून दाखवावयाचें कारणच नाहीं आणि शिवाय माझी तशी इच्छाहि नाहीं. कारण माझ्यामतें परमेश्वराचें अस्तित्व सिद्ध करावयाचा प्रयत्न करणें ही शुद्ध कुचेष्टा आहे; तसेंच नास्तिकपणा हा माझ्यामतें केवळ मूर्खपणा आहे. परमेश्वर आहे कारण आपणांस अस्तित्व आहे. व्यक्तीच्या व मानवजातीच्या विवेकबुद्धींत, तसेंच आपणां भोंवतालच्या सृष्टीमध्यें ईश्वराचें अधिष्ठान आहे. आनंदाच्या किंवा दुःखाच्या अत्यंत गंभीर क्षणांमध्यें आपली विवेकबुद्धि त्याचा धांवा करिते. परमेश्वराला मानवानें बरींवाईट रूपें धारण करावयास लाविलें, त्याचें नाम अमंगल करावयाचा यत्न केला; पण मनुष्याला देवाचें पवित्र नाम अजिबात नष्ट मात्र करतां आलें नाहीं. व्यवस्थितपणा, एकतानता आणि नियमबद्धता यांद्वारें सृष्टि आपणांमध्यें वसत असलेलें परमात्मस्वरूप प्रकट करून दाखविते. तुम्हांमध्यें कोणी नास्तिक नसावेत अशीच माझी कल्पना आहे—जर असतील तर त्यांचेसाठीं आपण अश्रू ढाळले पाहिजेत, त्यांचेवर रागावण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. चांदण्या चमकत असतांना, आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांच्या थडग्या शेजारीं बसलें असतांना किंवा आत्मसमर्पण करणाऱ्या वीरांच्या सन्मुख उभें असतांना जो कोणी परमेश्वराचें अस्तित्व नाकबूल करील

तो दुःखांत होरपळत तरी असला पाहिजे किंवा तो अतिशय दुष्ट वृत्तीचा मनुष्य असला पाहिजे. अगदीं पहिला नास्तिक हा निःसंशय एक गुन्हेगार होता; त्यानें आपला गुन्हा दुसऱ्या कोणालाहि उगमूं दिला नव्हता; मात्र आपल्या गुन्ह्याला देव साक्षी आहे ही विवेकाची टोंचणी गप करावयासाठींच तो नास्तिक बनला असला पाहिजे. कदाचित् हा पहिला नास्तिक एकादा जुलमी राजाहि असेल; त्यानें आपल्या बांधवांचें स्वातंत्र्य हरण करून त्यांचे अर्धे प्राणच हरण केले होते; त्यानें कर्तव्य आणि हक्क यांजवरील श्रद्धेच्या-ऐवजीं दानवी शक्तीची आराधना सुरू केली होती. तेव्हांपासून कोणी नीतिभ्रष्ट तत्त्ववेत्ते मधून मधून नास्तिकवादाला पोषक अशीं तत्त्वें हळूंच ध्वनित करीत आले आहेत; पण त्यांची संख्या फारच लहान आहे, शिवाय त्यांची फारच फजीति उडालेली आहे. फार दिवसांपूर्वींची गोष्ट नाहीं, फ्रान्समधील लोकांना असें भासविण्यांत आलें कीं एका विवक्षित जातीनें, एका जुलमी सत्तेनें आपल्या फायद्यासाठीं देव ही कल्पना रूढ केलेली आहे; ह्या खुळचट कल्पनेनें चिडून जाऊन त्यांनीं देवाचें अस्तित्वच नाकबूल केलें; हा प्रकार एक क्षणभरच झाला, मात्र त्या क्षणांत त्या लोकांना दैवी शक्तीची आवश्यकता इतकी भासली कीं, त्यांनीं सृष्टि आणि विचारशक्ति या देवता कल्पून त्यांचें पूजन सुरू केलें. आज धर्मामध्यें दिसून येणारी आचारभ्रष्टता पाहून व भावीधर्मामध्येंहि शुद्ध आचार रूढ होणें शक्य आहे अशी खात्री नसल्यामुळें कित्येक लोक धार्मिक संस्थांचा तिटकारा करतात, पण तेसुद्धां स्वतःला नास्तिक म्हणवून घेत नाहींत. आज कित्येक धर्मगुरु क्षुद्र स्वार्थाकरितां परमेश्वराचें नाम भ्रष्ट करीत आहेत. कित्येक जुलमी राज्यकर्ते आपल्या साम्राज्याचा रक्षणकर्ता या नात्यानें त्याची प्रार्थना करून त्याच्या नांवाला काळिमा आणीत आहेत; पण अखिल सृष्टीला नवजीवन देणाऱ्या सूर्याचें किरण केव्हां केव्हां हवामानाप्रमाणें अंधुक दिसतात म्हणून आपण सूर्याचें अस्तित्व आणि त्याची संजीवनशक्ति नाकबूल करावयाची कीं काय? स्वातंत्र्यासाठीं यत्न चालले असतांना कित्येक हलके लोक अत्याचाराकडे प्रवृत्त होतात म्हणून आपण स्वतंत्रतेला दोष द्यावयाचा कीं काय? स्वतःच्या खोटेपणानें व हीनपणामुळें मनुष्यानें देवाच्या नांवाला काळोखी आणली आहे, या काळोखांतहि श्रद्धेचें तेज मधून मधून झळकतांना दिसतें. असत्य आणि स्वार्थ हीं नष्ट होतील, सर्व प्रकारचे जुलूम नाहींसे होतील. ईश्वर चिरंतन आहे, जनता ही परमेश्वराची पृथ्वीवरील जिवंत प्रतिमा आहे व ती चिरंजीव

आहे. गुलामगिरी, यातना व गरीबी यांमध्यें गुरफटून गेलेली जनता हळू हळू विवेक, सामर्थ्य व स्वातंत्र्य हीं प्राप्त करून घेते, याचप्रमाणें हल्लींच्या लांचलुचपतीच्या धर्मपद्धतीचा नायनाट होईल व परमेश्वराचें पवित्र नाम आपल्या संपूर्ण तेजानें देदीप्यमान झालेलें दिसून येईल; आणि मग पवित्र अंत:करणानें व विवेकबुद्धीच्या अनुरोधानें परमेश्वराचें पूजन करण्यांत येईल.

म्हणूनच मी त्याचें अस्तित्व सिद्ध करावयाच्या खटाटोपांत पडत नाहीं किंवा त्याचेबद्दल तुम्ही पूज्यभाव बाळगला पाहिजे असेंहि म्हणत नाहीं; कारण जेव्हां तुम्हांला आपलें स्वतःचें व आपल्या भोंवतालच्या समाजाचें जीवन भासमान होतें तेव्हां तुम्ही देवाचें नामस्मरणहि न करतां त्याचें पूजनच करीत असतां. त्याचें पूजन कसें करावें ह्याचें मात्र मी विवेचन करणार आहें व तुम्हांवर राज्य करणारांपैकीं अनेकांच्या मनांत असलेल्या एका चुकीच्या समजुतीबद्दल तुम्हांला सूचना देणार आहें; शिवाय तुमचीहि तशीच समजूत होऊन बसली आहे; अशा कल्पना मनांत बाळगणें हें नास्तिकपणाइतकेंच घातुक आहे.

ही चुकीची समजूत म्हणजे परमेश्वर आणि त्यानेंच निर्माण केलेलें जग यांमध्यें भेदभाव कल्पिणें ही होय. कोणी म्हणतील, " कबूल, ईश्वर आहे; पण आपल्याला त्याचें अस्तित्व कबूल करणें व त्याची भक्तिपूर्वक पूजा करणें एवढेंच करतां येईल. ईश्वर आणि मनुष्य याचा संबंध अगम्य आहे; या प्रश्नाचा वाद मानवी विवेकबुद्धीनें परमेश्वराबरोबरच केला पाहिजे. तुमचीं मतें कांहींहि असोत, तीं आपल्या बांधवांत प्रसृत करण्याचा अथवा व्यवहारांत उतरविण्याचा यत्न मात्र तुम्हीं करूं नये. धर्म आणि राजकारण या अगदीं भिन्न बाबती आहेत, त्यांची भेसळ करून गोंधळ करूं नका. धर्मासंबंधींच्या सर्व गोष्टी हल्लीं अस्तित्वांत असणाऱ्या बऱ्या वाईट धर्मसंस्थांकडे सोंपवून द्या; मात्र त्या संस्था आपल्या कर्तव्यापासून च्युत झाल्या आहेत असें तुम्हास आढळून आलें तर त्यांचे निकाल अमान्य करा. प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य व श्रद्धास्वातंत्र्य द्या; फक्त ऐहिक कामें एकजुटीनें करावीं; तुम्ही जडवादी असा किंवा अध्यात्मवादी असा; मानवी स्वातंत्र्य व समता यांवर तुमचा विश्वास आहे ना ? मतें द्यावयाचा हक्क सार्वत्रिक असावा अशी तुमची इच्छा आहे ना ? ह्या इच्छा पूर्ण व्हाव्या म्हणून एकजूट व्हा, त्या प्राप्त करून घेण्यासाठीं सर्वांच्या धार्मिक मनांत एकवाक्यता असणें जरूर आहे असें मुळींच नाहीं. "

दुसरे कोणी म्हणतील कीं, " परमेश्वर आहे, पण तो फार मोठा आहे. त्यानें निर्माण केलेल्या सर्व गोष्टींच्या मानाने तो फारच मोठा आहे; म्हणून त्याप्रत पोंचणें हें मानवी सामर्थ्यापलीकडचें काम आहे. जग ही माती आहे; जीवन क्षणभंगुर आहे; म्हणून संसारापासून अलिप्त रहा आणि मानवी जीवनाची किंमत भलतीच चढवून ठेऊं नका. आत्म्याच्या मानानें संसाराची काय किंमत आहे याचा विचार करा आणि पारलौकिक हितावर नजर ठेवा. तुमची ऐहिक स्थिति कशी आहे या विचाराचा काय उपयोग ? मरण कांहीं तुमच्या कपाळाचें सुटत नाहीं; तुमच्या जीवनाचें मोल करतांना तुम्ही आपले विचार ऐहिक हितापेक्षां पारमार्थिक कल्याणाकडे जास्त लावले होते कीं काय याचाच परमेश्वर विचार करील. तुम्हीं अपेष्टा भोगीत अहां काय ? तर मग ज्या ईश्वरानें ही दु:खें तुम्हीं अनुभवावीं म्हणून पाठविलीं त्याचे आभार माना. ऐहिक जीवन ही कसोटी आहे आणि इहलोक ही काळ्या पाण्याची जागा आहे. म्हणून प्रपंचाचा तिरस्कार करा व आत्मोन्नति साधा. यातना, गुलामगिरी व गरिबी या भोगीत असतांनासुद्धां देवाची भक्ति व प्रार्थना करून, ऐहिक गोष्टींचा त्याग करून आणि ज्या भविष्यकाळांत तुम्हांला फार मोठें बक्षीस मिळावयाचें आहे त्यावर श्रद्धा ठेवून आत्मोन्नति करून घेणें तुम्हांला शक्य आहे. "

असें म्हणणाऱ्या वर्गांपैकीं पहिल्या वर्गाची परमेश्वरावर भक्ति नसते व दुसऱ्या वर्गाला त्याचें ज्ञान नसतें.

पहिल्या वर्गातल्या लोकांना सांगा कीं मनुष्याचे दोन विभाग कल्पितां येत नाहींत; समाजसंघटनेबद्दल तुमच्या व इतरांच्या मनांत एकवाक्यता असावी आणि जीवनाचा उद्गम, नियमन व भवितव्य यासंबंधींच्या मतांमध्यें मात्र इतरांचे व तुमचे मनांत फरक असावा, असे विभाग मनुष्यमात्रांचे ठायीं कल्पितां येत नाहींत. मनुष्यांचे मनामध्यें धर्मालाच प्रमुख स्थान असतें. हिंदू लोकांचा असा समज आहे कीं, कांहीं जाती ब्रह्मयाच्या मस्तकापासून, कांहीं बाहूंपासून व इतर त्याच्या चरणांपासून निर्माण झाल्या आहेत; या समजुतीनें जातिभेदाच्या तत्त्वावर त्यांनीं आपल्या समाजाची उभारणी केली; ब्राह्मणांना बौद्धिक कार्यें, क्षत्रियांना युद्धकला व इतरांना हलकी मजुरी असा श्रमविभाग समाजांत करण्यांत आला. यामुळें त्या देशानें स्वतःला अत्यंत हीन अशा निष्क्रियतेंत पुरून घेतलें आहे आणि जोंपर्यंत वर सांगितलेला समज दृढ आहे तोंवर ही निष्क्रियता अशीच राहील. ख्रिश्चन धर्मानें जाहीर केलें कीं मनुष्यें हीं ईश्व-

राचीं लेंकरें आहेत व म्हणून सर्वजण भाऊभाऊ आहेत. गुलाम व धनी हे परमेश्वरनिर्मित भेद आहेत ही प्राचीन तत्त्ववेत्त्यांची कल्पना त्यावेळीं सर्वत्र प्रचारांत होती; खिश्चन धर्मप्रसारामुळें गुलामांचें बंधविमोचन झालें व समाजघटनेचीं मूलतत्त्वें बदलूं लागलीं तेंव्हां वरील प्राचीन कल्पना आपोआप नष्ट झाली. धार्मिक समजुतींत होणाऱ्या प्रगतीबरोबरच सामाजिक बाबतींतहि प्रगति होत असते हें मानवजातीच्या इतिहासांत नेहमीं पहावयास सांपडतें; पण धार्मिक बेफिकीरपणामुळें अत्याचारांचा उद्भव होतो. ह्यामुळें समाजाचा विध्वंस होतो, संघटना होत नाहीं; शक्य असेल तर हें नाकबूल करा. प्रॉटेस्टंट पंथांतल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेची तुम्हीं अतिशयोक्ति केली आणि या तत्त्वापासून इतर सर्व कल्पना ओढून ताणून काढावयाचा तुमचा यत्न आहे; त्या तत्वाचा त्याग करावयाची आवश्यकता आज प्रॉटेस्टंट पंथालाच भासत आहे शिवाय या तत्त्वाच्या नांवाखालीं आज तुम्ही काय करीत आहां ? व्यापारांत दुबळ्यांवर जुलूम, राजकारणांत ज्या अनाथ लोकांजवळ आपले हक्क शाबीत करावयाचीं साधनें नाहींत, त्यासाठीं वेळ नाहीं व ज्ञानहि नाहीं त्यांची तिरस्कारव्यंजक थट्टा; ज्या गरीबांना स्वावलंबन शक्य नाहीं त्यांचा त्यांचा नैतिक अधःपात ! यापासून मुक्त होण्यासाठीं संघ स्थापिले पाहिजेत; ज्यांचें ध्येय एक आहे व एकाच धर्मावर ज्यांची श्रद्धा आहे अशा लोकांशिवाय हे संघ कसे स्थापितां येतील ? आपल्याला शिक्षण पाहिजे. पण मनुष्याचें जीवन कोणीकडून कोणीकडे चाललें आहे याबद्दल एकवाक्यता पावलेल्या कल्पना ज्या तत्त्वांत आहेत अशा तत्त्वांशिवाय हें शिक्षण द्यावयाचें तरी कसें व घ्यावयाचें तरी कसें ? धर्मभावनांची एकवाक्यता नसेल तर शिक्षण कसें देणार व कसें घेणार ? आम्हांला राष्ट्र घडवावयाचें आहे, पण एखाद्या सार्वजनिक कार्यासाठीं सार्वत्रिक कर्तव्य असल्याशिवाय हें कसें घडून येईल ? ईश्वर आणि त्याचा व आपला संबंध या तत्त्वावर नव्हे तर दुसऱ्या कोणच्या तत्त्वाच्या पायांवर ही सार्वत्रिक कर्तव्याची कल्पना उभारावयाची ? निःसंशय, मतें द्यावयाचा हक्क सार्वत्रिक असणें ही फार उत्कृष्ट गोष्ट आहे; जनतेनें स्वतः राज्य चालविण्याचा व तें चालवतांना रक्तपात टाळण्याचा हा एकच कायदेशीर मार्ग आहे. पण ज्या राष्ट्रामध्यें धर्म एक आहे तेथील मताधिक्यांत राष्ट्रीय इच्छा प्रदर्शित होते; इतरत्र ज्या पक्षाचें बहुमत असतें तो पक्ष आपलाच फायदा करून घेण्याकडे या शक्तीचा उपयोग करून घेतो; यामुळें इतरांवर जुलूम होतो. ज्या देशांमध्यें

धर्माबद्दल बेफिकिरपणा असतो तेथें राजकीय सुधारणेलाहि चिरस्थायित्व प्राप्त होत नाहीं; ह्या मुद्यावर गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासानें पुष्कळ प्रकाश पाडला आहे.

आणि जे कोणी स्वर्ग व पृथ्वी यांमध्यें भेदभाव कल्पितात त्यांना सांगा कीं, पृथ्वी आणि स्वर्ग हीं एकाच शिडीच्या पहिल्या आणि शेंवटच्या पायरीसारखीं आहेत. पृथ्वी मृतिकामय आहे हें आम्हांला शिकवूं नका. हें जग देवाचें आहे. आणि तें अशाकरितां उत्पन्न करण्यांत आलें आहे कीं या मार्गानें आपण परमेश्वराप्रत प्राप्त व्हावें. पूर्वजन्मींच्या पापांचें प्रायश्चित्त भोगण्यासाठीं आणि नव्या मोहांत गुरफटून घेण्यासाठीं जगाची जागा परमेश्वरानें निर्मिलेली नाहीं. पृथ्वी ही आत्मोन्नति साधावयाची कर्मभूमि आहे, उच्चतर जीवनाकडे प्रगति करावयाचें स्थान ह्याहे; ईश्वरानें आपणांस नुस्ताच विचार करावयासाठीं उत्पन्न केलें नाहीं तर कृति करून दाखविण्यासाठीं उत्पन्न केलें आहे. त्यानें मनुष्यप्राणी आपल्याच प्रतिमेबरहुकूम तयार केला आणि परमेश्वर म्हणजे विचार व कृति यांची मूर्ति आहे; इतकेंच नव्हे तर ज्या विचारांचा परिपोष कृतींत होणारा नाहीं असे विचार त्याचे ठायीं संभवतच नाहींत. तुमचें म्हणणें कीं मनुष्यानें प्रपंचांतून लक्ष काढून तें परमार्थाकडे लावावें; पण प्रपंच हीच परलोकप्राप्तीची पहिली पायरी आहे, परमार्थाची प्रस्तावना आहे. ज्या एकाच सोपानमार्गानें आपणांस वर चढणें शक्य आहे त्याची पहिली पायरी अपवित्र आहे, तीवर पाऊल ठेऊं नका असें म्हणणें म्हणजे प्रगतीचा मार्गच बंद करण्यासारखें नाहीं काय? आत्म्याच्या जीवनाची प्रत्येक पायरी पवित्र आहे, मग ती इहलोकींची असो वा त्यानंतर येणारी असो; म्हणून प्रगतीच्या मार्गावरलें पुढलें पाऊल आणखी पुढें जावयाच्या तयारीनेंच टाकलें पाहिजे. प्रत्येक व्यक्तीमध्यें आणि त्याच व्यक्ति जिच्या घटक आहेत त्या मानवजातीमध्यें परमेश्वरानें जी अनंत जीवज्योति प्रज्वलित केली आहे ती अधिकाधिक दैदीप्यमान होत जावी हाच मानवी जीवनाचा हेतु असला पाहिजे.

परमेश्वरानें तुमची या जगांत स्थापना केली, तुम्हांभोंवतीं तुम्हांसारखींच कोटयावधि माणसें वेष्टून ठेवलीं; त्या सर्वांच्या मनाचा विकास, प्रगतीचा परिपोष व जीवनाची उपयुक्तता हीं तुमच्या विकासामुळेंच सिद्ध होतात. एकांतवासाच्या दुष्परिणामांपासून मनुष्याला मुक्त करण्यासाठीं देवानें तुम्हांमध्यें अशा कांहीं जरूरी उत्पन्न केल्या कीं, त्या तुम्हांला स्वतःच्या एकाकी प्रयत्नानें पुरवितां येऊं

नयेत; यासाठींच तुम्हांमध्यें त्यानें समाजबुद्धि उत्पन्न केली. सौंदर्यामुळें व जिवंतपणामुळें अर्थपूर्ण असें जग त्यानें तुम्हांभोंवतीं पसरून ठेवलें; जगाचा जिवंतपणा हें देवाचें दृश्य स्वरूप आहे असें आपणांस क्षणोक्षणीं भासतें, तरीहि त्या जिवंतपणाचें आविष्करण व विकास व्हावयास तुमच्या कार्याची आवश्यकता आहे. त्यानें तुमच्या अंत:करणांत सहानुभूतिची शक्ति उत्पन्न केली, तिजमुळें तुम्ही इतरांचीं दु:खें पाहून दु:खित होतां, इतरांना स्मित करतांना पाहून सस्मित होतां, आपल्या बांधवांवर जुलूम होतांना पाहून संतप्त होतां; या भावनेमुळेंच सत्याचा अखंड शोध करावयाची तळमळ तुमच्या अंत:करणांत उत्पन्न होते, कोणी आपल्या लोकोत्तर बुद्धिमत्तेमुळें आजवर अज्ञात असें एकादें सत्य प्रकट करतो तेव्हां याच प्रवृत्तीमुळें तुम्ही त्याचें अभिनंदन करतां; एकाद्या सत्य तत्वाला कोणी व्यावहारिक स्वरूप दिलें तर तुम्हांला उल्हास वाटतो आणि जे आपल्या कार्यांत यशस्वी न होतां वीरोचित मरणाचा आनंदानें अंगीकार करतात त्यांच्या रक्ताला तुम्ही साक्ष राहतां व त्यांचेबद्दल तुम्हांस आदर वाटतो हा ह्याच मनोभावनेचा परिणाम होय. तरीहि तुम्ही आपल्या जीवनाच्या नियंत्याकडे दुर्लक्ष करतां, तुमच्यासाठीं प्रत्यक्ष परमेश्वरानें योजून ठेवलेल्या कार्याचा मार्ग दाखविणाऱ्या चिन्हांकडे तुम्ही तिरस्कारानें पाहतां आणि केवळ आत्मशुद्धीवर भर देतां. ही आत्मशुद्धि करावयाचा यत्न जर तुम्ही गिरिकंदरांत एकांतवासांत करणार असलां तर तो यत्न खास विफल होईल.

आणि जे नुस्तीच अंत:शुद्धि करीत राहतात आणि समाजसुधारणेचा यत्न करीत नाहींत त्यांना परमेश्वर शिक्षा करीत नाहीं काय ? गुलामांचे स्थितीपेक्षां जास्त हीन अशी अवस्था आहे काय ? एकादा अशिक्षित मजूर आपल्या इंद्रियांची भूक शमविण्यासाठीं आपला देह कष्टवीत असतो तेव्हां त्याच्या जीवनांतील दैवी अंश गुदमरून जात नाहीं काय ? स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या पोलिश वीरांपक्षां रशियामध्यें खिचपत पडलेल्या गुलामांच्या अंत:करणांतील धर्मभावना अधिक पवित्र आहेत असें तुम्हांस वाटतें काय ? लॅंबर्डीच्या व फ्लॉरेन्सच्या स्वातंत्र्यासाठीं सज्ज झालेल्या लोकांपेक्षां पोपच्या अथवा एकाद्या सुलतानाच्या जुलमाला निमूटपणें मान वांकविणाऱ्या प्रजेच्या अंत:करणांतील धर्मभावना अधिक उच्च दर्जाच्या असणें शक्य आहे अशी तुमची कल्पना आहे काय ? दैवी तेज व स्वातंत्र्य हीं नेहमीं एकत्र निवास करतात असें एका ख्रिश्चनधर्मप्रसारकाचें मत आहे; याच धर्मानें गुलामगिरीचा

नायनाट केला; कारण जो कोणी देवानेंच उत्पन्न केलेल्या प्राण्याच्या चरणांशीं धूळ खात पडलेला असतो त्याला प्रत्यक्ष देवाची भक्ति कशी करतां येईल? ज्याला तुम्ही धर्म समजतां तो खरा धर्म नव्हे, मनुष्यत्वाला विसरलेल्यांचा तो पंथ आहे. तुमच्या पूर्वजांनीं आपल्या काळीं समाजांतील कुजके नासके भाग छाटून टाकिले आणि समाजाचें पावित्र्य वृद्धिंगत केलें; आणि त्यांच्या या कृतीचा आज तुम्ही तिरस्कार करावा काय? जुन्या पंथांच्या पडझडीमधून जेव्हां एकादें नवें तत्त्व आस्थापूर्वक उत्पन्न होतें तेव्हां समाजाची पुनर्घटना होते; कारण त्या तत्वामुळें मानवी कार्यक्षेत्राच्या प्रत्येक भागामध्यें घडामोड होते; कारण स्वर्गाची व धर्माची कल्पना जसजशी उत्क्रांत होत जाते तसतसा समाजहि परिवर्तन पावत जातो; कारण अर्वाचीन इतिहासांत बदलत्या परिस्थितीच्या अनुरोधानें प्राचीन घडामोडीची पुनरावृत्ति होत असते; ख्रिश्चन लोक आपल्या प्रार्थनेंत म्हणतात कीं ' देवाधिदेवा, जसें स्वर्गांत तसेंच पृथ्वीवरहि तुझेंच अधिराज्य असो. "

बांधवांनो, तुमच्या पूर्वजांनीं या प्रार्थनेला व्यावहारिक स्वरूप द्यावयाचा प्रयत्न केला; पुन्हां एकदां प्रयत्न करून त्यांचेपेक्षां अधिक यश मिळविणें हें तुमचें कार्य आहे. हीच तुमची श्रद्धा, हीच तुमची प्रार्थना. या प्रार्थनेचें मनन करा आणि अशा रीतीचें वर्तन ठेवा कीं ती पूर्ण व्हावी. जे तुम्हांला निष्क्रियतेचा, प्रपंचत्याग करण्याचा, मानवी सत्तेपुढें—मग ती सत्ता वस्तुत: दानवी असली तरी हरकत नाहीं—मान वांकवण्याचा उपदेश करतात आणि सांगतात कीं, " सुलतानाला मुजरा करा, देवाला वंदन करा " म्हणजे ज्याचा भाग त्याला मिळाल्यासारखें होईल, या त्यांच्या उपदेशाकडे लक्षच देऊं नका. सुलतानसुद्धां जर परमेश्वराच्या अंमलाखालींच आहे तर सुलतानांचा वांटा सुलतानाला द्या असें म्हणण्यांत अर्थ कोठें राहिला? ऐहिक सामर्थ्य व राज्यकारभार ज्या व्यक्तींच्या ताब्यांत असतात त्या तरी परमेश्वराच्याच तंत्रानें वागत असतात; त्या व्यक्ति परमेश्वराच्या इच्छेचा भंग करीत आहेत असें तुम्हांला वाटेल त्याचवेळीं त्यांना हुसकावून लावण्याचा तुम्हांला हक्क आहे, इतकेंच नव्हे, असें करणें हें तुमचें कर्तव्य आहे. स्वत:च्या कार्यक्षेत्रांत आपापल्या कर्तृत्वाप्रमाणें परमेश्वराचे हेतु पार पाडण्यासाठीं झटणें याशिवाय तुमचें या जगांत काय काम आहे? परमेश्वर जर एक आहे तर मानव जातहि एकच आहे; पण असें नुसतें ढोंगीपणानें बोलून दाखविण्यांत काय अर्थ आहे? मानवजातीचें

अस्वाभाविक असे तुकडे पाडून त्यांमध्यें वैरभाव उत्पन्न करण्यांत आलेला आहे, त्यांना एकजूट करण्याचें कार्य तुम्हीं केलें पाहिजे. मनुष्याला स्वातंत्र्य असावें, मग त्याचे वर्तनांत जबाबदारपणा उत्पन्न होतो असें तुम्हांस नुसतें वाटून काय उपयोग ? स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गांत उभे असलेले अडथळे हाणून पाडावयास तुम्हीं झटलें पाहिजे. आपले अनेक बांधव तुडवले जात असतांना, हीन व तिरस्कृत मानले जात असतांना आपणांस रोज रोज दिसतात. असें असतां नुसत्या बंधुभावाच्या गोष्टी करण्यांत काय अर्थ आहे ? जग ही कर्म-भूमि आहे, ती पवित्र करणें हें आपलें काम आहे. आपणांभोंवतालच्या ऐहिक शक्ति हीं आपल्या कार्याचीं साधनें आहेत; त्यांचा त्याग करून चालणार नाहीं, आपण त्या साधनांचा उपयोग सत्कार्यासाठीं केला पाहिजे.

परंतु तुमच्या कार्यामध्यें भगवंताचें अधिष्ठान असल्याशिवाय तुम्हांला यश प्राप्त होणें शक्य नाहीं. हक्कांचें ज्ञान हा प्रगतीचा मार्ग नव्हे; आणि आपली सुधारणा सदोदित होत रहावी अशी तर तुमची इच्छा आहे. पण परमेश्वराशि-वाय एकाद्या कार्याला कर्तव्याचें स्वरूप कसें प्राप्त होणार ? स्वतःसाठीं कोण-तीहि राज्यपद्धति तुम्ही निर्माण करा; तिचा आधारस्तंभ जर ईश्वर नसेल तर ती निर्दय, दानवी, व जुलमी अशाच शक्तीवर उभारलेली असली पाहिजे हें तुम्ही खूप समजा; याशिवाय तिला दुसरा आधार असणें शक्यच नाहीं. एक तर मानवी प्रगति परमेश्वराच्या संकेतानुसार चालत असली पाहिजे—मग ती इच्छा व तिचे नियम शोधून काढून त्यांना मूर्तस्वरूप देण्याची जबाबदारी आपणांवर येते; किंवा प्रगतीचा परिपोष स्वच्छंदी दैवगतीवर अवलंबून असला पाहिजे, मग ज्या मनुष्याला विशिष्ट परिस्थितीचा फायदा घेतां येतो त्याच्या हुकमतींत आपण राहिलें पाहिजे. म्हणजे एक तर आपण परमेश्वरास मानलें पाहिजे नाहींतर एक वा अनेक मानवांची सेवा तरी केली पाहिजे. सर्व मानवांवर हुकमत चालविणारा सर्वश्रेष्ठ असा एखादा शास्ता अस्तित्वांत नसेल तर उन्मत्त झालेल्या आपल्याच बांधवांपासून आपलें रक्षण कोण करील ? मनुष्यानें निर्माण केलेल्या कायद्यापेक्षां श्रेष्ठ व पवित्र असें एकादें बंधन नसेल तर एकादें कृत्य नीतीला धरून आहे कीं नाहीं हें आपण कसें ओळखावयाचें ? विषमता आणि छळ यांचे विरुद्ध आपण कोणाच्या जोरा-वर खटपट करावयाची ? परिस्थिति व परमेश्वर या शिवाय सर्वश्रेष्ठ असा दुसरा कोणीच नाहीं; मग त्या परिस्थितीचें नांव राज्यक्रांति असो किंवा नेपोलियन हें

असो. आमचीं तत्वें पटलेलीं असतांनासुद्धां याच परिस्थितीची सबब पुढें करून लोक आपल्या निष्क्रियतेचें समर्थन करीत असतात. तुम्ही स्वार्थत्याग करा, आपल्या मतांसाठीं प्राणावर येऊन बेतली तरी बेहत्तर, डरूं नका, असा उपदेश त्यांना आम्हीं केवळ आमच्या मतांच्या जोरावरच करावयाचा काय ? अमूर्त तत्वाचें रूपांतर मूर्त कृतींत आम्ही करूं पहातों तें फक्त आमच्या स्वार्थासाठींच काय ? स्वतःची फसवणूक करून घेऊं नका. आमच्या बुद्धीप्रमाणें आमची मतें म्हणून आम्ही बोलतों तोंवर आमचे शब्द मात्र स्वीकारा. सर्व क्रांत्या होतात तेव्हां क्रुसेडर* लोकांच्या युद्धसंकेतशब्दाचा हर हर महादेव पुन्हां गर्जावयास लागतो: "हें कार्य परमेश्वराचें आहे–ही ईश्वराची कामगिरी आहे." त्याच शब्दांनीं आळशी लोकांना कृति करावयाचा उत्साह येतो, भित्र्यांना शौर्य चढतें, हिशेबी लोकांना स्वार्थत्यागाचा जोर येतो, मनुष्याच्या तोंडच्या शब्दांवर ज्यांचा विश्वास नसतो त्यांचे मनांत याच रणगर्जननें श्रद्धा उत्पन्न होते. लोकांना दाखवून द्या कीं, त्यांच्या स्वातंत्र्याचें व प्रगतीचें कार्य हें धर्मकृत्य आहे, हें देवाच्या दारीं रुजू आहे, मग त्या कार्याला कोणी विरोध करणार नाहीं. इहलोकीं कार्यरत होणें हा आत्म्याच्या अनंत जीवनाचा एक महत्वाचा भाग आहे अशी त्यांची खात्री पटवून द्या आणि मग त्यांच्या साऱ्या शंकाकुशंका नष्ट होतील. परमेश्वराच्या कार्याला स्फूर्तिचा पाठिंबा मिळतो—त्या कार्यासाटीं-लोकांची तयारी सहज करतां येते, पण स्वतःच्या कामासाठीं त्यांना हुकमतींत ठेवावें लागतें; धर्मावांचून तुम्ही लोकांचे सम्राट् होऊं शकाल, पण तुम्हांला गुरुस्थानीं मानावयास मात्र कोणीहि तयार होणार नाहीं.

"यतो धर्मस्ततो जयः" ही लोकांची गर्जना आहे, तुमच्या लोकांची गर्जना आहे, इटालियन राष्ट्राची गर्जना आहे. एकनिष्ठेनें कार्य करा आणि जे कोणी तुम्हांला सांगतील कीं राजकारण हें इटालियन लोकांचें कामच नव्हे

---

* क्रुसेडर:– ख्रिश्चन धर्माचें तीर्थस्थान जेरुसलेम शहर हें मुसलमानी मुलुखांत असून आज अनेक शतकें तें मुसलमानांच्याच ताब्यांत आहे. हें शहर ख्रिश्चन लोकांच्या ताब्यांत यावें म्हणून पोपच्या प्रोत्साहनानें युरोपांतील धर्मनिष्ठ लोकांनीं पॅलेस्टाइन प्रांतावर अनेक स्वाऱ्या केल्या. या मोहिमांना क्रुसेडस् म्हणतात. परक्या मुलखांत थोडक्या सैन्यानिशीं कडव्या शत्रूबरोबर युद्ध करून जय मिळवणें अत्यंत बिकट असल्यामुळें क्रुसेडर्सना यश आलें नाहीं.

आणि धर्मभावना इटलींतून पार नष्ट झाल्या आहेत, त्यांचें बोलणें ऐकून फसूं नका. सोळाव्या शतकांत फ्लारेन्सचें स्वातंत्र्य नष्ट झालें व पांचव्या चार्लसच्या सैन्यानें पोपच्या विश्वासघाताची मदत घेऊन इटलीचें स्वातंत्र्य चिरडून टाकलें, लोक आपलें राष्ट्रीयत्व विसरले आणि परकी सत्तेखालीं आपणहि परदेशचेच लोक आहों इतक्या सुखानें राहूं लागले, तेव्हां मात्र इटलीची धर्मनिष्ठा विलयास गेली. नंतर आमचे विद्वान् लोक संस्थानिकांचे खुषमस्करे बनले व आपल्या अरसिक आश्रयदात्यांना खूष करावयासाठीं प्रत्येकाची व प्रत्येक गोष्टीची चेष्टा करूं लागले. नंतर आमच्या धर्मगुरूंना आढळून आलें कीं खऱ्या धर्माचीं तत्वें व्यवहारांत आणणें अशक्य आहे; मग त्यांच्या मनांत स्वतःबद्दल विचार येऊं लागले. त्यांनीं लोकांना पवित्र वाटणाऱ्या वस्तूंचा बाजार उघडला; जनतेला सुसंस्कृत करणें व तिचें रक्षण करणें ह्या आपल्या खऱ्या कार्याचा त्यांनीं त्याग केला. सुशिक्षित लोक आपणांस हलकं लेखितात, धर्मगुरु आपली फसवणूक करतात व कोणत्याहि सार्वजनिक कार्यांत आपणांस पडतां येत नाहीं हें पाहून सामान्य जनसमूहानें केवळ सूड म्हणून विद्वत्तेची थट्टा आरंभली, धर्मगुरूविषयीं अविश्वास प्रगट केला; त्यांना दिसून आलें कीं, धर्माला अवनत दशा प्राप्त झाली आहे, मग त्यांनीं सर्वच धर्मपंथांविरुद्ध बंड उभारलें. तेव्हांपासून आपण निःसत्व व निर्वीर्य झालों, धर्मसंबंधीं वेडगळ समजुती आपल्या डोक्यांत शिरल्या व त्या केवळ संशयानें आपणांमध्यें रूढ झाल्या; पण आतां मात्र महत्पद प्राप्त करून घेऊन वंदनीय होण्याची आकांक्षा आम्हांमध्यें जागृत झालेली आहे आणि आमच्या राष्ट्राच्या महनीय परंपरेची आठवण आम्हांस झालेली आहे. बाराव्या शतकांत लॅांबर्डीमधील आपल्या बांधवांनीं चढाई करून आलेल्या जर्मनांना पराभूत केलें, आपलें स्वातंत्र्य त्यांचे हातून हिसकून घेतलें, लढाईच्या धुमश्चक्रींत त्यांचे ओंठावर परमेश्वराचे नाम व अंतर्यामीं एकनिष्ठा होती याची आज आठवण करा. देवालयांत कायदेमंडळें भरवणाऱ्या टस्कनी शहरांतील लोकसत्तावाद्यांची आठवण करा. फ्लॉरेन्सच्या कामगार वर्गानें आपलें स्वातंत्र्य मेडिसी[1] घराण्याच्या ताब्यांत जाऊं दिलें नाहीं व

[1]मेडिसी घराणें: वाङ्मय व कलाकौशल्य यांना उत्तेजन दिल्यामुळे हें घराणें इटलींत फार विख्यात आहे. अत्यंत कुशलतेनें अनेक वर्षेपर्यंत राजकारस्थानाचे वेगवेगळे डाव टाकून हें घराणें संपन्न व समर्थ झालें. आणि लवकरच फ्लॉरे-

त्यांनीं अत्यंत गंभीर वृत्तीनें ख्राइस्टला आपल्या लोकसत्ताक राज्याचा नियंता निवडलें याचें स्मरण करा; सॅव्होनारोलानें[२] परमेश्वराचे ठायीं दृढ श्रद्धा आणि जनतेचे हक्क यांचें समर्थन आपल्या धर्मपीठावरून केलें याच स्मरण करा; सतराशें शेचाळीस सालीं जिनोआच्या लोकांनीं आपले गांव ताब्यांत घेणाऱ्या जर्मन सैन्यावर "कुमारी मेरीच्या" नांवाच्या जयघोषांत नुस्ता दगडांचा मारा करून त्यांना हांकून दिलें याची स्मृति बाळगा. धर्मनिष्ठेनें राष्ट्रीय भावनांचें संरक्षण व जोपासना होते याचीं अशीं आणखी अनेक उदाहरणें दाखवितां येतील. आज ती धर्मनिष्ठा लोकांचे अंत:करणांत निद्रितावस्थेत आहे; ती जागृत करा; ज्या कोणाला हें करतां येईल त्याचें कार्य राजकारणशास्त्रांतल्या तत्त्वांचा कीस काढण्यापेक्षां खात्रीनें जास्त उपयुक्त होईल. राजकारणांत परक्या पद्धती व परके डावपेंच वापरण्यांत आले म्हणून आजवर इटलींत झालेलीं बंडें अपयशी झालीं व त्यांना लोकांकडून मिळावा तितका पाठिंबा मिळाला नाहीं. बांधवहो, म्हणून सांगतों कीं, लोकांना उपदेश कराल तो भग-

---

न्सचीं अधिकारसूत्रें मेडिसींच्या हातांत आलीं. पंधराव्या शतकांत तुर्क लोकांनीं कॉंस्टॅंटिनोपल शहर काबीज केलें तेव्हां तेथें स्थायिक झालेले कारागीर व पंडित इटलीच्या आश्रयाला आले; मेडिसी घराण्यानें त्यांपैकीं अनेकांना आश्रय दिला. अमेरिका खंडाचा व आफ्रिका खंडाला वळसा घालून हिंदुस्थानांत यावयाच्या मार्गाचा शोध लागला तेव्हां भूमध्यसमुद्रांतील व्यापार कमी पडला व तेथील बंदरांच्या भरभराटीला ओहटी लागली. फ्लॉरेन्सच्या वैभवाला उतरती कळा लागल्यानंतर मेडिसी घराण्याची सत्ताहि ओसरूं लागली.

[२] सॅव्होनरोला: (१४५२-१४९८) इटालियन धर्मगुरू व धर्मवीर: लहानपणापासूनच एकांतवास व अभ्यास प्रिय असलेल्या सॅव्होनरोलाला एकोणीसाव्या वर्षी प्रेमभंग झाल्यामुळें वैराग्य प्राप्त झालें. विलासी इटालियनांच्या अध:पातामुळें त्याचें अंत:करण जळत होतें. अशा अंत:करणांतून निघालेल्या बोलांनीं जनतेचें अंत:करण वेधून गेलें. त्याच्या नेतृत्वाखालीं फ्लॉरेन्सच्या रहिवाशांनीं लोकसत्ता स्थापन केली व मेडिसी या जहागीरदार घराण्याचा पाडाव केला. फ्लॉरेन्सच्या लोकशाहीचा नाश करून मेडिसी घराण्याला पुन्हां गादी मिळवावयासाठीं पोपनें सॅव्होनरोलावर बहिष्कार पुकारला; पुढें पोपच्याच हुकमावरून त्याला जिवंत जाळण्यांत आलें.

वंतांचें नांवानें करा—ज्या कोणाचें अंतःकरण खरेंखुरें इटालियन असेल तो खास तुमच्या मागून येईल.

धर्माच्या दृष्टीनें लोकांना उपदेश करा. अभ्यासजड लोक कदाचित् याकडे पाहून डोळे मिचकावतील; त्यांना विचारा, तुम्ही स्वतः राष्ट्राकरितां काय केलें आहे ? धर्मोपाध्यायांनीं तुम्हांला बहिष्कृत केलें तर त्यांना सांगा कीं, साऱ्या धर्ममार्तंडांना मिळून परमेश्वराबद्दल जितकें ज्ञान झालें असेल त्यापेक्षां आम्हांला जास्त ज्ञान प्राप्त झालेलें आहे. शिवाय परमेश्वर व त्याचें शासन प्रकटविणारा यांमध्यें कोणी धंदेवाईक दलाल लागत नाहीं. जनतेचा तुम्हांवर विश्वास बसेल, लोक तुम्हांबरोबरच म्हणतील कीं " आमचा पिता जो परमेश्वर त्यावर आमची दृढ श्रद्धा आहे—तो ज्ञानमय आणि प्रेममय आहे, मानवजातीचा उत्पत्तिकर्ता आहे आणि आमचा आदिगुरु आहे " आणि याच महामंत्राचा जप करीत असतांना तुम्ही आणि जनता खास विजयशाली व्हाल.

# ३ कर्तव्यविवेकाचें महातत्त्व.

" अंधासी सूर्य प्रसन्न । झालिया देखे तो निधान ॥
तेंवी प्रकटोनी जनार्दन । हें गुह्यज्ञान बोलवी ॥ "

एकनाथ.

तुम्हांला जीवन आहे, म्हणून जीवनाच्या नियमनाचे कायदे तुम्हांला लागू आहेत. नियमबद्धतेशिवाय अस्तित्त्वच संभवत नाहीं. जें कांहीं अस्त्त्विांत असतें तें कोणत्या तरी विशिष्ट प्रकारानें, कांहीं ठराविक परिस्थितींत व कोणत्या तरी निर्बंधानुसारच आपलें अस्तित्व राखूं शकतें. धातूचे परिमाणु एकमेकांना चिकटून राहतात, झाडेंझुडपें वाढत असतात, तारे फिरत राहतात, ही प्रत्येक गोष्ट नियमानुसारच घडत असते. सर्व जड पदार्थांच्या व प्राण्यांच्या जीवनाला आपल्या हुकमतींत ठेवणाऱ्या सृष्टिनियमांपेक्षां तुमच्या जीवनावर सत्ता चालविणारा नियम अधिक उच्च व उदात्त आहे, कारण मनुष्य हाच सर्व प्राणिमात्रांत श्रेष्ठ आहे. आत्मविकास व जीवनाच्या अनुशासनानुरूप आयुष्यक्रम हाच तुमचा धर्म आहे, हेंच तुमचें कर्तव्य आहे, कारण मनुष्य जन्मतःच कर्मयोगी आहे.

परमेश्वरानें मनुष्याला जीवन दिलें व जीवनाचे नियमहि त्यानेंच निर्माण केले, मानवजातीला परमेश्वर हा एकच शास्ता आहे, मानवानें मानलाच पाहिजे असा धर्महि एकच आहे. जोंवर मनुष्यानें निर्माण केलेला कायदा या धर्माला धरून असतो तोंवरच तो सत्य व माननीय असतो. परमेश्वराच्या शासनाला विरोध करणारा मनुष्यनिर्मित कायदा असत्यच असला पाहिजे आणि अशा कायद्यांचा प्रतिकार करणें व ते नष्ट करविणें हा तुमचा हक्क आहे इतकेंच नाहीं, तर हें तुमचें कर्तव्य आहे. जो मनुष्य परमेश्वराच्या संकेताचा अर्थ स्पष्ट करतो व वेळोवेळीं व्यवहारांत वापरून दाखवितो तोच तुमचा नेता; त्यावर प्रेम ठेवा व त्याच्या नेतृत्वाखालीं कार्य करा. पण परमेश्वराशिवाय तुमचा स्वामी

मात्र कोणीहि नाहीं–जर कोणा व्यक्तीला तुम्ही आपल्या जीवनाचा नियंता मानाल तर तो परमेश्वराचा द्रोह होईल.

जीवनाचें सूत्र जाणणें–परमेश्वरनिर्मित जीवनशासनाचें ज्ञान करून घेणें, हा नीतीचा, कर्तव्याचा व कृतीचा पाया आहे; हें मनुष्याच्या जबाबदारीचें परिमाण आहे, तुम्हांवर अन्यायी कायदे लादणाऱ्या एका अथवा अनेक व्यक्तींच्या स्वैर इच्छेचा तुम्ही भंग कां करावा, याचा हें ज्ञान हा आधार आहे; या ज्ञानाशिवाय मनुष्यानें आपल्या हक्कांची मागणी करणें हा शुद्ध ढोंगीपणा आहे. सर्व हक्क कायद्याला धरून असतात आणि जोंवर तुम्हांला आपल्या हक्कांना आधारभूत असा एकादा कायदा दाखवितां येत नाहीं तोंवर सामर्थ्य असेल तर तुम्ही हक्क बळकावणारे म्हटले जाल, असमर्थ असाल तर गुलाम गणले जाल. पण जनावरें, झाडपाला वगैरे गोष्टी व मनुष्य यांमधला फरक स्पष्ट व्हावयासाठीं प्रत्येक मनुष्याला ह्या धर्माचें ज्ञान असणें व त्याला अनुसरून वर्तन करणें जरूर आहे.

ह्या नियमाचें ज्ञान कसें करून घ्यावयाचें ?

आजवर ज्या ज्या लोकांनीं कर्तव्य या शब्दाचा उच्चार केला त्यांना मानवजातीनें हाच प्रश्न विचारला आहे. आणि ह्या प्रश्नाला जीं उत्तरें देण्यांत आलीं आहेत तीं सर्व भिन्न भिन्न आहेत.

कित्येकांनीं एकाद्या ग्रंथाचा आधार दाखवून सांगितलें आहे कीं, यांमध्यें प्रतिपादन केलेलीं मतें हेंच आमचें नीतिशास्त्र आहे. कित्येकांचें म्हणणें–मनुष्यानें आपल्या मनाला विचारून पहावें, त्याला सद्वर्तन व दुर्वर्तन यांमधील विवेक आपोआप कळून येईल. कित्येकांनीं या वैयक्तिक विवेकावर विश्वास न ठेवतां सांगितलें आहे कीं एकाद्या बाबतीत मानवजातीचें साधारण मत जें असतें तेंच सत्य होय.

हीं सर्व मतें चुकीचीं आहेत, मानवजातीच्या इतिहासांत असे प्रसंग दिसून येतात कीं त्यामुळें हीं मतें निर्विवादपणें फोल ठरतात. मानवजात एकच स्मृति सदासर्वदा पाळीत नसते; अनेक कायद्यांचा आजवर त्याग झाला आहे, पूर्वीपेक्षां जास्त चांगल्या वांटणाऱ्या कायदेपद्धतींचा स्वीकार झाला आहे; मानवजात आपला हा क्रम एकदम सोडून देईल हें संभवत नाहीं. एकाद्या ग्रंथांतले अथवा एकाद्या व्यक्तीनें केलेले कायदे मानणारांना हें उत्तर पुरें आहे.

आणि जे म्हणतात कीं, सत्य व असत्य यांमधला निर्णय ठरवावयास मनुष्याची विवेकबुद्धि हें एकच प्रमाण आहे, त्यांना आम्ही आठवण करून देतों कीं कोणत्याहि धर्माला–मग त्या धर्मांतील तत्वें कितीहि उदात्त असोत–विरोध करावयास त्या धर्मतत्त्वांवर श्रद्धा न ठेवणारे पाखंडी आढळतातच, स्वतःच्या प्रामाणिक व दृढ मतांचा त्या धर्मतत्त्वांशीं विरोध होत असल्यामुळें त्या धर्मांचीं बंधनें झुगारून देणारे व आपल्या मतांसाठीं स्वतःच्या विवेकाच्या जोरावर प्राणाचीहि पर्वा न करणारे लोक आढळून येतात. आज प्रॉटेस्टंट धर्मामध्यें हजारों पंथ दिसून येतात ते सर्व व्यक्तीच्या सदसद्विवेकशक्तीच्या आधारावरच निघालेले आहेत; ते आपापसांत लढावयास उद्युक्त झाले आहेत, श्रद्धेच्या बाबतींत अंदाधुंदी झाली आहे आणि युरोपांत खवळत असलेल्या सामाजिक व राजकीय कलहांचें बीज याच ठिकाणीं सांपडणार आहे. सत्यासत्यविवेकासाठीं मानवजातीच्या मताचा जे हवाला देतात व वैयक्तिक विवेकाचा निकाल मान्य करीत नाहींत त्यांना आमचें इतकेंच सांगणें आहे कीं ज्या ज्या महातत्त्वांनीं मानवजातीच्या प्रगतींत भर टाकली आहे तीं सर्व प्रथमतः मानवजातीच्या साधारण मताला विरोधी अशींच होतीं. त्या तत्वांचा प्रसार करणाऱ्या महात्म्यांची समाजानें कुचेष्टा केली, त्यांचा छळ झाला, त्यांना क्रूसावर खिळून मारण्यांत आलें.

वर निर्देश केलेल्या सत्यासत्यविवेकाच्या निदानांपैकीं एकाच मताच्या मदतीनें सत्यशोधन व जीवनशासनाचें ज्ञान होऊं शकत नाहीं. सदसद्विवेकबुद्धि पवित्र आहे व मानवजातीचा शब्दहि पवित्र आहे; मात्र यांपैकीं एकच तत्व स्वीकारलें असतां सत्यशोधनाच्या साधनांपैकीं एका महत्वाच्या अंगाचा त्याग केल्यासारखें होतें; आजवर फक्त एकाच मार्गाचा स्वीकार करण्यांत आला ही चूक झाली. या चुकीचे परिणाम फार घातुक झाले; कारण केवळ वैयक्तिक विवेकबुद्धीस अनुसरून वागण्यानें झोटिंगपाच्छाही होते आणि विशिष्ट काळीं प्रचलित असलेल्या मानवजातीच्या मताचा स्वीकार अखेरचा निकाल या दृष्टीनें करण्यांत आल्यामुळें स्वातंत्र्याचा कोंडमारा होतो व दंडेलीला एकदम आरंभ होतो.

समाजाची इमारत याच पायावर उभी असते पण आपली तशी कल्पनासुद्धां नसते हें दाखवावयासाठींच मी इतकीं उदाहरणें देत आहें. लोकांनीं अशा

चुकीच्या तत्त्वांवर समाजाच्या राजकीय अंगाची उभारणी केली; कित्येकांनीं केवळ व्यक्तीचे हक्कांवर भर ठेवला, समाजाला शिक्षित करणें हें समाजाचेंच कार्य आहे या तत्त्वाचा त्यांना विसर पडला; दुसऱ्या अनेकांनीं केवळ समाजाच्या हक्कांवरच जोर दिला आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आणि कार्यावर घाला घातला[1]! फ्रान्सनें राजक्रान्तीनंतर आणि मुख्यत्वेंकरून इंग्लंडनें दाखवून दिलें आहे कीं वर सांगितलेल्या दोन पद्धतींपैकीं पहिलीचा स्वीकार केल्यानें विषमता व जुलूम हीं निष्पन्न होतात; समाईक संपत्तीची पद्धति जर कधीं मूर्त स्वरूपांत येईल तर आपणास दिसून येईल कीं वर सांगितल्यांपैकीं दुसऱ्या पद्धतीचा स्वीकार केल्यानें समाज पाषाणासारखा निर्जीव बनतो व त्याची प्रगमनशीलता नाहींशी होते.

कित्येकांनीं व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर व्यापारामध्यें चढाओढीची स्वतंत्रता उत्पन्न करून आर्थिक संघटना करावयाचा प्रयत्न केला, पण त्याचा परिणाम विध्वंसकच झाला; उलटपक्षीं समाजाच्या हक्कांच्या पुरस्कर्त्यांनीं सर्व वस्तूंच्या उत्पादनाची परवानगी फक्त सरकारच्या ताब्यांत ठेवली; पहिल्या तत्त्वामुळें बेबंदशाही झाली, दुसऱ्यामुळें प्रगमनशीलता नाहींशी झाली व जुलमाचे सर्व दुष्परिणाम समाजाला भोगावे लागले.

लोकमत व विवेकबुद्धि हे परमेश्वरानें मनुष्याला जणूं काय दोन पंखच दिले आहेत कीं ज्यांच्या साह्यानें मनुष्यानें निजरूपाप्रत उड्डाण करून यावें. यांपैकीं एक पंख कापून टाका, असा आग्रह कोणीं काय म्हणून धरावा? तुम्ही स्वतःला समाजापासून अलग कां करून घ्यावें किंवा जगाच्या भोंवऱ्यांत तरी स्वतःला कां गुंतवून घ्यावें? लोकमत व व्यक्तीच्या विवेकबुद्धीचा निर्णय यांपैकीं एक नाहींसें करावें असें तुम्हांला कां वाटतें? दोन्हीहि सारखींच पवित्र आहेत, दोघांमध्येंहि परमेश्वराचाच शब्द व्यक्त होतो. जेव्हां लोकमत व व्यक्तीच्या

१. लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं ठरवलेल्या राज्यपद्धतीला धरून राहणाऱ्या राजाच्या अंमलाखालीं (Constitutional Monarchy) लोकांनीं एका विशिष्ट प्रकारची समाजसंघटना करावयाचा यत्न केला त्यांचेबद्दल मी हें बोलत आहें. ज्या देशावर जुलुमाचें राज्य चाललेलें असतें तेथें मुळीं समाजालाच अस्तित्व नसतें. तेथें समाजाचे हक्क व व्यक्तींचे हक्क या दोघांचाहि चुराडा उडत असतो.

विवेकाची वाणी हीं जुळतात तेव्हां तें मत हा प्रत्यक्ष परमेश्वराचाच शब्द आहे अशी खात्री बाळगा, तें सत्य आहे असा दृढभाव धरा; कारण एकाचा सत्यपणा दुसऱ्यामुळें प्रस्थापित झालेला असतो.

तुमचीं सर्व कर्तव्यें नकारदर्शक असतीं—दुर्वर्तन करावयाचें नाहीं, आपल्या बांधवांना इजा करावयाची नाहीं, अशा प्रकारचीं असतीं—तर मानवी वर्तनाबद्दल विवेकशक्तीचा निकाल मान्य करणें बरोबर झालें असतें. शिक्षणाचा अगदीं थोडका संसर्ग झालेल्या लोकांचे वर्तनसुद्धां या प्रमाणानें पाहतां बरेंच उच्च दर्जाचें असतें.

पण तुमचा जन्म सत्कार्यासाठीं झाला आहे; आणि जेव्हां तुम्ही धर्मविरुद्ध वर्तन करतां-ज्या प्रकारच्या वर्तनाला लोक गुन्हा म्हणतात-तेव्हां तुमच्या अंतःकरणांतून एक टोंचणी तुम्हांला सारखी भासत राहते; तुमच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेले विवेकाचे शब्द तुमच्या गुन्हेगार मनाला स्वस्थपणा मिळूं देत नाहींत, ही टोंचणी आपल्या मनाला बोंचत आहे हें तुम्ही आपल्या आजूबाजूच्या माणसांपासून लपवून ठेवूं शकाल पण स्वतःची फसवणूक करून घेतां येणें मात्र अशक्य आहे. तुमचीं अत्यंत महत्त्वाचीं कर्तव्यें अस्तिभावदर्शक आहेत. कांहीं विशिष्ट गोष्टी न करणें एवढयानेंच भागत नाहीं–कांहीं कृति मुद्दाम केल्याच पाहिजेत अशा आहेत. कायद्याविरुद्ध वर्तन करावयाचें नाहीं एवढयानेंच भागत नाहीं, कायद्याला अनुसरून वागलें पाहिजे; आपल्या बांधवांना दुखवावयाचें नाहीं एवढेंच करून भागत नाहीं, तर त्यांच्या कल्याणासाठीं तुम्हीं झटलें पाहिजे. आजपर्यंत नीतितत्त्वांचा प्रचार साधारणपणें अमूक करूं नये, तमूक करूं नये अशाच पद्धतीनें झालेला आहे. परमेश्वराच्या कायद्यांचा अर्थ लोकांना विशद करून दाखविणारांनीं सांगितलें आहे "हत्या करूं नये," "चोरी करूं नये;" पण मनुष्य या नात्यानें व्यक्तीवर जी जबाबदारी व बोजा येऊन पडतो त्यांचें, मनुष्यानें आपल्या बांधवांना कोणत्या रीतीनें मदत केली पाहिजे व परमेश्वराच्या संकेताची पूर्तता व्हावी म्हणून यतमान झालें पाहिजे ह्याचें विवेचन कोणींच केलें नाहीं.

पण नीतीचें ध्येय हेंच आहे आणि स्वतःच्या विवेकबुद्धीला मात्र अनुसरून वागणाऱ्या व्यक्तीला नीतीच्या या ध्येयाप्रत कधींच जातां येणार नाहीं.

शिक्षण, प्रवृत्ति, संवयी, मनोविकार यांच्या अनुरोधानेंच ज्याची त्याची विवेकबुद्धि आपला निर्णय देत असते. एकाद्या रानवटाची विवेकबुद्धि व एको-

णिसाव्या शतकांतल्या सुधारलेल्या मनुष्याची विवेकबुद्धि यांचे निर्णय अर्थातच भिन्न प्रकारचे असले पाहिजेत. स्वतंत्र प्रवृत्तीच्या माणसाची विवेकबुद्धि त्याला जीं कांहीं कर्तव्यें आहेत म्हणून सांगत असते तींच आपलींहि कर्तव्यें असू शकतील असें गुलामगिरींत निढावलेल्या मनुष्याच्या स्वप्नांतसुद्धां यावयाचें नाहीं. लँबर्डीमधल्या शेतांत खपणाऱ्या एकाद्या मजराला विचारा कीं त्याची आपल्या कर्तव्यांबद्दल काय कल्पना आहे. त्याला जर नीतीचें शिक्षण एखाद्या अर्धवट पाद्याकडून मिळालें असेल, जर त्याला अक्षर ओळख असली तर त्याचें अध्ययन बहुधा आस्ट्रियानें छाटाछाट केलेल्या बायबलापलीकडे गेलेलें नसेल— तर तो सांगेल कीं "आम्ही आळस न करतां कष्ट करावे; धनी देईल ती मजुरी घ्यावी, नाहींतर पोटाला तरी कोण देणार ? कायदे मोडून कसें चालेल ? कायदे कसेहि असोत, आपल्याला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ? आपण कोणालाहि मारहाण करूं नये; इतकींच मला माझीं कर्तव्यें आहेत असें वाटतें." त्याची मानवजातीसंबंधीचीं व राष्ट्रासंबंधीचीं कर्तव्यें काय आहेत हें तुम्ही त्याला स्पष्ट करून सांगूं लागाल व म्हणाल कीं "तूं आपल्या कामाची खरीखुरी किंमत आहे त्यापेक्षां कमी वेतन घेतोस आणि आपल्याच भावांच्या पोटांवर पाय आणतोस; तसेंच अन्यायाला कायदेशीरपणा प्राप्त व्हावा म्हणून जुलमी लोकांनीं सत्तेच्या जोरावर जाहीर केलेल्या कायद्यांचें पालन करून तूं परमेश्वराचा द्रोह केल्याचें महत्पाप करीत आहेस," तर त्याला उत्तर म्हणून काय बोलावें, हें न कळून तो काय वाटेल तें बोलेल आणि मग गोंधळून जाईल; ज्या एकाद्या मजूराचा अर्धवट शिक्षण मिळालेल्या मनुष्यांशीं संबंध आलेला असेल व सत्याचा थोडाबहुत भाग ज्याला त्यांचेपासून कळलेला असेल त्याला तोच प्रश्न विचारा; तो म्हणेल "माझा देश गुलामगिरींत खिचपत पडलेला आहे, माझ्या बांधवांची सांपत्तिक व नैतिक स्थिति फार हलाखीची झालेली आहे आणि अशा प्रकारच्या अन्यायाचा शक्य त्या उपायांनीं निषेध केला पाहिजे. एकाच देशांत आणि एकाच परिस्थितींत राहणाऱ्या दोन व्यक्तींच्या विवेकबुद्धीच्या निर्णयांत असा फरक कां पडतो ? मानवजातीच्या शक्तींचा विकास व प्रगति होईल अशा एकाच मुख्य तत्त्वावर श्रद्धा असलेल्या दहा लोकांच्या मनांत आपले विचार कृतींत उतरविण्याचे—म्हणजेच कर्तव्याचे, दहा प्रकारचे मार्ग कां येतात ? एकूण व्यक्तिविवेकाचा निर्णय कोणत्याहि परिस्थितींत विश्वसनीय असलाच पाहिजे—त्याच्याच अनुरोधानें आपण चालावें आणि त्याचेच योगें महातत्त्वांचा बोध

आपणांस होतो, असें म्हणतां येत नाहीं. विवेकबुद्धि आपणांस इतकेंच सांगू शकतें कीं, परमेश्वरानें जगासाठीं कांहीं शासन घालून दिलें आहे—यामुळें व्यक्तिमात्राचीं कर्तव्यें कोणतीं आहेत हें सांगणें मात्र तिच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. म्हणूनच अनेक वीरांनीं स्वमतार्थ प्राणत्याग केला—त्यांपैकीं कित्येकांची कृति क्षणिक अहंकारामुळें झालेली असेल. कित्येकांनीं ज्या मतांसाठीं प्राणत्याग केला तीं मतें चुकीचीं असतील; आणि आजहि अनेक लोक याच प्रकारच्या चुका करीत असतील.

म्हणून मानवी विवेकबुद्धीला एकाद्या वाटाड्याची जरूर आहे, भोंवतालच्या अंधारांत प्रकाश दाखवावयास एकाद्या ज्योतीची जरूर आहे, स्वतःच्या साहजिक प्रवृत्तीच्या निर्णयाला दुजोरा देणाऱ्या एकाद्या सर्वसाधारण नियमाची आवश्यकता आहे; आणि हा वाटाड्या, ही ज्योति व हा नियम म्हणजे विचारशक्ति व मानवजाति हींच होत.

परमेश्वरानें व्यक्तिमात्राला विचारशक्ति व बुद्धिमत्ता हीं दिलेलीं आहेत तीं एवढ्याचकरितां कीं त्यांच्या सहाय्यानें मनुष्यमात्रानें जीवनाच्या नियमांचें ज्ञान प्राप्त करून घ्यावें; अनेक शतकेंपर्यंत आपणांमध्यें रूढ झालेल्या चुकीच्या कल्पना व आपणांवर राज्य करणारांची इच्छा या कारणांमुळें आपल्या बुद्धीला शिक्षण बिलकूल मिळत नाहीं; म्हणूनच हे अडथळे उलथून पाडणें अवश्यक आहे; ह्या विरोधि शक्ति दूर झाल्यावरहि केवळ बुद्धीच्या जोरावर तुम्हांला धर्माचें ज्ञान होणार नाहीं, तें ज्ञान प्राप्त करून घ्यावयासाठीं मानवजातीच्या एकवटलेल्या बुद्धिमत्तेची मदत तुम्हांला घ्यावी लागेल. नरदेह दोन दिवसांचा आहे, परमेश्वरानें मनुष्याला नेमून दिलेल्या कार्याच्या मानानें मानवी शक्ति फारच दुर्बळ आहेत, अनिश्चित आहेत आणि दुसऱ्या शक्तींची मदत घेतल्याशिवाय नियोजित कार्य पार पाडणें मनुष्याला अशक्य आहे. तुमच्या मदतीसाठीं परमेश्वरानें एक चीरंजीव शक्ति निर्माण करून ठेवली आहे; आज जवळ जवळ चार हजार वर्षेंपर्यंत मानवी विचारशक्तीनें अनेक कार्यें करून जें चैतन्य प्राप्त करून घेतलें आहे तें सर्व तिच्याठायीं एकीकृत झालें आहे; व्यक्तींचे हातून प्रमाद घडोत, त्यांची वर्तणूक दोषास्पद होवो—ही शक्ति ज्ञानसंचयांत व नीतिमार्गावर सदोदित प्रगति करीत आहे; ह्या शक्तीच्या विकसनांत परमेश्वरानें आपल्या शासनाचीं कलमें एकएक लिहिलीं आहेत व आजहि तीं लिहिलीं जात आहेत--

ही शक्ति, हें चैतन्य म्हणजे मानवजात हें होय.

मानवजात हा सदासर्वदा ज्ञानसंपादन करीत असलेला एक महापुरुष आहे मनुष्यप्राणी नाशिवंत आहे, पण प्रत्येक व्यक्तीनें सत्याचा जो भाग प्रकट केलेला असतो तो त्या व्यक्तीबरोबर नाश पावत नाहीं, तें ज्ञान मानवजातीच्या खजिन्यांत जमा होतें व त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर उत्पन्न होणाऱ्या पिढ्यांना त्या सत्यशोधनाचा फायदा मिळतो. आपण ज्यांमध्यें वावरणार तें कल्पनांचें व भावनांचें वातावरण आपल्या जन्मापूर्वींच तयार झालेलें असतें-तें मानवजातीच्या आजपर्यंतच्या अनेक पिढ्यांनीं तयार करीत आणलेलें असतें, प्रत्येक व्यक्ति त्याच वातावरणांत स्वतःलाहि नकळत कमी अधिक महत्वाची भर टाकीतच असते व अशा रीतीनें मानवजातीच्या भविष्यकाळासाठीं वातावरण तयार होत राहतें पूर्वेकडच्या देशामध्यें प्राचीन काळीं चाल होती कीं जाणारायेणारानें वाटेवर रचून ठेवलेल्या दगडांच्या राशीवर एक एक नवीन दगड टाकून मग पुढें जावें; या चालीमुळें निर्माण झालेले मोठमोठे मनोरे आजहि आपणांस दिसून येतात. आपण एका दिवसाचे वाटसरू आपली वाट चालून झाल्यावर इतरत्र वेगळ्या प्रकारचें शिक्षण प्राप्त करून घ्यावयासाठीं जात असतों; मानवजात व्यक्तिमात्राला जें शिक्षण देते तें व्यक्तीमध्यें मधून मधून मात्र प्रकट झालेलें दिसतें, पण मानवजात स्वतः जें शिक्षण संपादन करते तें धीरानें व अखंडपणें प्रगतीचा मार्ग आक्रमण करीत चाललेलें असते. मूर्त स्वरूप धारण केलेली परमेश्वराची वाचा म्हणजेंच मानवजात. युगांमागून युगें लोटत आहेत, मानवजातीमध्यें परमेश्वराचे तेज-कधीं व्यक्तीच्या द्वारें, कधीं राष्ट्राच्या द्वारें, जास्त शुद्ध व जास्त क्रियावान् स्वरूपांत प्रकट होत आहे. एकामागून एक कार्यें हाताखालून जात राहतात व याच रीतीनें मानवजातीला स्वतःच्या जीवनाचें ज्ञान होऊं लागतें, स्वतःचा जीवितोद्देश स्पष्टपणें दिसूं लागतो, परमेश्वर व त्याचें शासन ह्यांची उमज पडूं लागतो.

परमेश्वराचा संकेत व त्याचें शासन यांचा उमज आपणांस हळूहळू पडत असतो, अनेक पिढ्यांच्या अनुभवानें त्याचा बोध होत राहतो; व्यक्ति जाति व राष्ट्रें हीं जसजशीं जास्त निकट येऊं लागतात व संघटित होऊं लागतात तसतसा धर्माचा उमज आपणांस जास्त स्पष्टपणें होऊं लागतो; एकाच व्यक्तीला किंवा एकाद्या राष्ट्राला परमेश्वराच्या संकेताचा व शासनाचा बोध पूर्णपणें झालेला आहे, असें आजवर झालें नाहीं व संपूर्ण मानवजात पूर्णपणें संघ-

टित होऊन व्यक्तींच्या अंतस्थ शक्तीचा विकास होऊन त्या कार्यकारी होईपर्यंत आपणांस धर्माचा उलगडा पूर्णपणे होणें शक्यहि नाहीं. ज्या राष्ट्रांनीं असा विकास थोडयाबहुत प्रमाणांत साधिला आहे त्यांना कर्तव्याकर्तव्याचें ज्ञान बरेंच झालेलें असतें म्हणून त्यांचाच अनुभव आज आपण प्रमाण मानला पाहिजे; त्यांच्या इतिहासांत आपणांस ईश्वराचा संकेत प्रगट झालेला दिसतो, आपण काय केलें पाहिजे याबद्दल त्यांच्या ज्या कल्पना असतात त्यांमुळें आपणांस आपल्या कर्तव्यांचा बोध होतो. देशकालपरिस्थितीच्या अनुरोधानेंच व्यक्तिमात्राचीं कर्तव्यें ठरत असतात; अर्थातच नेहमीं नवीं नवीं कर्तव्यें उत्पन्न होत राहतात. म्हणून आपण सर्वांनीं मिळून मानवजातीच्या उन्नतीसाठीं व शिक्षणासाठीं आपापसांत सहकारिता करून कार्यास आरंभ केला पाहिजे.

म्हणून परमेश्वरानें मानवजातीसाठीं कोणता मार्ग नेमून ठेविला आहे, आपण स्वतः काय केलें असतां मानवजातीच्या प्रगतीच्या कार्याला आपली मदत होईल हें जाणण्यासाठीं स्वतःच्या विवेकाचीच नव्हे तर मानवजातीच्या मताची-लोकनिष्ठेचीहि—मदत आपण घेतली पाहिजे. व्यक्तीचें व मानवजातीचें शिक्षण हीं ज्याप्रमाणें प्रगमनशील आहेत त्याचप्रमाणें नीतीहि प्रगमनशीलच आहे. ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराच्या वेळीं जीं नीतीतत्वें प्रचारांत होतीं तींच तत्वें धर्माचा आरंभ होण्यापूर्वीच्या काळांत प्रमाण मानलीं जात नसत. अठरा शतकांपूर्वीच्या लोकांच्या व आजच्या आमच्या नीतिकल्पनांमध्यें जमीनअस्मानचा फरक आहे; आज तुमच्या राजकर्त्यांनीं कामकरी वर्ग व समाजाचे इतर वर्ग, यांमध्यें तेढ उत्पन्न केली आहे, कोणत्याहि प्रकारचे संघ स्थापण्याची मनाई झालेली आहे; वर्तमानपत्रें व पुस्तकें यांवर सरकारनें आपला पहारा ठेवला आहे कीं न जाणों, तुमच्या डोक्यांत चुकून सत्याचा प्रकाश पडेल, तुम्हांला आपलीं कर्तव्यें कळतील; मानवजातीला आज कशाची जरूर आहे हें याच साधनांनीं तुम्हांपासून लपवून ठेवण्यांत येत आहे. राष्ट्राकडून तुमच्या मोफत शिक्षणाची सोय होऊन सार्वजनिक शाळांमधून मानवजातीचा इतिहास व वर्तमानकाळांतील कर्तव्यें हीं शिकवलीं जाण्यास आरंभ व्हावयाचे पूर्वी याच गोष्टी शिकणें व मानवजातीच्या प्रगतीची दिशा ओळखणें तुम्हांला शक्य आहे. मानवजातीच्या प्रगतीची दिशा व या प्रगतीमुळें प्रगट होणारी मानवी कर्तव्यें हीं वेगवेगळ्या राष्ट्रांत होणाऱ्या घडामोडीचे रूपांत प्रगट होत असतात; या घडामोडीमध्यें कमीअधिक रक्त सांडलें जातें, या गरजा कधीं कधीं अंधुक

अंधुकहि दिसतात; ज्या राष्ट्राला जबरदस्तीनें निष्क्रिय केलेलें नाहीं व जेथें स्मशानाची शांतता स्थापण्यांत आलेली नाहीं तेथें अशा घडामोडी वारंवार होत असतात. गुलामगिरींत पडलेल्या माझ्या बांधवांनो,-या गोष्टीची माहिती करून घ्यावयास तुम्हांस कोणी प्रतिबंध केला आहे काय ? जुलमी व संशयानें ग्रस्त झालेले आमचे राज्यकर्ते युरोपांत घडणाऱ्या गोष्टी आम्हां लक्षावधि इटालियनांपासून किती दिवस छपवून ठेवूं शकतील ? आम्हांपैकीं अनेक लोक वारंवार परदेशांत जात येत असतातच. सार्वजनिक संघ स्थापावयास बंदी आहे पण गुप्त मंडळ्या स्थापावयास कशी हरकत घेतां येईल ? मात्र या गुप्त संस्थांनीं बाह्य खुणा व गुंतागुंतीची घटना यांचा त्याग केला पाहिजे; ह्या मंडळ्यांच्या सभासदबांधवांची सांखळी शहराशहरांना जोडीत जोडीत थेट सरहद्दीपर्यंत जाऊन पोंचली पाहिजे. सरहद्दीपलीकडच्या प्रत्येक भागांत तुमचे मित्र व देशबांधव तुमची वाट पहात आहेत; इटालीचा उद्धार करावा अशी त्यांची इच्छा होती म्हणून आपल्या राजकर्त्यांनीं त्यांना हद्दपार केलें आहे; हे लोक तुम्हांला वस्तुस्थितीचें खरें स्वरूप दाखवून देतील; हद्दपारीमध्यें आलेले कडू अनुभव व केलेलें निरीक्षण यामुळें त्यांना मानवजातीच्या वर्तमानकाळच्या आकांक्षांचें जें ज्ञान झालें असेल तें सर्व तुम्हांला त्यांचेपासून सहज प्राप्त होईल. हे तुमचे मित्र व देशबांधव तुम्हांला दिसत नाहींत काय ? ते अज्ञातवासांत राहून जें वाङ्मय प्रसिद्ध करतात तें वाचण्याची तुमची नुसती इच्छा असेल तर तें मिळणें तुम्हांला अशक्य आहे काय? ते लेख वाचा आणि लगेच जाळून टाका; कारण दुसऱ्या दिवशीं सरकारनें तुमच्या घराची झडती घेतली व ते लेख तुम्हांपाशीं सांपडले तर तुमच्या साऱ्या कुटुंबावर संकट यावयाचें !' आमचें कार्यक्षेत्र आम्हांला वाढवतां यावें, तुमच्यासाठीं जगाच्या व स्वदेशाच्या इतिहासाचे ग्रंथ लिहवून ते छापवितां यावे म्हणून आम्हांला मदत करा. अशा पुस्तकांचा प्रसार त्वरेनें होणें इष्ट आहे म्हणून तसा प्रसार व्हावयाचा मार्ग तयार ठेवा. शिक्षणाशिवाय कर्तव्यबोध होणार नाहीं हें लक्षांत ठेवा. समाजानें तुमच्या शिक्षणाची सोय केली नाहीं तर या गुन्ह्याची जबाबदारी समाजाच्याच डोक्यावर बसते; मात्र शिक्षणाची संधि मिळाली असतांहि तिजकडे तुम्ही दुर्लक्ष कराल, ज्या समाजांत तुम्हांला अशिक्षित ठेवण्यांत येत आहे त्याला नवें रूप यावयाचीं साधनें तुमच्या हातीं असतांना सुद्धां तीं वापरण्यांत तुम्ही कुचराई कराल तर मात्र हें महत्पाप तुमच्याच माथ्यावर पडेल. अज्ञान हा गुन्हा नाहीं पण

अज्ञानांतून मुक्त व्हावयासाठीं तुम्ही धडपड करणार नाहीं तर मात्र तुम्ही स्वतः गुन्हेगार ठराल; तुमची विवेकबुद्धि सांगत असते कीं ईश्वरदत्त शक्तींचा विकास करणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे; तुम्ही आपल्या विचारशक्तीला निद्रितावस्थेंस कुजत पडूं द्याल तर मात्र तुम्ही गुन्हेगार ठराल; परमेश्वरानें सत्यप्रीति ही भावना मनुष्यमात्राला दिली त्याचवेळीं सत्याला अनुसरण्याचीं साधनेंहि त्यानेंच देऊन ठेविलीं आहेत, हें माहीत असून सुद्धां सत्यसंशोधन तुम्ही निराश होऊन सोडून द्याल किंवा जबरदस्तांच्या तोंडचे शब्द निःसंशय सत्य असें तुम्ही मानाल किंवा अशाच जबरदस्तांचे गुलाम झालेल्या धर्ममार्तंडांच्या शब्दावर विश्वसून रहाल तर मात्र तुम्ही गुन्हेगार ठराल.

जगत्पिता व सृष्टिशास्ता जो परमेश्वर तो आपलें शासन मनुष्यजातीमध्यें काल व स्थल यांद्वारें प्रकट करतो. मानवजातीच्या परंपरेला विचारा—मात्र एकाच पिढीला अथवा एकाच मताच्या अनुयायांना या बाबतींत अंतिम प्रमाण धरूं नका. देशकालपरिस्थितीनें अबाधित असा मानवजातीचा शब्द प्रमाण माना. जेव्हां व्यक्तीच्या विवेकशक्तीचा निर्णय लोकमताशीं जुळता असतो तेव्हां खात्रीपूर्वक समजा कीं तो प्रत्यक्ष परमेश्वराचा शब्द आहे.

आमची निष्ठा आहे कीं परमेश्वराचा संकेत प्रकट करण्याची शक्ति फक्त मानवजातींत आहे व आमची मानवजातीवर श्रद्धा आहे. जीं मनुष्यमात्राचीं कर्तव्यें आहेत म्हणून मी सांगणार आहें तीं खरोखरच तशीं आहेत कीं नाहींत याचा पडताळा आपणच काढून पहा. आपल्या विवेकाचा शब्द व मानवजातीचा निर्णय हे दोनहि जुळले तर अर्थातच तीं कर्तव्यें असलीं पाहिजेत.

# ४ मानवजातीसंबंधीं कर्तव्यें.

**पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें ॥**

॥२०॥४॥४॥ दासबोध.

तुमचीं आद्यकर्तव्यें मानवजातीसंबंधींचीं आहेत; म्हणजे हीं पुरतेपणीं पार पाडल्याशिवाय इतर कर्तव्यांना हात घालावयाचा नाहीं असें मात्र नव्हे तर इतर कर्तव्यांपेक्षां जास्त महत्वाचीं म्हणून हीं तुमचीं आद्यकर्तव्यें आहेत; हीं समजावून घेतलीं नाहींत तर इतर कर्तव्यें तुम्हांला नीटपणें पार पाडतां यावयाचीं नाहींत. नागरिक, पुत्र, पति व पिता या नात्यांनीं करावयाचीं कर्तव्यें पवित्र व अनुल्लंघनीय आहेत; पण मनुष्य या नात्यानें तुम्हांवर येऊन पडणाऱ्या जबाबदारीमुळेंच तीं पवित्र व अनुल्लंघनीय होतात. तुम्हांला पितृपद प्राप्त होतें तें एवढ्याचकरितां कीं परमेश्वराचें पूजन कसें करावयाचें व कर्तव्याकर्तव्यविवेक कसा करावयाचा हें तुम्हीं इतरांना शिकवावें. परमेश्वरानें तुम्हांला आपला असा एक देश दिलेला आहे तो एवढ्याचकरितां कीं मर्यादित कार्यक्षेत्रांत—भाषा, प्रवृत्ति व परंपरा यांमुळें जे लोक तुमच्याशीं निगडित झालेले आहेत त्यांचे मदतीनें तुम्ही मानवजातीच्या कल्याणाकरितां श्रम करावेत—मग ज्यांचेसाठीं तुम्ही श्रम करणार ते सध्यां कोणत्याहि स्थितींत असोत किंवा भविष्यकालांतील त्यांचे वंशज कसेहि निपजोत; हें कार्य एकाकी पार पाडतां येण्यासारखें नाहीं कारण मनुष्यप्राणी दुर्बल आहे आणि आपल्या बांधवांच्या समुदायांत त्याचा गोंधळ उडण्याचा संभव आहे. व्यक्तिमात्राला फक्त स्वदेश व आपलें कुटुंब यांबद्दलचीं कर्तव्यें पाळावयाचें नैतिक बंधन असतें असा उपदेश करतात ते नीति शिकवीत नसतात, ते तुम्हांला अहंकार शिकवीत असतात. यामुळें इतरांचे तसेंच तुमचें स्वतःचेहि अकल्याण होतें. कुटुंब व स्वदेश हीं दोन्हीं कार्यक्षेत्रें ज्यामध्यें समाविष्ट होतात असें

मानवजात हें एक अत्यंत विस्तृत कार्यक्षेत्र आहे; एकाच सोपानमार्गाच्या या पहिल्या दोन पायऱ्या मात्र आहेत; त्या चढून गेल्याशिवाय तुम्हांला अधिक उच्च स्थानावर जाणें शक्य नाहीं—मात्र या शिडीच्या पायथ्याशींच उभें रहावयाचा कर्तव्यतत्पर व्यक्तिमात्रास प्रतिबंध आहे.

तुम्ही मनुष्य आहां, तुम्हांमध्यें विचारशक्ति व समाजबुद्धि आहे; संघटनेनें आत्मोन्नति करून घ्यावयाची शक्ति तुम्हांमध्यें आहे आणि या उन्नतीला मर्यादा घालावयास कोणीहि समर्थ नाहीं; आज मानवजातीच्या जीवनाबद्दल आपणांस ही इतकीच माहिती आहे. या शक्ति हे मनुष्यस्वभावाचे महत्वाचे घटक आहेत. जनावरें व माणसें यांमधला फरक याच शक्तींमुळें दिसून येतो आणि त्या फलद्रूप व्हाव्या म्हणूनच बीजरूपानें मनुष्यमात्राचे ठायीं ठेवण्यांत आल्या आहेत.त्यांचा विकास व्हावा व त्यांचें सामर्थ्य वृद्धिंगत व्हावें अशाच रीतीचा प्रत्येकाचा जीवनक्रम असला पाहिजे. या दैवी शक्तीच्या विकासाला विरोध करणें अथवा होऊं देणें या कृत्यानें मनुष्यप्राणी मानवकोटींतून जनावरांच्या कोटींत जातो, त्यांचे हातून जीवितकर्तव्याचा व परमेश्वराच्या आज्ञेचा भंग होतो.

या शक्तींचा लोप होऊं देणें अथवा त्यांचेवर दुसऱ्या कोणाची दडपशाही चालूं देणें हा परमेश्वराचा द्रोह आहे. मनुष्याला व्यक्ति या नात्यानें अलग अलग करतां येण्यासारखीं कर्तव्यें असावींत व तीं त्यानें एकएकटयानेच पाळावीं अशी जर परमेश्वराची इच्छा असती तर त्यानें मनुष्यास एकांतवासामध्यें उत्पन्न केलें असतें; पण संसारामध्यें राहून व्यक्तीनें कर्तव्यरत व्हावें अशी त्याची इच्छा असल्यामुळे त्यानें मनुष्याला लोकसमुदायांत उत्पन्न केलें. मानवजातीमध्यें त्यानें पूर्णत्वाची व प्रीतीची भावना बीजरूपानें ठेवली ती संसारांत मूर्तस्वरूपांत व अधिकाधिक तेजानें प्रकट होत जावी असाच परमेश्वराचा संकेत आहे. व्यक्तीच्या ऐहिक जीवनाचें कार्यक्षेत्र कालानें आकुंचित केलेलें आहे व कर्तृत्वशक्तीच्या कमकुवतपणामुळें वैयक्तिक जीवन अगोदरच कमजोर झालेलें आहे. तेव्हां अशा वैयक्तिक जीवनांत या भावना क्वचित् झळकतांना दिसाव्या हेंच साहजिक आहे. पिढयामागून पिढया उत्पन्न होत राहतात म्हणून मानवजाति चिरंजीव आहे; व्यक्तिमात्रांच्या बुद्धिप्रभावानें मानवजातीची सामुदायिक बुद्धिमत्ता अखंडितपणें प्रदीप्त राहते आणि म्हणून देशकालपरिस्थितीनें अबाधित अशा मानवजातीच्या निर्णयांतच परमेश्वराचा शब्द प्रकट होणें शक्य आहे. मनुष्यानें आपल्या

आयुष्याचा व्यय मानवजातीच्या कल्याणाकडे करावा, त्यानें आपल्या शक्तींचा उपयोग आपल्या बांधवांच्या नैसर्गिक शक्तींची वाढ करणाऱ्या प्रयत्नांत करावा आणि अनेक शतकेंपर्यंत हळू हळू प्रगति करीत असलेल्या सत्यसंशोधनाच्या व सुधारणेच्या कार्याला व्यक्तिमात्रानें हातभार लावावा म्हणूनच परमेश्वरानें मनुष्याला जीवन—शक्ति दिलेल्या आहेत. तुम्ही स्वत: शिक्षणसंपादन केलेंच पाहिजे व इतरांनाहि सुशिक्षित केलें पाहिजे; स्वत:च्या सर्व शक्ति शक्य तितक्या विकसित करून घेतल्या पाहिजेत व इतरांना याच कार्यांत मदत केली पाहिजे. तुमच्या अंतर्यामीं नि:संशय परमेश्वराचें अधिष्ठान आहे, तसेंच तुम्हांभोंवतीं दिसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे ठायीं नारायणाचें वास्तव्य आहे; प्राचीन, वर्तमान व भावी या सर्व पिढ्यांमध्यें त्याचें वास्तव्य होतें, आहे व असेल. परमेश्वर, धर्म व मानवी कर्तव्यें यांचें ज्ञान जास्त पवित्र व प्रसृत करणें हें या पिढ्यांचें कार्य आहे. परमेश्वर ज्या वस्तूंत अधिष्ठित आहे अशी तुमची भावना होईल त्या वस्तूंचें पूजन तुम्हीं केलेंच पाहिजे. मानवजात हें परमेश्वराचें मंदिर आहे आणि म्हणून या मंदिरांत होणाऱ्या प्रत्येक अपवित्र प्रकाराचा बोजा तुम्हांवर आहे. तुम्ही स्वत:ला पवित्र व उच्च म्हणून घ्याल तर त्यापासून फारसा उपयोग होणार नाहीं; एकांतवास पत्करूनसुद्धां तुम्ही ज्याला पवित्र म्हणतां, तें रक्षण करतां येण्यासारखें आहे; तुम्ही अपवित्रतेपासून दोन पावलें दूर रहाल; पण तुम्ही जगांतल्या अपवित्रतेची हकालपट्टी करण्यासाठीं झटलां नाहींत तर तुम्ही कर्तव्यच्युत आहां असेंच मानलें पाहिजे. सत्याची भक्ति नुस्ती अंत:करणांतच करून भागत नाहीं; जगाच्या कोठल्याहि कोंपऱ्यांत तुमचा एकादा बांधव अज्ञानाच्या अंध:कारांत खितपत असेल तर त्याची सुटका करण्यासाटीं आपल्या परीनें यत्न करणें हें तुमचें कर्तव्य आहे हें माहित असूनहि तुम्ही तसा यत्न न कराल तर तुम्ही कर्तव्यभ्रष्ट आहांत असेंच मानण्यांत येईल. तुमच्या बांधवांचे अंतर्यामीं असलेली परमेश्वराची मूर्ति अशा वर्तनानें विद्रूप होईल. परमेश्वरानें या संसाराला घालून दिलेल्या नियमांचें—धर्माचें-पालन व्यक्तिमात्रानें केलेंच पाहिजे अशी त्याची इच्छा असतांहि, त्यांचा आज विपर्यास होत आहे, त्यांचा आज भंग होत आहे. ज्या अनंत कोटि व्यक्तींनीं त्यांना नेमून दिलेलें काम पार पाडावें असा ईश्वराचा संकेत, त्याच व्यक्ति आज मानवी जीवनाच्या उदात्ततेला कालिमा आणीत आहेत. आणि अशावेळीं तुम्ही किंकर्तव्यमूढ होऊन निष्क्रिय राहाल तर चालेल काय? कांहींच कार्य करीत

नसतांहि आमची परमेश्वरावर श्रद्धा आहे असें म्हणावयाचा निर्लज्जपणा तुमचे अंगीं आहे काय?

एकाद्या देशाचे लोक आपल्या राष्ट्राचा व स्वातंत्र्याचा झेंडा उभारतात,— आपल्या शत्रूंशीं युद्ध करतात, विजय किंवा स्वर्ग यापैकीं एक तरी त्या स्वातंत्र्य-युद्धांत प्राप्त करून घेतात—ते लोक ग्रीसचे असोत वा पोलंडचे असोत, त्यांच्या युद्धकथा ऐकतांना तुमचें हृदय उचंबळून येतें, त्यांच्या विजयाची वार्ता ऐकून तुम्हाला आनंदाचें भरतें येतें, त्यांच्या पराभवाची बातमी ऐकतांना तुम्हाला आपला स्वतःचाच पराभव होत आहे असें वाटतें; असें कां होतें? जिकडे तिकडे सामसूम असतांना जगाच्या कोठल्या तरी कोंपऱ्यांतून एकादा मनुष्य—मग तो तुमचा देशबांधव असो किंवा कोणी परकीय असो—एकाद्या नव्या तत्वाचा उच्चार करतो, त्याची निष्ठा असते कीं तें तत्व सत्य आहे; कितीहि छळ झाला व तुरुंगवास भोगावा लागला तरी तें तत्व सत्यच आहे असा तो आग्रह धरतो आणि फांसावर त्याच्या गळ्यासभोंवतीं तांतेचा फांस आंवळून बसत असतांनासुद्धां त्या तत्वाशीं तो एकनिष्ठ राहतो. अशा मनुष्याला धर्मवीर अथवा महात्मा म्हणून तुम्ही त्याचा आदर कां करतां? तुम्ही स्वतः त्याचें स्मरण आदरपूर्वक करतां व आपल्या मुलाबाळांनाहि तसेंच करावयास शिकवितां, हें तुम्ही कां करतां?

ग्रीसच्या इतिहासांतल्या राष्ट्रप्रीतीनें ओथंबलेल्या कथा तुम्ही अत्यंत उत्सुकपणें वाचतां, त्या आपल्या मुलांना निवेदन करीत असतांना तुमचें मन अभिमानानें भरून येतें, कीं जणूं काय या गोष्टी आपल्याच वाडवडिलांच्या कर्तृत्वाच्या आहेत—या भावना तुमच्या अंतःकरणांत कां येतात? जे प्रसंग तुमच्या मनांत असतात ते दोन हजार वर्षांपूर्वी घडलेले, आणि तेहि फार वेगळ्या परिस्थितींत! ज्या तत्वांच्या सत्यतेखालीं त्या वीरांनीं आपल्या रक्ताची साक्ष दिली त्या तत्वांवर तुमचा भरंवसा नसेल; त्यांनीं स्वतःवर मरण ओढवून घेतलें व वैयक्तिक प्रगति खुंटवून घेतली असेंहि तुमचें मत असेल; ज्या लोकांच्या जयपराजयाशीं तुमच्या भावना एकतान होतात ते तुम्हांला परके आहेत, त्यांचेबद्दल तुम्हाला फारसें ज्ञानहि नाहीं; त्यांची भाषा वेगळी, त्यांच्या व तुमच्या रीतींभातीचाहि कांहीं संबंध नाहीं; मग त्यांचे प्रांतावर एकाद्या सुलतानाची सत्ता असली काय, बव्हेरियाच्या राजाची किंवा रशियाच्या झारची सत्ता असली काय, अथवा त्या राष्ट्राचें राज्य त्याच देशाच्या लोकांनीं स्वसत्ताक ठेविलें असलें

काय, तुम्हांला सारें सारखेंच ! पण तुमच्या अंतःकरणांत एक ध्वनि बोलत असतो कीं ते दोन हजार वर्षांपूर्वीचे लोक, तुम्हांपासून आज दोन हजार मैलांवर लढत असलेले लोक-हे एका तत्वासाठीं लढले-कदाचित त्याच तत्वासाठीं तुम्ही स्वतः लढणार नाहीं-ते तुमचे बांधव आहेत, नुसते मानवजातीच्या नात्यानें बांधव नव्हेत तर ध्येयाच्या व कार्याच्या एकवाक्यतेमुळें ते तुमचे बांधव आहेत. ते ग्रीक लोक निजधामाला गेले पण त्याचें कार्य मात्र नाहींसं झालें नाहीं; त्यांनीं आपलें कार्य जर नीटपणें केलें नसतें तर आज आपण नैतिक व बौद्धिक विकसनाच्या ज्या पायरीवर आहोंत तेथवर आजपर्यंत येऊं शकलोंच नसतों. आज ज्या राष्ट्रस्वातंत्र्याच्यां तत्वासाठीं तुम्ही लढत आहां तेंच तत्व त्यांनीं आपल्या रक्ताच्या अर्घ्यानें पवित्र केलें आहे. त्या वीरांनीं आत्मयज्ञ करून जगाच्या निदर्शनास आणन दिलें कीं सत्यासाठीं मनुष्यानें सर्वस्वाचा त्याग करावयास तयार असलें पाहिजे, प्रसंगीं प्राणाचीहि आहुति दिली पाहिजे. ज्या वीरांनीं आपल्या धर्मनिष्ठेवर रक्ताची मोहोर केली त्यांनीं स्वतःच्या ऐहिक प्रगतीचा मार्ग खुंटवला कीं काय या प्रश्नाला कांहींच महत्व नाहीं, खुद्द परमेश्वराला त्यांच्या जीवनाचा विकास करणें भाग आहे; मानवजातीची प्रगति ही मुख्याची गोष्ट आहे. सत्यासाठीं आज जें युद्ध चाललें आहे व जो आत्मयज्ञ चालला आहे त्यापासून भविष्यकालांतल्या लोकांना धडा मिळावा, त्यांची सत्यभक्ति जास्त उच्च प्रतीची व्हावी व त्यांना मानवी कर्तव्यांचें ज्ञान जास्त स्पष्ट व्हावें, ही महत्वाची गोष्ट आहे. आत्मयज्ञांमुळें मानवस्वभाव उच्चतर होत जातो आणि मनुष्याला खऱ्या धर्माचें ज्ञान अधिक स्पष्टपणें होऊं लागतें; मनुष्यस्वभाव उच्चतर होतो, नव्या तत्वांना मूर्तस्वरूप व विजय प्राप्त होतो आणि शिक्षण, प्रगति व नीति यांचे मार्गावर एकादें पाऊल पुढें पडतें तेव्हां संपूर्ण मानवजातीवर त्याचा परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाहीं अशी मनुष्याची खात्री पटते. वेगवेगळ्या मार्गांनीं एकाच ठिकाणावर चाल करून जाणारे व वेगवेगळ्या पथकांत विभागलेले असे एकाच सैन्यांतले तुम्ही स्वतः एक सैनिक आहांत हें विसरूं नका. त्या सर्व सैन्याचें ध्येय एकच आहे; सध्यां तुम्हांला स्वतःचे अगदीं निकटचे असेच नेते दिसत असतात; वेगवेगळ्या प्रकारचे लष्करी पोषाख, वेगवेगळ्या भाषेंत व अर्थांनीं उच्चारलेले जाणारे हुकमांचे शब्द व या एकाच सैन्याच्या वेगवेगळ्या पथकांना एकमेकांना शत्रुवत् भासवणाऱ्या सरहद्दी वगैरे अडथळ्यांमुळें तुम्हांला या सत्याचा विसर पडतो व तुमचें लक्ष अगदीं आकुंचित

अशा कार्यक्षेत्रांतल्या अगदीं निकटच्या साध्यांत गुंतून राहतें. पण जगन्नियंत्याला संपूर्ण मानवजातीवर नजर ठेवतां येतें; त्याला हें सर्व सैन्य दिसत असतें. सर्व पथकांच्या वेगवेगळ्या हालचाली त्याच्याच हुकमानें चाललेल्या आहेत. हें युद्ध कशाकरितां चाललें आहे हें एकट्या परमेश्वरालाच माहीत आहे; या युद्धाचा नकाशा फक्त त्यालाच अवगत आहे आणि संपूर्ण मानवजातीला एकाच झेंड्याखालीं एकीकृत करावयाचें सामर्थ्य फक्त त्याचेच ठायीं आहे.

आज आमच्या अंतःकरणांत जी निष्ठा आहे ती अशा प्रकारची आहे; ज्या नवयुगाचा उषःकाल होत आहे असें आपणांस वाटत आहे त्या युगाच्या नीतीचा पाया याच निष्ठेवर आहे; या नवयुगाच्या नीतीचा पाया आणि प्राचीन काळांतल्या लोकांच्या नीतीचा पाया यांचेमध्यें केवढें जमीनअस्मानाचें अंतर आहे ! ज्या सत्ययुगाची संस्थापना आपण करणार आहों त्याच्या कल्पनेंत आणि आपणांस जीं कर्तव्यें वाटतात त्यांच्या कल्पनेंत किती दृढ ऐक्यभाव आहे ! अनादि कालांत सुद्धां लोकांना परमेश्वराचें अस्तित्व भासत होतें, पण त्यांनीं परमेश्वराचें व धर्माचें यथार्थ ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचा प्रयत्न केला नाहीं; त्यांना वाटत होतें कीं परमेश्वर परमसमर्थ आहे; ते त्याच्या सामर्थ्याला भीत होते, देवाच्या प्रीतीची ओढ त्यांच्या जीवाला भासत नव्हती; देव व मनुष्य यांचेमध्यें कांहीं तरी संबंध असावा अशी त्याची अंधुक कल्पना मात्र होती. इंद्रियांना गोचर होणाऱ्या वस्तूंच्या आडचें चैतन्य त्यांना उमगूं लागलें नव्हतें, त्यांनीं देवालाहि तशाच प्रकारचें स्वरूप दिलें—विजेनें भंगलेलें एकादें झाड, ज्या एकाद्या खडकाच्या आसऱ्यानें त्यांनीं आपलें खोपट उभारलें होतें तो खडक, त्यांच्या नजरेस पडलेलें एकादें विचित्र जनावर—यांना व अशाच वस्तूंना देव मानून त्यांची पूजा त्यांनीं आरंभिली. यांवरून जड वस्तूंमध्यें अद्भुत शक्तीचें अधिष्ठान आहे असा समज रूढ होऊन वस्तूपूजेला आरंभ झाला. त्यावेळीं मनुष्याला स्वतःच्या कुटुंबाव्यतिरिक्त कोणतेच बंधन नव्हतें; कुटुंबाबाहेरचे सारे त्याला परके असत; आणि सारे परके जवळ जवळ त्याला आपले शत्रु वाटत असत; अर्थातच अशा परिस्थितीमध्यें स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबाचें संरक्षण करणें एवढाच त्यांच्या नीतिमत्तेचा पाया होता. कालांतरानें देवाबद्दलची कल्पना जास्त विस्तृत झाली. इंद्रियगोचर वस्तूंमध्यें वसणाऱ्या परमेश्वराची कल्पना त्याच वस्तूंविरहित अशी मनामध्यें आणावयाचा यत्न त्यांनीं भीतभीतच केला व सर्व साधारण अनुमानें काढावयास

त्यांनीं आरंभ केला. देव हा फक्त कुलस्वामी आहे ही आकुंचित कल्पना त्यांनीं सोडून दिली; देव हा कुटुंबसंघाचा, जातीचा, शहराचा व राष्ट्राचा रक्षणकर्ता आहे येथवर ही कल्पना विस्तार पावली. वस्तुपूजेनंतर अनेक देवदेवतांच्या पूजेला आरंभ झाला. अर्थातच यानंतर नीतीचें कार्यक्षेत्रहि अधिक विस्तृत झालें. मनुष्याच्या कर्तव्याचें कार्यक्षेत्र फक्त कुटुंबापुरतेंच होतें, त्याचा विस्तार झाला व मनुष्य आपल्या जातीसाठीं व देशासाठीं कार्य करावयास लागला; तरीहि मानवजातीकडे त्याचें लक्ष अझून पोंचलें नव्हतें. प्रत्येक राष्ट्राला वाटत असे कीं आपल्या सरहद्दीपलीकडचे सारे लोक रानटी आहेत; असा समज एकदां रूढ झाल्यावर त्या लोकांना फार वाईट रीतीनें वागविण्यांत आलें, शक्तीच्या जोरावर अथवा कपटानं त्यांना जिंकण्यांत आलें व त्यांचेवर जुलूम करण्यांत आला. असे लक्षावधि परकी—व म्हणून रानटी—लोक प्रत्येक देशांत रहात होते, त्यांना नागरिकत्वाचे हक्क नव्हते, राष्ट्राच्या धर्मांत प्रविष्ट व्हावयास त्यांना प्रतिबंध होता; ते हाडानेंच गुलाम असले पाहि-जेत असा साऱ्यांचा समज होता, म्हणून प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांत असे परतंत्र गुलाम आढळून येत असत. लहान मोठे अनेक देव मानण्याऐवजीं देव हा एक आहे असें मानण्यांत आलें असतें तरच मानवजातीच्या वेगवेगळ्या विभागां-मध्यें ऐक्यभाव आहे अशी कल्पना लोकांचे मनांत आली असती. परमेश्वर एक आहे ही कल्पना प्राचीन काळच्या कांहीं महर्षींच्या अंत:श्चक्षूंस भासमान झाली होती; मोझेसनें[1] हेंच जाहीर केलें होतें; पण हें जाहीर करतांना त्यानें एक ढोबळ चूक करून ठेविली होती ती ही कीं मानवजातीमधल्या अनेक विभागां-पैकीं एका विशिष्ट देशच्या लोकांवर देवाची विशेष मेहेरनजर आहे असें आपलें मत त्यानें नमूद करून ठेविलें होतें. रोमन साम्राज्याच्या अस्तकालीं ख्रिश्चन धर्माचा उदय होत होता तेव्हां मात्र हें तत्त्व अगदीं शुद्ध स्वरूपांत मान्य करण्यांत आलें; " परमेश्वर एक आहे व मनुष्यें हीं त्याचीं लेंकरें आहेत" हीं दोन तत्त्वें ख्राइस्टनें आपल्या शिकवणुकीच्या अग्रस्थानीं स्थापन केलीं होतीं; ह्या तत्वांच्या प्रचारानें संपूर्ण मानवजातीच्या घटनेत मोठा फरक घडून

---

१ मोझेस:– धर्मगुरु; ज्यू समाजाच्या नियमनासाठीं मोझेसनें आपल्या मनू-प्रमाणें कायदे निर्माण केले. इजिप्तच्या जुलमी राजांच्या कचाटींतून सुटावया-साठीं ज्यू लोकांनीं मोझेसच्या नेतृत्वाखालीं दुसऱ्या देशचा मार्ग धरला.

आला, मनुष्याच्या नीतीचें कार्यक्षेत्र व कर्तव्यांची व्याप्ति संपूर्ण मानवजाती-इतकी विस्तृत झाली. कुटुंबकर्तव्यें व राष्ट्रकर्तव्यें हीं अगोदरच मान्य करण्यांत आलीं होतीं, त्यांमध्यें मानवजातीसंबंधींच्या कर्तव्यांची भर पडली. नंतर मनुष्याला समजून आलें कीं सर्व मनुष्यप्राणी हे आपले बांधव आहेत, प्रत्येकाचे अंतर्यामीं नारायणाचा निवास आहे, प्रत्येकाचा आत्मा अनंत आहे व तो परमेश्वरस्वरूपांत केव्हां तरी लीन होणार आहे; आपण प्रत्येकाशीं प्रीतीचा व विचारांचा विनिमय केला पाहिजे, आपण इतरांना प्रत्यक्षपणें अगर अप्रत्यक्षपणें मदत केली पाहिजे अशी मनुष्याची खात्री झाली. नंतर ईश्वरानें धर्मप्रचारकांचे अंत:करणांत स्फूर्ति प्रज्वलित केली तेव्हां त्यांचे मुखांतून गंभीर अर्थ भरलेल्या महामंत्रांचा उच्चार होऊं लागला. हे मंत्र त्या वेळच्या लोकांना समजले नाहींत व कांहीं धर्मगुरूंनाहि ते कुचकामाचे वाटून त्यांनीं त्या मंत्रांचा त्याग केला; मानवदेहांत अनेक इंद्रियें असतात, पण प्रत्येक इंद्रियाला तींच कार्यें करावयाचीं नसतात; आपण मानव जरी कोटयावधि आहों तरी परमेश्वराच्या विश्वरूपांत आपण एकवटलों आहों; तसेंच प्रत्येक मनुष्य हा दुसऱ्या कोणाच्या तरी जीवनाचा एक अवयव आहे.[१] सर्व मानवजातीमध्यें ऐक्यभाव आहे व संपूर्ण सृष्टीचा शास्ताहि एकच आहे,[२] ह्या महामंत्रांचा उच्चार होऊन आज जवळ जवळ दोन हजार वर्षें होत आलीं, इतकीं वर्षें अभ्यास व परिश्रम करून अनुभव मिळाल्यानंतर आज ह्या तत्त्वांना व्यावहारिक स्वरूप प्राप्त व्हावयाची वेळ आली आहे; हीं तत्त्वें फक्त व्यक्तीव्यक्तींनाच लागू करावयाचीं आहेत असें नाहीं, तर मानवजातीच्या अंत:शक्तींस व सामर्थ्यास तीं लागू करावयाचीं आहेत; ह्यामुळें मानवजात एक आहे व म्हणूनच धर्महि एकच आहे इतकेंच प्रतिपादित व्हावयाचें नाहीं. या धर्माचें पहिलें कलम प्रगति हें आहे—ती प्रगति या जगांत सिद्ध व्हावयाची आहे--आपणांस परमेश्वराचा संकेत यथाशक्ति पूर्ण करावयाचा आहे आणि उच्चतर जीवनासाठीं शिक्षण प्राप्त करून घ्यावयाचें आहे—इतक्या गोष्टी त्या महामंत्रांमध्यें गर्भित आहेत. जर मानवजात हा महापुरुष, तर अर्थातच आपण त्या महापुरुषाच्या शरीराचे घटक

---

१ Paul. Ep. to Romans, ch. XII. VV. 4, 5 हेच विचार भगवद्गीतेंतहि आहेत. अध्या ११ श्लो. १३

२ Gospel of St. John, Ch. X. Ver. 16

आहों आणि याच नात्यानें आपण त्याच्या सामर्थ्यसमृद्धिसाठीं परिश्रम केले पाहिजेत; मानवजातीचे जीवनांत एकतानता, उत्साह आणि सामर्थ्य हीं आपण विकसित केलीं पाहिजेत. आपल्या बांधवांची उन्नति केल्यानेंच आपलीहि उन्नति होते, आपल्या बांधवांची इच्छा नसतांहि त्यांच्या उन्नतीसाठीं आपण झटलें पाहिजे—हीं तत्वें ओळखून त्यांना आपल्या वर्तनांत मूर्तस्वरूप द्यावयाचा काळ आतां आलेला आहे. मनुष्यानें हा नरदेह धारण करून जें कार्य केलें पाहिजे असें आपणांस अनुमान काढतां येतें तें साध्य व्हावयासाठीं संपूर्ण मानवजातीनें एकवटून यत्न केला पाहिजे अशाच प्रकारचें तें कार्य आहे; धर्म म्हणून चार दाणे भिक्षेकराला घालण्याचे ऐवजीं धर्म म्हणूनच आपण कांहीं तरी सघटना निर्माण केली पाहिजे—संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठीं आपण यतमान झालें पाहिजे, आणि हेंच आपणांस नीटपणानें करतां यावें म्हणून आपणांस आपल्या कुटुंबाची व राष्ट्राची पुनर्घटना केली पाहिजे.

आपणांस मानवी जीवनाचें ज्ञान अधिक स्पष्टपणें होत जाईल तशतशीं दुसरीं व यापेक्षांहि विस्तृत अशीं कर्तव्यें आपणांस प्रकट होत जातील अशा रीतीनें जगत्पिता जो परमेश्वर तो मानवजातीला सुधारणेच्या मार्गावर चालवीत असतो; हें कार्य तो मानवजातीला हळूहळू पण अखंडितपणें धर्माचें शिक्षण देऊनच करीत असतो; मानजातीची सुधारणा होत असतांना नैसर्गिकपणें प्रत्येक व्यक्तीचीहि सुधारणा होत जाते.

मानवजातीच्या सुधारणेबरोबरच व्यक्तिमात्राची सुधारणा होत राहते कारण व्यक्तीच्या आजूबाजूचें नैतिक वातावरण जर घाणेरडें असेल तर व्यक्तिमात्राला पावित्र्य व उन्नति हीं कशीं प्राप्त करून घेतां येणार ? सर्वसाधारणपणें पाहिलें तर मनुष्याला मानवजातीबरोबरचा आपला संबंध तोडतां येत नाहीं, मुद्दाम यत्न केला तर तो तुटत नाहीं; मनुष्यमात्राला आपलें आयुष्य आपल्या बांधवांतच काढावें लागतें, त्यांचेमुळेंच त्याला स्वत:चा जीवनक्रम चालवतां येतो आणि कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारानें आपल्या बांधवांचेसाठींच तो आपल्या जीवनाचा व्यय करतो. भोंवतालची हवा बिघडली तर धट्ट्याकट्ट्या प्रकृतीच्या माणसावरहि तिचा वाईट परिणाम निश्चयेंकरून होतो, व्यक्तिमात्राच्या जीवनाचेंहि तसेंच आहे, त्याला आपल्या भोंवतालच्या परिस्थितीचे परिणाम टाळतां येत नाहीं—अर्थातच कांहीं अत्यंत तेजस्वी पुरुष या नियमाला अपवाद अस-

तात. एकाद्या देशांत राज्यकर्ते व हेर यांच्या जुलुमामुळें प्रत्येकाला आपलीं अर्धी अधिक मतें जाहीर तरी करतां येत नाहींत किंवा आपलीं मतें तशीं नाहींतच असें तरी बोलून दाखवावें लागतें—अशा देशांमध्यें पोटापाण्यासाठीं आपल्या मुलांबाळांना अशा देशांमध्यें पाठवावयाचें तुम्ही ठरविलें असतें तर त्यांनीं सत्यप्रतिज्ञच व्हावें व छळहि सोसावा, अशा प्रकारचें शिक्षण त्यांना द्यावयाची मनाची तयारी असलेले लोक तुम्हांमध्यें किती आढळतील ? ज्या समाजांत संपत्ति हेंच सामर्थ्य मानण्यांत यतें, जेथें फक्त पैशाला मान मिळतो—फक्त संपत्तिमान् लोकांचाच आदर करण्यांत येतो—सत्ताधारी अथवा त्यांचे हस्तक यांचेकडून होणाऱ्या जुलुमापासून व अपमानापासून जेथें फक्त पैसा मनुष्याचें रक्षण करूं शकतो, अशा समाजांत आपल्या मुलाबाळांना आयुष्य घालावयाचें आहे हें माहीत असूनहि त्यांचे अंत:करणांत संपत्तीचा तिटकारा उत्पन्न होईल अशा प्रकारचें शिक्षण त्यांना द्यावयाचा करारीपणा तुम्हांपैकीं किती लोकांनीं दाखविला आहे ? " कोणावरहि विश्वास टाकूं नका; प्रामाणिक मनुष्यानें सार्वजनिक कार्य करण्याच्या भानगडींत पडूं नये, ज्यानें त्यानें आंथरूण पाहून पाय पसरावे—" अशा प्रकारचा उपदेश आपल्या लोभांतल्या इटालियन बांधवांना ज्यानें केला नाहीं असा तुम्हांमध्यें कोण आहे ? हा उपदेश करीत असतांना उपदेशकाचे मनांत नि:स्वार्थी प्रेम व शुद्ध हेतु असूं शकतील, हे विचार त्याचे मनांत समाजांतील परिस्थितीचें निरीक्षण केल्यानंतरच आले असतील, पण हा उपदेश सर्वस्वीं अनीतिदर्शकच नाहीं काय ? ज्या ख्राइस्टनें आपण होऊन मानवजातीसाठीं क्रूसावर आत्मयज्ञ केला त्याचीच पूजा करणारी अशी कोणची माता आहे कीं, जिनें आपला पुत्र स्वत:च्या बांधवांचेसाठीं आत्मयज्ञ करावयास निघाला असतां त्याचे गळ्यांत हात टाकून त्याला त्या कार्यापासून परावृत्त केलें नाहीं ? आपल्या मुलांना उच्च प्रकारचें शिक्षण द्यावयाचें मनोधैर्य तुम्हीं दाखविलें असलें तरी समाजांतले हजारों दुर्गुण व घाणेरडे लोक यांचेमुळें तें शिक्षण निष्फळ होणार नाहीं काय ? अध:पतनानें हीन झालेल्या वातावरणांत तुम्हांला स्वत:ला तरी आत्मोन्नति व पावित्र्य हीं प्राप्त करून घेणें शक्य आहे काय ?

ऐहिक परिस्थितीसंबंधानें विचार करीत असतांहि सर्वांच्या अभ्युदयाशिवाय तुमची ऐहिक स्थिति कायमची सुधारणें शक्य आहे काय? मी आज हे शब्द इंग्लंडांत लिहीत आहें, येथें धर्मदाय म्हणून लक्षावधि पौंड दरसाल

खासगी लोकांकडून निराश्रित गरीबांचे मदतीसाठीं खर्च करण्यांत येतात; तरीहि मदत मागणारांची संख्या सालोसाल वाढतच आहे. फक्त पैसेवाल्या लोकांचा धर्म या कामासाठीं पुरा पडत नाहीं म्हणून याच कार्यासाठीं एकादी सार्वजनिक संस्था उभारावी असा विचार सगळीकडे चालला आहे. ज्या देशांत राज्यकर्ते अन्यायांवर अन्याय करून प्रजेस चिरडून टाकीत आहेत, जेथें जुलूम करणारे व जुलूम सोसणारे यांचेमध्यें युद्ध जुंपणार असा संभव क्षणोक्षणीं दिसत आहे अशा देशामध्यें नवीन प्रकारचे धंदे ऊर्जितावस्थेस आणावयासाठीं फार दिवस वापरावयास मिळेल असें अफाट भांडवल बाहेर देशांतून आणणें शक्य आहे काय ? ज्या देशांत राज्यकर्त्यांच्या स्वैर इच्छेनुसार कर बसविण्यांत येतात व निर्बंध घालण्यांत येतात, स्वतःच्या सत्तेला धोका येऊं नये म्हणून जेथें सैनिक, गुप्त हेर, हलकट हस्तक व पेनशर लोक यांची संख्या दिवसानुदिवस वाढविण्यांत येत असते अशा देशांत उद्योगधंदे व कारखाने स्थापन होतील अथवा त्यांची भरभराट होईल असें तुम्हांला वाटतें काय ? फक्त आपल्याच देशाची राज्यपद्धति व सामाजिक स्थिति सुधारली कीं आपलें काम झालें असें तुम्हांला वाटतें काय ? नाहीं, आज जगांतला कोणताहि देश निर्भेळ स्वदेशी मालावर जिवंत राहूं शकत नाहीं, वस्तूंचा विनिमय झालाच पाहिजे, आयात व निर्गत यामुळेंच राष्ट्र जिवंत राहूं शकतें. एकाद्या परकी राष्ट्रांतले लोक सांपत्तिक दृष्टीनें खालावले तर तुमच्या देशच्या मालाच्या मागणीवर त्याचा परिणाम होतो. एकाद्या देशची राज्यपद्धति वाईट असली म्हणजे त्या देशाचा परदेशांशीं चालत असलेला व्यापार सपशेल बसतो, यामुळें सबंध देशाची स्थिति खालावते. इंग्लंड अथवा अमेरिका या राष्ट्रांचा एकदम नाश झाला तर इटालीचाहि नाश होईल. कोणत्याहि राष्ट्राची पत स्वयंसिद्ध नसते, राष्ट्रीय पत हा आंतरराष्ट्रीय संबंध आहे. एका राष्ट्राची उन्नति होऊं लागली म्हणजे बाकीच्या राष्ट्रांमध्यें अस्वस्थता पसरूं लागतें, म्हणून एका विशिष्ट राष्ट्राचा स्वतःच्या उन्नतीसाठीं यत्न हा सर्व राष्ट्रांच्या उन्नतीचाच प्रयत्न असतो; हें तुमच्या अगोदर साऱ्या राज्यकर्त्यांनीं व राजकारणी पुरुषांनीं ओळखलें आहे; कोणत्याहि देशामध्यें राष्ट्रीय उन्नतीची चळवळ सुरू झाली कीं ती लागलीच दडपून टाकावयाची; यासाठीं त्यांनीं आपसांत अगोदरच संघटना करून ठेवली आहे; म्हणून इटलीच्या उद्धारासाठीं युरोपांतील सर्व राज्यकर्त्यांचेबरोबर तुम्हांला लढावें लागेल. सर्व राष्ट्रांमध्यें सुधारणेची चळवळ जारीनें सुरू झाली पाहिजे, युरोपमधील राष्ट्राराष्ट्रां-

मध्यें बंधुभाव प्रस्थापित झाला पाहिजे; संपूर्ण मानवजातीमध्यें जो ऐक्यभाव प्रस्थापित व्हावयाचा आहे त्याची पहिली पायरी याच भावनेनें हा यत्न सुरू झाला पाहिजे. माझ्या बंधूनों, म्हणूनच मीं तुम्हांला सांगत आहे कीं, तुमचीं आद्यकर्तव्यें मानवजातीसंबंधींचीं आहेत. ह्या दिशेनें प्रयत्न होईल तरच तुम्हांला राष्ट्रकर्तव्यें व कुटुंबकर्तव्यें नीटपणें पाळतां येतील; हें तुमचें कर्तव्य आहे, हें तुमच्या हिताचेंहि आहे. परमेश्वराची प्रीति व त्यानेंच नेमून दिलेला धर्म हीं विश्वव्यापी आहेत, त्याचप्रमाणें तुम्हीं संपूर्ण मानवजात आपल्या कार्यकक्षेंत घ्या. तुमचा जन्म कोठल्याहि देशांतला असो, कोणत्याहि देशामध्यें एकादा मनुष्य सत्यासाठीं व न्यायासाठीं लढत असेल तेथें तुमच्या एका सख्ख्या भावानें तें युद्ध चालविलेलें आहे असें माना; प्रमाद, अन्याय अथवा जुलूम यांखालीं जे कोणी चिरडले जात आहेत तेच तुमचे भाऊ, मग ते कोणत्याहि देशचे असोत. स्वतंत्र राष्ट्रांतले व परतंत्र राष्ट्रांतले सर्व लोक भाऊ भाऊच आहेत. तुम्हां सर्वांचा उद्गम, धर्म व ध्येय हीं एकच आहेत; तेव्हां तुम्ही ज्या दिव्य निशाणाखालीं लढणार तें निशाणहि एकच असूं द्या. वेगवेगळ्या राष्ट्रांमध्यें बोलल्या जाणाऱ्या भाषा वेगवेगळ्या आहेत असें म्हणूं नका; अश्रू, कृति व आत्मयज्ञ या मूलाक्षरांची भाषा जगांतल्या सर्व लोकांना सहज समजते, तुम्हांलाहि ती समजते. मानवजात अफाट आहे व आम्ही व्यक्तिशः अति दुर्बल आहोंत असेंहि म्हणूं नका. कारण परमेश्वर तुमच्या सामर्थ्याचें माप घेणार नाहीं, तर तो तुमचे हेतु किती उच्च होते हेंच पाहील. मानवजातीवर प्रेम करा. राष्ट्र व कुटुंब हीं आपलीं निकटचीं कार्यक्षेत्रें आहेत, त्यांचेमध्यें कोणतेंहि कार्य करावयाचें तुमच्या मनांत आलें तर तुम्हीं स्वतःला विचारा कीं, मी जें आतां करीत आहें तेंच सर्व लोकांनीं एकमेकासाठीं करावयास आरंभ केला तर त्यापासून मानवजातीचें कल्याण होईल कीं अकल्याण होईल ? विवेकानें निर्णय दिला कीं अकल्याण होईल, तर त्या कार्याला हात घालूं नका; तुमच्या कुटुंबाचा अथवा राष्ट्राचा त्या कार्यापासून थोडाबहुत फायदा होईल असें तुम्हांला वाटत असलें तरी तें कार्य तुम्ही बंद करा. या नव्या धर्माचे तुम्ही प्रचारक व्हा, राष्ट्राराष्ट्रांमध्यें बंधुभाव प्रसृत करणाऱ्या या धर्माचे प्रसारक व्हा; यामुळेंच मानवजातीमध्यें बंधुभाव व ऐक्यभाव प्रस्थापित होणार आहे. हें तत्व आज नुस्तें सिद्धांतरूपांतच जगानें मान्य केलें आहे, पण व्यवहारांत या तत्वाला अझून मूर्तस्वरूप प्राप्त झालेलें नाहीं. शक्य त्या मार्गांनीं व शक्य तेथें या धर्माचा प्रसार करा.

तुम्हीं यापेक्षां जास्त कार्य करावें अशी परमेश्वराचीहि अपेक्षा नाहीं, मग मनुष्याची काय कथा ! तुम्ही एकटे जरी हें तत्त्व सर्व ठिकाणीं, सर्व काळीं, अबाधित सत्य म्हणून मान्य कराल तर त्यानेंहि मानवजातीचें कल्याणच होईल अशी माझी निष्ठा आहे. निष्ठावंतांची संख्या व त्यांचें पावित्र्य हीं वाढत राहिलीं म्हणजेच मानवजातीमध्यें परमेश्वराच्या शिकवणुकीला फळें आलीं व मानवजातीची उन्नति झाली. तुम्ही स्वतः निष्ठावंत व्हा, पावित्र्य मिळवा व इतरांना स्वत:सारखे निष्ठावंत व पवित्र करा म्हणजे सर्वसाक्षी परमेश्वरच तुम्हांला तुमच्या कार्याचा मार्ग दाखवून देईल.

# ५. राष्ट्रकर्तव्यें.

" जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी "

महत्त्वाच्या मागानें तुमचीं आद्यकर्तव्यें मानवजातीसंबंधाचीं आहेत हें मीं पूर्वी सांगितलेंच आहे. नागरिकत्व व पितृपद हीं प्राप्त व्हावयाचे अगोदर तुम्हांला मनुष्यपण प्राप्त झालेलें असतें. संपूर्ण मानवजातीला जर तुम्ही आपल्या प्रेमकक्षेंत घेतलें नाहीं, परमेश्वर एक आहे व म्हणून मानवजातीमध्यें भेदभाव नाहीं या तत्त्वावर तुमचा विश्वास नसेल, ज्या वेगवेगळ्या राष्ट्रांमधील समाजांचे हातून हें ऐक्याचें कार्य सिद्धीस जावयाचें आहे त्यांचेमध्यें बंधुभाव असला पाहिजे यावर तुमची श्रद्धा नसेल, तुमचा एकादा बांधव दुःखाचा आर्त स्वर काढीत असतांना अथवा जुलूम व असत्य यांमुळें मानवी जीवनाच्या उदात्तपणास बाध येत असतांना आणि दुःखितांचे मदतीस धांवून जाण्याची ताकद असूनहि, या युद्धांत पडण्याची आपणांस जरूर नाहीं असें तुम्हांला वाटत असेल, तर तुम्ही धर्मभ्रष्ट आहां असेंच मी मानीन—परमेश्वराच्या इच्छेचा तुम्ही भंग केला आहे व ज्या धर्मानें भविष्यकालांत सुख आणि शांति हीं नांदावयाचीं आहेत त्या धर्माची तुम्ही अवज्ञा केली आहे—असेंच मानण्यांत येईल.

मानवजातीच्या नैतिक उन्नतीसाठीं व प्रगतीसाठीं तुम्हांपैकीं प्रत्येकजण आपापल्या एकाकी शक्तीनें काय करूं शकणार आहे ? फार तर तुम्ही वेळोवेळीं आपलीं मतें बोलून दाखवाल, पण यापासून कांहींच निष्पन्न होणार नाहीं; क्वचित् प्रसंगीं एकाद्या परदेशी बांधवाला तुम्ही थोडाबहुत धर्म कराल, यापेक्षां एकाकी व्यक्तीला जास्त कांहीं करतां यत नाहीं. भविष्यकालीं प्रकट होणाऱ्या धर्माचें मूळ अनाथांना मदत करणें या कल्पनेंत नसून तें संघशक्तींत आहे— एकाच सार्वत्रिक ध्येयासाठीं बंधुभावाचें परस्परसहाय्य या कल्पनेंत आहे; आणि हें मूलतत्व गरीबांना भीक घालणें या कल्पनेपेक्षां खास उच्चतर आहे; तुम्ही सर्वांनीं मिळून सर्वांना रहावयासाठीं उभारलेलें गृह हें तुम्हांपैकीं

प्रत्येकानें स्वत:साठीं उभारलेल्या झोंपडीपेक्षां जितकें जास्त उदात्त समजलें जाईल तितकें हें भावी धर्माचें तत्व दयाधर्म या तत्वापेक्षां उदात्त मानण्यांत येईल. मानवजातीमध्यें भाषा, प्रवृत्ति, परंपरा व कर्तृत्वशक्ति यांमुळें भेदभाव उत्पन्न झालेला आहे म्हणून या सार्वत्रिक कार्याला एकदम हात घालतां येत नाहीं. मानवजात अफाट आहे व मनुष्य दुर्बल आहे. खलाशी सागरावर सफरीस निघतो तेव्हां तो परमेश्वराची करुणा भाकतो, कीं हे देवाधिदेवा, माझें रक्षण कर, माझें जहाज फार लहान आहे, आणि तुझा हा सागर अनंत आहे ! व्यक्तिमात्राची स्थिति मानवजातीसंबंधानें विचार करतांना अशीच होणें साहजिक आहे. कारण कार्याच्या प्रमाणांत कर्तृत्वशक्ति वाढत जाईल असें साधन मनुष्यापाशीं नाहीं. पण परमेश्वरानें जेव्हां तुम्हांला आपला स्वतःचा असा देश दिला, ज्या त्या मजुराला त्याच्या मगदुराप्रमाणें काम नेमून देणाऱ्या शहाण्या मुकादमाप्रमाणें त्यानें पृथ्वीच्या पाठीवर मानवांचे वेगवेगळे समूह पसरून दिले, तेव्हांच त्यानें व्यक्तिसामर्थ्य संघशक्तीनें वाढावें अशी योजना करून ठेवली आहे. मात्र अन्यायी राजकर्त्यांनीं परमेश्वराच्या कार्याची मांडणी विस्कळित करून टाकली आहे; समुद्र, पर्वत, नद्या वगैरे परमेश्वरानें आंखून दिलेल्या राष्ट्रमर्यादांना त्यांच्या राज्यमर्यादा उल्लंघीत आहेत हें नकाशाकडे पाहतांच तुम्हांस आढळून येईल; लोभ, मत्सर, गर्व वगैरे हीन मनोविकारांमुळें त्यांनीं इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा घातली आहे; या राज्यकर्त्यांच्या राज्यमर्यादा इतक्या अनिर्बंध आहेत कीं, आज इंग्लंड व फ्रान्स या दोनच देशांच्या मर्यादा नैसर्गिक आहेत असें आढळून येतें. हे राज्यकर्ते स्वतःला अमुक देशाचा राजा असें म्हणवीत नाहींत, तर त्यांच्या अंमलाखालचा प्रदेश मात्र अमुक घराण्याच्या ताब्यांतला प्रदेश अशा संज्ञेनें ओळखण्यांत येतो. पण परमेश्वराच्या इच्छेपुढें कोणत्याहि अडथळ्यांचा टिकाव लागणार नाहीं. लोकांच्या अंतकरणांतील नैसर्गिक स्फूर्तीचे जोरानें या अन्यायी राज्यकर्त्यांच्या सुलतानी राज्यमर्यादा मोडल्या जातील व युरोपचा राजकीय नकाशा पुन्हां तयार करावा लागेल; राजे लोकांनीं स्थापलेल्या राज्यांचे ऐवजीं लोकांचे देश देश निर्माण होतील आणि या देशांच्या मर्यादा स्वतंत्र लोकांच्या स्वतंत्र मतानुसार ठरविण्यांत येतील, तेव्हां हीं राजघराणीं व सरदार घराणीं नष्ट होतील; नवयुगांतील अशा राष्ट्राराष्ट्रांमध्यें बंधुभाव व एकतानता उत्पन्न होईल आणि नंतर मानवजातीच्या सर्वसाधारण सुधारणेचें कार्य, धर्माच्या सत्य तत्वांच्या संशोधनाचें व त्या तत्वांना व्यवहारांत मूर्त

स्वरूप यावयाचें कार्य, हीं सर्व कामें त्या राष्ट्रांच्या संघांचे हातून होतील; या कार्यांचे विभाग पाडून ते वेगवेगळया देशांमध्यें ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें वांटून देण्यांत येतील; हें काम शांततेच्या व विकासाच्या मार्गानेंच सिद्ध होईल; आणि नंतर तुमच्यापैकीं प्रत्येकाला—आपलीच भाषा बोलणाऱ्या स्वतःसारख्याच नैसर्गिक प्रवृत्ति असणाऱ्या, एकाच इतिहासानें व संस्कृतीनें बद्ध झालेल्या लक्षावधि लोकांच्या प्रीतीनें समर्थ होऊन आपला व्यक्तिगत प्रयत्न संपूर्ण मानवजातीला कल्याणप्रद होईल अशी आशा करतां येईल.

तुमचा जन्म इटलींत झाला आहे आणि जणूं काय परमेश्वरानें तुम्हांवर आपली मेहेरनजर म्हणूनच अत्यंत रेखीव अशा मर्यादांचा देश तुम्हांला दिलेला आहे. इतर देशांच्या सरहद्दी इतक्या ठळक नाहींत, त्यांचेबद्दल उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा निकाल भविष्यकाळांत लोकमतानुसार ठरविण्यांत येईल. पण आजवर या सरहद्दी ठरावयासाठीं पुष्कळ रक्तस्राव व अश्रुवर्षाव झालेला आहे व कदाचित् यापुढेंहि कांहीं कालपर्यंत असेंच चालेल; पण तुमच्या देशाच्या सरहद्दी मात्र अगदीं बिनहरकत मान्य केल्या जातील अशाच स्वरूपांत परमेश्वरानें निर्मिल्या आहेत—एका बाजूला सर्व युरोपखंडातला अतिशय उंच असा आल्पस् पर्वत व दुसऱ्या बाजूस समुद्र, अनंत विस्ताराचा सागर! युरपखंडाचा एक नकाशा घ्या आणि कंपासाचें एक टोंक इटलीच्या उत्तरेस पारमावर ठेवा आणि दुसरें व्हार नदी समुद्रास मिळते तेथें ठेवा; ही त्रिज्या धरून आल्पस् पर्वताच्या दिशेकडे एक अर्धवर्तुळ काढा—या अर्धवर्तुळाचा दुसरा बिंदु इसोंझो नदीच्या मुखावर येईल, हीच तुम्हांसाठीं परमेश्वरानें निर्मिलेली सरहद्द. येथवर तुमचीं भाषा बोलली जाते. या हद्दीपलीकडे तुमच्या राष्ट्राला कांहीं हक्क नाहींत. सिसिली, सार्डिनीया, कॉर्सिका व त्यांच आसपासचीं लहान लहान बेटें आणि इटली देश हीं तुमचींच आहेत-याबद्दल तुम्हांशीं कोणी हुज्जत घालीत बसणार नाहीं. कदाचित् आपल्या सामर्थ्याच्या जोरावर मदांध झालेली एकादी राजसत्ता याबद्दल भांडण उकरून काढील; पण या सरहद्दी आज हजारों वर्षें लोकांनीं मान्य केलेल्या आहेत; आणि ज्या दिवशीं तुम्ही एकजूट होऊन इटालीसाठीं दिव्य करावयास उठावणी कराल आणि आपलें तिरंगी निशाण या सरहद्दीवर रोंवाल, त्या दिवशीं यूरप पुनरुज्जीवन पावलेल्या इटलीचें अभिनंदनपूर्वक स्वागत करील, इटलीला युरोपियन राष्ट्रसंघांत प्रविष्ट करून घेईल. हें अंतिम दिव्य यशस्वी व्हावें एवढेंच तुमच्या सर्व कार्याचें ध्येय असलें पाहिजे.

राष्ट्राशिवाय व्यक्तीला नांव नाहीं, खूण नाहीं, मत नाहीं, हक्क नाहींत आणि राष्ट्राराष्ट्रांच्या बंधुसमाजांमध्यें बरोबरीच्या नात्यानें प्रवेश करावयाला परवानगीहि नाहीं. राष्ट्राशिवाय तुम्ही मानवजातीच्या दारचे दासीपुत्र समजले जाल. राष्ट्राशिवाय तुम्हांला लढावयास निशाण नाहीं, श्रद्धेचें सामर्थ्य नाहीं आणि स्वसंरक्षणशक्तीहि नाहीं; तुमच्या स्वाभिमानाचा हवाला घ्यावयास कोणीहि पुढें येणार नाहीं. समाजामध्यें जे अन्याय तुम्हांला निमूटपणें सोसावे लागतात त्यांचेपासून तुमची सुटका, तुम्ही स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवून द्याल तेव्हांच होईल; दुसऱ्या मार्गाची आशा लावून घेऊन तुम्ही स्वत:ची फसवणूक करून घेऊं नका. जथें राष्ट्र नाहीं तथें लोकमत नाहीं आणि जेथें लोकमत नाहीं तेथें न्यायहि नाहीं; तेथें स्वार्थाच्या दुरभिमानाचेच साम्राज्य असतें, तेथें जनतेच्या हितसंबंधाचा आणि हक्कांचा रक्षणकर्ता कोणीहि नसतो. राष्ट्राचा प्रश्न सोडविण्यापूर्वी तुम्हांला आपली आर्थिक स्थिति सुधारतां येईल ह्या कल्पनेनें फसून जाऊं नका—असें होणें अशक्य आहे. परस्पर सहाय्यकारी मंडळ्या व कारागिरांचे संघ यांपासून तुम्हांला शिस्त लागेल; पण आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें इटली राष्ट्र स्वतंत्र होईपर्यंत संघटनेचें फल प्राप्त होणें अशक्य आहे. आर्थिक उन्नतीसाठीं मोठें भांडवल जमवावें लागतें, मालाच्या उत्पादनाची वाढ होईल अशी सामुग्री पैदा करावी लागते; पण आज तुमच्या राष्ट्राचे तुकडे पाडण्यांत आले आहेत; व्यापाऱ्याच्या मार्गांत जकातीचें व इतर अनेक प्रकारचे अडथळे उत्पन्न करण्यांत आले आहेत; म्हणूनच आपल्या व्यापाराचें क्षेत्र फारच मर्यादित झालें आहे. तेव्हां इटालीची आर्थिक स्थिति सुधारणें आज तरी अशक्य आहे. आज जें कार्य करावें असें तुमच्या मनांत आहे तें पार पाडावयाइतकें सामर्थ्य तुम्हांमध्यें नाहीं. इटलीचें सरकार पूर्णपणें राष्ट्रीय होईल व जगांतल्या प्रवृत्तींच्या दिशेची त्याला ओळख पटेल, रोममधील लोकप्रतिनिधींच्या सभेमधून इटलीच्या प्रगतीचा कार्यक्रम आंखावयासाठीं "तत्त्वांचा जाहीरनामा" निघेल व त्यामध्यें असें एक कलम घालण्यांत येईल कीं "मजूर वर्ग पवित्र आहे व इटलीच्या अभ्युदयाचा उगमहि याच वर्गामध्यें आहे," तेव्हांच तुमच्या उन्नतीस खराखुरा आरंभ झाला असें मानतां येईल.

म्हणून आजच्या या परिस्थितीत ऐहिक उन्नति प्राप्त करून घेतां येईल या कल्पनेनें तुम्ही हुरळून जाऊं नका. आल्पस् पर्वतापासून सिसिलीपर्यंत पसरलेला तुमचा विस्तृत व सुसंपन्न देशच तुमच्या या साऱ्या आशा पुरा करण्यास

समर्थ आहे. कर्तव्यपालनाशिवाय हक्क प्राप्त होत नाहींत; ते हक्क उपभोगावयास प्रात्र व्हा, मग ते आपोआपच तुम्हांला प्राप्त होतील. माझ्या बंधूंनों, आपल्या मातृभूमीवर प्रेम करा, स्वदेश हें परमेश्वरानें आपणांस दिलेलें घर आहे. ह्या राष्ट्रकुटुंबांतील सर्व घटकांचें तुम्हांवर प्रेम आहे आणि तुमचेंहि त्यांवर प्रम आहे; ह्या राष्ट्रकुटुंबांशीं आपले विचार व आपल्या भावना सहजच एकतानता पावतात, परदेशाबद्दल अशी एकतानता मनुष्याचे मनांत उत्पन्न होत नाहीं. एकाच कार्यक्षेत्रावर एकजुटीनें राहून आपल्या एकजीव झालेल्या स्वभावानुरूप कांहीं विशिष्ट कार्य पार पाडावयाचें या कुटुंबाचें भाग्य आहे. स्वदेश हें व्यक्तिमात्राचें कार्यक्षेत्र आहे; व्यक्तिमात्रानें आपलें कार्य राष्ट्रीय दृष्टीनें केलें तरच त्यापासून मानवजातीचे कल्याण होतें; मनुष्याला आपल्या कार्याचीं साधनें स्वदेशांतच आढळून येतात, त्यांचा त्याग करणें म्हणजे परमेश्वराशीं निमकहरामपणा करणें आहे, अशा त्यागामुळें आपल्या शक्तींचा क्षय होतो. मानवजातीच्या कल्याणासाठीं आपण जें कार्य करणार आहों त्याचा आरंभ स्वदेशांतच झाला पाहिजे; नाहींतर त्या कार्यापासून मानजातीचें हित साध्य होत नाहीं व स्वदेशालाहि त्याचें फळ मिळत नाहीं. खऱ्या तत्वनिष्ठनें केलेलें राष्ट्रकार्य हें मानवजातीचेंच कार्य आहे. मानवजात ज्या राष्ट्रसंघाची बनलेली आहे त्या संघामध्यें आपल्या राष्ट्राचा प्रवेश झाला पाहिजे, त्यासाठीं आपलें राष्ट्र प्रथम स्वतंत्र व समर्थ असलें पाहिजे. समसमानांमध्येंच संघटना शक्य असते आणि हल्लीं तर तुम्हांला सार्वजनिक जीवनच नाहीं.

मानवजातीचें ध्येय साध्य करावयासाठीं हा राष्ट्राराष्ट्रांचा सेनासमूह परमेश्वरानेंच निर्माण केलेला आहे. वेगवेगळीं राष्ट्रें हीं त्या महासेनेचीं पथकें आहेत. प्रत्येक पथकाला वेगवेगळी जागा नेमून दिलेली आहे व प्रत्येकाला एक विशिष्ट कार्यहि नेमून दिलेलें आहे; हीं वेगवेगळीं कार्यें जितक्या पूर्णपणें पार पाडण्यांत येतील त्यावरच मानवजातीच्या ध्येयाचा विजय अवलंबून आहे. या युद्धव्यवस्थेंत जाणूनबुजून बिघाड करूं नका. परमेश्वरानें तुम्हांला जें निशाण दिलें आहे, त्याचा त्याग करूं नका. तुमचा जन्म कोणत्याहि राष्ट्रांत झालेला असो, परिस्थितीनें तुम्हांला कोठल्याहि समरांगणावर लढावयास पाठविलेलें असो, त्या युद्धापासून कोणत्याहि राष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त होणार असो—त्या युद्धांत तुम्ही अशा रीतीनें लढा, कीं त्यापासून तुम्हांलाच नाहीं तर तुमच्या राष्ट्रालाहि मान मिळेल व इतरांचे मनांत तुमच्या देशाबद्दल प्रेम उत्पन्न होईल. तुमचे

अंतःकरणांत सदोदित स्वदेशाबद्दल विचार येत असावे, तुमचे हातून घडून येणारीं सर्व कार्यें तुमच्या राष्ट्राच्या कीर्तीला साजतील अशींच असावींत, आणि ज्या निशाणाखालीं तुम्ही मानवजातीच्या ध्येयसिद्धीसाठीं एकत्र होणार तें निशाणहि सदासर्वदा स्वदेशाचेंच असूं द्या. मी कार्य करणार असें म्हणूं नका, तर आम्हीं सर्व मिळून कार्य करणार असेंच म्हणा. स्वतःचे ठायीं स्वदेशच प्रतिबिंबित झाला आहे, आपण आपल्या राष्ट्राचाच अवतार आहोंत अशी भावना प्रत्येकानें धरावी; आपण स्वतः आपल्या देशबांधवांबद्दल जबाबदार आहों अशाच भावनेनें प्रत्येकानें वागलें पाहिजे. तुम्हीं आजपासून जीं कार्यें हातीं घ्याल तीं अशा रीतीचीं असावीं व तीं तुम्हीं अशा रीतीनें पार पाडावीं, कीं त्यामुळें इतरांना तुम्हांबद्दल व तुमच्या राष्ट्राबद्दल आदर व प्रेम वाटावें.

तुमचें राष्ट्र एक आहे आणि अभेद्य आहे. एकाद्या कुटुंबांतून एकाद्या मनुष्याला हिसडून नेऊन कोठें दूरदेशीं टाकलेलें असलें म्हणजे त्याच्या भावांबहिणींना अन्न गोड लागत नाहीं त्याचप्रमाणें तुमचीच मातृभाषा जेथें वदली जाते असा तुमच्याच देशाचा एकादा भाग जोंवर तुमच्या राष्ट्रापासून विभाग पावून एकाद्या परकी सत्तेच्या ताब्यांत गेलेला असेल तोंवर तुम्हांलाहि अन्न गोड लागणें शक्य नाहीं; तो भाग परत मिळवीपर्यंत तुम्ही आनंद करूं नये व विसावाहि घेऊं नये.

तुम्हांला परमेश्वरानें जें कार्य नेमून दिलें आहे त्याची राष्ट्र ही निशाणी आहे; त्या कार्यासाठीं राष्ट्राच्या एकूणएक पुत्रांची बुद्धि व शक्ति यांचें एकीकरण झालें पाहिजे. तूं कोण आहेस, असा कोणीं प्रश्न केला असतां मी इटालियन आहें, असें उत्तर देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कांहीं विशिष्ट हक्क व कर्तव्यें आहेत. फक्त लोकमतावरच जिचा पाया आहे अशा लोकसत्तेची संस्थापना झाल्याशिवाय इटालियनांचे हक्क काय आहेत व त्यांचीं कर्तव्यें कोणकोणतीं आहेत या प्रश्नांचा निवाडा लागणें शक्य नाहीं; म्हणून राष्ट्रामध्यें एकाच राज्यपद्धतीचें अधिष्ठान असलें पाहिजे. जे मुत्सद्दी इटली हा संस्थान-संघ आहे असें म्हणतात त्यांना एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची जाणीवच नसते; त्यांच्या खटाटोपामुळें इटालीचे तुकडे पडतील व राष्ट्र विस्कळित होऊन जाईल. आज इटालींतील वेगवेगळ्या संस्थानांत जे सत्ताधारी आहेत त्यांची स्थापना इटालीच्या लोकमतानुसार झालेली नाहीं; राजे व सरदार लोक यांच्या महत्त्वाकांक्षेचीं तीं फळें आहेत; आपण अमुक संस्थानचे राजे असें म्हणवून घेतांना या

संस्थानिकांना मोठी फुशारकी वाटत असते, इतरत्र आपला अंमल बसवावयाची मात्र त्यांना हिंमत नसते; म्हणून देशाच्या या लहानशा तुकडयांत मिळणाऱ्या मानमरातबावर ते खूष असतात. इटालींतील शहरें व गांवोगांवची कम्यूनस् ( स्वतंत्र स्थानिक स्वराज्य—संस्था ) हीं मात्र तुम्हीं स्वतः स्थापिलेलीं आहेत, आपलीं सुखदु:खें व प्रीति हीं तुम्हीं त्यांना समर्पित केलीं आहेत, त्यांचेसाठीं आपलें रक्त ओतून तुम्हीं त्यांना पावित्र्य प्राप्त करून दिलें आंहे. याच गांवांमध्यें तुमच्या पूर्वजांनीं निवास केला, यांमध्येंच तुमचीं मुलेंबाळें नांदणार आहेत; आपल्या शक्तींचा विनियोग तुम्हांला येथेंच करतां येतो, येथेंच तुम्हांला आपल्या हक्कांचा उपभोग घेतां येतो व येथेंच तुम्हांला व्यक्ति या नात्यानें अस्तित्व असतें. व्हेनिसचे रहिवाशी म्हणतात कीं, " व्हेनिस नगर आमचें आहे, त्याचें सांप्रतचें स्वरूप आम्हीं त्याला प्राप्त करून दिलें. " आपल्या गांवाबद्दल अशाच प्रकारची भावना प्रत्येकानें बाळगावी. आपल्या गांवामध्यें तुम्हांला व्यक्तिस्वातंत्र्याची जितकी आवश्यकता भासते तितकीच राष्ट्रांमध्यें संघसंस्थापनेची जरूर आहे. ग्रामपंचायतीला स्वातंत्र्य व राष्ट्रामध्यें एकी याच तत्त्वांवर तुम्ही आपल्या निष्ठेची उभारणी करा. इटलीची सारीं कम्यूनस् भिन्न आहेत असें मानूं नका—रोम व टस्कनी, रोम व फ्लारेन्स असें म्हणूं नका, रोम हें इटलीच्या राष्ट्रीय जीवनाचें मूर्त स्वरूप आहे. तुमच्या ग्रामपंचायतीमध्यें तुमचें वैयक्तिक जीवन केंद्रीभूत झालेलें आहे. यांशिवाय इटलीमध्यें जे विभाग कल्पिले जातील अथवा स्थापले जातील ते सर्व अस्वाभाविकच असले पाहिजेत–राष्ट्राच्या परंपरेला ते मान्य नाहींत.

स्वतंत्र व समसमान अशा मानवांना बंधुभावानें बद्ध करून एकाच विशिष्ट ध्येयासाठीं मन:पूर्वक मेहनत करविणारा असा राष्ट्र हा एक बांधवसंघ आहे. राष्ट्रामध्यें असा बंधुभाव उत्पन्न करणें व तो कायम राखावयासाठीं यत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. राष्ट्र म्हणजे जमिनीच्या अनेक तुकडयांची बेरीज नव्हे, तर राष्ट्र हा एक संघ आहे. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचे हक्क अगदीं सारखे असले पाहिजेत. जातिभेद व हक्कांची विषमता यांमुळें राष्ट्रचैतन्याची जागृति सम प्रमाणांत होत नाहीं; जेथें मागसलेल्या वर्गांच्या उन्नतीसाठीं यत्न करण्यांत येत नाहींत, जेथें लोकमान्य असें एकहि तत्त्व अस्तित्वांत नसतें तेथें खरें राष्ट्रीयत्व संभवतच नाहीं. अशी स्थिति एखाद्या देशांत असेल तोंपर्यंत त्या प्रद-

शाला राष्ट्र हें पवित्र नाम प्राप्त होणें अशक्य आहे, अर्थातच तेथील रहिवाशांमध्यें राष्ट्रीय जीवन संभवत नाहीं. पोट भरावयासाठीं एका ठिकाणीं जमलेले हे बाजारबुणगे असेच पोटासाठीं केव्हां तरी पांगून जातील. ज्या राष्ट्रानें तुम्हांला जन्म दिला त्यामधील सर्व प्रकारची विषमता नष्ट होईपर्यंत तुम्ही अखंड लढलें पाहिजे आणि तेहि केवळ तुमच्या अंतःकरणांत राष्ट्रभक्ति आहे एवढयासाठींच परमेश्वरानें फक्त एकच विशिष्ट हक्क निर्माण केला आहे आणि तो अगदीं थोडया व्यक्तींचे ठायीं मात्र संभवतो. हा हक्क म्हणजे बुद्धिसामर्थ्य हा होय; मात्र ही बुद्धिमत्ता नीतिमत्तेशीं संयोग पावलेली असली पाहिजे. हा विशेष हक्क ईश्वरनिर्मित आहे; या दैवी स्फूर्तीचे तुम्ही अनुयायी होतां, अक्कलहुषारीनें आणि राजीखुषीनें तुम्ही या स्फूर्तीचे अनुकरण करतां. आपल्या घराण्याच्या नांवावर अथवा जोरजबरीनें जर एकादा मनुष्य आपल्या विशेष हक्कांचे समर्थन करूं लागला तर मात्र तो तुमच्या स्वातंत्र्यावर गदा घालीत आहे अशी खात्री बाळगा. त्याचा पाडाव व नायनाट होईपर्यंत तुम्ही त्याचेबरोबर लढलें पाहिजे. राष्ट्र हें तुमचें मंदिर आहे, या मंदिरांत परमेश्वराचें अधिष्ठान आहे आणि समभावानें एकत्र झालेला राष्ट्रघटकांचा समूह देवद्वाराशीं उभा आहे. आपल्या राष्ट्राचा व स्वतःचा अपमान होऊं नये अशी तुमची इच्छा असेल तर राष्ट्रमंदिराच्या या मांडणीशिवाय दुसरी कोणतीहि मांडणी मान्य करूं नका. नाहींतर तुमचा नैतिक अधःपात होईल. तुमच्या जीवनाच्या नियमाचे मार्ग ह्याच महातत्त्वाला धरून असले पाहिजेत.

आणि ते असे असावे म्हणून राष्ट्राचे सर्व कायदे लोकमताला धरून असले पाहिजेत. एकाद्या विशिष्ट वर्गानें राष्ट्राचे कायदे तयार केलेले असतील तर त्यांमध्यें त्या एकाच वर्गाचे विचार, आकांक्षा व इच्छा प्रदर्शित झालेल्या आढळून येतील. त्यांना लोकमताचा पाठिंबा असणें अशक्य आहे. राष्ट्राचे कायदे राष्ट्रीय आकांक्षांचे निदर्शक असले पाहिजेत, राष्ट्राचें कल्याण हेच त्यांचें ध्येय असलें पाहिजे, त्यांनीं राष्ट्राच्या हृदयाच्या थडाडीशीं ताल धरला पाहिजे; राष्ट्रीय कायद्याचे स्वरूप अशाच प्रकारचें असावें म्हणून प्रत्यक्षपणें अथवा अप्रत्यक्षपणें प्रत्येकानें कायदे करण्याच्या कामांत भाग घेतला पाहिजे.

राष्ट्र म्हणजे नुस्ता भूमीचा तुकडा नव्हे; तो विशिष्ट प्रदेश राष्ट्राचा पाया मात्र आहे. राष्ट्र ही त्या पायावर उभारली गेलेली भावना आहे; राष्ट्र ही भावना प्रेममय आहे, राष्ट्रांतील सर्व व्यक्तींना बंधुप्रीतीनें निगडित करणारी ती चिच्छक्ति

आहे. राष्ट्रीय जीवनाच्या विकासाच्या कार्यामध्यें जोंवर कांहीं व्यक्तींना आपलें मत द्यावयाचा हक्क मिळालेला नाहीं, जोंवर तुमच्या एकाद्या बांधवाला शिक्षणाच्या अभावीं भाजीपाल्यासारखा जीवनक्रम स्वीकारणें भाग पडत आहे, मोलमजुरी करण्याची इच्छा व ताकद असूनहि जोंवर तुमच्या एकाद्या बांधवाची उपासमार होत आहे तोंवर तुमचें राष्ट्र पूर्णावस्थेप्रत आलेलें नाहीं— सर्वांचें व सर्वांसाठीं, अशा प्रकारचें राष्ट्र तुम्हांला मिळालेलें नाहीं हें लक्षांत ठेवा. मत शिक्षण व काम, हे राष्ट्राचे तीन आधारस्तंभ आहेत; त्यांची उभारणी होईपर्यंत तुम्ही क्षणमात्र विसावा घेऊं नका.

तुम्ही या तत्त्वत्रयीची संस्थापना करा, व्यक्तिमात्राच्या ऐहिक व आत्मिक जीवनाच्या विकासाची पूर्वतयारी करून ठेवा, स्वदेशांत एकजूट करा आणि मग तुम्ही आपल्या शक्तींच्या विकासाचें कार्य व इटलीला परमेश्वरानें नेमून दिलेलें कार्य हीं साधावयासाठीं सज्ज व्हाल तेव्हां लक्षांत बाळगा कीं इटलीचें हें कार्य म्हणजे युरोपमध्यें धर्माची एकवाक्यता प्रस्थापित करणें हेंच होय; हें कार्य हातीं घेतल्यावर जीं कर्तव्यें तुम्हांला तत्परतेनें पाळावीं लागतील त्यांची आठवण ठेवा. विस्कळित झालेल्या युरोपियन राष्ट्रांची एकी करण्याचा प्रयत्न फक्त इटलीनेंच केलेला आहे. रोम हें दोनदां युरोपियन राष्ट्रांचें मंदिर व केंद्रस्थान झालें आहे. पहिल्या वेळीं रोमचा विजयशाली गरुडध्वज त्या काळीं अवगत असलेल्या जगाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत विजयांची सलामी घेत होता; त्यावेळीं रोमनें सुधारलेल्या संस्थांचा प्रसार केला आणि एकीचा मार्ग खुला करून दिला. रोमचा विजयोन्माद उतरल्यानंतरहि जगामध्यें एकीचा प्रसार करावयाचा दुसरा प्रयत्न इटलीनेंच केला; इटलीचा आत्मा पोपच्या गादीवर अधिष्ठित झाला आणि युरोपच्या धार्मिक एकीकरणाच्या कार्याचें धुरीणत्व रोममधील ख्रिश्चन धर्माच्या केंद्रस्थानाकडे आलें; मात्र या पवित्र कार्याचा चार शतकांपूर्वीं त्याग करण्यांत आला आहे. आज इटलीपुढें तिसऱ्या कार्याचा उदय होत आहे; आजपर्यंत इटलीनें जीं कार्यें हातीं घेतलीं त्यापेक्षां हें कार्य जास्त मोठें आहे; तुमचे हातून स्वतंत्र व अभेद्य अशा इटलीची स्थापना व्हावयाची आहे; सीझरच्या किंवा पोपांच्या साम्राज्यापेक्षां तुमचें राष्ट्र जास्त उदात्त व बलाढ्य होणार आहे. इटलीमध्यें त्या कार्याला आरंभ झालेला पाहून सर्व युरोपभर खळबळ उडाली आहे आणि सर्व राष्ट्रांचीं अंतःकरणें इटलीच्या हृदयाशीं एकतान झालीं आहेत.

हें कार्य उदात्त आहे, तुमचीं राष्ट्रकर्तव्येंहि तितकींच उदात्त आहेत. हें कार्य पवित्र आहे म्हणून अपवित्र अशा वृथा अभिमानापासून तें अलिप्त राखलें पाहिजे, असत्याचा व राजकारस्थानांचा या कार्याला स्पर्शहि होऊं देतां कामा नये.

तुम्ही आपलें कार्य नीटपणें पार पाडाल तरच तुमच्या देशाच्या राज्यपद्धतीची मांडणी पवित्र तत्त्वाच्या पायावर होईल; नाहींतर स्वार्थी लोक आपलाच फायदा करून घ्यावयाची वेळ वायां जाऊं देणार नाहींत. युरोपांतल्या कांहीं राष्ट्रांमध्यें अंतर्व्यवस्थेंत मात्र स्वातंत्र्य पूज्य मानण्यांत येतें, इतर राष्ट्रांशीं व्यवहार करतांना त्यांची नजर स्वतःच्या फायद्यावर असते; तीं राष्ट्रें म्हणतात कीं "खरेंखोटें व नफातोटा यांचा कांहीं संबंध नाहीं-तत्त्व आणि व्यवहार यांचाहि कांहीं संबंध नाहीं." त्या राष्ट्रांमध्यें अंदाधुंदी माजेल, त्यांवर जुलमी राज्यकर्त्यांचें राज्य स्थापन होईल व इतर राष्ट्रें त्यांना वाळींत टाकतील. अशा रीतीनें त्यांच्या पापांचें परिमार्जन होईल. पण तुम्हांला आपल्या राष्ट्राचें कार्य समजलेलें आहे म्हणून या भ्रष्ट राष्ट्रांचा मार्ग तुम्ही स्वीकारूं नका. परमेश्वर एकच आहे व खरा धर्महि एकच आहे; त्याचप्रमाणें तुम्ही आपल्या एकवटलेल्या राष्ट्रामध्यें एकच राज्यपद्धति स्थापन करा. कॅपिटोल आणि व्हॅटिकन* यांचेपेक्षांहि उदात्त असा राष्ट्रीय जयस्तंभ तुमचे हातून उभारला जाईल, त्यावर तुम्ही स्वातंत्र्याचें व संघटनेचें निशाण रोंवा; त्या निशाणाचें तेज साऱ्या राष्ट्रांच्या डोळ्यांत भरेल; एकाद्या जुलमी सत्ताधाऱ्याच्या भीतीनें अथवा दोन दिवसांच्या स्वार्थासाठीं तुम्ही आपल्या राष्ट्राचें निशाण खालीं उतरवूं नका. अंतःकरणांत श्रद्धा असल्यास धीर आपोआपच उत्पन्न होतो. संपूर्ण जगताला आणि जे आज स्वतःला जगाचे स्वामी म्हणवून घेत आहेत त्यांना तुम्ही इटलीच्या अंतःकरणांत खळबळणारे स्वतंत्र विचार खणखणीत आवाजानें बोलून दाखवा. तुमच्या कार्यामुळेंच राष्ट्रीय जीवनाला सौंदर्य व सामर्थ्य हीं प्राप्त होणार आहेत, तुम्हामुळेंच तुमच्या राष्ट्रांतील भ्याडपणा व संशयामुळें उत्पन्न होणारा अनिश्चय हे नष्ट होणार आहेत; तुम्हांमुळें तुमचें राष्ट्र लोकमताच्या पायावर उभारलें जाणार आहे. राष्ट्रीय कायदे तर्काला धरून केले जाणार आहेत; तुमच्या सामर्थ्यावर राष्ट्राची शक्ति अवलंबून राहणार आहे; सकलांचें कल्याण हाच या राष्ट्रपद्धतीचा परिणाम व परमेश्वरानें नेमून दिलेल्या कार्याची सिद्धि हेंच अशा राष्ट्राचें साध्य होय. तुम्ही मानवजातीप्रीत्यर्थ आपला प्राण वेचावयास तयार व्हा, म्हणजे तुमचें राष्ट्र चिरंजीव होईल.

---

*कॅपिटोल—रोमन राजसत्तेचें केंद्रस्थान: व्हॅटिकन—ख्रिश्चन धर्मगुरूंचें आद्यपीठ.

## ६. कुटुंबकर्तव्यें.

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः "

मनुष्याचें मन स्वदेशांतच रमतें व मनुष्याला स्वतःच्या कुटुंबांत आपलें अंतःकरण उघडें करितां येतें, म्हणजे राष्ट्रीय भावनांचा आरंभ प्रथमतः कुटुंबांतच होतो. प्रत्येक कुटुंबांत अशी एक देवता असते कीं ती आपल्या लालित्यानें, मधुरतेनें व प्रीतीनें मनुष्याला भारून टाकते, त्याचा कर्तव्यपूर्तीचा मार्ग सुखाचा करून देते व त्याचें दुःख हलकें करिते. याच देवतेच्या प्रसादानें कुटुंबसौख्य हा अत्यंत शुद्ध आनंद मनुष्याला आस्वादितां येतो—इतर सर्व प्रकारच्या सुखांमध्यें दुःखाचें थोडेंबहुत मिश्रण असतें. ज्या कोणा दुर्दैवी प्राण्याला परिस्थितीच्या वक्रदृष्टीमुळें या देवतेच्या कृपाछत्राखालीं गंभीर अशा कौटुंबिक जीवनाचा आस्वाद घेणें अशक्य असतें त्याचे अंतःकरणांत सदैव निराशेचा अंधःकार पसरलेला असतो, त्याच्या खुरटून गेलेल्या हृदयाला फिरून पालवी फुटणें जवळ जवळ अशक्यच होऊन बसतें. मी हें लिहीत आहें, कारण हा माझा स्वतःचा अनुभव आहे. म्हणून तुम्हांपैकीं ज्या कोणाला कौटुंबिक जीवनाचा आनंद अनुभवावयास मिळालेला आहे, ज्या कोणाच्या दुःखाचें या देवतेनें सांत्वन केललें आहे त्यानें अशी ही देवता उत्पन्न केल्याबद्दल परमेश्वराला दुवा दिला पाहिजे. कुटुंबाबाहेर आपणांस जास्त आनंद प्राप्त होईल व आपल्या दुःखाचा भारहि हलका केला जाईल अशी खोटी कल्पना करून घेऊन तुम्ही या देवतेला क्षुद्र लेखूं नका. कुटुंबाबाहेर एकनिष्ठा ही तुम्हांला क्वचित् आढळून येईल. वृक्षाला लपेटून राहणाऱ्या लतेप्रमाणें ही चिर प्रीति तुम्हांला बिलगून राहील; ती लता दीर्घकाल टिकते, चिवट असते, वृक्षाभोंवतीं ती आपले पाश टाकीत असतांना तिजकडे कोणी लक्ष देत नाहीं, तसेंच या एकनिष्ठ प्रीतीचें आहे. या देवता सदैव तुमची काळजी वहात असतात, थोडक्याच काळानंतर तुमच्या व त्यांच्या जीवनांत कांहींच भेदभाव उरत नाहीं, शिवाय हें सर्व कार्य दुसऱ्या कोणालाहि न कळत होत असतें. तुम्हांला

असल्या एकतानतेची इतकी संवय होऊन जाते कीं, हें असें असेल अशी कल्पनाहि तुमचे मनांत येत नाहीं; पण या देवतांचा वियोग होतांच तुम्हांला वाटूं लागतें कीं आज कांहीं तरी चुकलें आहे; आपल्या जीवनाशीं चिरपरिचित व जीवनाला अत्यावश्यक असें कांहीं तरी नाहींसें झालें आहे. अशी अस्वस्थता तुमच्या भटकणाऱ्या अंत:करणांत उत्पन्न होईल. आनंदाचे व समाधानाचे कांहीं क्षण तुम्हांला यापुढेंहि मिळूं शकतील; पण एकाद्या सरोवराच्या पृष्ठभागावर एकच तरंग उत्पन्न होतांना भासते तशी शांति, आईच्या हृदयाशीं पूर्ण विश्वासानें बिलगून निद्रा घेणाऱ्या बालकाला जिनें स्थिर केलें आहे अशी शुद्ध शांति व पूर्ण समाधान हीं मात्र तुम्हांला त्या वियोगानंतर प्राप्त होऊं शकणार नाहींत.

ही गृहदेवता म्हणजे स्त्री ही होय; माता, पत्नी व भगिनी या रूपांत ती अवतीर्ण होत असते. स्त्री ही जीवनामध्यें समाधान देणारी व आयुष्याच्या भेसूरपणावर प्रीतीचें अमृत सिंचन करणारी देवता आहे; मनुष्यमात्रांची काळजी वाहणाऱ्या परमात्म्याची व्यक्तिरूपांत प्रतिबिंबित झालेली मूर्ति आहे; दु:खित अंत:करणाचें सांत्वन करणाऱ्या प्रेमळतेचा बहुमोल ठेवा तिजपाशीं आहे. भविष्यत्कालाचा वर्तमानाशीं संयोग तिजमुळेंच होत असतो. मातेच्या पहिल्या मुक्यानें बालकाला शुद्ध प्रेमाचा उमज पडतो; मनुष्याचें ज्या स्त्रीवर प्रेम असतें तिच्या पहिल्या पवित्र चुंबनानें त्याचे अंत:करणांत आशा व श्रद्धा उत्पन्न होते. प्रीति व श्रद्धा यांमुळेंच मनुष्याला पूर्णावस्थेप्रत जावयाची इच्छा उत्पन्न होते व तिकडे पायरीपायरीनें जावयाचें सामर्थ्यहि उत्पन्न होतें; यामुळेंच भविष्य व वर्तमान यांमधला दुवा घडविला जातो—या भविष्यवर्तमान संयोगाची खात्री पटवून देणारी जिवंत निशाणी म्हणज बालक ही होय. कुटुंब या संस्थेशीं परमेश्वरानें पुनरुत्पादनाचें गूढ निगडित करून ठेवलें आह. ही गृहदेवता आपल्या कुटुंबाला नेहमीं अनंताकडे नेत असते.

म्हणून माझ्या बंधूनों, कुटुंब पवित्र आहे असा दृढविश्वास धरा. गृहस्थाश्रम ही जीवनाला अत्यंत आवश्यक अशी अवस्था आह कित्येक अविचारी तत्ववेत्त्यांनीं गृहस्थाश्रम अगदीं अनावश्यक आहे, त्यामुळें मनुष्याचे मनांत स्वार्थपरायणता व जातिद्वेष उत्पन्न होतो अशा प्रकारचे अमानुष विचार प्रदर्शित केले आहेत; गृहस्थाश्रमाचें निर्मूलन व्हावें अशी त्यांची आततायी इच्छा आहे त्यांच्या या रानटी विचारपद्धतीचा प्रतीकार करा.

कुटुंब ही संस्था परमेश्वरसंभूत आहे; ती मानवानें निर्माण केलेली नाहीं म्हणून कोणत्याहि मानवी शक्तीला तिचा नाश करतां येणार नाहीं. जीवनाच्या विकसनासाठीं राष्ट्रापेक्षांहि कुटुंब ही संस्था अधिक आवश्यक आहे.

मानव जातीच्या प्रागतिक स्वरूपाची व नैतिक कार्याची मनुष्याच्या विवेकबुद्धीला ओळख पटली म्हणजे आज अत्यंत पवित्र वाटत असलेल्या राष्ट्रभावनेचा त्याला विसर पडेल; मग सारीं राष्ट्रें विलयास जाऊन मानजातीचें एकवटलेलें स्वरूप मात्र त्याला दिसून येईल; पण मनुष्यप्राणी अस्तित्वांत आहे तोंवर कुटुंब ही संस्था नष्ट होणें शक्यच नाहीं. मानवी जीवनाच्या सर्वच बाजू प्रगमनशील असतात, म्हणून कालमानाप्रमाणें कुटुंबांमधील मनोभावना व आकांक्षा जास्त उच्च प्रतीच्या होत राहतील; पण ही संस्था अजिबात नष्ट करणें मात्र सर्वस्वीं अशक्य आहे.

कौटुंबिक जीवन पवित्रतर करणें व राष्ट्राशीं जास्त निगडित करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे; विशिष्ट राष्ट्राचें संपूर्ण मानवजातीशीं जें नातें आहे तेंच नातें कुटुंब व राष्ट्र यांचेमध्यें आहे. मनुष्याला मानवजातीशीं निगडित करावयासाठीं शिक्षित करणें हें राष्ट्राचें कार्य आहे, त्याचप्रमाणें राष्ट्रासाठीं नागरिक तयार करणें हें कुटुंबाचें कार्य आहे. कुटुंब आणि राष्ट्र हे एकाच रेषेचे दोन अंतिम बिंदु आहेत. ज्या कुटुंबाला किंवा राष्ट्राला या तत्त्वाचा विसर पडतो तेथें गृहस्थाश्रम या संस्थेला अत्यंत तिरस्करणीय असें स्वरूप प्राप्त होतें; पवित्र प्रीति अशा गृहांचा त्याग करते आणि नीतिभ्रष्टता मात्र मागें राहते.

परिस्थितीमुळें आज अनेक कुटुंबांमध्यें स्वार्थबुद्धीचा प्रादुर्भाव झालेला दिसून येतो. सामाजिक जीवनाच्या संस्थांना हीन अवस्था प्राप्त झालेली आहे, हेंच याचें कारण होय. हेर, शिपाई, तुरुंग व सूळ यांच्याच जोरावर आज समाजामध्यें शांतता राखली जात आहे; अशा समाजामध्यें तरुण पुत्राचे मनांत उदात्त आकांक्षा यावयास लागतांच त्याच्या आईला मुलाच्या भवितव्यतेबद्दल भीति वाटूं लागते—जगांत फसवेगिरी किती भरलेली आहे याचा उपदेश ती आपल्या मुलाला करूं लागते; "बाळा, सावध रहा! जो मनुष्य स्वदेशाच्या, स्वातंत्र्याच्या व स्वदेशाच्या भावी वैभवाच्या कल्पना बोलून दाखवीत असतो, जो तुला अगदीं निकट ओढावयाचा यत्न करीत असतो तो स्वतःच हेर असण्याचा फार संभव आहे—" अशा प्रकारचे विचार प्रकट करण्याची पाळी त्या मातेवर येते. अशा समाजामध्यें सद्वर्तनामुळेंच सच्छील लोकांचा घात होतो. ज्या समा-

जामध्यें फक्त संपत्तीपासूनच सामर्थ्य, सुरक्षितपणा व स्वसंरक्षण हीं प्राप्त होतात तेथें सत्याची तहान लागलेल्या तरुण पुत्राला त्याचा बाप उपदेश करतो कीं, "बाबा रे–सावध रहा! संकटकाळीं तुझें संरक्षण करावयास एक संपत्तीच समर्थ आहे; उन्मत्त सत्तेपासून आणि फंदफितुरीपासून तुझें संरक्षण करावयास सत्य हें एकाकी पुरें पडणार नाहीं." पण तुम्हांला स्वतंत्र राष्ट्राची संस्थापना करावयाची आहे; ह्या कार्यासाठीं तुम्हांला आपलें रक्त ओतावें लागेल; तुमची पुण्याई आणि तुम्ही आपल्या बांधवांसाठीं कराल तो स्वार्थत्याग, यांवरच त्या स्वातंत्र्यासाठीं स्थापना व्हावयाची आहे. हें स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचा एकच मार्ग मोकळा आहे; इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं युद्ध करावयाला जे तयार असतील त्यांनीं आपलीं नांवें नोंदविणें, तयारी करणें व सुसंधि पाहून बंड करणें हाच तो मार्ग. कर्तव्यपालनाच्या मार्गावर आज आपणांस अनेक दुर्घट अडथळे दिसत आहेत, पण तुमचें राष्ट्र स्वतंत्र झाल्यावर हे अडथळे आपोआप दूर होतील. असें घडून येईल तेव्हां कदाचित् माझ्या देहाची माती झालेली असेल—कदाचित् तेव्हां तुम्हांला माझी फिरून आठवण होईल व माझे हे शब्द तुम्ही फिरून वाचाल; मी हा जो उपदेश आज करीत आहें तो केवळ प्रीतीनें पूरित होऊनच करीत आहें—मीं हे शब्द दृढविश्वासानें व अंतःकरणपूर्वक लिहिलेले आहेत, अशी तेव्हां तुमची खात्री पटेल.

स्त्रीवर प्रेम करा व तिला मान द्या. तिजपासून फक्त सांत्वनाचीच अपेक्षा करूं नका; तिजपासून सामर्थ्य, स्फूर्ति, बुद्धिमत्ता व नीतिमत्ता हीं प्राप्त करून घ्या. स्त्रीजातीपेक्षां पुरुषजात श्रेष्ठ आहे अशी चुकीची कल्पना करून घेऊं नका. आज अनेक शतकें स्त्रियांना अशिक्षित ठेवण्यांत आलें आहे, त्यांच्या मानसिक विकासाची कांहींच व्यवस्था करण्यांत आलेली नाहीं, म्हणूनच त्यांचें बौद्धिक सामर्थ्य कमी दर्जाचें आहे असा आज आपणांस भास होत आहे; आणि याच गैरसमाजला सत्य मानून तुम्हीं आज स्त्रीजातीवर हा जुलूम चालविला आहे. जे जुलमी असतात ते आपल्या जुलमाच्या समर्थनार्थ स्वतःच्याच बेजबाबदार मतांचा आधार नेहमीं दाखवीत असतात; जेथें जुलूम होत असतो तेथें नेहमीं अशा प्रकारचें समर्थन दिसून येत असतें. युरोपमध्यें वरच्या वर्गाचे हातीं राजसत्ता होती, त्यांनीं खालच्या वर्गांना कोणत्याहि प्रकारचें शिक्षण मिळूं दिलें नाहीं आणि नंतर या अशिक्षित लोकांना नागरिकत्वाचे हक्क काय करावयाचे, त्यांना राष्ट्राचे कायदे कसे तयार करतां येतील, राज्यकारभारामध्यें मत द्याव-

याचा हक्क त्यांना देऊन काय उपयोग--अशा प्रकारची विचारसरणी निर्माण करून त्यांनीं आजपर्यंत सर्वच सत्ता बळकावून ठेवली होती. अमरिकेंत निग्रो गुलामांचे मालकहि प्रतिपादन करीत असत कीं या जातीचा दर्जाच अगदीं हीन आहे म्हणून त्यांना शिक्षण घ्यावयाची पात्रताच नाहीं; म्हणून ज्यांनीं ह्या निग्रो लोकांना शिक्षण द्यावयाचा उपक्रम केला होता त्यांचा या गुलामवाल्यांनीं छळ केला. इटलीचे राज्यकर्ते आज पन्नास वर्षें ओरडत आहेत कीं, या इटालियनांना स्वातंत्र्याची पात्रताच नाहीं, ही पात्रता मिळविण्यासाठीं आम्ही ज्या मार्गानें यत्न करतों ते मार्ग याच राज्यकर्त्यांनीं कायदे व फौज यांच्या जोरावर बंद करून टाकले आहेत--जणूं काय अशा जुलमामुळेंच एकाद्या राष्ट्राला स्वातंत्र्याची पात्रता मिळत असते!

हा जर आपणांस अन्याय वाटतो तर आपणहि स्त्रीजातीसंबंधानें असाच अपराध केलेला आहे. एकाच कुटुंबाचे दोन तुकडे पाडणें व त्यांपैकीं एका वर्गातील व्यक्तीनीं दुसऱ्या वर्गाला गुलामगिरींत दडपून टाकणें हा अपराध फार मोठा आहे. परमेश्वराच्या या सृष्टींत ह्याच्याइतका मोठा असा दुसरा अपराधच नाहीं. देवापुढें स्त्री व पुरुष असा भेदच नाहीं. मनुष्यत्व हें स्त्री व पुरुष या दोघांचेहि ठायीं असतें. मनुष्याला समाजबुद्धि असते, शिक्षण घेण्याची पात्रता असते व स्वतःची उन्नति करून घेतां येते; मनुष्य व जनावर यांमधील फरक हाच आहे. हे गुण पुरुष व स्त्री या दोघांचे ठायीं असतात म्हणूनच त्यांच्या कर्तव्यांमध्यें आणि हक्कांमध्यें समानता असली पाहिजे. ह्या एकाच झाडाच्या दोन फांद्या मात्र आहेत; त्यांचे ठिकाणीं कोणत्या प्रकारचा अधिक-उणेपणा असणें अशक्य आहे; वैयक्तिक प्रकृति व गुणकर्म यांमुळें पुरुषवर्गांतहि विषमता असते. एकाच तंतुवाद्याच्या दोन सुस्वरांना कमी अधिक किंमत देतां येईल काय? मानवजात या तारेवरील पुरुष व स्त्री हे दोन स्वर आहेत. विशिष्ट नैसर्गिक प्रकृतीमुळें एकादें राष्ट्र वसाहती स्थापन करितें व या रीतीनें मानवी संघटनेची कल्पना प्रसृत करितें; दुसरें एकादें राष्ट्र वाङ्मय व ललितकला या विषयांमध्यें अग्रस्थान प्राप्त करून घेतें; ह्या कार्यानेंहि मानवी संघटनेच्या कल्पनेचा प्रसार होत असतो. तीं दोनहि राष्ट्रें एकाच दैवी कल्पनेचा प्रसार करीत असतात. मग हें कार्य त्यांचे हातून जाणतेपणीं घडून येत असो अथवा अजाणपणानें घडून येत असो—आपल्या कार्यामुळें तीं समसमान होतात व बंधुभावानें बद्ध होतात. ह्या दोन राष्ट्रांना मानवजातीप्रीत्यर्थ दोन भिन्न भिन्न

कार्यें पार पाडावयाचीं असतात. पुरुष व स्त्री यांचेंहि असेंच आहे; यांचे हातून जीं कार्यें घडत असतात तीं पावित्र्यामध्यें समसमान आहेत, त्या कार्यांच्या विभागणीमुळें व संयोगामुळेंच प्रगतीचें ध्येय सिद्ध होणार आहे; विचारशक्ति हाच सृष्टीचा अंतरात्मा आहे, ही शक्ति परमेश्वरनिर्मित आहे व तिचें प्रतिनिधित्व ह्या अनेक राष्ट्रांकडे आणि पुरुष व स्त्री ह्यांचेकडेहि आहे; म्हणून स्त्री ही फक्त सुखदु:खाच्या मार्गांतीलच आपली सोबतीण आहे असें मानूं नका; आपल्या आकांक्षा, विचार, अभ्यास व समाजसुधारणेसाठीं परिश्रम या सर्वांमध्यें तुम्ही स्त्रीला आपली वांटेकरीण करा. सामाजिक व राजकीय जीवनक्रमामध्यें ती स्वत:इतक्याच योग्यतेची आहे असा दृढभाव धरा. मानवजातीला आपलें ध्येय साध्य करतां यावें म्हणून मानवी जीवनाला परमेश्वरानें हे जणूं काय दोन पंखच दिलेले आहेत. बायबलांत सांगितलें आहे की, परमेश्वराने प्रथमत: पुरुष निर्माण केला आणि मग त्याचे देहापासून त्यानें स्त्री निर्माण केली; पण भविष्यकालांत जो धर्म स्थापन होणार आहे त्यामध्यें असेंच एक वचन दिसून येईल कीं, परमेश्वरानें मानवजात निर्माण केली आणि ती पुरुष व स्त्री यांचे रूपानें दृग्गोचर झाली.

परमेश्वर तुम्हांकडे जीं बालकें पाठवितो त्यांवर प्रेम करा; पण ती प्रीति अंत:करणाच्या उमाळ्याची, गंभीर व धीरोदात्त अशीच असूं द्या; कारण तुमची प्रीति जर उथळ, वेडी आणि आंधळी असेल तर तिजमुळें तुमच्या बालकांचा नाश मात्र होईल. तुम्हांवर भावी पिढयांची जबाबदारी आहे हें विसरूं नका. परमेश्वराच्या व मानवजातीच्या दृष्टीनें ही जबाबदारी अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. मुलांचे मनांत सुखोपभोगाची तहान उत्पन्न होणार नाहीं असेंच शिक्षण त्यांना द्या; त्यांना मानवी जीवनाची व मानवी कर्तव्याची यथार्थ कल्पना करून द्या; मनुष्याच्या जीवनाला धर्मामुळेंच संगति प्राप्त होते हें त्यांचे मनावर नीटपणें ठसवा. आपल्याच बालकांना शिक्षण देणें हें कार्य किती पवित्र व महत्वाचें आहे याची योग्य कल्पना फारच थोडया मातापितरांना झालेली आहे; या कार्याकडे सुखवस्तु वर्गाचें तर फारच दुर्लक्ष आहे. तीस वर्षांपूर्वींच्या बालकांना त्यांच्या मातापितरांनीं सुखोपभोगाचा व स्वार्थाचा मार्ग दाखविला, आयुष्य हें कर्तव्य आहे हें त्यांच्या मनांवर त्यांच्या निष्काळजी आईबापांनीं ठसविलेंच नाहीं; आजच्या चळवळींत जे अनेक बळी यावे लागत आहेत हा ह्या शिक्षणाचा परिणाम; मात्र हा कार्यकारणभाव फारच थोड-

त्यांचे लक्षांत आलेला आहे. कामकरी वर्गाच्या मुलांची स्थिति ह्यापेक्षां पुष्कळ बरी आहे, त्यांचे मुलांना लहानपणापासूनच हालअपेष्टांमध्यें दिवस काढावे लागतात. पण विपरीत परिस्थितीमुळें त्यांना यथायोग्य शिक्षण मिळणें मात्र अशक्य झालें आहे. तरीहि तुम्हांला सुद्धां आपलें कर्तव्य कमीअधिक प्रमाणांत पार पाडण्याची संधि आहे-स्वतःच्या सद्वर्तनाच्या योगानें व तोंडी शिक्षण देऊन आपल्या मुलांना जीवनाची यथार्थ कल्पना करून देणें तुम्हांला शक्य आहे.

" मुलें बहुधा आपल्या आईबापांचे वळणावर जातात; तुम्ही स्वतः दुर्गुणी असाल तर तुमचीं मुलेंहि तशींच निपजतील व तुमचें वर्तन जर चांगलें असेल तर तींहि सद्वर्तनीच होतील.

" तुमच्याच अंतःकरणांत प्रामाणिकपणा व आपल्या बांधवांबद्दल कळकळ नसेल तर तुमचींच बालकें प्रामाणिक, दयाळू व मोकळ्या अंतःकरणाचीं कशीं निपजतील बरें ? तुमचें वर्तन जर अगदींच स्वैर असेल तर आपण आपले मनोविकार आंवरून धरावे असें त्यांना वाटणें शक्य तरी आहे काय ? त्यांचे देखत अश्लील वर्तन करून अथवा घाणेरडे शब्द उच्चारून जर तुम्हीं मर्यादेचें उल्लंघन करीत असाल तर त्यांची नैसर्गिक मुग्धता कशी शाबूत राहील ?

" तुमचें चालतें बोलतें उदाहरण त्यांचे समोर सदैव असतें, मुलांच्या मनाला बरें वाईट वळण फार लवकर लागतें. घरांतलीं मुलेंबाळें कर्त्या मनुष्याचाच कित्ता गिरवीत असतात. आपल्या मुलांना मनुष्यत्व प्राप्त करून देणें आपल्याच हातीं असतें, तसेंच त्यांना जनावरांच्या जोडीला नेऊन बसविणें हेंहि आपल्याच हातीं असतें. " *

संभाषणाचे द्वारें मुलांना शिक्षण देतां येतें. त्यांचा जन्म ज्या राष्ट्रांत झालेला आहे तें प्राचीन काळीं कोणत्या स्थितींत होतें, आज कोणत्या स्थितींत आहे व भविष्यकाळीं आपण आपल्या राष्ट्राला कोणतें पद प्राप्त करून दिलें पाहिजे या विषयावर त्यांचेबरोबर संभाषण करा. सायंकाळीं तुम्ही कामावरून दमून भागून आपल्या घरीं आलेले आहां, तुमच्या मुलांची माता आपल्या बालकांकडे पाहून समाधानानें सस्मित झालेली आहे, तीं मुलें तुमच्या मांडीवर

---

* लामेनेस.

येऊन बसतांच त्यांच्या बोबडया बोलांनीं तुम्हांला आपल्या श्रमांचा विसर पडलेला आहे—अशा वेळीं तुम्ही आपल्या मुलांना राष्ट्रवीरांच्या मर्दुमकीच्या कथा निवेदन करा; ज्या लोकांचें स्वदेशावर गाढ प्रेम होतें, ज्यांनीं अनेक अपेष्टा, दुष्कीर्ति व छळ सोसूनहि आपल्या देशाचें भवितव्य उज्वल करावयाचा प्रयत्न केला. त्यांचा इतिहास तुम्ही आपल्या बालकांना कथन करा. त्याचे मनांत जुलूम करणारांबद्दल द्वेष उत्पन्न करूं नका तर जुलमाचा प्रतीकार करावयाचा दृढनिश्चय त्यांचेकडून करवा. सद्वर्तनाचा मार्ग किती आनंदप्रद आहे, सत्याचें संरक्षण करावयासाठीं छाती ठोकून उभें राहणें किती उदात्त आहे, आपल्या बांधवांप्रीत्यर्थ आत्मयज्ञ करणें किती पवित्र आहे हें त्या बालकांना तुम्ही स्वमुखानें सांगा; तुमची पत्नी अर्थातच या निवेदनाला आपली संमति दर्शवील; असत्य, अपवित्र व उन्मत्त सत्तेशीं झगडावयाचा उपदेश त्यांना करीत असतांनाच सत्य, पवित्र व चिरंतन अशा परमात्मशक्तीबद्दल भक्तीची ज्योति तुम्ही त्यांच्या कोमल अंतःकरणांत प्रज्वलित करा. जुलूम व बेबंदशाही यांबद्दल त्यांचे मनांत तिरस्कार उत्पन्न झाला पाहिजे, विवेकबुद्धीला पटणाऱ्या व परंपरेच्या स्फूर्तीनें निर्माण होणाऱ्या धर्मावर त्यांची अढळ निष्ठा असली पाहिजे—मात्र हा धर्म परंपरेनें जखडलेला असतां कामा नये.

आपल्या मातापितरांवर प्रेम करा. आपल्या मुलाबाळांच्या पाशांत गुंतून आपल्या मातापितरांकडे दुर्लक्ष करूं नका; असा प्रकार अनेक ठिकाणीं घडून आलेला आहे; खरें पाहिलें असतां या नवीन बंधनांमुळें तीनहि पिढया एकमेकांशीं जास्त निकटपणानें बद्ध झाल्या पाहिजेत. आपल्या कोमल व भक्तिपूर्ण प्रीतीचें आवरण आपल्या वृद्ध मातापितरांचे भोंवतीं आजन्म असूं द्या. त्यांच्या जीवनमार्गांतील शेवटचा टप्पा फुलांनीं आच्छादून काढा—हा काळ त्यांना सुखासमाधानाचा जाईल अशाच रीतीनें त्यांचेपाशीं वागा. त्यांच्या थकल्या भागल्या जीवाभोंवतीं आपल्या चिरप्रीतीचा सुगंध दरवळूं द्या—कारण यामुळेंच त्यांना अनंताची अनुभूति होत असते; आणि तुम्ही आपल्या पितरांवर अखंड प्रीति करीत आलां हीच गोष्ट तुमचीं बालकेंहि तुम्हांवर अशीच एकनिष्ठ प्रीति ठेवतील याची साक्ष पटविण्यास समर्थ आहे.

माता, पिता, बंधु, भगिनी, पत्नी व बालकें ह्या सर्व एकाच कुटुंबवृक्षाच्या फांद्या आहेत हें लक्षांत ठेवा. प्रीतीमुळें एकरूपता येते-अशा प्रीतीच्या ऐक्य

भावानें कुटुंबसंस्था पवित्र करा. कुटुंब हें राष्ट्रासाठीं आत्मयज्ञ करावयाचें मंदिर आहे—आणि मंदिराला साजेल अशाच प्रकारचें वर्तन आपण आपल्या कुटुंबांत ठेविलें पाहिजे. ह्या रीतीनें वागल्यास तुम्हांला सौख्य होईल कीं नाहीं हें मला खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं; पण मला एवढें मात्र सांगतां येईल कीं अशा रीतीनें वागल्यानें तुम्हांला प्रत्येक संकटामध्यें गंभीर शांतीचा स्वाद मिळेल, तुमच्या विवेकबुद्धीला यातना होणार नाहींत, आणि केवढेंहि तुफान होत असलें तरी आकाश लवकरच उघडेल अशी आशा करावयास तुम्हांला काळ्याभोर मेघांच्या गर्दींत थोडी तरी जागा निळी आहे असें दिसून येईल.

# ७. स्वतःसंबंधींचीं कर्तव्यें.

आपण तरला नव्हे हें नवल।
लोकांतें तारील तोचि ज्ञानी ॥ तुकाराम.

"तुम्हांला जीवन आहे, तें नियमबद्ध आहे; आत्मविकास, कृतिपरायणता आणि जीवनाच्या अनुशासनानुरूप आयुष्यक्रम हाच तुमचा धर्म आहे, हेंच तुमचें अत्यंत महत्त्वाचें कार्य आहे;" हें मी तुम्हांला पूर्वीं सांगितलेलेंच आहे. मानवधर्माचें रहस्य जाणण्यासाठीं परमेश्वरानें दोन साधनें निर्मिलेलीं आहेत. व्यक्तीची विवेकशक्ति व देशकालपरिस्थितीनें अबाधित असें मानवजातीचें साधारण मत हींच तीं दोन साधनें होत, असेंहि मी सांगितलेलें आहे. व्यक्तिविवेकाचा निर्णय आणि मानवजातीच्या विवेकाचा निर्णय यांची एकवाक्यता होते तेव्हां त्या निर्णयांत अनंत सत्य प्रगट झालेलें असतें; मानवजातीच्या विवेकाचा हा निर्णय इतिहासांत प्रकट झालेला दिसून येत असतो.

इतिहासांत प्रकट होणारा मानवजातीच्या विवेकाचा निर्णय काय आहे हें ठरविणें आज फार अवघड होऊन बसलें आहे; इतिहासाचीं चांगलीं पुस्तकें आज उपलब्ध नाहींत आणि हें ज्ञान प्राप्त करून घ्यावयास तुम्हांला वळहि नाहीं. गेल्या पन्नास वर्षांत कांहीं उत्कृष्ट इतिहासशास्त्रज्ञांनीं अत्यंत परिश्रम करून मानवजीवनाचें रहस्य जाणावयाचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे व मनुष्यस्वभावाचे कांहीं विशेष गुण त्यांनीं शोधून काढले आहेत. मनुष्य हा स्वभावतःच समाजप्रिय आहे आणि त्याला शिक्षण प्राप्त करून घ्यावयाचें सामर्थ्य आहे असा सिद्धांत त्यांनीं स्थापन केला आहे; परमेश्वर एक आहे म्हणून मनुष्याच्या वैयक्तिक व सामुदायिक स्वरूपांत एकच धर्म असला पाहिजे आणि प्रगति हेंच या धर्माचें मूलतत्त्व आहे असा त्यांचा निष्कर्ष आहे. मानवी ज्ञानाच्या सर्व अंगांचा या तत्त्वाला दुजोरा आहे आणि मनुष्याचीं व्यक्तिविषयक कर्तव्यें व हक्क काय आहेत यांचें अनुमान याच तत्त्वाच्या

अनुरोधानें काढतां येतें. त्यांचें स्वरूप थोडक्यांत असे दर्शवितां येईल:-कर्तव्यपालनामध्यें व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असलेंच पाहिजे आणि यासाठीं एकमेकांनीं एकमेकांना मदत केली पाहिजे.

मनुष्य स्वतंत्र आहे आणि आपलें स्वातंत्र्य त्याला सदोदित भासमान होत असतें. पश्चात्ताप आणि वीरांचा आत्मयज्ञ हे वारंवार जगाला गर्जना करून सांगत असतात कीं, मनुष्य स्वतंत्र आहे; मनुष्यप्राणी दैवाधीन आहे हें म्हणणें साफ चूक आहे; मनुष्याला पश्चात्ताप कां होतो आणि वीरांना तत्वत्यागापेक्षां देहत्यागच अधिक प्रिय कां वाढतो याचें उत्तर या दैववाद्यांना देतां येणें शक्यच नाहीं; शिवाय सदसद्विवेकबुद्धीचाहि त्यांना पाठिंबा मिळत नाहीं. सॉक्रेटीस, येशूख्रिस्त आदिकरून ज्यांनीं आपल्या देशासाठीं किंवा निष्ठेसाठीं मोठ्या आनंदानें प्राण सोडला त्यांचे आत्मे मनुष्याला गुलाम बनविणाऱ्या ह्या दैववाद्यांच्या मतांचा इनकार करतात आणि म्हणतात, "आम्हांलाहि आमचा जीव प्यारा होता, ज्या व्यक्तींमुळें आम्हांला जिवंत राहण्यांत आनंद वाटत होता त्यांनींहि आम्हांला सांगितलें होतें कीं जे तुम्हांवर जुलूम करीत आहेत त्यांना शरण जा; सुखाला लालचावलेलें आमचें मन सांगत होतें कीं जिवंत राहण्यांतच मजा आहे! पण आमचे मागून जे अनेक लोक जन्म पावणार आहेत त्यांच्या बंधमोचनासाठींच आम्हीं आत्मसमर्पण केलें व मृत्यूचा अंगीकार केला." केनपासून* हल्लींच्या हलकट हेरांपर्यंत अनेक नीच लोक या जगांत उत्पन्न होऊन गेले, त्यांनीं आपल्या बांधवांचा विश्वासघात केला; त्यांचा मार्ग पापाचा व अधोगतीचा होता तरीहि त्यांच्या अंतःकरणांत कधीं कधीं एक गंभीर ध्वनि निनादित होत असे; हा स्वर ऐकतांच त्यांना स्वतःच्या दुर्वर्तनाबद्दल आपलाच तिरस्कार वाटे. त्यांचें मन अगदीं अस्वस्थ होऊन जात असे; तो स्वर त्यांना विचारी, "तुम्ही सन्मार्गाचा त्याग कां करितां?"

मनुष्य स्वतंत्र आहे आणि म्हणूनच तो आपल्या वर्तनाबद्दल पूर्णपणें जबाबदार आहे. या नैतिक स्वातंत्र्यामुळेंच मनुष्याला राजकीय स्वातंत्र्याचा हक्क

* केन: ॲडॅम व ईव्ह यांना केन व अबेल हीं दोन मुलें होतीं. या दोघांनींहि देवाला अर्घ्य अर्पण केलें; पण देवानें ॲबेलच्या अर्घ्याचा मात्र स्वीकार केला. हें पाहून केन चिडून गेला व संतापाच्या भरांत त्यानें आपल्या भावाचा खून केला.

प्राप्त होतो, राजकीय स्वातंत्र्य मिळवावयासाठीं कार्य करावयाचें कर्तव्य उत्पन्न होतें, हें स्वातंत्र्य सर्वदा अबाधित ठेवावयासाठीं व कोणासहि त्यावर बंधन घालतां येऊं नये म्हणून सदोदित कार्यदक्ष रहावयाचें कर्तव्य उत्पन्न होतें.

शिक्षणानें सुसंस्कृत होण्याची शक्ति प्रत्येक मनुष्याचे ठायीं आहे. प्रत्येक मनुष्याला बौद्धिक व नैतिक सामर्थ्य असतें; शिक्षणामुळेंच तें जिवंत आणि कार्यकारी होतें. मनुष्याला शिक्षण मिळालें नाहीं तर या शक्ति नष्ट होत जातात; त्यांची काळजीपूर्वक जोपासना केली तरच त्या शक्ति सदैव जागृत राहतात, नाहींतर त्यांचें अस्तित्व आपणांस मधून मधून मात्र भासतें.

शिक्षणानें मनुष्याच्या आत्मिक शक्तीचें पोषण होतें. शरीराचा विकास व पोषण व्हावें म्हणून त्याची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याचप्रमाणें बौद्धिक व नैतिक शक्तींचा विकास पूर्णपणें व्हावा व मनुष्याच्या जीवनक्रमांत त्या सदोदित प्रकट होत रहाव्या म्हणून आपण त्यांच्या पोषणाची विशेष काळजी घेतली पाहिजे; अनेक लोक आपल्या अंतःकरणांतील भावना, प्रीति व आकांक्षा प्रकट करीत असतात आणि ह्यामुळेंच सर्वांच्या बौद्धिक व नैतिक शक्तींचें पोषण होतें; म्हणून आपण आपल्या शक्तींना या पोषकद्रव्यांचा भरपूर पुरवठा केला पाहिजे. वेगळाल्या प्रकारच्या वनस्पतींचे वेगळाले गुणधर्म असतात. त्याचप्रमाणें जितक्या व्यक्ति तितक्या त्यांच्या प्रकृति असतात; या अनेक प्रकारच्या प्रकृतींच्या पोषणासाठीं अनेक प्रकारचीं पोषक द्रव्यें लागतात असें मात्र नाहीं. व्यक्तीच्या शक्तींना मानवजातीमुळेंच संजीवन मिळतें आणि त्यांचा विकास होतो; शक्तिसंजीवनाचें आणि विकसनाचें हें कार्य शिक्षणामुळें होतें; मानवजातीनें आजपर्यंत किती प्रगति केलेली आहे हे प्रत्यक्षपणें अथवा अप्रत्यक्षपणें व्यक्तिमात्राला शिक्षणाचेद्वारें समजतें. शिक्षण हें जीवनाला आवश्यक आहे इतकेंच नव्हे तर शिक्षण म्हणजे व्यक्तिमात्राची आपल्या बांधवांशीं होणारी एक प्रकारची एकरूपता आहे; ज्या अनेकांनीं आजवर विचार केला आहे आणि कार्य करून दाखविलें आहे त्या थोर लोकांशीं मनुष्याला शिक्षणामुळें साधर्म्य प्राप्त करून घेतां येतें; आणि याच भावना मनांत बाळगून आपण शिक्षण प्राप्त करून घ्यावयाचा अटोकाट प्रयत्न केला पाहिजे; परमेश्वरानें ज्या शक्ति बीजरूपानें मनुष्यमात्राचे ठायीं ठेविल्या आहेत त्या सर्व फलद्रूप व्हाव्या म्हणूनच आपण बौद्धिक व नैतिक शिक्षण प्राप्त करून घेतलें पाहिजे आणि अशा रीतीनें वैय-

क्तिक जीवन आणि संपूर्ण मानवजातीचें जीवन यांमध्यें एकतानता उत्पन्न करून ती कायम राखण्याचा यत्न सदोदीत चालू ठेविला पाहिजे.

आणि हें शिक्षणाचें कार्य शक्य तितक्या त्वरेनें व्हावें व वैयक्तिक जीविताची मानवजातीच्या सामुदायिक जीवनाशीं एकरूपता अगदीं पूर्ण व्हावी म्हणूनच परमेश्वरानें मनुष्यामध्यें समाजबुद्धि निर्माण केली. मानवकोटीच्या खालच्या कोटींतील प्राण्यांना सामाजिक जीवनच नाहीं; पण मनुष्याला मात्र आपलें आयुष्य समाजांतच काढावें लागतें. पदोपदीं प्रत्येकाला आपल्या बांधवांची मदत घ्यावी लागते, जीवनाला जरूर अशा अगदीं साध्या गोष्टी प्राप्त करून घेतांनासुद्धां आपणांस इतरांची मदत घेणं भाग असतें. समाजांत राहून मनुष्याचें सामर्थ्य, मुळांत असतें त्यापेक्षां अनेक पटीनें वाढतें; पण समाजाचा संबंध तुटला कीं मग मात्र आपण अत्यंत दुर्बल आहों, जनांवरांमध्येंसुद्धां आपणांपेक्षां जास्त सामर्थ्य आहे, आपली आत्मविकासाची शक्ति नष्ट झालेली आहे व धडपणें जगणेंहि आपणांस अशक्य आहे हें त्याला कळावयास लागतें. स्वदेशप्रीतीसारख्या अत्यंत उदात्त भावना आणि वैभवप्राप्ति व लोकप्रियता यांच्यासारख्या दुय्यम प्रतीच्या आकांक्षा, या मनुष्याचे अंतःकरणांत प्रगट होतात; मनुष्याला आपल्या लक्षावधि बांधवांचे जीविताशीं एकतानता पावण्याची इच्छा अगदीं उपजत असते हें या मनोभावनांवरूच सिद्ध होतें; तुमचा जन्मच संघटनेसाठीं झालेला आहे असें यावरून अनुमान निघतें. संघटनेमुळें व्यक्तीचे सामर्थ्य शतपटीनें वाढतें, विचारविनिमय होतो आणि इतरांच्या प्रगतीबरोबरच आपलीहि प्रगति होत राहते; मानवजातीच्या विश्वव्यापी कुटुंबांत संघटनेमुळें ऐक्यभावाचा उद्भव होतो, व्यक्तिमात्रांना एकमेकाबद्दल जास्त प्रेमभाव वाटतो–यामुळेंच मनुष्याची उन्नति होते आणि त्यांचें जीवन पवित्रतर होतें. म्हणून संघटना जितकी निकट, व्यापक आणि अंतःकरणपूर्वक होईल तितकी वैयक्तिक प्रगतीच्या मार्गावर आपण मजल मारली असें म्हणतां येईल.

सर्वांनीं एकवटून कार्य केल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णावस्था प्राप्त होणें शक्य नाहीं. मानवधर्मरहस्याचा एक एक भाग जसजसा आपणांस उलगडत जातो तसतशी मानवजातींत अधिकाधिक संघटना झालेली आपणांस इतिहासांत दिसून येते, राष्ट्राराष्ट्रांमध्यें अधिक निकट संबंध स्थापन झालेला दिसून येतो. ग्रीसमध्यें नागरिकत्वाचे हक्क भोगणाऱ्या स्वतंत्र लोकांची कल्पना होती

कीं गुलामगिरींत असलेल्या लोकांना स्वातंत्र्याची पात्रताच नाहीं—स्वतंत्र आणि गुलाम ह्या अगदीं भिन्न प्रकारच्या मनःप्रवृत्ति आहेत, ह्या अगदीं वेगवेगळ्या जाती आहेत. संपूर्ण मानवजात एक आहे हें तत्त्व जाहीर करून ख्रिश्चन धर्मानें या कल्पनेला पहिला विरोध केला; ख्रिश्चन धर्माचा प्रसार सुरू झाला त्याच सुमारास रोमन लोकांनीं आपल्या सामर्थ्याच्या जोरावर युरोपखंडामध्यें एकछत्री साम्राज्य स्थापन केलें होतें. नंतर ख्रिश्चन धर्माच्या आद्यगुरूंनीं आपल्या धर्मपीठावरून जाहीर केलें कीं आध्यात्मिक सामर्थ्य हें आधिभौतिक सामर्थ्यापेक्षां उच्चतर आहे; ज्या काळीं त्यांनीं हें जाहीर केलें तेव्हां या धर्मगुरूंचें पीठ ही फार उपयुक्त संस्था होती, आतां ती तशी नाहीं ही फार खेदाची गोष्ट आहे. हें तत्व जाहीर व्हावयाचे सुमारास उत्तरेकडल्या रानटी जर्मन- लोकांनीं रोमन साम्राज्याचा विध्वंस मांडला होता, पण त्यांच्या या जबरदस्तीमुळें जर्मन संस्कृति व लॅटिन संस्कृति यांचें संघटन घडून आलें. आज युरोपांत राष्ट्रस्वातंत्र्याच्या कल्पनेमुळें मोठी खळबळ उडाली आहे, ही कल्पना निःसंदेह विजयशाली होणार आहे. ह्या कल्पनेचा उद्भव व्हावयाचे अगोदर फ्रान्सच्या राजक्रांतीच्या व साम्राज्याच्या लढाया युरोपभर झाल्या होत्या आणि त्यांमुळें तोंवर निद्रित असलेले स्लाव्ह लोक एकदम जागृत झाले व युरोपच्या राजकारणांत भाग घ्यावयास त्यांनीं आरंभ केला.

आणि शेवटीं मनुष्य प्रगमनशील आहे.

प्रगतीचें तत्त्व प्राचीनकाळीं लोकांना नीटपणें समजलें नव्हतें पण यापुढें हें तत्त्व अत्यंत पवित्र मानलें जाईल. जनतेचें सामाजिक, राजकीय व धार्मिक परिवर्तन या तत्त्वांत अंतर्भूत झालेलें आहे.

सृष्टींतील सर्व घडामोडी दैवगतीनुसार होत असतात अशी प्राचीन काळच्या लोकांची कल्पना होती. दैव ही एक गूढ शक्ति आहे; जिजबद्दल मनुष्याला ज्ञान होणें शक्य नाहीं, तिच्या स्वैर इच्छेवर कोणाचाहि दाब नाहीं, हवी ती गोष्ट उत्पन्न करण्याचें अथवा हव्या त्या वस्तूंचा नाश करण्याचें तिला सामर्थ्य आहे; या शक्तीच्या कार्याचें उद्दिष्ट काय आहे हें मनुष्याला समजणेंच शक्य नाहीं—मग त्या कार्यांत तिला मदत करणें त्यांचे हातून कोठून होणार–अशा दैवगतीबद्दल त्यांच्या कल्पना होत्या. चिरस्थायी अशी कोणतीहि गोष्ट उत्पन्न करणें मनुष्यप्राण्याचे हातून होणें शक्य नाहीं अशी त्यांची ठाम समजूत होती. मनुष्याच्या लहानशा जीवनक्रमांतच मानवजातीचा जीवनक्रम जखडून गेलेला

आहे असें त्याना वाटत होतें; व्यक्तीनें सामर्थ्य संपादन करावें व शेवटीं वृद्ध होऊन मरून जावें एवढाच व्यक्तीचा जीवनक्रम असतो अशी त्यांची कल्पना होती. त्यांच्या ज्ञानाचें आणि कल्पनांचें क्षेत्र अत्यंत संकुचित होतें, त्यांचें इतिहासाचें ज्ञान स्वदेशाच्या इतिहासापलीकडे कधींच गेलेले नव्हतें; मानवजात म्हणजे पृथ्वीवरील कोटयवधि मानवांचा घोळका—तिला जीवन नाहीं व शास्त्राहि नाहीं अशी त्यांची कल्पना होती; त्यांनीं व्यक्तींच्या उदाहरणावरून आपल्या साऱ्या कल्पना बसविल्या होत्या. या कल्पनांचा परिणाम असा झाला कीं, आहे त्या स्थितींत सुख मानून घ्यावयाची संवय मनुष्याला लागली; आपल्याला अनुकूल अशी परिस्थिति उत्पन्न करावयाचें धैर्य त्याचेमध्यें राहिल नाहीं. जेथील राज्यकारभार मूळपासूनच लोकांच्या हातांत होता तेथील जनतेचीं मतें लोकसत्तावादी होतीं; जेथे जुलमी सत्ताधाऱ्यांच्या हातांत कारभार होता तेथील लोक गुलामगिरींत निर्ढावून गेले होते—जनतेची प्रगति होत आहे कीं नाहीं याकडे त्यांचें पूर्ण दुर्लक्ष होतें. ग्रीक तत्ववेत्त्यांनीं समाजव्यवस्थेसाठीं दोन जाती कल्पिल्या होत्या—एक स्वतंत्र नागरिकांची जात व दुसरी गुलामांची जात—गुलामांना स्वातंत्र्याची पात्रता केव्हांहि येणार नाहीं असा त्यांचा समज होता; त्याचप्रमाणें पौर्वात्य देशांमध्यें चातुर्वर्ण्याची स्थापना झालेली होती; वर सांगितलेल्या मनःप्रवृत्तीमुळें या वेगवेगळ्या लोकांनीं जातिभेदाची चालू परिस्थिति पूर्णपणें मान्य केली होती; प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्यासारख्या महा बुद्धिवान् पुरुषांनाहि हा भेद मान्य होता. अशा समाजांच्या तावडींत तुम्ही सांपडला असता तर तुमची सुटका व उद्धार होणें जवळजवळ अशक्य होऊन बसलें असतें.

जीझसच्या वचनांचा आधार घेऊन ज्या अनेक महात्म्यांनीं ख्रिस्ती धर्माची स्थापना केली त्यांना प्रगति या पवित्र तत्त्वाचा बोध अगदीं अंधुक अंधुक असाच झाला होता. त्यांना या तत्त्वाचें आकलन पूर्णपणें करतां आलें नाहीं; मानवजातींत कोठेहि भेदभाव असणें शक्य नाहीं, मानवजातीच्या जीवनाला नियमबद्धता देणारा धर्महि एक आहे आणि मनुष्यमात्राला पूर्णावस्था प्राप्त होणें ही गोष्ट अशक्य कोटींतील नाहीं—ह्या तीन महातत्त्वांचा बोध त्यांना पूर्णपणानें झाला होता; पण परमेश्वरानें मनुष्याला नेमून दिलेलें कार्य त्याला नीटपणें पार पाडतां यावें म्हणून ईश्वरानें मनुष्याला कोणती साधनसामुग्री दिलेली आहे आणि तें कार्य साधावयासाठीं कोणत्या मार्गाचा अवलंब केला

पाहिजे या दोन गोष्टींचा मात्र त्यांना नीटसा उमज पडला नव्हता. शिवाय जीवनांत घडून येणारी प्रगति कोणत्या नियमानुसार होते हें जाणावयासाठीं त्यांनीं वैयक्तिक विचारांचा आधार घेऊन आपलें कल्पनाक्षेत्र मर्यादित मात्र करून घेतलें होतें. त्यांना मानवजातीच्या सामुदायिक स्वरूपाचा बोध झाला नव्हता. पूर्वी कार्यकारणभावाची संगति दैव या शक्तीमुळें लागत असे, त्यांनीं या दैवाच्या जागीं देवाला आणून बसविलें; देव हा व्यक्तिमात्रांचा रक्षणकर्ता आहे हें त्यांनीं जाणलें होतें, मात्र मानवतेला तो एका ध्येयाप्रत नेत आहे अशी त्यांची कल्पनाहि नव्हती. पूर्णावस्थेच्या कल्पनेची अगाधता आणि मानवी जीविताची क्षणभंगुरता यांमधील जमीन अस्मानचा फरक पाहून त्यांची अक्कल गुंग झाली. मग त्यांनीं परमेश्वर आणि मनुष्य यांमधील एक अवस्था कल्पनेनेंच निर्माण केली—ही अवस्था म्हणजे देवानें मनुष्यरूपांत घेतलेला अवतार, ही होय; मानवजातीच्या संघटित स्वरूपाचें आकलन त्यांना झालेलें नव्हतें म्हणून या अवतारांवर श्रद्धा ठेवणें हाच मोक्षाचा मार्ग आहे-ह्यामुळें व्यक्तीला सामर्थ्य येतें व तिजवर परमेश्वराची कृपादृष्टि होते अशी त्यांनीं कल्पना करून घेतली.

परमेश्वर आपलें शासन सदोदित मानवजातीचे द्वारानें मनुष्यमात्रासाठीं प्रगट करीत असतो अशी त्यांची कल्पनाच नव्हती, मात्र विशिष्ट प्रसंगीं हें शासन यदृच्छेनें प्रगट होत असतें असें त्यांना वाटत होतें. ईश्वर आणि मनुष्य यांचा कांहीं संबंध आहे एवढें त्यांना समजत होतें, पण मनुष्यमात्राचें एकीकरण करणारा भ्रातृभाव मात्र त्यांना भासत नव्हता. एका पिढीच्या कार्याचा व विचारांचा दुसऱ्या पिढीवर परिणाम होतो हें त्यांना दिसून आलेलें नव्हतें; तेव्हां एकामागून एक येणाऱ्या पिढ्यांचें महत्व त्यांना कसें कळणार? म्हणून त्यांनीं या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें; मानवजातीचें सामुदायिक ध्येय आणि संसार यांपासून मनुष्याला परावृत्त करण्याचा त्यांनीं घाट घातला; पृथ्वी हें पापपरिमार्जनाचें स्थल आहे, येथें सत्कृत्यें केलीं तर स्वर्गप्राप्ति होईलच असें नाहीं, श्रद्धा आणि देवाची कृपा यांमुळेंच मनुष्याला स्वर्ग प्राप्त होतो, स्वर्ग व पृथ्वी यांचा कांहीं संबंध नाहीं अशी त्यांची विचारपरंपरा होती. धर्माचें अविष्करण परमेश्वरानें एकदां करून ठेवलच आहे, तें पुनः करणें शक्य नाहीं, धर्मगुरूंचें मत सर्वांनीं प्रमाण मानलेंच पाहिजे अशी त्यांची कल्पना झाली होती. जीझसला अंतर्ज्ञानामुळें एकदां भविष्यकालाचें ज्ञान झालें होतें व तेव्हां तो जे शब्द बोलला

होता त्यांचा त्यांना विसर पडला—तो म्हणाला होता:—" मी तुम्हांला बऱ्याच गोष्टी सांगणार होतों, पण तें आतां अशक्य आहे. जेव्हां सत्याच्या अधिष्ठात्री देवतेचा अवतार होईल तेव्हां तुम्हाला सत्याचा मार्ग दाखविला जाईल; ही देवता स्वत:बद्दल कांहींच बोलणार नाहीं, पण ती जें श्रवण करील तेंच तिच्या बोलण्यासारखें असेल "*. प्रगति हेंच तत्व या वाक्यामध्यें गर्भित आहे; मानवजातीच्याच द्वारें सत्य प्रगट होत राहील या कल्पनेची ही प्रस्तावना आहे. रोम पुन: जागृत होऊन जगाला जो संदेश निवेदन करणार आहे तो सत्य आहे याचा हा पुरावा आहे. प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या प्रत्येक जाहिरनाम्यावर दोन शब्द घातलेले असतात; ' परमेश्वर आणि मानवजात, ' आणि हेच शब्द पुनरुजीवन पावलेलें रोम जगाला नजर करणार आहे. प्राचीनकाळच्या अज्ञानामुळें लोकांना ह्या संदेशाचें महत्व समजलें नव्हतें.

आजवर जे धर्मपंथ स्थापले गेले ते कशा प्रकारचे आहेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या साह्यानें तुमचें बंधविमोचन होणें शक्य नाहीं.

येशूख्रिस्तानंतर तेराशें वर्षांनीं एका इटालियन महात्म्यानें पुढें दिलेले सिद्धांत सत्य म्हणून नमूद केले. " देव एक आहे, सृष्टि हा परमेश्वराचा विचारविलास आहे म्हणून सृष्टीहि एक आहे. सर्व वस्तूंचा संभव परमेश्वरापासूनच आहे. ज्या विशिष्ट कार्यासाठीं एकादी वस्तु निर्मिली गेली त्या कार्याला पुरेसा दैवी अंश त्या वस्तूचे ठायीं नेहमींच असतो. परमेश्वरानें निर्मिलेल्या सर्व वस्तूंमध्यें मनुष्यप्राणी उच्चत्तम आहे, त्याचे ठायीं परमेश्वरानें दैवी अंश विशेष प्रमाणांत ठेविला आहे. एकाद्या वस्तूला जितकी पूर्ण अवस्था प्राप्त होणे शक्य आहे तितकी प्राप्त करून घेण्यासाठीं ती सदैव यत्न करीत असते. मनुष्याच्या उन्नतीला मर्यादाच नाहीं. मानवजात एकच आहे. परमेश्वरानें निर्मिलेल्या वस्तूंपैकीं एकहि वस्तु निरुपयोगी नाहीं मानवता एकच आहे म्हणून मनुष्याचें ध्येयहि एकच असलें पाहिजे, आणि तें सकलांच्या संघटित श्रमामुळेंच साध्य झालें पाहिजे. मानवजातीमध्यें अस्ताव्यस्त पडलेल्या शक्तींचा, विचार व कृति या क्षेत्रांत शक्य तितका विकास व्हावा एतदर्थ संपूर्ण मनुष्यजातीनें एकदिलानें झटलें पाहिजे. म्हणूनच मनुष्यजातीमध्यें फक्त एकाच विश्वधर्म अस्तित्वांत असला पाहिजे. "

---

* St John, chapt XVI.

हीं वचनें वदणाऱ्या महापुरुषाचें नांव डँटे* इटली देश स्वतंत्र झाल्यावर गांवोगांव या पुरुषाचे आपण पुतळे उभारले पाहिजेत; कारण त्याच्या वचनांमध्यें भविष्यकाळांत प्रगट होणारा धर्म बीजरूपानें असलेला दिसून येतो. हीं वचनें त्यानें लॅटिन भाषेंतल्या ग्रंथांत ग्रथित केलेलीं आहेत; ते ग्रंथ आज विद्वान् म्हणवून घेणाऱ्या महापंडितांसहि दुर्बोध आहेत, पण जगताच्या बुद्धिक्षेत्रावर विचारांचें बियाणें एकदां फेंकलें गेल्यावर ते कधींहि मरत नाहीं. हे विचार प्रथमत: कोणाच्या मनांत आले याचा लोकांना विसर पडला तरीहि ते सदोदित जिवंत राहतात व फलद्रूप होतात. मनुष्याच्या दृष्टीला विस्तार पावलेला वृक्ष दिसत असतो, त्याचें बीज लोकांच्या दृष्टीआडच असतें.

डँटेनें जे बीजारोपण केलें त्याचा आज महावृक्ष झालेला आहे. अनेक बुद्धिमान् लोकांनीं या रोपट्याची जोपासना केली आणि अठराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं त्याचा विस्तार झाला. प्रगति हेंच जीवनाचें तत्व आहे ह्या मताला इतिहासानें दुजोरा दिला. शास्त्रानें त्याला पाठिंबा दिला आणि हे तत्त्व हाच भविष्यन्मार्गदर्शनाचा ध्वज झाला. आज सर्व विचारी लोकांनीं आपल्या कार्याचें ध्येय म्हणून याच तत्त्वाचा स्वीकार केला आहे.

प्रगति हेंच जीविताचें उद्दिष्ट आहे हें आज आपणांस उमगलें आहे. व्यक्ति प्रगमनशील आहे तशीच मानवजातहि प्रगमनशीलच आहे. एक परमेश्वर आणि एकच धर्म. मानवजात अस्तित्वांत आली तेव्हांपासून ती प्रगति पावत आहे. सत्याचें आविष्करण पूर्णपणें अथवा एकदम असें कधींच झालेलें नाहीं, युगांयुगांमध्यें हळूहळू त्याचें प्रकाशन होत असतें, सत्याचा एकएक भाग जसजसा प्रकाशन पावत जातो तसतसा मनुष्यजातीचा जोवनक्रमहि उच्चतर होत राहतो आणि तिजमध्यें निष्ठा वृद्धिंगत होत राहते. म्हणून धर्मभावनेची विकासपरायणता अमर्याद आहे; मनुष्याची श्रद्धा उच्चतर होत जाईल आणि यामुळें धर्माला पवित्रतर स्वरूप प्राप्त होत राहील. शेवटीं संपूर्ण मानवजातीचें एक विश्वमंदिर उभारलें जाईल आणि संपूर्ण मानवजातीचा एक धर्म स्थापन होईल. परमेश्वरानें ज्या व्यक्तीमध्यें विशेष बुद्धिमत्ता आणि शील हीं ठेवलेलीं असतील तेच

---

* डॅन्टे: इटालियन महाकवि, तत्ववेत्ता व द्रष्टा डिव्हाइन कॉमेडी ( स्वर्गीय सुख ), व्हिटा नुओव्हा ( नवजीवन ), परगेटरी ( पापक्षालन ) हीं डॅन्टेचीं महाकाव्यें जगद्वंद्य झालीं आहेत.

या धर्माचे प्रचारक मानले जातील; या भावी धर्मातील तत्त्वांच्या आविष्करणाचा अधिकार फक्त मानवजातीच्या संघटनेसच आहे असें मानण्यांत येईल; सर्व लोक हीं तत्त्वें मान्य करतील आणि वैयक्तिक जीविताच्या सर्व अंगांमध्यें तींच तत्त्वें प्रत्यक्ष स्वरूपांत दृष्टोत्पत्तीस येतील.

मानवजात चिरंजीव आहे आणि ती सदोदित ज्ञान संपादन करीत असते. म्हणून कोणाहि मनुष्याचें मत काल व स्थल यांनीं अबाधित असें सत्य असलेंच पाहिजे असें म्हणतां येत नाहीं; म्हणून धर्मज्ञानाचें रक्षण करणें अथवा धर्मतत्त्वांचा अर्थ विशद करणें हेंच ज्यांचें कार्य आहे असा विशिष्ट वर्ग अस्तित्त्वांत असणें अशक्य आहे; परमेश्वर आणि व्यक्ति यांमध्यें कोणी दुभाष्या लागत नाहीं, हा हक्क फक्त संघटित मानवजातीला आहे. मनुष्याची प्रगति होत रहावी एतदर्थ परमेश्वरानें मानवजातीच्या शिक्षणाचा क्रम तयार केला, व्यक्तिमात्राच्या अंतःकरणांत प्रगतीची स्वाभाविक बुद्धि उत्पन्न केली आणि या कार्यासाठीं जरूर लागणाऱ्या शक्तीहि त्यानें व्यक्तिमात्राचे ठायीं निर्मून ठेविल्या. कर्तव्यमार्गाचें अनुसरण करून या शक्तींचा सदुपयोग करावयास अथवा स्वार्थाच्या भरीस पडून त्यांचा दुरुपयोग करावयास, शक्य तितक्या त्वरेनें स्वतःची प्रगति करून घ्यावयास अथवा हें कार्य लांबणीवर टाकावयास मनुष्य स्वतंत्र आहे; पण परमेश्वराच्या संकेताला मोडता घालणें मात्र मानवी शक्तीच्या हातांत नाहीं. मानवजात परमेश्वरानें योजिलेल्या शिक्षणक्रमांतून खास पार पडणार आहे. रानटी लोकांनीं रोमचा विध्वंस केला तेव्हां जगांतील सर्व सुधारणा नष्ट होणार असा भास कांहीं काळपर्यंत उत्पन्न झाला होता; पण यामुळेंच पूर्वीपेक्षांहि उच्च दर्जाची संस्कृति निर्माण झाली आणि तिचा प्रसारहि जास्त विस्तृत प्रमाणावर झाला. कित्येक व्यक्तींच्या दडपशाहीमुळेंच स्वातंत्र्याचें संवर्धन जास्त जोरानें होतें, यांतील रहस्य हेंच आहे.

प्रगतीचें तत्त्व इहलोकींच व्यवहारांत आणावयाचें आहे. स्वर्ग आणि पृथ्वी यांचेमध्यें विरोध नाहीं. परमेश्वरानें मानवजातीसाठीं जें गृह मुद्दाम तयार करून दिलें त्याला तिरस्कृत मानणें हा परमेश्वराचा द्रोह आहे. पाप, अहंकार व जुलूम यांचे तावडींत हें गृह जाऊं देणें हा शुद्ध पाखंडीपणा आहे. पृथ्वी हें पापनाशाचें स्थल नाहीं; सत्यनिष्ठा व न्यायबुद्धि प्रत्येकाचे अंतःकरणांत जन्मसिद्धच आहेत म्हणून सत्य व न्याय यांबद्दल आमच्या अत्यंत उच्च अशा ज्या कल्पना आहेत त्यांना व्यावहारिक स्वरूप द्यावयाचें हें स्थल आहे. परमेश्वराच्या संके-

ताला मूर्त स्वरूप द्यावयासाठीं स्वत:स वाहून घेणें हेंच परमेश्वराचें खरें पूजन होय; या पूजनाच्या साह्यानें मानवजातीमधील ईश्वराला ऐश्वर्य आणून पूर्णावस्थेप्रत जावयाचा पृथ्वी हा एकच मार्ग आहे. आपल्या बांधवांच्या कल्याणासाठीं व त्यांच्या प्रगतीसाठीं आपण त्यांना जी मदत केली असेल तिच्या प्रमाणांतच आपली पूर्णावस्थेच्या सोपानमार्गावरील प्रगति अवलंबून रहात असते; आपण कांहींच कार्य केलें नाहीं किंवा पापमार्गाचा स्वीकार केला तर आपला अध:पात होतो व पुन्हां पहिल्यापासून प्रगतीला आरंभ करावा लागतो. आपल्या बांधवांशीं आपण जितक्या निकटपणें निगडित होऊं, त्यांचें व आपलें साहचर्य जितकें वृद्धिंगत होईल तितकी आपली शक्ति गुणित होईल आणि आपल्या कर्तव्यांचें कार्यक्षेत्र विस्तार पावेल; प्रगतीला मूर्त स्वरूप द्यावयाचा हा एकच मार्ग आहे. संपूर्ण मानवजातीनें एकाच कुटुंबांतील माणसांप्रमाणें गुण्यागोविंदानें रहावें आणि प्रत्येक व्यक्तीनें आपल्या बांधवांना मदत करीत असावें–हें सिद्ध व्हावें हेंच आपलें ध्येय आहे. युगांमधून युगें लोटत राहतात, पिढ्यांमागून पिढ्या येत असतात आणि म्हणूनच मानवजातीची पूर्णावस्थेकडे प्रगति होते; त्याचप्रमाणें अनेक जन्म धारण करून, स्वत:च्या प्रयत्नानें व्यक्तिमात्रालाहि पूर्णावस्था प्राप्त करून घेतां येते.

प्रगति या तत्त्वांतूनच जगताच्या भावी धर्माचा उद्भव व्हावयाचा आहे. या तत्त्वांत अंतर्गत असलेलीं कांहीं प्रमेयें मात्र वर नमूद केलीं आहेत. याच तत्त्वानुसार तुमचा उद्धार होणार आहे.

## ८. स्वातंत्र्य.

"Yet Freedom! yet thy banner, torn but flying,
Streams like the thunder storm against the wind;"

*Byron.*

तुम्हांला जीवन आहे आणि हें तुम्हांला नुसत्याच दैवगतीनुसार प्राप्त झालें आहे असें नाहीं. दैवावर विश्वास ठेवूनहि हें जीवन तुम्हांला कां प्राप्त झालें याचा उलगडा होत नाहीं; आपलें अज्ञान प्रदर्शित करण्यासाठींच आपण दैव हा शब्द वापरतों. हें जीवन तुम्हांला प्रत्यक्ष परमेश्वरानें दिलेलें आहे. आज अनेक वर्षें मानवजातीची प्रगति होत आहे यावरून स्पष्ट दिसून येतें कीं यामध्यें परमेश्वराचा कांहीं तरी हेतु आहे; म्हणूनच प्रत्येक व्यक्तीच्या जीविताला कांहीं तरी ध्येय आहे हें खास.

मानवजातीच्या प्रगतीचें अंतिम ध्येय काय आहे याबद्दल आपणांस आज कांहींच ज्ञान नाहीं; पण म्हणून असें ध्येय असणें शक्यच नाहीं असें मात्र म्हणतां येत नाहीं. कुटुंब, स्वदेश व मानवजात या प्रगतीच्या तीन अवस्थांमध्यें आपलीं कर्तव्यें काय आहेत व आपल्या जीवितीचें ध्येय काय आहे हें एखाद्या तान्ह्या बाळाला समजत असतें काय? नाहीं; पण त्याच्या जीवनाला कांहीं तरी ध्येय हें असलेंच पाहिजे हें आपणांस समजतें. तें त्याला नीटपणानें समजावून देतां यावें म्हणूनच आज आपण स्वत: तें समजावून घेत आहोंत. मानवजात हें परमेश्वराचें बालकच आहे; ह्या बालकाच्या हातून जें कार्य व्हावयाचें आहे तें जगत्पित्याला माहीत आहे. प्रगति हाच जगाचा नियम आहे हें मानवजातीला नुक्तें कळावयास लागलें आहे. भोंवतालीं पसरलेल्या सृष्टीचें ज्ञान मनुष्याला आज अंधुकपणानें होत आहे; आत्मज्ञान होण्यापूर्वी मानवी प्रगतीचे नियम व सृष्टिनियम यांचें ज्ञान होणें जरूर आहे; रानटीपणा, गुलामगिरी व अज्ञान यांमुळें मानवजातीच्या अर्ध्याहून अधिक भागाला हें ज्ञान मिळविणें आजच्या काळीं अशक्य आहे. बुद्धिविकासाच्या मार्गानें हें ज्ञान प्राप्त करून घेणें युरोपच्या थोड्याबहुत राष्ट्रांनाच

आज अशक्य आहे. शिक्षणाचा अभाव व शारीरिक श्रमांचा अप्रस्तुत अतिरेक यांमुळें बुद्धि निद्रितावस्थेंत राहिल्या कारणानें मजूरवर्गीपैकीं एकाहि व्यक्तीला जगाच्या ज्ञानभांडारांत भर घालतां आली नाहीं; म्हणून ज्या ध्येयाचा उलगडा संघटित कार्यामुळें लागावयाचा आहे त्याचें ज्ञान आजच आपणांस कसें व्हावें बरें ? आपल्यापैकीं फार थोडया लोकांना प्रगति या तत्वाची जाणीव झालेली आहे, ह्या पवित्र शब्दाचा उच्चार आपल्या मुखांतून अझूनपर्यंत बोबडा बोबडाच निघत आहे-तेव्हां संपूर्ण मानवजातीला आपल्या ध्येयाप्रत अझून जातां आलेलें नाहीं असा विचार करून बेदिल होण्यांत तरी काय अर्थ आहे ? मानवजातीचें ध्येय काय असावें हें समजत नाहीं म्हणून सत्यशोधनाचा मार्ग अजिबात सोडून देणें हें अगदींच पोरकटपणाचें आहे. संशोधनाचें कार्य निग्रह-पूर्वक, विनयानें आणि अखंडपणें चालवावें लागतें. दुष्टपणामुळें जितक्या लोकांचा नाश आजवर झालेला आहे त्यांच्या संख्येपेक्षां, अहंकार व अधीरता यांना बळी पडलेल्या लोकांची संख्या जास्त मोठी आहे. बेबलची महत्वाकांक्षा होती कीं गगनमंडलाला भेदून थेंट स्वर्गापर्यंत जाईल एवढा मोठा मनोरा आपण बांधावा; हा प्रयत्न फसला व त्यामुळें जिकडे तिकडे गोंधळ मात्र माजला यांतील रहस्य तरी हेंच आहे.

मानवजातीचें अंतिम ध्येय कोणतेंहि असो, त्याप्रत आपण केव्हांतरी पोंचणार आहोंच; मानवी शक्तींच्या विकासानेंच हें ध्येय हळूहळू साध्य होणार आहे. या शक्ती-ही साधनसामुग्री-खुद्द देवानेंच मनुष्याला दिलेली आहे. म्हणून त्या शक्तींचा विकास करणें, त्यांचें कार्यक्षेत्र स्वतंत्र व सुरक्षित ठेवणें हें अत्यंत अवश्य आहे. स्वातंत्र्याशिवाय व्यक्तीला आपलीं सारीं कर्तव्यें नीटपणें पार पाडणें अशक्य आहे म्हणून स्वातंत्र्य हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे; कोणत्याहि सत्तेनं तुमचें स्वातंत्र्य हिरावून घेतलेलें असलें तर तिजपासून हव्या त्या उपायानें तें हिसकावून घेणें हाहि तुमचा हक्कच आहे.

स्वातंत्र्याशिवाय नीतीला अस्तित्वच नाहीं. कारण सदाचार आणि दुराचार, स्वार्थ व लोककल्याण यांपैकीं आपण कोणता मार्ग स्वीकारावा हें ठरवावयास ज्यांना स्वातंत्र्य नसतें त्यांना त्यांच्या वर्तनाबद्दल जबाबदार धरतां येत नाहीं. बेजबाबदार वर्तनांत नीति असणें अशक्य आहे. स्वातंत्र्याशिवाय समाजाला अस्तित्व असणें अशक्य आहे, कारण स्वतंत्र आणि गुलाम यांचेमध्यें बंधुभाव व ऐक्यभाव उत्पन्न होणें अशक्य आहे—तेथे स्वतंत्रांचेंच स्वामित्व असतें.

स्वातंत्र्य पवित्र आहे; व्यक्तीचें जीवन पवित्र आहे आणि व्यक्तिमात्रांच्या जीवनाचें प्रतीनिधित्व स्वातंत्र्याकडेच आहे, म्हणून स्वातंत्र्य पवित्र आहे. पारतंत्र्यांतील जीवनक्रम म्हणजे नुसता इंद्रियांचा व्यापार मात्र असतो. ज्या मनुष्यानें आपलें स्वातंत्र्य गमावलें आहे त्यानें आपल्या मनुष्यत्वावर पाणी सोडलें आहे आणि परमेश्वराच्या आज्ञेचा भंग केलेला आहे असेंच आपण समजलें पाहिजे.

ईश्वरदत्त हक्कांचा अविर्भाव आणून, वंशाच्या किंवा संपत्तीच्या जोरावर जेथें एकादी व्यक्ति, एकादें कुटुंब वा एकादी जात इतरांवर प्रभुत्व गाजवीत असते तेथील स्वातंत्र्य नष्ट झालेलें असतें. स्वातंत्र्य हें सर्वांसाठीं आहे व तें प्रत्येकाच्या आटोक्यांत असलें पाहिजे. सत्ताधारीपणाचा ताम्रपट ईश्वरानें कोणालाहि दिलेला नाहीं. परमेश्वरानें दिलेली अशी जी कांहीं सत्ता आहे ती फक्त मानवजात, राष्ट्र व समाज यांच्याच वांटयाला आलेली आहे; आणि यांनींहि आपल्या ईश्वरदत्त शक्तींचा दुरुपयोग केला—त्यांचा उपयोग ईश्वरी संकेत पुरा करण्याकडे केला नाहीं—तर तींहि या सत्तेला मुकतात. म्हणून सम्राट्पद हक्काचें असें कोणाचेंहि नाहीं; मानवजातीच्या ध्येयाला सम्राट्पद आहे, तत्प्रीत्यर्थ आपण जीं कामें करूं त्यांत तें आहे. आपलें ध्येय आणि आपले मार्ग हीं जनतेपुढें पसंतीकरितां ठेविलीं पाहिजेत. चिरंतन व नैसर्गिक असें सम्राट्पद आज अस्तित्वांत नाहीं व यापुढेहि तें कोणाला प्राप्त होणें शक्य नाहीं. राज्यपद्धति ही एक संस्था मात्र आहे—आणि जनतेच्या प्रवृत्तींचा कल दाखविणें एवढेच तिचें काम आहे; या पद्धतीनें थोडक्या लोकांच्या हातांत सत्ता केंद्रीभूत होते ती एवढयासाठीं कीं, त्यांनीं आपल्या राष्ट्राचें ध्येय साध्य करण्यांत आपल्या सर्व शक्तींचा उपयोग करावा व आपलें राष्ट्र त्या ध्येयाप्रत शक्य तितक्या लवकर नेऊन पोंचवावें; या कामांत त्यांनीं चुकारपणा केला तर राज्यसूत्रांना हातहि लावावयाचा अधिकार त्यांना उरत नाहीं. सरकारनें नेमलेल्या प्रत्येक अधिकाऱ्यानें लोकमतानुसारच वागलें पाहिजे, लोकांनीं केलेल्या निवडणुकीमुळेंच त्याला तो अधिकार प्राप्त झालेला असला पाहिजे आणि त्यानें जाणूनबुजून अथवा गैरसमजुतीमुळे लोकमताला विरोध केला तर त्याला एकदम बडतर्फ करतां येईल अशाच प्रकारची राज्यपद्धति प्रत्येक राष्ट्रांत असली पाहिजे. म्हणून मी सांगतों कीं, जेथें नुसत्या आनुवंशिक हक्कांच्या जोरांवर एकाद्या वर्गाच्या अथवा घराण्याच्या हातांत सत्तेचा लेशहि असेल तेथें जन-

तेच्या स्वातंत्र्याचा भंग झालेला आहे. तुमच्या प्रत्यक्ष संमतीशिवाय तुम्हांवर कोणी सत्ता गाजवीत असेल तर तुम्हांला स्वतंत्र कसें म्हणावें ? लोकसत्ता हीच एक सत्य व मनुष्याच्या बुद्धीला पटणारी राज्यपद्धति आहे.

स्वर्गांत परमेश्वर आणि भूमीवर राष्ट्र यांशिवाय तुम्हांवर कोणाचीहि सत्ता नाहीं. मानवी जीवनाच्या नियमनाचा एकादा अंशहि तुम्हांला समजला आणि परमेश्वराच्या संकेताची जाणीव झाली कीं मग मात्र तुमचा जीवनक्रम त्यांना धरूनच असला पाहिजे. तुमच्या राष्ट्रबांधवांनीं संघटित होऊन त्यांची अमूक एक तत्त्वावर निष्ठा आहे असें जाहीर केल्यानंतर मग मात्र तुम्ही त्याविरुद्ध बंड-खोरीचा यत्न करूं नये.

कित्येक वैयक्तिक बाबती अशा आहेत कीं त्या मानवी जीवनाला अत्याव-श्यक असल्यामुळें त्यांचेवर राष्ट्रसमाजाचीहि सत्ता नाहीं. ज्या विशिष्ट शक्तीं-मुळें मनुष्याला मनुष्यपणा प्राप्त होतो त्या तुम्हांपासून हिरावून घ्यावयाचा हक्क कोणत्याहि संघटित शक्तीला अथवा मताधिक्याला नाहीं. लोकसत्तेनेंच जुलूम करावयास आरंभ केला तर तिचें स्वतःचें स्वातंत्र्य नष्ट होतें; लोकसत्ता या मार्गानें आत्मघात करून घ्यावयाला लागेल तर शस्त्रास्त्रांच्या जोरावर तिचा पाडाव करतां येत नाहीं, तिच्या अशा कृतींविरुद्ध परिस्थिति सुचवील त्या प्रकारचा निषेध प्रदर्शित करण्याची मात्र कोणासहि मुभा आहे; निषेधप्रदर्शन हा व्यक्तिमात्राचा अबाधित हक्क आहे.

व्यक्तीच्या ऐहिक आणि नैतिक विकासासाठीं ज्या गोष्टी जरूर आहेत त्या सर्व प्रत्येकाला मिळाल्याच पाहिजेत, तसेंच प्रत्येकाला व्यक्तिस्वातंत्र्य असलेंच पाहिजे.

व्यक्तिस्वातंत्र्य, गतिस्वातंत्र्य, धर्ममतस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, मुद्रणद्वारा अगर इतर शांततेच्या मार्गांनीं आपलें मत प्रदर्शित करावयाचें स्वातंत्र्य, मनाचा विकास समाजांत होतो म्हणून संघटनास्वातंत्र्य, बुद्धीनें अथवा मजूरीनें उत्पन्न होणाऱ्या वस्तूंचा व्यापार करावयाचें स्वातंत्र्य—या सर्व गोष्टी तुम्हांपासून हिरा-वून घ्यावयाचा हक्क कोणासहि नाहीं; अर्थातच कांहीं अपवादात्मक प्रसंगीं ह्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित करावें लागतें. हे प्रसंग कोणते याचा निर्देश कराव-याचें हें स्थल नव्हे; ह्या स्वातंत्र्यांना बाध आणणें हा महदन्याय आहे व त्याचा निषेध करणें हें तुमचें कर्तव्य आहे.

कारण सांगावयाचे अगोदर अथवा देशाच्या नेहमींच्या न्यायासनासमोर योग्य काळांत न नेतां नुसत्या समाजसंरक्षणाच्या राबबीवर तुम्हांला कैद कराव-

याचा व तुम्हांवर हेर ठेवावयाचा कोणासहि हक्क नाहीं. मातृभूमीच्या कोणत्याहि विभागांत प्रवास करावयाचा असल्यास त्यासाठीं प्रवासाचे परवाने मिळविणें भाग पाडणें वगैरे निर्बंध तुम्हांवर घालावयाचा कोणासहि हक्क नाहीं. धर्ममतांबद्दल असहिष्णुता दाखविण्याचा अथवा तुमचा छळ करावयाचा कोणासहि हक्क नाहीं. विवेक आणि परमेश्वर यांची एकतानता बिघडविण्याचा हक्क कोणासहि नाहीं. विचार ही ईश्वरदत्त शक्ति आहे; ह्या शक्तीला अथवा तिच्या प्रकट स्वरूपाला कोणत्याहि प्रकारचें बंधन घालावयाचा हक्क कोणासहि नाहीं; विचारशक्तीमुळेच व्यक्तीला आपलें जीवन समाजाच्या जीवनाशीं एकरूप करतां येतें, आणि प्रगतीचा हा एकच मार्ग आपणांस उपलब्ध आहे. मुद्रणस्वातंत्र्य पूर्णपणें अनिर्बद्ध असेंच असलें पाहिजे; हा मनुष्याच्या बुद्धीचा हक्क आहे, मुद्रणनिर्बंध हा निव्वळ जुलूम आहे; लेखकांकडून गुन्हेगारीस उत्तेजन दिलें जाईल किंवा अनीतिपर मत प्रदर्शित केलें जाईल तेव्हां मात्र त्या लेखकांना इतर गुन्हेगाराप्रमाणें शिक्षा देणें न्याय्य आहे. लोकमतानुसार शिक्षा देणें हें मनुष्याला आपली जबाबदारी कळलेली आहे याचें प्रत्यंतर असतें, पण आगाऊ ढवळाढवळ स्वातंत्र्याला विरोधी असते. विचार पवित्र आहेत, तशीच संघटनाहि पवित्र आहे. समाजबुद्धि प्रगतीला पोषक आहे आणि म्हणूनच परमेश्वरानें ती मनुष्यमात्रांत बीजरूपानें ठेवलेली आहे; मानवजातीमध्यें भविष्यकाळांत पूर्ण ऐक्यभाव स्थापन होणार आहे आणि असें खास होणार याचा समाजबुद्धि हा पुरावा आहे. तिला विरोध करावयाचा हक्क कोणासहि नाहीं. जीवनशक्तीचा उपयोग करणें, विकास करणें आणि तिची जोपासना करणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे; आपल्या बांधवांसाठीं आपण कांहीं तरी केलेंच पाहिजे, हें ऋण आपण फेडलेंच पाहिजे. मोलमजुरी पवित्र आहे, एकतंत्री कायदे करून तिला अडथळे घालावयाचा हक्क कोणासहि नाहीं; मनुष्यानें निर्माण केलेल्या पदार्थांच्या विनिमयावर कोणत्याहि प्रकारचे निर्बंध घालावयाचा कोणासहि हक्क नाहीं. मातृभूमीच्या कोणत्याहि प्रदेशांत तुम्हीं उत्पन्न केलेल्या मालाची नेआण करावयाचा तुम्हांला हक्क आहे.

स्वातंत्र्याचे हे सर्व विभाग अत्यंत शुद्ध अशा स्वरूपांत प्रस्थापित झाल्यानंतर, व्यक्तींचा विकास ज्या मार्गांनीं होतो ते सर्व सदोदित मोकळे ठेवण्यांत येतील अशा प्रकारची लोकसत्ता प्रस्थापित केल्यावर, तुमचें ह्यापुढचे व सर्वांत

महत्त्वाचें असें कर्तव्य यथासांग पार पाडतां येणें शक्य होतें; स्वतःची आणि इतरांची नैतिक पूर्णावस्था, मानवजातीच्या सर्व घटकांचें एकमेकांशीं अधिक निकट व जिव्हाळ्याचें संघटन–अशासाठीं कीं पुढें मनुष्यजातीमध्यें एकाच धर्माचा उदय व्हावा, हें तें कार्य.

मानवजातीच्या सर्व घटकांचें अति विस्तृत पण सुसंघटित असें कुटुंब उत्क्रांत करणें, परमेश्वराचें हें भव्य मंदिर उभारणें आणि त्याचा संकेत मानवजातीमध्यें दृश्य स्वरूपांत प्रकट करणें हें तुमचें कर्तव्य आहे.

" जेव्हां तुम्ही एकमेकांशीं खऱ्या बंधुभावानें वागाल, जनहित हेंच स्वहित आणि मानवजातीचें जीवन हेंच आपलें जीवन असें मानावयास व तसेंच वागावयास लागाल आणि मानवजातीप्रीत्यर्थ आपला प्राणहि खर्ची घालावयास सिद्ध व्हाल तेव्हां सारें जग तुम्हांसाठीं आपलाहि जीव धोक्यांत घालील आणि सूर्योदयाबरोबर क्षितिजावरलें दाट धुकें वितळून जातें त्याचप्रमाणें आज मानवजातीच्या शिरावर असलेला दुःखाचा भार एकदम नाहींसा होईल; कारण खुद्द परमेश्वराचेंच वचन आहे कीं, मानवजातीचे विस्कळित झालेले भाग मानवांच्या प्रीतीच्या शक्तीमुळेंच हळू हळू अधिकाधिक निकट येऊं लागतील. मानवजातीमधला द्वैतभाव लयाला जाईल आणि मग परमेश्वरासारखेंच मानवजातीचें स्वरूप अद्वैतात्मक होईल. "*

हे एका सत्पुरुषाचे शब्द विसरूं नका. त्याचें प्रेम विश्वव्यापी होतें व मानवजातीच्या भवितव्यावर त्याचा विश्वास होता. बांधवानों, स्वातंत्र्य हें फक्त एक साधन मात्र आहे, तें साध्य आहे असा कोणाचा समज असेल तर त्यांना धिःकार असो. प्रत्येक व्यक्तीला कांहीं कर्तव्यें व हक्क असे असतात कीं ते सर्वदा अबाधितच असले पाहिजेत; पण व्यक्तीचें जीवन व स्वातंत्र्य यांत सर्व कांहीं आलेंच पाहिजे आणि हेंच व्यक्तिमात्राचें साध्य असा ज्यांचा दुराग्रह असेल त्यांना धिःकार असो. स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याहि प्रकारच्या सत्तेला विरोध असें मुळींच नव्हे, तर राष्ट्रांच्या समाइक ध्येयाचें प्रतिनिधित्व ज्या सत्तेमध्यें नाहीं तिचाच इनकार करणें म्हणजे स्वातंत्र्य; कारण अशा सत्तेचा पाया प्रजेच्या राजीखुषीवर नसतो. स्वातंत्र्य या पवित्र तत्त्वाचे वेगवेगळे अर्थ लावण्यांत येत आहेत; व्यक्तीला स्वैर वर्तनाला मुभा असणें म्हणजे स्वातंत्र्य इतका हीन अर्थ या शब्दानें दर्शविला जातो असें कित्येकांचें मत आहे; त्यांच्या मतें मनुष्याच्या

* लामनेस. Livre du Peuple, iii.

कार्याचा आणि समाजघटनेचा एवढाच हेतु आहे. दुसऱ्या कित्येकांचें म्हणणें आहे कीं, सर्वच प्रकारच्या राज्यपद्धति व हरएक प्रकारची सत्ता जगामध्यें नेहमींच अस्तित्वांत राहणार, त्या कितीहि वाईट असल्या तरी त्यांचा पूर्णपणें नायनाट करणें अशक्य आहे म्हणून अशा सत्तेला शक्य तितका आळा घालतां येणें हेंच स्वातंत्र्य ! त्यांचे मतें स्वातंत्र्याच्या मर्यादा शक्य तितक्या विस्तृत करणें हेंच समाजाचें कार्य होय ! मनुष्याला आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग बऱ्यावाईट कामांकडे करावयाचा हक्क आहे, मात्र त्यानें दुसऱ्या कोणाचें प्रत्यक्ष अहित केलें नाहीं म्हणजे झालें, कोणी कोणाला इजा करूं नये असा बंदोबस्त ठेवणें इतकेंच सरकारचें काम, असेंहि त्यांचें मत आहे ! माझ्या बंधूंनों, या खोटया मतांचा त्याग करा. इटलीच्या भावी वैभवाच्यां मार्गांत अडथळे घालणारे जर कोणी लोक असतील तर ते हेच लोक होत. यांपैकीं पहिल्या मताच्या लोकांनीं देशामध्यें जातिवर्चस्वाचा दुरभिमान उत्पन्न केला आहे. राज्यपद्धतीमध्यें राष्ट्राचें जीवन प्रदर्शित झालें पाहिजे असें असतांहि हे दुसऱ्या प्रकारच्या मतांचे लोक आग्रह धरतात कीं सरकार म्हणजे शांततेचा देखावा कायम रहावा म्हणून उभा केलेला एक शिपाई मात्र आहे ! स्वातंत्र्य म्हणजे अनाचार व अत्याचार, अशी या दोघांचीहि कल्पना आहे; समाजाची नैतिक सुधारणा होऊं शकते ही कल्पना त्यांना अमान्य आहे; समाजानें शिक्षणाचें व प्रगतीचें कार्य आपल्या अंगावर घेऊं नये—तें वायफळ आहे असें त्यांचें मत आहे. स्वातंत्र्याबद्दल तुमचीहि अशीच कल्पना असेल तर पारतंत्र्यांत खितपत पडावयाची तुमची तयारी अगदीं पूर्णपणें झालेली आहे, आज नाहीं उद्यां त्या स्थितींत जाऊन पडणें तुम्हांला भाग आहे असेंच मी म्हणेन. मानवी कर्तव्यें आणि पूर्णावस्थेला पोंचण्याची मानवजातीची पात्रता या दोन तत्त्वांवर निष्ठा ठेवा. या दोन तत्त्वांच्या अनुरोधानें स्वातंत्र्य ही कल्पना जोंवर विकास पावत राहील तोंवरच तिचें पावित्र्य कायम राहील. मानवी शक्तींचा व प्रवृत्तींचा सदुपयोग अथवा दुरुपयोग स्वैरपणानें करावा यासाठीं नव्हे तर आपल्या नैसर्गिक प्रवृत्तींच्या अनुरोधानें सत्कार्य करावयासाठीं स्वातंत्र्य मानवास जरूर आहे असें तुम्ही मानाल तरच तुमचें स्वातंत्र्य अखंड विजयशाली राहील, परमेश्वर आणि मानव यांचेकडून त्याचें संरक्षण होईल.

# ९. शिक्षण.

**नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**

गीता ४–३८.

**परमेश्वरानें** मनुष्याला शिक्षण प्राप्त करून घ्यावयाचें सामर्थ्य दिलें आहे, म्हणून यथाशक्ति शिक्षण संपादन करणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे. समाजानें शिक्षणावर कोणत्याहि प्रकारचा निर्बंध घालतां कामा नये, इतकेंच नव्हे तर समाजानें व्यक्तीला या कार्यांत मदत केली पाहिजे आणि अशिक्षितांच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे. समाजाकडून या साधनांची अपेक्षा करणें हा व्यक्तिमात्राचा हक्क आहे.

मनुष्याचें स्वातंत्र्य, हक्क, सामाजिक अन्यायांपासून मुक्तता आणि जीवितकार्य हीं सर्व शिक्षणावर अवलंबून असतात. शिक्षणाशिवाय मनुष्याला योग्य रीतीनें सदसद्विवेक करतां येत नाहीं, त्याला आपल्या हक्कांचें यथासांग ज्ञान होत नाहीं, त्याला राष्ट्राच्या राजकीय जीवनांत भाग घेतां येत नाहीं व आपल्या जीवितकार्याची मांडणी नीटपणें करतां येत नाहीं. राष्ट्राच्या राजकीय जीवनांत भाग घेतल्यावाचून गुलामगिरींतून तुमची सुटका होणें शक्य नाहीं. शिक्षण हें आत्म्याचें अन्न आहे. खडकावर फेंकलेलें बीं, पोषणाच्या व जोपासनेच्या अभावीं, पिकत नाहीं, तद्वत्‌च शिक्षणाशिवाय मनुष्याच्या सर्व शक्ति कमजोर होतात व निष्फळ राहतात.

आज तुम्हांला जें शिक्षण देशांत येत आहे तें इतकें तुटपुंजें व खराब आहे कीं त्याला शिक्षण हें नांवच देतां येत नाहीं; जी राजसत्ता तुम्हांला हें शिक्षण देत आहे तिचा व तुमचा कांहीं संबंध नाहीं; शिक्षणाचें उद्दिष्ट तत्त्व कोणतें आहे याचा तुमच्या राज्यकर्त्यांनीं निर्णय केलेला नाहीं; आपल्या अंमलाखालीं असलेल्या प्रदेशामध्यें थोडयाशा शाळा तुरळकपणें पसरून दिल्या कीं आपण कृतकृत्य झालों अशी या राज्यकर्त्यांपैकीं अत्यंत उदार अशा लोकांची कल्पना होऊन बसली आहे—मग या शाळा कोठें जास्त तर कोठें अगदींच थोडया

अशा असल्या व त्यांमध्येंच मुलांना फक्त र ट फ करावयाचें ज्ञान मिळत असलें तर यांत नवल तें काय ? या शाळांमधील मुलांना थोडेसें लिहावयाला, अर्धवट वाचावयाला व दोन आंकडे मोडावयाला मात्र शिकविण्यांत येतें.

देहाचे अवयव आणि मनुष्याचा प्राण यांमध्यें जितका फरक आहे तितकाच शिक्षणाचा वर सांगितलेला प्रकार आणि खरें शिक्षण यांमध्यें फरक आहे. अवयव हीं प्राणशक्ति प्रगट व्हावयाचीं साधनें मात्र आहेत; अवयवांची प्राणावर सत्ता नाहीं, अत्यंत साधुवृत्तीच्या अथवा दुर्वृत्त जीवनक्रमाचीं तीं कार्यसाधनें मात्र आहेत. शिक्षणाच्या तत्वांना व्यावहारिक स्वरूप द्यावयाचें ह्याच हेतूनें अभ्यासक्रम तयार करण्यांत आला पाहिजे; म्हणून हल्ल्या त्या प्रकारच्या अभ्यासपद्धतीला शिक्षण हें व्यापक नांव देतां येत नाहीं.

शिक्षण हें नैतिक शक्तींना दिलें जातें व अभ्यासक्रम हा मनुष्याच्या बुद्धीसाठीं असतो. शिक्षणानें मनुष्याला आपल्या कर्तव्यांचें ज्ञान प्राप्त होतें आणि अभ्यासामुळें तीं कर्तव्यें पार पाडण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त होतें. अभ्यासाशिवाय शिक्षण बहुधा निष्फल होतें आणि शिक्षणाशिवाय अभ्यासक्रम निराधार होतो. तुम्हांला अक्षर ओळख झालेली असेल पण एकाद्या पुस्तकांत प्रतिपादन केलेलीं तत्त्वें खरीं आहेत कीं खोटीं आहेत हें जर तुम्हांला सांगतां आलें नाहीं तर त्या वाचनाचा काय उपयोग ? लेखनद्वारा तुम्हांला आपले विचार आपल्या बांधवांना निवेदन करतां येत असतील, पण हे विचार जर सर्वस्वी स्वार्थपर असतील तर त्या लेखनाचा काय उपयोग ? अभ्यास हा संपत्तीसारखा आहे—मनुष्याच्या बऱ्यावाईट हेतूंप्रमाणेंच या दोघांचेहि बरेवाईट परिणाम घडून येतात; जनतेच्या प्रगतीसाठीं त्यांचा उपयोग होणार असला तर त्यापासून संस्कृति व स्वातंत्र्य हीं निर्माण होतील, वैयक्तिक स्वार्थाकडे त्यांचा विनियोग होणार असला तर त्यापासून जुलूम व भ्रष्टपणा हे उत्पन्न होतील. आज युरोपमध्यें विद्यार्थ्यांकडून नुस्ताच अभ्यास करवून घेण्यांत येतो—त्यांना नैतिक शिक्षण देण्यांत येत नाहीं हें फार वाईट आहे; यामुळें समाजांतील उच्चनीचभाव कायम राहतो. मनुष्याचा स्वभाव हिशेबी व स्वार्थी बनतो आणि त्याच्या न्याय-अन्यायाच्या कल्पनांमध्यें सत्य व व्यवहार यांची तडजोड झालेली दिसून येते.

विशिष्ट अभ्यासक्रमाप्रमाणेंच तुम्हांला बौद्धिक शिक्षण देणें आणि व्यापक नैतिक शिक्षण देणें यांमध्यें फार मोठा फरक आहे. हा फरक किती मोठा आहे

याबद्दल तुम्हांला नीटशी अटकळ बांधतां येणार नाहीं, म्हणून मी प्रथमतः याच मयाचें स्पष्टीकरण करून दाखवितों.

स्वातंत्र्यवाद्यांमध्यें दोन पक्ष आहेत. एका पक्षाचें म्हणणें कीं, समाज व्यक्तिसाठीं आहे; दुसऱ्या पक्षाचें म्हणणें कीं, समाजसंघटनेलाच मुख्य अधिकार व सार्वभौम सत्ता ( Sovereignty ) असली पाहिजे, आणि समाजाची व्यवस्था त्यामधील घटकांच्या बहुमतानें चालली पाहिजे. मनुष्यमात्राचे नैसर्गिक हक्क एकदां जाहीर करण्यांत आले व स्वातंत्र्याच्या संरक्षणाची खडी व्यवस्था केली कीं आपण आपलें विशेष कार्य पूर्ण केलें असें पहिल्या पक्षास वाट असतें; दुसऱ्या पक्षाचें लक्ष सदोदित संघटनकडे असतें आणि या संघटनेच्या नियमांनुसार मानवी कर्तव्यें निश्चित करण्याकडे या पक्षाचा कल असतो. विद्यार्थ्यांकडून अभ्यास ( Instruction ) करवून घ्यावयाचा, यावरच पहिल्या पक्षाचा भर असतो, कारण यापासून व्यक्तींच्या वेगवेगळ्या शक्तींचा विकास होत राहतो पण समाजाला साधारण दिशा मात्र देतां येत नाहीं; समाजाच्या ध्येयाला मूर्त स्वरूप प्राप्त व्हावें यासाठीं शिक्षण ( Education ) अत्यंत अवश्य आहे असा दुसऱ्या पक्षाचा आग्रह असतो. पहिल्या पक्षाच्या तत्त्वामुळें समाजावरील नीतीचें बंधन नाहींसें होतें—नैतिक अनाचार घडून येतात; दुसऱ्या पक्षाच्या तत्त्वांमुळें व्यक्तिस्वातंत्र्य हा मनुष्यमात्राचा हक्क आहे याचा समाजास विसर पडतो आणि एकाकी व्यक्तीला बहुमताच्या जोरावर दडपून टाकण्यांत येतें.

पहिल्या विचारपद्धतीचे लोक फ्रान्समध्यें राज्यक्रांतीनंतर फार प्रबळ झाले होते; त्यांनीं १८३० मध्यें लोकांच्या विश्वासाचा घात केला; हे सर्व लोक मध्यम स्थितींतले होते, या वर्गाला पहिल्या प्रकारच्या शिक्षणपद्धतीमुळें वैयक्तिक शक्तींचा विकास करून घेणें जास्त सुलभ होतें; त्यांनीं शिक्षणस्वातंत्र्याचा जाहीरनामा काढून राजसत्ता सदैव आपल्याच हातांत राहावी असा घाट घातला; आज दुसऱ्या पक्षाचे लोक मधून मधून मात्र आढळून येतात, त्यांच्या कल्पना आतां अगदीं जुन्यापुराण्या झाल्या आहेत आणि प्रगति या तत्वावर त्यांचा विश्वास नाहीं.

या दोनहि पक्षांचीं मतें चुकीचीं आहेत, कारण त्यांचें ध्येय फार संकुचित आहे.

सत्य तत्व असें आहे; परमेश्वर, त्याचें शासन आणि संकेत, मानवजातीचें ध्येय, आणि मानवी कर्तव्यें यांचेच ठायीं सर्वभौम सत्ता ( Sovereignty) असणें शक्य आहे; ईश्वरी संकेत हा असाधारण व सच्छील अशा बुद्धिमत्तेचे ठिकाणीं सहजस्फूर्तीनें आणि युगायुगांमधून मानवजातीच्या नैसर्गिक प्रवृत्तीचे द्वारें प्रगट होत असतो. व्यक्ति व समाज हीं जोंवर ईश्वरी संकेताला व शासनाला अनुसरून वर्तत असतील व मानवजातीच्या ध्येयासाठीं प्रत्यक्षपणें प्रयत्न करीत असतील तोंवरच त्यांचे ठिकाणीं सार्वभौम सत्ता संभवते—नुसत्या समाजांत किंवा व्यक्तीमध्यें तीं असणें शक्य नाहीं. हें शासन प्रगट करणाऱ्या मनुष्याला मात्र सार्वभौम सत्ता गाजवण्याचा अधिकार प्राप्त होतो म्हणून त्यानें ईश्वरी संकेताला मूर्त स्वरूप देण्यासाठींच त्या सत्तेचा उपयोग केला पाहिजे, तो असें करणार नाहीं तर त्याचा त्या सत्तेवर कांहींच हक्क उरणार नाहीं आणि म्हणून त्याला उलथून पाडणें हें आपलें कर्तव्य होईल. मानवजातीला नियमबद्ध ठेवणाऱ्या नीतीला विरोध करणाऱ्या अथवा प्रगतीचा मार्ग जाणून बुजून बंद करणाऱ्या बहुमतालाहि अशा सत्तेचा अधिकार नाहीं. सामाजिक कल्याण, स्वातंत्र्य व प्रगति; या तीन संज्ञांचे व्यतिरिक्त अशी सत्ता संभवत नाहीं.

शिक्षणामुळें समाजाचें कल्याण कशांत आहे याचें ज्ञान होतें.

समाजकल्याणाच्या कल्पनेची प्रगति अखंड व्हावी यासाठीं कोणतीं साधनें स्वीकारावींत याबद्दल व्यक्तीला स्वातंत्र्य अभ्यासामुळें ( Instruction ) प्राप्त होतें.

वर्तमानकाळीं आणि स्वदेशांत आपले बांधव स्वतःचा आयुष्यक्रम कोणत्या तत्त्वांच्या आणि भावनांच्या अनुरोधानें नियमित करीत आहेत याचें ज्ञान तुमच्या मुलांबाळांना शिकविलें जाणें हें अत्यंत महत्वाचें आहें; स्वदेशानें आपल्या नैतिक, सामाजिक आणि राजकीय उन्नतीच्या कार्याची मांडणी कोणत्या रीतीनें केलेली आहे, ज्या न्यायतत्त्वांच्या आधारानें व्यक्तीच्या कार्याचें मोल ठरविलें पाहिजे तीं तत्त्वें, मानवजातीनें आजवर प्रगतीचा मार्ग कोठवर आक्रमिला आहे आणि यापुढें तिला किती मजल मावयाची आहे-या सर्व गोष्टींचा समावेश शिक्षणक्रमांत होणें अत्यंत अवश्य आहे. व्यक्तींबद्दल समदर्शित्व, मानवजातीच्या समुदायिक ध्येयाबद्दल भक्ति आणि परमेश्वरानें त्यांना दिलेल्या लक्षावधि बांधवांबद्दल प्रीति या भावना तुमच्या बालकांचे अंतःकरणांत अगदीं लहानपणापासून येत राहाव्या हें तुमच्या दृष्टीनेहि अत्यंत महत्वाचें आहे.

या सर्व विषयांचा समावेश फक्त राष्ट्रीय शिक्षणांतच होणें शक्य आहे.

आज नैतिक शिक्षणाचा पूर्ण अभाव आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. देशांत इतकी गरीबी आहे कीं कुटुंबांतल्या कर्त्या माणसांना आपल्या मुलांना नैतिक शिक्षण द्यावयासाठीं वेळ नाहीं; कारण पोटापाण्यासाठीं झगडण्यांत त्यांचा सगळा वेळ मोडतो आणि वेगळा शिक्षक ठेवावयाचीहि कोणाला ऐपत नाहीं; शिवाय आज स्वार्थपरायणतेमुळें कुटुंब ही संस्थाच भ्रष्ट होउन गेली आहे, म्हणून या शिक्षणाची सोय होत नाहीं. ज्या कोणाला असें शिक्षण द्याव-याची ऐपत आहे त्यांच्या मर्जीस येईल त्या शिक्षकाची या कामीं योजना होत असल्यामुळे नैतिक शिक्षणांत एकवाक्यता असणें अशक्य होऊन बसलें आहे; कोणी शिक्षक मुलांचे मनांत अंधविश्वास भरून ठेवितात, कोणी त्यांना चार्वाक-मतवादी बनवून टाकतात; कोणी त्यांचे मनांत स्वातंत्र्याच्या कल्पना जागृत करतात, कोणी भ्याडपणा उत्पन्न करितात; कोणी त्यांना लोकसत्तावादी बन-वितात, कोणी त्यांना शिष्टजनांचे अनुयायी बनवितात ! लहानपणीं मनांत अशा भिन्न भिन्न प्रवृत्ति उत्पन्न झाल्यामुळें तींच मुलें आपल्या मोठेपणीं देशासाठीं एकजुटीनें काम करतील हें शक्य तरी आहे काय ?—देशाचे चालते बोलते अवतार, अशाच प्रकारचीं देशांतलीं सारीं माणसें होणें शक्य आहे काय ? राष्ट्राची अपेक्षा कीं त्यांनीं राष्ट्राचें ध्येय साधण्यासाठीं कार्य करावें, पण त्यांना अशा सार्वत्रिक ध्येयाची कोणी कल्पनाच आणून दिलेली नसते ! समाजनिय-मनासाठीं कांहीं कायदे असणें अवश्य आहे—ते काय आहेत, त्यांच्या कक्षेंत काय काय येऊं शकतें, हें समाजाकडून नागरिकांना शिकविण्यांत येत नाहीं, मात्र हेच कायदे कोणी मोडले तर त्यांना शिक्षा होते. समाजाच्या ध्येयासाठीं समाजघटकांनीं स्वार्थत्याग करावा व सहकारिता करावी अशी समाजाची अपेक्षा असते; पण याच समाजघटकांना त्यांच्या बालपणीं कोणाहि शिक्षका-कडून या ध्येयाची कल्पना करून दिली जात नाहीं. वर निर्देश केलेल्या पहिल्या प्रकारच्या शिक्षणपद्धतीच्या अनुयायांना एवढेंच मान्य आहे कीं सर्वांना बाल-पणीं शिक्षण मिळालेंच पाहिजे, हेंच कार्य संपूर्ण राष्ट्रानें संघटित होऊन करावें हें मात्र त्यांना मान्य नाहीं. शिक्षणस्वातंत्र्य या तत्त्वाच्या जोरावर ते असें प्रति-पादन करतात कीं, हवें त्यानें हव्या त्या पद्धतीचें शिक्षण द्यावें; पण त्यामुळें राष्ट्राच्या नैतिक शिक्षणाच्या हक्काला बाध येतो. देशामध्यें एकाच प्रकारचें नाणें आणि एकाच प्रकारची वजनमापें असावींत, हें अत्यंत महत्त्वाचें आहे हें

त्यांना मान्य आहे; पण ज्या तत्वांच्या अनुरोधानेंच राष्ट्राच्या जीवनाची मांडणी आणि विकास व्हावयाचा असतो तीं तत्त्वें राष्ट्रांत सर्वत्र सारखींच असली पाहिजेत हें मात्र त्यांना मान्य नाहीं, त्यांना हा मुद्दा गौण वाटतो. आज सदनशीर राज्यपद्धतीच्या ( Constitutional Government ) पुरस्कर्त्यांकडून शिक्षणस्वातंत्र्याबद्दल सारखी ओरड होत आहे; तुम्ही मात्र या आरडाओरडीमुळें फसून जाऊं नका.

राष्ट्रीय शिक्षणानेंच राष्ट्राचें चैतन्य जागृत होतें, राष्ट्रघटकांचे अंतःकरणांत राष्ट्रीय भावना उत्पन्न होतात; राष्ट्रीय शिक्षण हेंच राष्ट्र या भावनेचें नैतिक समर्थन आहे.

सर्व नागरिकांना साधारण अशा राष्ट्रीय शिक्षणाशिवाय, ' सर्वांना समान हक्क व कर्तव्यें आहेत ' या म्हणण्यांत कांहींच अर्थ उरत नाहीं; व्यक्तींना आपल्या कर्तव्यांचें ज्ञान होणें व आपल्या हक्कांचा फायदा मिळवून घ्यावयाचें सामर्थ्य प्राप्त होणें हें सर्वस्वीं दैवाधीन होऊन बसतें, शिक्षकांची निवड करणाऱ्या एककल्ली व बेजबाबदार व्यक्तींवर ह्या कार्याचा बोजा येऊन पडतो.

शिक्षणामध्यें एकवाक्यता असावी या तत्त्वाला विरोध करणारे लोक हा विरोध नेहमीं स्वातंत्र्याच्या नांवावर करीत असतात. पण ह्यामध्यें कोणाच्या स्वातंत्र्याचा भंग होतो ? वडिलांच्या कीं मुलांच्या ? वडिलांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण व्हावें म्हणून ही पद्धत मुलांचें स्वातंत्र्य बळी देत असते; अर्थातच राष्ट्राच्या प्रगतीचा मार्ग मोकळा आहे हा भास खोटा ठरतो. व्यक्तींच्या कल्पना नेहमींच खऱ्या असतात असें नाही, शिवाय त्या प्रगतीला विरोधी असूं शकतात; या शिक्षणपद्धतीमुळें मुलांच्या मनांत स्वातंत्र्याचा अहंकार निर्माण होतो; हें शिक्षण पितृपदावरून देण्यांत येते आणि तेंहि अशा वयांत, कीं मुलांच्या चौकसबुद्धीची वाढ झालेली नसते; अर्थातच या प्रकाराला शिक्षण हें नांव देतां येणें अशक्य आहे. बालपणांत मनावर ठसविण्यांत आलेल्या कल्पनांचें परीक्षण करावयाचें सामर्थ्य तरुणपणीं प्राप्त होतें; पण पोटाच्या विवंचनेमुळें तरुणपणींच कामाला जुंपून घ्यावें लागत असल्यामुळे सर्व शिक्षण निरुपयोगी होतें. हें स्वातंत्र्य नव्हे, हा अनाचार आहे; यामुळें भ्याड लोकांचा एक वर्ग अस्तित्वांत येतो व आपलेंच वर्चस्व कायम ठेवावयासाठीं तो वर्ग जुलमाच्या या मार्गाचा अवलंब करतो.

ही पद्धत स्वैर इच्छेचा पुरस्कार करिते—स्वातंत्र्याचें समर्थन करीत नसते. जेथें समता नाहीं तेथ खरें स्वातंत्र्यहि नाहीं; राष्ट्रीय जीवनाचें मूलतत्व म्हणून संपूर्ण जनतेनें एकच तत्त्व मान्य केलेलें असलें पाहिजे व सर्वांना साधारण अशा कर्तव्यतत्त्वावर जनतेची निष्ठा असली पाहिजे--जेथें असें तत्त्व व अशी निष्ठा नसते त्या समाजांत समतेचो भावना असणें शक्य नाहीं; अर्थातच तेथ खरें स्वातंत्र्यहि संभवत नाहीं. कर्तव्यनिष्ठेशिवाय स्वातंत्र्याला अस्तित्वच नाहीं. अनीतीचा मार्ग अनुसरणें हें स्वातंत्र्य नव्हे; कल्याणप्रद अशा कोणत्याहि सन्मार्गाचा स्वीकार करणें ह्यांतच खरें स्वातंत्र्य आहे, हे मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. बापानें आपल्या मुलांना हव्या त्या प्रकारचें वाईट शिक्षण द्यावें एवढेंच स्वातंत्र्य वर सांगितलेल्या शिक्षणपद्धतीमध्यें दिसून येतें. एकाद्या बापानें आपल्या मुलाच्या शरीराला अपाय करण्याचा घाट घातला तर निःसंशय समाज त्याचे आड येईल; मनुष्याचा आत्मा व मनुष्याचें मन ह्यांचें मोल त्याच्या शरीरापेक्षां कमी दर्जाचें आहे काय ? मग कोणी मनुष्य एकाद्या बालकाच्या अंतःशक्तीचा चुराडा उडवावयास लागला असतां समाजानें मध्यें पडावयास नको काय ? अज्ञान, अनीति व अंधश्रद्धा हीं बालकांचे मनांत उत्पन्न होणार नाहींत अशी खबरदारी समाजानें घ्यावयास नको काय ?

शिक्षणस्वातंत्र्याचें तत्व उत्पन्न झालें तेव्हां तें फार उपयुक्त होतें. जुलमी राज्यपद्धति व प्रगतीला विरोध करणाऱ्या मतांचा धर्मोपाध्याय वर्ग यांचे हातीं देशाला नैतिक शिक्षण द्यावयाचा अधिकार आज आलेला आहे म्हणून आजहि शिक्षणस्वातंत्र्याचें महत्व फार आहे. जुलमाला हाणून पाडण्यासाठीं शिक्षणस्वातंत्र्य हें फार उपयुक्त हत्यार आहे आणि यावांचून बंधविमोचन होणें शक्य नाहीं. तरी बंधविमोचनाचा हा एकच मार्ग आहे असेंहि नाहीं. जेथें गुलामगिरी अस्तित्वांत असेल तेथें हें शस्त्र उपयोगांत आणावें पण चित्तचक्षूंपुढें जो भविष्यकाळ उभा राहिलेला आहे त्यामध्यें फार वेगळी परिस्थिति उत्पन्न झालेली आहे अशी कल्पना करून मी बोलत आहें—तेव्हां प्रत्येक धर्ममंदिराच्या द्वारावर प्रगति हा शब्द खोदण्यांत येईल, तेव्हांचे विद्यार्थी राष्ट्रीय शिक्षण घेऊन घरोघर परत जावयास निघाले असतांना त्यांना उद्देशून पुढील शब्द उच्चारण्यांत येतील:—तुमचा आतां राष्ट्रसंघटनेंत प्रवेश व्हावयाचा आहे; ह्या संघटनेचीं मूलतत्वें आम्हीं तुम्हांला शिकवलींच आहेत; ह्या मूलतत्त्वांवर आपल्या राष्ट्राची आज निष्ठा आहे. ह्या तत्त्वांचें अग्रस्थान 'प्रगति' या तत्वाला आहे

हें सदैव लक्षांत ठेवा. शक्य तेथें आपल्या बांधवांचें मन व अंतःकरण उन्नत करणें हें मनुष्य आणि नागरिक या नात्यानें तुमचें आद्यकर्तव्य आहे हें विसरूं नका. राष्ट्रसंचारानें, परिस्थितीच्या परीक्षणानें आणि तत्त्वांच्या तुलनेनें यापेक्षां उच्चतर असें सत्य तुम्हांला प्रगट झालें तर तें तुम्ही धीटपणान जाहीर करा; त्यामुळें राष्ट्रोद्धाराचा मार्ग अधिक सुकर झाला तर तुमचे राष्ट्रबांधव तुम्हांला दुवा देतील. आणि नंतर शिक्षणस्वातंत्र्य हें तत्त्व राष्ट्राची जरूर भागविण्यास अपुरें आहे आणि राष्ट्राच्या ऐक्याला विघातक आहे म्हणून तुम्ही त्याचा त्याग करा, अगोदर मात्र करूं नका. नंतर मोफत आणि सक्तीचें शिक्षण स्थापन व्हावें अशी राष्ट्राकडे तुम्ही मागणी करा आणि तसें करणें राष्ट्राला भाग पाडा.

राष्ट्रीय प्रगतीचा कार्यक्रम प्रत्येक नागरिकांला समजावून देणें हें राष्ट्राचें कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकानें राष्ट्रीय पाठशाळांमध्यें प्राथमिक आणि नैतिक शिक्षण प्राप्त करून घेतलेंच पाहिजे; वेगवेगळ्या राष्ट्रांचा इतिहास, मानवजातीच्या प्रगतीचें सिंहावलोकन, स्वदेशाचा इतिहास, स्वदेशांतील कायदे ज्या तत्त्वांवर उभारण्यांत येत आहेत तीं तत्त्वें—या सर्व विषयांचा समावेश राष्ट्रीय विद्यालयांच्या अभ्यासक्रमांत झालाच पाहिजे आणि प्रत्येक नागरिकानेंहि हें राष्ट्रीय शिक्षण प्राप्त करून घेतलेंच पाहिजे. तसेंच प्रत्येक नागरिकानें या शिक्षणामुळें समता आणि बंधुप्रीति या भावनांचा विकास करून घेतला पाहिजे.

अशा प्रकारचें शिक्षण नागरिकांना एकदां प्राप्त झालें कीं मग स्वातंत्र्याला आपले हक्क पुन्हां प्राप्त व्हावयास लागतात. कुटुंबांत दिलें जाणारें शिक्षण पवित्र आहे, इतकेंच नव्हे तर कोठेंहि मिळणारें शिक्षण पवित्र आहे. आपल्या कल्पना इतरांना निवेदन करणें हा व्यक्तिमात्राचा हक्क आहे; त्यावर कोणत्याहि प्रकारचें बंधन असतां कामा नये; तसेच अशा कल्पना श्रवण करणें हा प्रत्येकाचा हक्क आहे. मनुष्याला आपले विचार हव्या त्या स्वरूपांत अगदीं स्वतंत्रपणें प्रगट करतां यावें हें इष्ट आहे, म्हणून समाजानें विचारप्रकाशन अनिर्बद्ध ठेविलें पाहिजे व त्याला उत्तेजन दिलें पाहिजे; समाजाच्या कार्याच्या विकसनाचे आणि उत्क्रांतीचे सर्व मार्ग सदैव खुले ठेविले पाहिजेत, म्हणजे सर्वत्रांचें सदैव कल्याण होत राहील.

# १० संघटना प्रगति.

" Progress, man's distinctive mark alone
Not God's & not the beasts' ; God is, they are,
Man partly is & wholly hopes to be. "

*Browning.*

मनुष्याचें जीवन सामाजिक व प्रागतिक असावें अशी परमेश्वराची योजना आहे. परिस्थितीनें तुम्हांभोंवतीं निर्माण केलेल्या कार्यक्षेत्रांत आपल्या बांधवाशीं संघटित होऊन शक्य तितकी प्रगति साधणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे. संघटनेच्या व प्रगतीच्या कार्यांत समाजानें व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य दिलेंच पाहिजे, कारण हा व्यक्तीचा हक्कच आहे; आणि या कार्याला लागणारीं साधनें पुरवून समाजानें व्यक्तीला मदत केली पाहिजे.

नीति व अनीति म्हणजेच कर्तव्य व स्वार्थ यांमधील विवेक करावयाचें सामर्थ्य स्वातंत्र्यामुळें येतें. हा विवेक कसा करावयाचा हें शिक्षणामुळें समजतें. ह्या विवेकाला मूर्त स्वरूप द्यावयाचें संघटना हें साधन आहे; प्रगति हेंच ह्या विवेकाचें साध्य आहे; हा विवेक युक्त होता याचा पुरावा म्हणजे प्रगतीला दृश्य स्वरूप प्राप्त होणें हा आहे. मानवी कार्याच्या या अंगांचें स्वरूप पूर्णपणें अबाधित असलें पाहिजे; त्यांकडे दुर्लक्ष झाल्यास मनुष्याचें मनुष्यपण व नागरिकाचें नागरिकत्व हीं नाहींशीं होतात; कारण यामुळें मनुष्याची अवस्था अपूर्ण राहते व त्याचा विकास अपरिणत राहतो.

या सर्व गोष्टी मिळवावयासाठीं व विशेषेंकरून संघटनेच्या हक्कासाठीं तुम्हीं लढलें पाहिजे; कारण संघटनेवांचून स्वातंत्र्य व शिक्षण हीं व्यर्थ होतात.

संघटनेचा हक्क धर्माइतका पवित्र आहे—कारण धर्म ही आत्म्याची संघटना आहे. आपण सर्व परमेश्वराचीं लेंकरें आहों आणि म्हणून भाऊभाऊ आहों, मग अशा भावाभावांनीं विचारविनियमासाठीं स्थापिलेल्या संघटनेला विरोध करणें हा गुन्हा नाहीं काय ?

प्रत्यक्ष परमेश्वराशीं मनुष्याची एकरूपता होते हें ख्रिश्चन धर्माचें तत्त्व आहे. ह्या विश्वकुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति परमात्मस्वरूपांत विलीन होऊं शकते. मोक्ष-साधनामध्यें गुलाम व धनी असा भेदभाव नाहीं; इच्छा आणि भक्ति यांचे योगानें संपूर्ण मानवजातीमध्यें ऐक्यभाव उत्पन्न होतो.

स्वतंत्र नागरिक व कामकरी गुलाम यांचे आत्मे भिन्न प्रकारचे असतात हे तत्त्व ख्रिश्चन धर्माचा प्रसार होण्यापूर्वीं सर्व विद्वानांनीं मान्य केलें होतें; ख्रिश्चन धर्मानें या नव्या तत्त्वाची स्थापना करून प्रगतीच्या मार्गावर फार मोठी मजल मारली. परमेश्वराशीं मनुष्याचें साधर्म्य होतें या तत्त्वांतच समता व बंधुभाव ह्या कल्पना अंतर्गत आहेत.

ख्रिश्चन धर्मगुरूंनीं हें कार्य केलें नाहीं. धर्मप्रसाराच्या आरंभीं त्यांना तितका धीर नव्हता आणि धर्मप्रसार झाल्यानंतर त्यांचा राजघराण्याशीं व सत्तेशीं संबंध जडून आला; त्यांचे मनांत स्वार्थाचे विचार येऊं लागले, आपण अगदीं वरच्या दर्जाचे लोक आहों असें त्यांना वाटूं लागलें; जीझसला अशा हीन कल्पनांचा स्पर्शहि झाला नव्हता; अर्थातच धर्माचा अधःपात झाला—इतका कीं, साधारण वर्गाला सलोकता मिळाली तर धर्मोपाध्यायांना सायुज्यता मिळते अशा प्रकारचीं तत्त्वें त्यांनीं रूढ करून ठेविलीं.

या तत्त्वांना जनतेकडून विरोध झाला; हा विरोध कित्येक धर्मवीरांनीं आपल्या रक्ताच्या अभिषेकानें पवित्रप्रत आणला, आणि नंतर धर्मतत्वांच्या सुधारणेस आरंभ झाला. धर्मगुरू लावतील तोच धर्मसूत्रांचा अर्थ, हा अर्थ अमान्य करतील ते पाखंडी, या पाखंड्यांना धर्मविचारण सभेनें ( Inquisition )* हवी ती शिक्षा द्यावी अशी पद्धति अमलांत आली. धर्मसुधारणेच्या चळवळीमध्यें जॉन हस या नांवाचा एक साधु बोहिमियांत आपल्या मतांचा प्रसार करीत होता, त्याला या धर्मसभेनें जिवंतपणीं जाळून मारण्याची शिक्षा फर्माविली. ह्या चळवळीचा खरा इतिहास आज लोकांना नीटसा माहीत नाहीं,

* कैद, अंधारकोठडी, फांशी व जिवंत जाळणें यांपैकीं हवी ती शिक्षा अपराध्याला देण्यांत येत असे. पाखंडी कोण हें ठरविण्याचा अधिकार धर्मगुरूंच्या हातीं होता; स्वार्थासाठीं व अब्रूसाठीं स्वतःचींच मतें खरीं आहेत असा आग्रह धरून त्यांनीं हजारों लोकांचे बळी घेतले. धर्मगुरूंचा वर्ग राजसत्तेच्या कह्यांत येईपर्यंत धार्मिक बलिदानाचा प्रघात सुरू होता.

लोकांची अशी कल्पना करून देण्यांत आली आहे कीं हें रण फक्त धर्ममतांबद्दलच माजलें होतें. ह्या चळवळीचा खरा इतिहास राष्ट्रीय पाठशाळेमध्यें तुम्हांला शिकविण्यांत येईल तेव्हां तुमची खात्री पटेल कीं, जनतेचीं धार्मिक मतें उच्चतर होत जातात तसतशी समाजाची सर्वांगीण प्रगति होत असते. राष्ट्रीय शिक्षण मिळाल्यानंतर तुम्हांला या युद्धाचा खरा अर्थ समजून येईल आणि या कार्यासाठीं ज्यांना बळी पडावें लागलें त्यांचेबद्दल तुम्हाला विशेष आदर वाटूं लागेल, ते मानवजातीचे कल्याणकर्ते होते असें तुम्हांला दिसून येईल.

त्यांनीं आपले बळी दिले म्हणूनच आज आपणांस समजून आलें आहे कीं, परमेश्वर आणि मनुष्य यांचे दरम्यान दलालांचा विशिष्ट वर्ग नाहीं; ज्यांचें शील उत्कृष्ट आहे आणि ज्यांनीं आध्यात्मिक व आधिभौतिक ज्ञान विशेषपणें प्राप्त करून घेतलें आहे. त्यांनीं सदोदित समाजाला सन्मार्ग दाखवून द्यावा आणि सदुपदेश करावा; पण आपली एक वेगळीच जात स्थापन करावयाचा अथवा समाजावर सत्ता चालविण्याचा अधिकार आपल्याच हातीं ठेवावयाचा मात्र त्यांना मुळींच हक्क नाहीं. प्रत्येक मनुष्याला परमेश्वराशीं साधर्म्य पावतां येतें. इहलोकीं जें पवित्र आहे तेंच परलोकींहि पवित्र आहे. सर्व व्यक्ति जर परमेश्वराचे ठिकाणीं एकरूप होऊं शकतात तर त्यांनीं ऐहिक जीवनांतहि एकवटून राहिलें पाहिजे. आत्मा एक आहे म्हणूनच विचाराला मूर्त स्वरूप द्यावयासाठीं आपल्या शक्तींची संघटना करावयाचा जनतेला हक्क आहे.

म्हणून संघटना करणें हा समाजाचा हक्क व कर्तव्य आहे अशी निष्ठा बाळगा.

नागरिकांच्या ह्या हक्काला मर्यादित करण्याची इच्छा मनांत धरणारे तुम्हांला सांगूं लागतील कीं खऱ्या संघटनेचीं, राज्यघटना व राष्ट्र हीं दोनच रूपें आहेत, व्यक्तिमात्राला ह्या संघटनेंत प्रविष्ट होणें भाग आहे. समाजांतील दुसरी कोणतीहि संघटना इतकी विस्तृत असणें शक्य नाहीं; असें असूनहि इतर संघटना निर्माण झाल्या तर त्या राज्यघटनेला विरोध करावयासाठींच अस्तित्वांत आल्या असल्या पाहिजेत, म्हणून त्या स्थापूं देणें योग्य नाहीं; संघटनास्थापनेचा हा हेतु नसेल तर त्या सर्वस्वीं निरुपयोगी तरी असल्या पाहिजेत, मग त्या स्थापण्यांत तरी काय अर्थ ?

राष्ट्राच्या सर्व घटकांना जें ध्येय व ज्या भावना साधारण आहेत त्याच फक्त राज्यपद्धति व राष्ट्र या संस्थांमध्यें संघटित होतात. पण सर्व नागरिकांना सामान्य नाहींत अशीं कांहीं ध्येयें संभवतातच. राष्ट्र म्हणजे सर्वांना सामान्य अशा साध्यांचें एकीकरण होय, म्हणूनच विशिष्ट भावना व ध्येयें असलेल्या नागरिकांनीं विशेष प्रकारच्या संघटना निर्माण केल्या पाहिजेत.

शिवाय मानवजातीची प्रगति होत आहे याबद्दल मनुष्याची खात्री पटवून द्यावयाचें सामर्थ्य फक्त संघटनेंतच आहे आणि संघटनास्वातंत्र्याचा हाच मूलाधार आहे. राष्ट्रसंस्थापनेचे वेळीं राष्ट्रघटकांचें ज्या तत्वांबद्दल एकमत झालेलें असेल त्या तत्वांची गोळाबेरीज म्हणजेच राष्ट्रघटना होय, आणि ही तत्त्वें हाच राष्ट्रघटनेचा आत्मा होय. कल्पना करा कीं, या तत्त्वांचें संवर्धन होत राहिल्यामुळें आणखी एकादें नवें तत्त्व कांहीं नागरिकांना प्रगट झाललें आहे, या नव्या तत्त्वाच्या सत्यतेबद्दल त्यांची खात्री झालेली आहे, पण या तत्त्वाचें ज्ञान संघटनेशिवाय प्रसृत होणें शक्य आहे काय ? कल्पना करा कीं, कांहीं नवीन शास्त्रीय शोध लागले आहेत, इतर देशाशीं दळणवळणाचे अधिक सोईस्कर असें नवे मार्ग सुरू झाले आहेत आणि यांचा परिणाम म्हणून राष्ट्रांतील कांहीं लोकांना नवे हितसंबंध स्थापन झाले पाहिजेत असें दाटूं लागले आहे; या व्यक्तींनीं आपलीं साधनें व सामर्थ्य हीं संघटित केलीं नाहींत तर त्या नव्या हितसंबंधांबद्दल राष्ट्रांत जागृति उत्पन्न होणें शक्य आहे काय ? आळसाकडे आणि चालूं परिस्थितींत सुख मानण्याकडे मनुष्यांची प्रवृत्ति अगदीं सहजपणें असते; जनतेला एकदां एकाद्या विशिष्ट विचारसरणीची संवय लागली कीं मग तिचा त्या पद्धतीवरील विश्वास उडविणें हें काम एका व्यक्तीचे हातून होणें शक्य नाहीं; पण अल्पसंख्याकांनीं एकाद्या तत्त्वासाठीं संघटना केली कीं दररोज तिचें सामर्थ्य वाढतच राहतें, अशा संघटनेलाच हें कार्य करतां येणें शक्य आहे. संघटना हा भविष्याचा मार्ग आहे. संघटनेवांचून राष्ट्राची प्रगति खुंटून बसेल व सुधारणेचें पाऊल जागचे जागींच जखडलें जाईल.

जनतेची प्रगति घडवून आणणें हाच संघटनेचा हेतु असला पाहिजे; मानवजात आणि राष्ट्र यांनीं मान्य केलेल्या सत्य तत्त्वांना विरोध करणें हा संघटनेचा हेतु असतां कामा नये. कोणी लोक इतरांची मालमत्ता लांबविण्यासाठीं एकदां संघ स्थापन करतील, किंवा सभासदांनीं अनेक स्त्रियांशीं लग्नें केलींच पाहिजेत असा नियम असलेली एकादी संस्था उत्पन्न होईल, राष्ट्र या संस्थेचा विध्वंस

करावयासाठीं अथवा जुलमी राजांचें राज्य सुरक्षितपणें चालावें यासाठीं कांहीं संघटना अस्तित्वांत येतील—तर या सर्व संस्था सर्वस्वीं बेकायदेशीरच गणल्या जातील. माणुसकी, नीति आणि स्वदेश या भावनांचा भंग करणाऱ्या तत्त्वांचा कोणी प्रसार करूं लागल्यास, जनतेला अशा तत्त्वांपासून अलिप्त ठेवण्यासाठीं त्याला हद्दपार करावयाचा राष्ट्राला हक्क आहे, अशा तत्त्वांचा प्रसार व्हावा या हेतूनें स्थापिलेल्या सर्व संघटनांना बंदी करावयाचा राष्ट्रास हक्क आहे.

संघटनेचे मार्ग सदोदित शांततेचेच असले पाहिजेत. लिहिलेला अथवा उच्चारिलेला शब्द यांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि शस्त्राचा उपयोग तिनें करतां कामा नये. लोकांचीं मनें वळवून त्यांना आपल्या कार्याला अनुकूल करणें हाच संघटनेचा हेतु असला पाहिजे, आपलें कार्य करावयास लोकांना भाग पाडणें हा तिचा हेतु असतां कामा नये.

संघटना सर्वस्वीं सार्वजनिक असली पाहिजे. स्वातंत्र्य आणि स्वदेश यांना अस्तित्वच नसतें तेव्हां गुप्त मंडळयांचें शस्त्र वापरणें हें धर्मयुद्धाला धरून आहे; पण स्वतःच्या स्वातंत्र्याचा हक्क एकदां मान्य झाल्यावर राष्ट्रानें या मंडळयांचा उच्छेद करावा; कारण राष्ट्र स्वतंत्र असलें म्हणजे विचारस्वातंत्र्य अबाधित राहूं शकतें आणि जनतेच्या विचारशक्तीचा विकास होत राहील अशी खबरदारी घेणें राष्ट्रास शक्य असतें. प्रगतीचा मार्ग खुला करणें हें संघटनेचें कार्य आहे, तसेंच जनतेकडून स्वतःच्या गुणदोषांचा निर्णय करून घ्यावयास संघटनेनें सदैव तयार असलें पाहिजे.

मनुष्यपणाच्या मूलभूत प्रवृत्तींपासून उद्भवणारे सर्व हक्क संघटनेनें मान्य केलेच पाहिजेत. युरोपच्या मध्ययुगांत वेगवेगळया धंद्यांतील लोकांनीं आपल्या धंद्यापुरते आपल्याच जातीच्या लोकांचे संघ स्थापन केले होते. या संघांमध्यें नवीन लोकांचा सहसा प्रवेश होत नसे; अशा संघांनीं कामकऱ्यांच्या स्वातंत्र्याला बाध येतो. या प्रकारचे किंवा व्यक्तीच्या मतस्वातंत्र्याला आड येणारे संघ अत्यंत अनिष्ट आहेत; म्हणून राष्ट्राच्या सरकारनें असल्या संघांचा पूर्णपणें नायनाट केला पाहिजे आणि असें करणें हें अगदीं न्याय्य आहे.

संघटना-स्वातंत्र्याच्या या इतक्या मर्यादा आहेत; ज्या संघटना या मर्यादांचें उल्लंघन करीत नाहींत त्या पवित्र आहेत, कारण त्यांचेमुळेंच प्रगतीला जीवन प्राप्त होतें. त्यांचेवर आणखी निर्बंध लादणारी राजसत्ता आपल्या समाजधर्मापासून च्युत झालेली असली पाहिजे; हा जुलूम बंद झालाच पाहिजे अशी

या राजसत्तेकडे जोराची मागणी करणें हें जनतेचें कर्तव्य आहे. शांततेचे सर्व मार्ग निष्फळ झाल्यानंतर ही राज्यसत्ता उलथून पाडणें हाच उपाय जनतेनें योजला पाहिजे.

माझ्या बांधवांनों, मानवी कर्तव्यांचे हे आधारस्तंभ आहेत आणि मनुष्याच्या हक्कांचें हें उगमस्थान आहे. नागरिक या नात्यानें व्यक्तीच्या सार्वजनिक जोवनक्रमांत अनेक प्रश्न उपस्थित होतात; अशा प्रश्नांचा अंदाज बांधणें अथवा ते सोडवावयास व्यक्तीला मदत करणें हा या ग्रंथाचा उद्देश नाहीं. हे प्रश्न सोडवितांना ज्या तत्त्वांचा आधार घ्यावा लागतो तीं तत्त्वें कोणतीं हें दाखवून देणें एवढाच या निबंधाचा मूळ हेतु आहे; या तत्त्वांचा प्रामाणिकपणें आणि मन:पूर्वक उपयोग केला तर असे प्रश्न सोडवावयाचीं साधनें खास उपलब्ध होतील. माझें मन मला ग्वाही देत आहे कीं, हे निबंध लिहिण्यांतील माझा हेतु बहुतांशीं सिद्धीस गेला आहे.

परमेश्वर हाच मानवी समतेचा आरंभ आणि आधार आहे हें मीं दाखविलेंच आहे; समाजस्वास्थ्यासाठीं केलेले कायदे नीतिनियमांना धरून असले पाहिजेत व कायदे करणारे लोक आपलें काम सत्याला धरून करीत आहेत कीं नाहीं हें कशावरून ठरवावयाचें, ह्याचेंहि निरूपण झालेलेंच आहे; राष्ट्र व राष्ट्रघटक जे नागरिक त्यांनाच मात्र परमेश्वराचें शासन प्रगट करावयाचा अधिकार आहे आणि राष्ट्राच्या राज्यसत्तेचा उगम त्यांचेमध्येंच आहे हें मीं सांगितलेंच आहे.

धर्माचें प्रधान अंग प्रगति हें आहे असें मीं सांगितलें आहे; प्रगति अमर्याद आहे व युगायुगांमध्यें तिचा एकएक भाग क्रमाक्रमानें प्रगट झालेला दिसून येतो; प्रत्यक्ष कार्याच्या प्रत्येक विभागांत, विचारशक्तीच्या प्रत्येक स्वरूपांत—धर्मापासून तों उद्योगधंद्यापर्यंत व संपत्तीच्या विभागणींत—प्रगति सदोदित होत असते हें मीं दाखवून दिलेंच आहे.

मनुष्यमात्राचीं मानवजातीसंबंधींचीं कर्तव्यें काय आहेत, राष्ट्रकर्तव्यें, कुटुंबकर्तव्यें व स्वत:संबंधींचीं कर्तव्यें कोणतीं आहेत हें मी स्पष्ट करून दाखविलें आहे; जीवसृष्टींत मनुष्यप्राण्याचें जें वैशिष्ट्य आहे तें प्रमाण धरून मानवी कर्तव्यें काय असावींत हें मीं अनुमानानें ठरविलें आहे—स्वातंत्र्य, शिक्षणसंपादनाचें सामर्थ्य, समाजबुद्धि आणि प्रगमनशीलता यांमध्यें मनुष्याचें जीवनकोटींतील वैशिष्ट्य दिसून येतें; या शक्तिवांचून मनुष्याला मनुष्यपणा अथवा नागरिकत्व प्राप्त होणें अशक्य आहे. ह्या शक्ति परमेश्वरानें मनुष्याला दिलेल्या आहेत

म्हणून कोणतीं कर्तव्यें करणें त्याला प्राप्त होतें, या शक्तींच्या आधारामुळें त्याला कोणते हक्क प्राप्त होतात व व्यक्तिमात्रानें स्वदेशांत कोणत्या प्रकारची राज्यव्यवस्था स्थापण्याचा यत्न केला पाहिजे हेंहि मीं दाखवून दिलेंच आहे. हीं तत्त्वें सदैव लक्षांत ठेवा. डोळ्यांत तेल घालून त्यांचेवर नजर ठेवा, नाहींतर तीं अबाधित राहणार नाहींत. जणूंकाय या तत्त्वांनींच तुमच्या देहांत प्रवेश केला आहे इतक्या निकटपणें हीं तत्त्वें तुम्हीं आपल्या जीवनाशीं निगडित करा, म्हणजे तुम्हांला स्वातंत्र्य व प्रगति हीं प्राप्त होतील.

तुम्हीं इतकें केलेंत म्हणजे मीं तुम्हांसाठीं जें कार्य हातीं घेतलें आहे तें पुरें होईल; पण या कार्यांत एका प्रचंड विरोधाबरोबर तुम्हांला झगडावें लागेल; सामाजिक परिस्थितींतच त्याचें मूळ आहे—हा विरोध म्हणजे साधनांची विषमता हा होय; मनुष्याला यामुळें आपलीं कर्तव्यें नीटपणें पाळतां येत नाहींत व आपल्या हक्कांचाहि उपभोग घेतां येत नाहीं.

कर्तव्यपालन आणि हक्कांचें संरक्षण यासाठीं तीन गोष्टी अवश्य आहेत. वेळ, बुद्धिविकास आणि पोटापाण्याची योग्य तरतूद.

प्रगतीचीं हीं साधनें ज्यांचेपाशीं नाहींत असे किती तरी लोक आज तुम्हांमध्ये सांपडतील. पोटासाठीं त्यांना जन्मभर तडफड करावी लागते. जीविताची प्रगति कशी होईल हा प्रश्न त्यांचेपुढें उद्भवतच नाहीं; फक्त प्राणधारणा कशी करावयाची हीच विवंचना जन्मभर त्यांचे डोळ्यांसमोर असते.

हा दोष आज समाजसंघटनेमध्यें अगदीं स्वाभाविक होऊन बसला आहे; मीं त्याचें स्पष्टपणें विवरण केलें नाहीं आणि हा दोष दूर करावयाचा मार्ग दाखवून दिला नाहीं तर माझ्या या कार्याचा कांहींच उपयोग होणार नाहीं.

म्हणून राष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीचें परीक्षण मी पढील प्रकरणांत करणार आहें.

# ११ कामकरी वर्गाचा प्रश्न.

कामकरी वर्गाची आज अत्यंत निकृष्टावस्था आहे. शेतावर अथवा कारखान्यांत काम करणारांपैकीं निदान तीन-चतुर्थांश लोकांना तरी पोटापाण्यासाठीं रोज तडफड करावी लागते. रोजीं दहा, बारा व कधींकधीं चवदा तास अविश्रांत श्रम करावे तेव्हां त्यांच्या पोटाची सोय होते; शिवाय त्यांना एकाच प्रकारचें काम अहोरात्र करावें लागत असल्यामुळें तें सहाजिकच कंटाळवाणें वाटतें. स्वतःची प्रगति करून घेणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे हें त्यांना सांगणें म्हणजे त्यांची प्रच्छन्न विटंबना करणें आहे; मनुष्याचें नैतिक व बौद्धिक जीवन, व्यक्तीचे राजकीय हक्क, शिक्षण व समाजाची परिस्थिति वगैरे विषयांवर त्यांच्याशीं संभाषण करणें म्हणजे त्यांचा निव्वळ उपरोध करण्यासारखें आहे. स्वतःची प्रगति करून घ्यावयास त्यांना वेळ नाहीं व साधनेंहि नाहींत. सदोदित एकाच यंत्रावर काम करीत राहिल्यानें त्यांचें शरीर थकून जातें व मन मंद होऊन त्यावर एक प्रकारची गुंगी चढते; अशा मनःस्थितींत कारखान्यांत काम करीत असतांनाच त्यांचे मनांत कारखानदार व भांडवलवाले या वर्गाबद्दल एक प्रकारचा त्वेष उत्पन्न होतो; मजूर लोकांना हा त्वेष कृतींत उतरवून दाखवितां येत नाहीं, म्हणून त्यापासून कांहींच निष्पन्न होत नाहीं; शिवाय पुष्कळ वेळां ह्या संतापाला न्यायाचें पाठबळहि नसतें. मजूर लोकांचा सारा जन्मच दुःखपूर्ण असतो; आज झालेलें दुःख व उद्यांची विवंचना यांचा आपल्या मनाला क्षणभर तरी विसर पडावा म्हणून हे लोक मादक पदार्थांचें सेवन करतात-यामुळें त्यांचें मन उत्तेजित होतें! त्यांच्या राहण्याच्या जागेला घर म्हणण्यापेक्षां ‘ अडगळीची कोठडी ’ म्हणणेंच परिस्थितीला धरून होणार आहे; सकाळीं उठल्याबरोबर पुन्हां पूर्वीप्रमाणेंच कामाच्या गाड्याला जुंपून घ्यावयाचें हाच त्यांचा जीवनक्रम!

मजूरांच्या आयुष्यक्रमाचें हें चित्र अत्यंत भयंकर आहे आणि ही स्थिति बदललीच पाहिजे.

प्रत्येक मनुष्याला शारीरिक, बौद्धिक व नैतिक सामर्थ्य असतें; आणि मनुष्य या नात्यानें व्यक्तिमात्रानें या शक्तींचा विकास केलाच पाहिजे; मनुष्यमात्रानें नागरिकधर्माला धरूनच वागलें पाहिजे, प्रत्येक मनुष्याला प्राथमिक शिक्षण व थोडासा रिकामा वेळ मिळालाच पाहिजे आणि अशी सोय व्हावी व समाजाचें कल्याण व्हावें यासाठीं प्रत्येकानें आपल्या नागरिकत्वाच्या हक्कांचा उपयोग केला पाहिजे.

कामकऱ्यांचे कामाचे तास कमी झाले पाहिजेत व त्यांच्या वेतनांत वाढ झाली पाहिजे हें स्पष्ट आहे.

मनुष्यमात्राला परमेश्वरानें जन्म दिला म्हणून मानवजातींत बंधुभाव असला पाहिजे; संपूर्ण मानवजातीचें एक विराट् कुटुंब आपणांस उत्क्रांत करावयाचें आहे; स्वभाव व सामर्थ्य यांच्या भिन्नतेमुळें व वेगवेगळ्या कामांकडे मनुष्याची प्रवृत्ति असते, यामुळें या विश्वकुटुंबाच्या घटकांमध्यें विषमता असणें संभवनीय आहे. पण सर्वांनीं एक महातत्व मान्य केलेंच पाहिजे:—समाजाच्या सोयीसाठीं यथाशक्ति काम करावयास कबूल असलेल्या व्यक्तीला मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा विकास करतां येईल इतकें वेतन, त्या कामाबद्दल मिळालेंच पाहिजे.

हें आपलें ध्येय आहे आणि तें शक्य तितक्या पूर्णपणें साध्य व्हावें म्हणून अनेक शतकें या दिशेनें अनेक प्रयत्न होत आहेत. जनतेची राजकीय प्रगति व सामाजिक सुधारणा या बरोबरच होत राहिल्या पाहिजेत; एकादी क्रांति झाली व तिजमुळें गरीब लोकांच्या स्थितींत सुधारणा झाली नाहीं तर ही उलाढाल पक्षद्वेषामुळें झाली असेंच म्हटलें पाहिजे, हें युद्ध फक्त स्वार्थासाठीं व सत्तेच्या लोभामुळें झालें असेंच समजलें पाहिजे; अशा युद्धामुळें परमेश्वराच्या संकेताचा भंग होतो, त्याला सत्याचा पाठिंबा नसतो आणि त्यामुळें समाजाचा विध्वंस मात्र होतो.

पण हें ध्येय साध्य करून घेणें आज कितीसें शक्य आहे ? तें कसें साध्य करून घ्यावयाचें आणि या कार्याचीं साधनें कोणतीं आहेत ?

कांहीं भ्याड लोकांचें म्हणणें आहे कीं, कामकरी लोकांनीं आपली नीति सुधारली पाहिजे. या लोकांनीं पेढया व अशाच प्रकारच्या संस्था स्थापन केल्या आणि कामकऱ्यांना सांगितलें कीं तुम्हांला मिळणारा पगार तुम्ही आमच्या पेढीवर आणून ठेवा, या पगारांतून कांहीं पैसे शिल्लक टाका, दारू पिऊं नका आणि असेच हलके प्रकार करूं नका; दुर्व्यसनांचा त्याग करा, म्हणजे तुमच्या

पाठीमागची ददात आपोआप चुकेल. उपदेश या दृष्टीनें हे शब्द फार मोलाचे आहेत, कारण कामकरी वर्गाची नैतिक उन्नति हेंच त्यांचें हृद्गत आहे आणि ही उन्नति झाल्याशिवाय त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं केलेले इतर सर्व प्रयत्न निष्फळच होणार. पण नैतिक उन्नतीमुळें या वर्गाच्या गरीबीचा प्रश्न मात्र सुटत नाहीं आणि हा प्रश्न सोडविणें हें समाजाचें कर्तव्य आहे—याचा या उपदेशकांना विसर पडतो. सर्वच कामकऱ्यांना आपल्या पगारांतून कांहीं रक्कम शिल्लक टाकतां येणें अशक्य आहे; ज्यांना थोडीफार बचत करतां येते त्यांना आपल्या म्हातारपणाची तरतूद करावयासाठीं साऱ्या जन्मभर पोटाला चिमटा घ्यावा लागतो. पण मजूराला वृद्धावस्थेंत सुखाचे चार दिवस मिळावे एवढाच आर्थिक सुधारणेचा हेतु नाहीं; त्याचें शरीर व मन ऐनज्वानींत असतें तेव्हां त्याच्या जीवनाचा पूर्ण विकास झाला तरच राष्ट्राच्या व मानवजातीच्या प्रगतीला त्याचा यथायोग्य उपयोग होणें शक्य आहे; त्याला आपल्या सर्व शक्तींची जोपासना करतां यावी व ह्या विकास पावलेल्या शक्तींचा उपयोग व्हावा हाच आर्थिक सुधारणेचा हेतु आहे. मजूर वर्गाची स्थिति सुधारावयासाठीं त्यांच्या वेतनांत वाढ होणें जरूर आहे आणि वर सांगितलेले पढीवाले उपदेशक तर याचें नांवहि काढीत नाहींत ! जनतेच्या सोयीसाठीं मजूर लोक खपत असतात, इतकेंच नव्हे तर समाजावर एकादें संकट येतें तेव्हां हेच लोक समाजसंरक्षणासाठीं आपलें रक्त ओतावयासहि तयार असतात; आणि म्हणूनच त्यांच्या सोयीकडे लक्ष पुरवणें हें समाजाचें कर्तव्य आहे. ह्या उपदेशकांच्या वर्गाशिवाय समाजांत आणखी एक वर्ग असतो; या वर्गातील लोकांचे मनांत मजूरांबद्दल कोणत्याहि प्रकारचा वैरभाव असतो असें नाहीं, फक्त गांजलेल्या कामकऱ्यांचा आर्त रव त्यांच्या कानावर गेला तरी त्यांच्या अंतःकरणाला धक्का बसत नाहीं, इतकेंच ! शिरस्त्याला सोडून नवीन प्रकारची व्यवस्था स्थापण्याचें धाडस त्यांचे अंगीं नसतें. ह्या लोकांचा स्वावलंबनावर मोठा विश्वास; त्यांना वाटतें प्रत्येक मनुष्याला आपल्या कर्तबगारीनें स्वतःचें बंधविमोचन करून घेतां आलेंच पाहिजे. प्रगति आणि संहति हे मानुषतेचे विशेष गुण आहेत, ही गोष्ट ते विचारांतच घेत नाहींत. सध्यां अस्तित्वांत असलेली मालाच्या उत्पादनाची पद्धत उत्कृष्ट आहे—तिजमध्यें कोणत्याहि प्रकारचा बदल केल्यास त्याचे परिणाम अत्यंत अनिष्टच होतील, असें त्यांचें मत आहे. ते म्हणतात, मनुष्यानें स्वतःपुरताच विचार करावा, नसत्या भानगडींत पडूं नये; आपण मेलों, जग मेलें; प्रत्येक व्यक्तीला

स्वैर वर्तन करावयास स्वातंत्र्य असलेंच पाहिजे--हीं सूत्रें समाजानें ग्रहण केलीं तर हळू हळू सर्व वर्गांत स्वास्थ्य व सुख उत्पन्न होऊन समाजाला समतोलपणा येईल. विश्वप्रीतीचें नाटक करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांचे भाषेत बोलावयाचें म्हणजे देशाच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत मालाची ने आण करण्याला समाजानें व्यक्तीला स्वातंत्र्य द्यावें, आंतर राष्ट्रीय व्यापाराला स्वातंत्र्य असावें, व्यापारावरील आणि विशेषत: कच्च्या मालावरील जकात शक्य तितकी कमी करण्यांत यावी; दळणवळणाचे मार्ग वाढविण्यांत यावे आणि मालाची पैदास वाढावी, यासाठीं यंत्रसामुग्रीचा उपयोग फार मोठया प्रमाणावर करण्यांत यावा--समाजाला यापेक्षां जास्त कांहींच करतां येणार नाहीं; समाजानें आर्थिक व्यवस्थेंत याहून अधिक ढवळाढवळ करूं नये, त्याचे परिणाम घातुकच होतील असा या शास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे.

आणि हा अभिप्राय बरोबर असेल तर समाजाला जडलेला हा गरीबीचा रोग असाध्य आहे असेंच म्हटलें पाहिजे. माझ्या बांधवांनों, परमेश्वर करो आणि हीं मतें मला कधींहि मान्य न होवोत. हीं मतें प्रतिपादन करणारांचे अंत:करणांत आशा नाहीं, परमेश्वर नाहीं आणि नीतीहि नाहीं; तुमच्या दु:खाला आणि आकांक्षेला असें निर्दयपणाचें उत्तर देणें माझ्या हातून कधींहि होणार नाहीं. कामकरी लोकांची भविष्यकालांत काय स्थिति होणार आहे याबद्दल अर्थशास्त्रज्ञांनीं ज्या प्रकारचीं अनुमानें काढलीं आहेत त्यांपेक्षां जास्त उज्वल असें भवितव्य तुम्हांला प्राप्त व्हावें अशी परमेश्वरानेंच योजना करून ठेवली आहे.

अर्थशास्त्रज्ञांचे प्रयत्न संपत्तीच्या उत्पादनाची वाढ व्हावी यासाठीं आहेत; संपत्तीची विभागणी जास्त समतेनें व्हावी यासाठीं त्यांनीं कांहींच योजना केलेली नाहीं. भूतदयेनें प्रेरित झालेले लोक सदोदित ओरडत असतात कीं, मजुरानें आपली नीति सुधारली पाहिजे; पण मजुराची सांपत्तिक स्थिति कशी सुधारेल याकडे त्यांचें लक्षच पोंचत नाहीं; आणि अर्थशास्त्रज्ञांकडे पहावें तों त्यांचें लक्ष संपत्तीच्या उत्पादनांत वाढ कशी होईल इकडेच गढलेलें असतें. मजूरवर्गाच्या नैतिक उन्नतीचे विचार त्यांच्या मनांत कधींच येत नाहींत; पहिल्या प्रकारचे लोक मजुराच्या मनुष्यपणावर भर देतात, दुसऱ्या प्रकारच्या तत्त्वज्ञांना मजूर हा मनुष्य आहे अशी जाणीवच नसते. त्यांना वाटतें कीं, कामकरी म्हणजे काम करावयाचें यंत्र ! अर्थशास्त्राचें एक तत्त्व आहे कीं, उद्योगधंद्यावर कोणत्याहि प्रकारचें बंधन नसेल तरच देशाची आर्थिक उन्नति होणें शक्य आहे. या

तत्त्वाचा अनेक देशांनीं स्वीकार केला; यामुळें देशामधील भांडवलाची वाढ झाली व मालाचें उत्पादनहि फार झपाट्यानें होऊं लागलें; पण अनेक शास्त्रज्ञांनीं पुराव्यानिशीं सिद्ध करून दाखविलें आहे कीं, देशामधील उद्योग-धंद्यांची कितीहि वाढ झाली तरी, तिजमुळें समाजांतील सर्व वर्गांना निश्चयें-करून जास्त सुख प्राप्त झालेंच पाहिजे असें मात्र म्हणतां येत नाहीं. कामकरी वर्गाच्या मानगुटीवर बसलेली गरीबी कांहीं सुटत नाहीं. राजकीय स्वातंत्र्यामुळें जनतेमधील प्रत्येक वर्गाला कांहीं हक्क प्राप्त होतात; पण कांहीं वर्गांना शिक्षणाच्या, सुसंधीच्या व वेळाच्या अभावीं या हक्कांचा उपयोगच करून घेतां येत नाहीं; त्याचप्रमाणें उद्योगधंद्यामधील स्पर्धास्वातंत्र्याचाहि कामकरी वर्गाला कांहींच उपयोग होत नाहीं. कारण त्यांना अगदीं लहान रक्कमहि शिलकेंत टाकणें अशक्य असल्यामुळें त्यांना व्यापारधंद्याला आरंभच करतां येत नाहीं. व्यापाराची सुकरता आणि संपत्तीची विभागणी व विनिमय यांच्या पद्धतीमध्यें सुधारणा झाल्यास दलालांच्या जुलुमांतून कामकरी वर्गाची सुटका होईल, माल उत्पन्न करणारा कारखानदार आणि तोच माल वापरणारें गिऱ्हाईक यांची जोड घालून द्यावयाचें काम दलालांकडे असतें आणि कारखान्यांतून माल जितक्या झपाट्यानें निघूं लागेल तितकी या दलालांची संख्या वाढते व अर्थातच त्याचा बोजा मजुरांना सहन करावा लागतो; दलालांचा जुलूम टळला तरी त्यांची भांडवलवाल्यांच्या मगरमिठींतून सुटका होत नाहीं; किंवा काम करणारे आणि काम करण्याचीं साधनें, याचा संयोग घडून येत नाहीं. संपत्तीची विभागणी समप्रमाणांत होत नाहीं. उत्पन्न झालेल्या मालाची वांटणी न्यायाला धरून होत नाहीं आणि मालाची मागणी करणाराची संख्या योग्य प्रमाणांत वाढत नाहीं म्हणून समाजकल्याणाकडे संपत्तीचा उपयोग होत नाहीं, देशांतील बहुतेक सर्व भांडवल फार थोड्या व्यक्तींचे हातांत तुंबून राहतें, अर्थातच जनतेच्या सर्व वर्गांमध्यें संपत्तीचा प्रसार होत नाहीं. वायफळ व चैनीच्या वस्तु उत्पन्न करण्याकडे या भांडवलाचा उपयोग करण्यांत येतो, आपल्याला कांहीं विशेष आवश्यकता आहेत अशी मनुष्य आपली कल्पना करून घेतो आणि मग या काल्पनिक जरूरी भागवण्यासाठीं कारखानें काढण्याकडे या तुंबलेल्या भांडवलाचा उपयोग करण्यांत येतो; जीवनाला आवश्यक अशा वस्तु उत्पन्न करण्याकडे हें भांडवल लावण्यांत येत नाहीं, त्याचा उपयोग घातुक आणि अनीतिमय अशा सट्टेबाजीकडे करण्यांत येतो.

आज सर्वत्र भांडवलवाले कामकऱ्यांवर सुलतानी गाजवीत आहेत; आर्थिक समाजांत भांडवलवाले, कारखान्याचे व्यवस्थापक आणि कामकरी हे तीन वर्ग दिसन येतात. जमीन, कारखाना, रोकड व कच्चामाल यांचें साह्यानेंच मजूर लोकांना काम करावयाचें असतें आणि हीं सर्व साधनें भांडवलवाल्यांच्या मालकीचीं असतात. कामकरी लोकांची योग्य कामावर योजना करणें आणि त्यांना शिस्त लावून देणें, कच्या व पक्या मालाची देवघेव करणें वगैरे बुद्धीचीं कामें व्यवस्थापक वर्गाच्या ताब्यांत असतात; मजूरवर्गाकडे शारीरिक श्रमाचीं कामें असतात. ह्या संपूर्ण कार्यक्षेत्राची मालकी पहिल्या वर्गाकडे असते; त्याच्या इच्छेस येईल तेव्हां ते मजूर लोकांना कमी किंवा जास्त काम करावयास लावतात; तसेंच मजूरांनीं कोणत्या दिशेनें काम करावें हें ठरविणें त्यांच्याच हातांत असतें. भांडवलवाल्यांना कारखान्याच्या नफ्यांतून किती हिस्सा मिळावयाचा हें बहुधा ठरलेलेंच असतें. व्यवस्थापकांची प्राप्ति इतकी निश्चित नसते; ती त्यांच्या बुद्धिबलावर आणि कर्तबगारीवर अवलंबून असते आणि ह्यामध्येंहि परिस्थितीच्या अनुरोधानें फेरबदल होत असतो; विशिष्ट धंद्यामध्यें कमी जास्त स्पर्धा होण्याचा संभव असतो, तसेंच त्याच धंद्यामध्यें वेगवेगळे लोक जास्त भांडवल घालतील अथवा पूर्वींच गुंतलेलें भांडवल काढून घेतील असाहि संभव असतो. ह्या घडामोडीमुळें नफ्याच्या प्रमाणाचें अनुमान अगाऊ ठरवितां येत नाहीं आणि ह्याचा परिणाम त्या धंद्यांतील लोकांच्या प्राप्तीवर होत असतो. पण कामकरी लोकांचा रोजमुरा काम पुरें व्हावयाच्या अगोदरच ठरविलेला असतो, अर्थातच धंद्यांत होणाऱ्या कमीअधिक नफ्याशीं याचा कांहीं संबंध नसतो; मजुरांची मागणी व पुरवठा यांच्या प्रमाणावर त्याचें वेतन ठरतें. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे कामकरी लोक आणि भांडवल यांच्या प्रमाणावर मजुरांचा रोजमुरा ठरत असतो. कामकरी लोकांच्या संख्येची वाढ अतिशय झपाट्यानें होत आहे आणि भांडवलाची वाढ मात्र या प्रमाणांत होत नाहीं; ह्या दोनच मुद्यांवरून सहज अनुमान काढतां येतें की, कामकऱ्यांना मिळणाऱ्या मजुरीचें मान दिवसानुदिवस उतरतच आहे. कामकऱ्यांची काळावर सत्ता नाहीं. मजूर लोकांना आपल्या परिस्थितींत बदल करून घेतां येणें अशक्य झालेलें आहे; याला अनेक कारणें आहेत. आर्थिक आपत्ति, राजकीय संकट, कारखान्यांत मजूरांची संख्या कमी लागेल अथवा मालाचें उत्पादन जास्त झपाट्यानें होईल असा एकादा यांत्रिक शोध, धंद्यांतील तेजी व मंदी, स्पर्धेच्या

आंधळेपणामुळें एकाच प्रकारच्या मालाचा मागणीच्या प्रमाणाबाहेर झालेला पुरवठा, वेगवेंगळ्या प्रदेशांमध्यें अथवा धंद्यांमध्यें मजुरांची विषम विभागणी इत्यादि कारणांमुळें कामकऱ्यांची स्थिति उत्तरोत्तर जास्त हलाखीची होत चालली आहे.

समाजाला एक भयंकर रोग जडला आहे असें या परिस्थितीवरून अनुमान काढतां येतें; या रोगापासून समाजाला मुक्त केलेंच पाहिजे. मात्र रोगनिवारणासाठीं अर्थशास्त्रज्ञांनीं सुचविलेले उपाय अगदीं निरुपयोगी आहेत.

आणि परिस्थिति इतकी विपरीत दिसते तरी कामकऱ्यांच्या स्थितींत प्रगति झालेली आहे व ती अनेक अडथळे ओलांडून अखंडपणें चाललेली आहे हें आपणांस इतिहासांत दिसून येतें. कामकरी लोक एका काळीं गुलाम होते; नंतर ते मुदतबंदीचे मजूर झाले आणि आजला ते वेतन मिळविणारे मजूर झाले आहेत. गुलामगिरीच्या दोन अवस्थांमधून त्यांनीं आपली सुटका करून घेतली आहे, मग या वेतनाच्या बंधनांत त्यांनीं कां अडकून रहावें? स्वतंत्रपणें कामधंदा करून त्यांनीं आपल्या श्रमामुळें उत्पन्न झालेला फायदा स्वतःसाठींच कां ठेऊन घेऊं नये? कामकरी वर्गाला स्वतःच्या प्रयत्नांनीं आणि पूर्णपणें अनत्याचारी मार्गानें अत्यंत उदात्त अशी क्रान्ति घडवून आणणें शक्य आहे. या कार्यांत त्यांचेबरोबर सहकारिता करणें हें समाजाचें पवित्र कर्तव्य आहे. श्रम हाच मानवी ऐक्यभावाचा आर्थिक पाया आहे आणि वैयक्तिक परिश्रमामुळें उत्पन्न होणाऱ्या वस्तु हाच वैयक्तिक मालमत्तेचा पाया आहे असें या क्रान्तीनंतर मानण्यांत येईल; या क्रांतीमुळें समाजाच्या वेगवेगळ्या वर्गांमधला उच्चनीच भाव लयाला जाईल, भांडवलवाले व मजूर यांपैकीं एकाला दुसऱ्यावर जुलूम करतां येणें अशक्य होईल आणि मालाची मागणी व पुरवठा यांमध्यें समतोलपणा येऊन त्यामुळें राष्ट्रमातेच्या सर्व मुलाबाळांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न होईल.

२.

समाजाचें कामकरी वर्गाबद्दल काय कर्तव्य आहे हें मीं स्थूलमानानें वर दाखविलेंच आहे आणि अशा कर्तव्यांबद्दल आज जनतेमध्यें जागृति उत्पन्न होत आहे; ह्या जागृतीचें श्रेय बहुतांशीं लोकसत्तावाद्यांच्या तत्वप्रसारालाच आहे; जनतेमध्यें होणाऱ्या भावी क्रांतीची पूर्वतयारी झालेली आहे; जनतेच्या हितचिंतकांनीं गेल्या तीस वर्षांत एक विचारपद्धति उत्क्रांत केली आहे. तिचें

नांव समाजसत्तावाद ( Socialism ). समाजसत्तावादाच्या आद्यप्रवर्तकांमध्यें पद्धतशीरपणाचीं भक्ति इतकी होती कीं हा त्यांचा एक दोषच झाला होता; शिवाय यांचेमध्यें अहंकारहि फार होता. याचा परिणाम असा झाला कीं या विचारपद्धतीमध्यें कांहीं तत्वांची अतिशयोक्ति करण्यांत आली, समाजाच्या कांहीं वर्गांनीं अगोदरच मिळविलेल्या संपत्तीचा विध्वंस होईल अशीं व आर्थिक दृष्ट्या अशक्य अशीं अव्यवहार्य तत्वें तिजमध्यें समाविष्ट करण्यांत आलीं. या तत्वांमुळें मध्यम स्थितींतल्या लोकांची साहजिकपणेंच घाबरगुंडी उडाली. नागरिकांच्या वेगवेगळ्या वर्गांच्या मनांत एकमेकांबद्दल अविश्वास उत्पन्न झाला, समाजसुधारणेचा प्रश्न मागें पडला व लोकसत्तावाद्यांमध्यें मात्र फूट पडली. अविश्वास, अस्वस्थता आणि आपापसांत फूट, यांचेमुळें लोकसत्तेची चळवळ दडपून टाकणें मात्र सोपें झालें; आणि फ्रान्समध्यें तर ही चळवळ हां हां म्हणतां नामशेष करण्यांत आली.

समाजसत्तावादाचे अनेक पंथ आहेत; सामयनचा पंथ, फूरिएरचा सांप्रदाय, कम्यूनिझम वगैरे पंथांचें परीक्षण येथें करतां येणें शक्य नाहीं. ह्या सर्व सांप्रदायांचा पाया अत्यंत उदात्त अशा तत्वांवर आहे आणि प्रगतीवर निष्ठा असलेल्या सर्व लोकांना ते मान्य आहेत; पण तत्त्वांना व्यावहारिक स्वरूप द्यावयासाठीं या पंथांच्या प्रवर्तकांनीं जे जुलमी मार्ग योजिले, त्यामुळें त्याच तत्त्वांचा नाश झाला. या लोकांचें म्हणणें आहे कीं, जनतेनें जर या मार्गाचा पुरस्कार केला तर प्रत्येक व्यक्तीचें भवितव्य अत्यंत उज्वल असें होणार आहे. या गोड आशेनें तुम्ही भुलून जाऊं नका. तुम्ही या मार्गाचा अवलंब कराल तर तुमच्या बंधविमोचनाचा काल आणखी दूर मात्र जाईल; या लोकांचे हातून जे प्रमाद घडले ते स्पष्ट करून दाखविणें अत्यंत जरूर आहे; या मताच्या कांहीं अनुयायांना परिस्थितीमुळें सत्ता प्राप्त झाली तेव्हां त्यांनीं आपल्या तत्त्वांना व्यावहारिक स्वरूप द्यावयाचा मुळींच यत्न केला नाहीं, एवढीच गोष्ट त्याच्या एकनिष्ठेबद्दल आपल्या मनांत संशय उत्पन्न व्हावयास पुरेशी आहे. त्यांनीं आपल्या लेखांमध्यें बेधडकपणें मोठमोठीं तत्त्वें ठोकून दिलीं, पण प्रत्यक्ष व्यवहाराशीं प्रसंग आला तेव्हां मात्र त्यांनीं माघार घेतली.

मीं आतांपर्यंत ज्या तत्त्वांचें विवेचन केलें आहे आणि मनुष्याला जे विशेष गुण असतात असें दाखविलें आहे, तीं तत्त्वें व ते गुण, मनासमोर बाळगून तुम्ही या विचारपद्धतींचें परीक्षण करा. म्हणजे तुम्हांला दिसून येईल कीं,

मानवजातीमध्यें प्रगति ज्या नियमांना धरून होत असते त्यांचा भंग व मनुष्याच्या सर्व विशिष्ट गुणांचा लोप होईल अशा प्रकारच्या या विचारपद्धति आहेत.

प्रगति क्रमाक्रमानेंच साध्य होत असते; मानवजातीची प्रगति व्हावी अशी व्यवस्था परमेश्वरानेंच केलेली आहे. कोणत्याहि मानवी शक्तीकडून तिचा भंग होणें अशक्य आहे; विकासामुळें आणि परिस्थितीच्या अनुरोधानें मनुष्याचा मूलस्वभाव सदोदित परिवर्तन पावत असतो, यामुळें प्रगति प्रकट होत असते. सामाजिक जीवनाचीं कित्येक अंगें अशीं असतात कीं, त्यांना मनुष्याच्या मूलस्वभावाचा आधार नसतो, केवळ रूढीमुळेच त्यांचें परिपोषण झालेलें असतें. विशिष्ट काल व स्थल, यांच्या मर्यादांचे बाहेर त्याच प्रकारचे लोकाचार समाजामध्यें दिसून येत नाहींत; म्हणून रूढ झालेल्या लोकाचारांना मानुष्याचीं मूलतत्वें म्हणतां येत नाहीं; पण ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून वेगवेगळया काळच्या व अनेक देशच्या लोकांनीं मानुष्याच्या मूलतत्त्वांबद्दल चुकीच्या कल्पना करून घेतल्या; याचें कारण इतकेंच कीं, त्यांचीं मनें पूर्वग्रहानें दूषित होतीं. हीं तत्त्वें कशीं आहेत याचा निर्णय कोणत्या नियमानुसार लागणें शक्य आहे तें मीं पूर्वीच सांगितलें आहे; मनुष्याच्या अंत:स्फूर्तीचा शब्द आणि इतिहासांत प्रगट होणारा, काल व स्थल यांनीं अबाधित असा मानवजातीचा शब्द—या साधनांचे सहाय्यानें, ह्या रूढीवरून बसविलेल्या मानुष्याबद्दलच्या कल्पनांचा खरेंखोटेपणा ठरणार आहे. या साधनांचे अनुरोधानें मनुष्याला सारभूत असे घटक कोणते आहेत याबद्दल निर्णय झाल्यावर, विशिष्ट परिस्थितीप्रमाणें आपण त्यांना विशेष प्रकारचें वळण दिलें पाहिजे आणि त्यांचा विकास तर सदैवच करीत राहिलें पाहिजे; हे घटक नष्ट करणें मात्र कदापि शक्य नाहीं.

मानवी जीवनाच्या मूल घटकांपैकीं धर्म, स्वातंत्र्य व संघटना इतक्यांचेंच विवेचन आतांपर्यंत झालेलें आहे; संपत्ति हा आणखी एक घटक आहे.

जगांत मनुष्यमात्राची अस्तित्वासाठींच धडपड चाललेली असते; अस्तित्वासाठीं त्याला ज्या अवश्यकता भासतात त्या सर्व संपत्ति या संज्ञेनें प्रदर्शित करण्यांत येतात. धर्म, शास्त्र व स्वातंत्र्य यांचे साहाय्यानें व्यक्तीला, जगताची नीति व बुद्धि यांना वळण लावतां येतें, त्यांची सुधारणा करतां येते व त्यांचेवर हुकमत चालवितां येते; जगताच्या बाह्यांगाची सुधारणा करण्याचें व निसर्गावर हुकमत चालविण्याचें साधन परिश्रम् ( material labour ) हें होय. जग-

तांच्या बाह्यांगाच्या परिवर्तनाचें, सुधारणेचे व नियमनाचें कार्य यशस्वी होणार आहे, हें जाणावयाची निशाणी संपत्ति ही आहे. मनुष्य आपल्या उद्योगानें जगांत आढळणाऱ्या वस्तूंना विशेष प्रकारचें रूप देतो, त्यांची उपयुक्तता वाढवितो व नैसर्गिक शक्तींच्या सामर्थ्यांत भर टाकतो; अर्थातच संपत्ति हें मनुष्याच्या परिश्रमांचें दृश्य स्वरूप होय.

म्हणून संपत्ति हें एक अविनाशी तत्त्व आहे. मानवजातीच्या जीवनाच्या सर्व अवस्थांमध्यें संपत्ति कोणत्या तरी रूपानें अस्तित्वांत असलेली आपणांस दिसून येते; तसेंच या सर्व अवस्थांमध्यें वैयक्तिक संपत्तींचें संरक्षण जनतकडून झालेलें आहे असेंहि आढळून येतें. मूलतत्त्व या दृष्टीनें संपत्ति अविनाशी आहे; पण ती ज्या स्वरूपांमध्यें दिसून येते तीं बदलणें मात्र शक्य आहे. मानवी जीवनाच्या सर्व अंगांचीं बाह्य स्वरूपें मानवजातीच्या प्रगतीबरोबरच उत्क्रांत होत असतात. आज संपत्ति एका विशिष्ट स्वरूपांत दिसते म्हणून तेंच स्वरूप अविनाशी आहे असा आग्रह धरणें व संपत्तीची व्यवस्था अन्य प्रकारानें व्हावी या हेतूनें होणाऱ्या सर्व यत्नांना विरोध करणें, म्हणजे मानवजातीची प्रगति होत आहे हेंच नाकबूल करण्यासारखें आहे. प्रत्येक शतकामध्यें संपत्तीची कल्पना परिवर्तन पावत असते. हें इतिहासावरून सहज दिसून येण्यासारखें आहे. एका विशिष्ट शतकामध्यें संपत्तीच्या विभागणीची पद्धत अत्यंत अन्यायाची होती म्हणून समाजघटनेमध्यें संपत्तीच असतां कामा नये असा आग्रह धरणारांना, संपत्ति हें मनुष्याचें एक अंग आहे याचा उमज झालेला नसतो; ह्या लोकांच्या मताप्रमाणें समाजाची संघटना करण्यांत आली तर समाजाचें जीवनच नष्ट होईल व प्रगतीच्या मार्गांत एक नवीन अडथळा उत्पन्न केल्याचें अपयश त्यांच्या पदरीं पडेल.

संपत्तीच्या विभागणीच्या आजच्या पद्धतीमध्यें आपणांस अत्यंत अव्यवस्था दिसून येते. कारण संपत्तीचें आधुनिक स्वरूप जुलुमाच्या पायावर स्थापन झालेलें आहे; कारण इतिहासाच्या आरंभीं कित्येक लोकांनीं इतरांवर स्वाऱ्या करून त्यांच्या जमिनी व संपत्ति हिसकावून घेतली—ह्या परधनावर अर्थातच त्यांचा कांहींहि हक्क नव्हता; कारण कारखानदार व मजूर यांच्या सहकार्यानें संपत्तीचें उत्पादन होतें, पण विभागणीमध्यें कामकऱ्यांना आपल्या परिश्रमांच्या प्रमाणांत संपत्तीचा वांटा मिळतो असें मात्र नाहीं; कारण संपत्तीमुळेंच मनुष्याला राजकीय हक्क मिळतात आणि राष्ट्राच्या कायद्यांची घटना करण्यामध्यें

भाग घेतां येतो. गरीब कामकरी लोकांना हे हक्क नसतात म्हणून राजकारण अल्पसंख्याकांच्या ताब्यांत जातें व बहुजनसमाजाला त्यामध्यें प्रवेश करून घेतां येत नाहीं; कारण हल्लींची कर घेण्याची पद्धत अन्यायाची आहे, तिजमुळें भांडवलवाल्यांना विशेष हक्क प्राप्त होतात—यामुळें गरीब लोकांवर जुलूम होतो आणि त्यांना आपल्या प्राप्तींतून कांहीं रक्कम शिल्लक टाकणें अशक्य होतें. संपत्तीच्या स्वरूपांत दिसून येणारे हे दोष दूर करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे; पण संपत्तीचें अजिबात उच्चाटन करण्यामुळें मनुष्याचा उत्साह नाहींसा होईल, आणि हें कृत्य फळ मिळावें म्हणून झाड तोडण्यासारखें रानटीपणाचें होईल.

आज अगदीं थोडया लोकांचे हातांत जगांतील बहुतेक सर्व संपत्ति तुंबून राहिली आहे म्हणून संपत्ति ही संस्थाच नष्ट करावयाचें कांहीं कारण नाहीं; धनसंपादनाचा मार्ग सर्वांना कसा मोकळा होईल एवढाच प्रश्न आहे.

यासाठीं आपण संपत्तीच्या मूलस्वरूपाकडे वळलें पाहिजे आणि फक्त श्रमामुळेंच संपत्तीचें उत्पादन होईल अशी व्यवस्था केली पाहिजे.

भांडवलवाले व मजूर यांना संपत्तीचा योग्य वांटा मिळेल अशा प्रकारची समाजघटना आपण निर्माण केली पाहिजे.

तसेंच कर वसूल करावयाची पद्धत बदलली पाहिजे; ज्यांची प्राप्ति अगदीं थोडी आहे त्यांना कर द्यावयाची माफी असली पाहिजे, म्हणजे गरीब लोकांनाहि बचत करतां येऊन हळू हळू त्यांना संपत्ति प्राप्त करून घेतां येईल. श्रीमंत लोकांचे विशेष हक्क एकदम नष्ट करण्यांत आले पाहिजेत आणि कायद्यांची घटना करण्यामध्यें संपूर्ण जनतेला भाग घेतां आला पाहिजे.

असें होणें शक्य आहे आणि हें सर्वस्वीं न्याय्य आहे. हे हक्क प्राप्त व्हावे म्हणून लोकमत तयार केलें पाहिजे आणि त्याला संघटित स्वरूप दिलें पाहिजे. हे हक्क मिळविण्याचा दृढनिश्चय झाल्यावर जनतेला ते मिळालेच पाहिजेत. संपत्ति नष्ट करणें अशक्य आहे; ज्यांनीं उद्योगाच्या बळावर संपत्ति संपादन केली त्यांचेपासून ती हिसकावून घेणें हा अन्याय आहे. यामुळें लोकांचें कल्याण होणें तर दूरच राहिलें, पण सर्वांचें अकल्याण मात्र होईल.

३.

बहुतेक समाजसत्तावाद्यांचें मत आहे कीं, व्यक्तीचा खासगी मालमत्तेवरील हक्क नष्ट करण्यांत यावा. कित्येकांचीं मतें यापेक्षांहि पुढें गेलेलीं आहेत; जन-

तेच्या धार्मिक समजुती चुकीच्या असतात, कांहीं जाति उच्च प्रतीच्या आहेत अशी गैरसमजूत समाजामध्यें दिसून येते, कांहीं विशिष्ट घराण्यांचाच बडेजाव होत आहे असें आढळतें; म्हणून धर्म, राज्यव्यवस्था व राष्ट्र या संस्थाच नाहींशा करण्यांत आल्या पाहिजेत असें या लोकांचें म्हणणें आहे. अशी विचारसरणी बालकांच्या किंवा रानटी लोकांच्या ठायींच संभवते. हवा बिघडली म्हणजे रोगराई होते म्हणून हवाच नाहींशी करण्यांत आली पाहिजे असा आग्रह धरण्याइतकेंच हें मूर्खपणाचें नाहीं काय ?

स्वातंत्र्याच्या नांवाखालीं अराजकता माजविणें व समाजघटनेचा नाश करून व्यक्तिस्वातंत्र्य व वैयक्तिक हक्क यांनाच मान्यता मिळविणें हा या लोकांचा हेतु आहे; म्हणूनच त्यांच्या या चुकीच्या मतांचें खंडन करावयाची जरूर नाहीं. प्रगति, मानवी कर्तव्यें, बंधुभाव व राष्ट्राराष्ट्रांची संघटना हीं सर्व तत्त्वें आपणांस पूज्य वाटतात; हीं तत्वें अमान्य करणारांना विरोध करणें हेंच माझें कार्य आहे. व्यक्तीचा खासगी मालमत्तेवरील हक्क नष्ट करण्यांत यावा व सर्व संपत्ति समाजसत्तेखालीं आणण्यांत यावी अशी मागणी करणारे लोक आपल्या तत्त्वांचें प्रतिपादन करीत असतांना व्यक्तीला विसरतात, स्वातंत्र्य अमान्य करतात, प्रगतीला विरोध करतात आणि समाजाचें जीवन नष्ट करतात. पहिल्या पंथाचे लोक व्यक्तीला प्राधान्य देतात, तर दुसऱ्या पंथाचे लोक समाजघटनेला प्राधान्य देतात.

जनसत्तावादाचीं ( Communism ) मूलतत्वें येणेंप्रमाणें आहेत. जमीन, भांडवल, कारखाने वगैरे संपत्तीच्या उत्पादनाचीं सर्व साधनें राष्ट्राच्या मालकीचीं असावींत; राष्ट्रानें व्यक्तिमात्राला काम नेमून द्यावें; कामकऱ्याला वेतन किती द्यावयाचें याबद्दल भेदभाव आहे—कोणी म्हणतात प्रत्येकाला सारखें वेतन मिळालें पाहिजे, कित्येकांचे मतें कामकऱ्याला त्याच्या गरजांच्या मानानें वेतन मिळावें. जर कदाचित् अशा प्रकारची घटना समाजानें मान्य केली तर त्या समाजाच्या घटकांचें मनुष्यत्व नष्ट होईल. मनुष्य म्हणजे संपत्ति उत्पन्न करावयाचें यंत्र या कल्पनेवर समाजाची उभारणी करण्यांत येईल; अर्थातच अशा समाजातील मनुष्यांचे ठायीं स्वातंत्र्य, उदात्तपणा व विवेकबुद्धि हीं असणें शक्य नाहीं. अशा समाजव्यवस्थेनें मनुष्याच्या शारीरिक गरजा भागतील; पण त्याच्या नैतिक व बौद्धिक जीवनाचा मात्र नाश होईल आणि याबरोबरच त्याचा उत्साह नाहींसा होईल, स्वतःला प्रिय असणारें कार्य करतांना जो संतोष होतो

तो त्याला प्राप्त होणार नाहीं; त्याचें संघटनास्वातंत्र्य नष्ट होईल व त्याचे हातून व्हावें तितकें कामहि होणार नाहीं; स्वतःच्या मालमत्तेमुळें मनुष्याला जें समाधान प्राप्त होतें तें त्याला मिळणार नाहीं व त्याची प्रगमनशीलता नाहींशी होईल.

पण जनसत्तावाद्यांचें तर असें मत आहे कीं, त्यांच्या समाजघटनेमध्येंच समता शक्य आहे.

प्रत्येकाला सारखें काम वांटून देतां येणें शक्य आहे काय ? नाहीं. कामें अनेक प्रकारचीं आहेत, म्हणून केवळ तासांच्या हिशेबावर मनुष्यानें किती काम केलें हें मोजतां येत नाहीं. विशिष्ट प्रकारचें काम करीत असतांना मनुष्याला किती त्रास सोसावा लागतो, त्यामुळें त्याला किती थकवा येतो व त्याच्या कामामुळें समाजाचा फायदा किती होतो, हे सर्व मुद्दे त्याच्या कामाचें मोल ठरवितांना विचारांत घ्यावे लागतात. कोळशाच्या खाणीमध्यें एक तास खपणें, एखाद्या डबक्यामधील घाण काढण्याचें काम एक तासभर करणें व एकतास सूत काढणें, हीं कामें एकाच दर्जाचीं आहेत असें म्हणतां येईल काय ? हा प्रश्न सोडवावयाचा एक प्रयत्न करण्यांत आलेला आहे:—समाजाला उपयुक्त असे कांहीं धंदे निवडून काढावे व अशा वेगवेगळ्या कारखान्यांमध्यें प्रत्येकानें कांहीं तास काम करावें. हा उपाय अमलांत आणला तर संपत्तीचें उत्पादन योग्य प्रमाणांत व्हावयाचें नाहीं, म्हणून तो अगदीं निरुपयोगी आहे. मनुष्यांच्या शक्ति, बुद्धि व प्रवृत्ति भिन्न भिन्न असतात, ही भिन्नता या उपायानें दूर होणें शक्य नाहीं. जें काम एकाला आवडतें व म्हणून सोपें वाटतें तेंच काम दुसऱ्याला अवघड वाटतें.

उत्पन्न झालेल्या पदार्थांच्या विभागणीमध्यें समता राखणें शक्य आहे काय ? नाहीं. प्रकृतिवैशिष्ट्यामुळें व्यक्तींच्या जरूरी भिन्न असतात म्हणून सर्व पदार्थांची वांटणी अगदी सम प्रमाणांत करणें हा शुद्ध अन्याय आहे; ज्याच्या त्याच्या जरूरीप्रमाणें प्रत्येकास वेगवेगळे पदार्थ वांटून देण्यामध्यें तत्वांचा भंग होतो; स्वतः उत्पन्न केलेल्या संपत्तीवर मनुष्याचा हक्क आहे. या पद्धतीमुळें त्या हक्काला बाध येतो.

प्रत्येकाच्या जरूरी काय आहे हें कोणीं ठरवावयाचें ? राष्ट्रानें काय ?

माझ्या बांधवानों, तुम्ही कोणच्या प्रकारचें काम करावें, काम करण्याची तुमची शक्ति किती आहे व तुमच्या जरूरी काय आहेत हें इतरांनीं ठरवावें व तुम्हीं त्याला मान्यता द्यावी हें तुम्हांला कबूल आहे काय ? विशेष प्रकारचें

शिक्षण प्राप्त करून घेणें हें ज्यांनीं आपल्याच हातांत ठेविलें आहे अशा लोकांनीं तुमच्या देहावर आपली हुकमत चालवावी हे तुम्हांला मान्य आहे काय ? ही गुलामगिरीच नव्हे काय ? राष्ट्राचीं सूत्रें ज्यांच्या हातीं जातील त्यांना केवढी मोठी सत्ता प्राप्त होणार आहे याचा विचार करा, या सत्तेचा दुरुपयोग करून ते स्वार्थ साधणार नाहींत हें शक्य आहे काय ? आणि असें झालें तर पूर्वीप्रमाणेच जुलुमाचें साम्राज्य होणार नाहीं काय ?

नाहीं, जनसत्तेमुळें कामकऱ्यांना समतेचा लाभ मिळणें शक्य नाहीं; मनुष्याला पोटापाण्याची काळजी नसली कीं तो मनःपूर्वक काम करावयाच्या भानगडींत पडत नाहीं; म्हणून जनसत्तेमध्यें संपत्तीचें उत्पादन वाढत्या प्रमाणांत होणें शक्य नाहीं आणि असें होणें तर आज अत्यंत अवश्य आहे[1] ! जनसत्तेमुळें यंत्रकलेमध्यें नवीन शोध लावावें अशी प्रबल इच्छा कोणत्याहि मनुष्याचे मनांत उत्पन्न होणें शक्य नाहीं. सर्वच कारभार अडाणी लोकांच्या समुदायाचे ताब्यांत राहिल्यामुळें जनतेची प्रगति होणार नाहीं. आणि हें कशासाठीं ? तर कामकऱ्यांची उपासमार होऊं नये म्हणून ! जनसत्तेच्या स्थापनेमुळें समाघटनेचा विध्वंस होतो, संपत्तीचें उत्पादन योग्य प्रमाणांत होत नाहीं, प्रगतीचा मार्ग बंद होतो, व्यक्तीचें स्वातंत्र्य नष्ट होतें आणि या जुलमाच्या संघटनेमध्यें प्रत्येक मनुष्य जखडला जातो; असें असतांहि केवळ उपासमार होऊं नये म्हणून जनसत्ताच स्थापण्यांत यावी, असा दुराग्रह तुमचे मनांत उत्पन्न होईल काय ? इतर मार्गांनीं हें साध्य होणें शक्य नाहीं काय ?

४

सामाजिक जीवनाच्या कांहीं जगन्मान्य तत्त्वांच्या पायावर समाजघटना स्थापन झालेली आहे; हीं तत्त्वें आजवर उत्क्रांत होत आलेलीं आहेत म्हणून तीं एकदम बदलतां येणें शक्य नाहीं; एकाद्या समाजानें विशेष प्रकारची घटना निर्माण केली तरी त्या घटनेचीं मूलतत्त्वें सामाजिक जीवनांत पूर्णपणें उतराव-

---

१. कल्पना करा कीं एक लक्ष कामकऱ्यांचा एक संघ आहे. या कामकऱ्यांपैकीं एकाच मनुष्यानें जास्त मेहनत करून एका वर्षांत शंभर रुपये किंमतीचा जास्त माल उत्पन्न केला; जनसत्तेच्या पद्धतीनें या मेहनतीसाठीं त्याला त्या वर्षीं एक षष्ठांश पै जास्त मिळेल. अशी परिस्थिति असतां आपण जास्त काम करावें अशी इच्छा होणें शक्य आहे काय ?

यास बराच काळ लागत असल्याकारणानें समाजांत आज दिसून येणारे अन्याय एकाएकीं दूर होणें शक्य नाहीं. मानवजातीसाठीं नवीन संघटना निर्माण करणें हें आपलें कार्य नसून तिची परंपरा कायम ठेवणें एवढेंच आपलें कार्य आहे. मानवी जीवनाच्या घटकांची सुव्यवस्था लावणें शक्य आहे आणि हेंच आपलें कार्य आहे; पण मानवी जीवनाचीं मूलतत्त्वें अजिबात नष्ट करणें मात्र अशक्य आहे; ह्या दिशेनें होणाऱ्या प्रयत्नांशीं समाज कधींहि सहकारिता करणार नाहीं. म्हणून नवीन प्रकारच्या समाजघटनेबद्दल कल्पना करण्यामध्यें वेळ घालविणे म्हणजे व्यर्थ कालक्षेप करणें होय. समाजाची संपत्ति वाढावी अशी व्यवस्था केल्याशिवाय जनतेला कामकऱ्यांची मजुरी वाढवितां येणें शक्य नाहीं. मजुरी वाढली म्हणजे माल उत्पन्न करण्यास लागणारा खर्च वाढतो, अर्थातच मालाची किंमत वाढते, म्हणून मालाची मागणी कमी होते; ह्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे कारखान्यांतील मजुरांची संख्या कमी करावी लागते.

स्वातंत्र्यामुळेंच मजुरीला पवित्रपणा येतो आणि मनुष्याला जास्त श्रम करावयास उत्साह येतो. असें स्वातंत्र्य नष्ट केल्यानें समाजांतील सर्व वर्गांना सुख प्राप्त होणें शक्य नाहीं; भांडवलवाले मजुरांचे हाल करतात, म्हणून संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें कमी करण्यानेंहि समाजाचें हित होणें शक्य नाहीं. कामकऱ्यांच्या सध्यांच्या अवस्थेला एकच उपाय आहे आणि तो उपाय म्हणजे मालाची निपज करणारे मजूर आणि कारखान्यांसाठीं लागणारें भांडवल हीं एकाच संघाचे ताब्यांत देणें, हा होय.

वर सांगितलेला उपाय समाजानें मान्य केल्यावर कामकऱ्यांना सदोदित दारिद्र्यांत ठेवणारी परिस्थितीच नाहींशी होईल. अशा समाजांमध्यें प्रत्येक मनुष्य स्वतःच्या परिश्रमानें कांहीं माल उत्पन्न करील आणि फक्त स्वतःसाठींच माल विकत घेईल. जेथें एकादा पदार्थ उत्पन्न होतो अशा कारखान्याचा मालक आणि तोच पदार्थ विकत घेणारा मनुष्य ह्या दोघांमध्यें अनेक दलाल असलेले आज दिसून येतात; त्यांचा निर्वाह व्यापारावरच चालावयाचा असल्यामुळें ते मालाच्या विक्रीमध्यें बराच नफा मिळवितात; म्हणून कारखानदाराला पडलेल्या किंमतीच्या सुमारें दीडपट किंमत गिऱ्हाइकाला बाजारांत द्यावी लागते. संपत्तीच्या उत्पादनाची व्यवस्था वर सांगितलल्या तत्त्वाप्रमाणें लागल्यास हा नफा जनतेला मिळेल किंवा कामकऱ्यांना तरी मिळेल. मालाची निपज करण्यामध्यें हे भांडवलवाले प्रत्यक्षपणें कांहींच भाग घेत नाहींत, तरीहि उत्पन्न झालेला

माल त्यांच्याच मालकीचा होतो; म्हणून भांडवलवाल्यांच्या कचाटींतून सुटण्यावरच तुमचें स्वातंत्र्य अवलंबून आहे. तुमची ऐहिक व नैतिक उन्नति व्हावी एवढीच माझी इच्छा आहे. जेथें मजूर व भांडवलवाले यांचें एकीकरण झालेलें असतें आणि जेथें अशा संघासाठीं प्रत्येक कामकरी मनःपूर्वक काम करतो व नफ्याच्या वाढत्या प्रमाणांत कामकऱ्यांच्या मजुरींतहि वाढ करण्यांत येते तेथील मजूर सुस्थितींत असतात व त्यांची नीति इतर कामकऱ्यांपेक्षां अधिक उच्च प्रतीची असते. कांहीं शेतकरी स्वतःचीच जमीन पिकवितात—म्हणजे निसर्ग, भांडवल व श्रम यांचें एकाच व्यक्तीचे ठायीं एकीकरण झालेलें असतें; ज्या शेतकऱ्यांना स्वतःच्या मालकीच्या जमिनी नसतात ते दुसऱ्यांच्या जमिनी खंडानें घेतात; खंडानें घेतलेल्या जमिनीपेक्षां मालकीच्या जमिनी जास्त कसदार असतात आणि त्यांवर पीकहि जास्त चांगलें येतें हें सर्वत्र दिसून येतें. स्वतःची जमीन असलेले शेतकरी प्रामाणिक असतात, त्यांचें अंतःकरण उदात्त असतें, त्यांच्या मनःप्रवृत्ति स्वतंत्र असतात आणि त्यांची वागणूक मनमोकळेपणाची व निष्कपट असते. याला सरकारच्या कागदोपत्रींहि पुरावा आहे.

कामकऱ्यांची संघटना व्हावी आणि त्यांनीं उत्पन्न केलेल्या मालाच्या विक्रीवर होणारा फायदा त्यांनाच वांटून देण्यांत यावा अशीच भविष्यकालांतली समाजघटना असली पाहिजे; यामुळेंच तुमचें दास्यविमोचन होणार आहे. एका कालीं तुम्ही बंदे गुलाम होतां; नंतर तुम्ही कांहीं बाबतींत मात्र गुलाम राहिलां; रोजमुरा मिळविणारे कामकरी हें स्वरूप तुम्हांला आज प्राप्त झालें आहे; स्वतंत्रपणें मालाची निपज करणारे कामकरी हें स्वरूप तुम्हांला संघटनेच्या द्वारें प्राप्त व्हावयाचें आहे.

स्वतंत्र व्यक्ति या नात्यानें व राजीखुषीनेंच या संघांत कामकऱ्यांचा प्रवेश झाला पाहिजे; अशा रीतीनें संघटित झालेल्या व्यक्तींना एकमेकांबद्दल प्रेम व आदर वाटला पाहिजे. या संघटनेची व्यवस्था कोणत्या प्रकारची असावी हें तुमचें तुम्हींच ठरवावयाचें आहे; एकाद्या सत्तेनें नुसत्या जबरदस्तीच्या जोरावर कामकऱ्यांची घटना निर्माण केली तर तिला स्वतंत्र व जबाबदार व्यक्तींची संघटना असें म्हणतांच येणार नाहीं. या संघटनेंत सामील होणाऱ्या व्यक्ति, हीं संपत्तीच्या उत्पादनाचीं यंत्रेंच आहेत, तेव्हां त्यांना एकमेकांबद्दल प्रेम वाटत आहे कीं नाहीं याचा विचार घेण्याची काय जरूर आहे, अशा कल्पनेवरच ही जबरदस्तीची व्यवस्था निर्माण झालेली असते.

लोकसत्तेमध्यें जसा बंधुभाव असतो तशीच भावना कामकऱ्यांच्या संघटनेमध्यें सदैव असली पाहिजे आणि हें कार्य तुमच्या प्रतिनिधीनें केलें पाहिजे; वाटेल तेव्हां या संघटनेमधून आपलें अंग काढून घेण्याची कामकऱ्यांना मोकळीक असली पाहिजे. या संटघनेवर सरकारचें अथवा एकाद्या विशिष्ट वर्गाचें स्वामित्व असतां कामा नये; त्यांना तुमच्या जरूरी व प्रवृत्ति कळणें शक्य नसतें; त्यांच्या स्वामित्वामुळें संघटनच्या घटकांवर जुलूम होण्याचा संभव असतो.

वेगवेगळया उद्योगधंद्यांमध्यें गुंतलेल्या कामकऱ्यांच्या संघटना स्वयंस्फूर्तीनेंच निर्माण झाल्या पाहिजेत. संघटनेची व्यवस्था लावण्यामध्यें कोणत्याहि सत्तेचें अथवा विशिष्ट वर्गाचें अंग असतां कामा नये.

युरोपमध्यें मध्ययुगांत वेगवेगळया धंद्यांतील कारागिरांनीं आपल्यापुरते संघ ( Corporations ) स्थापन केले होते; मालाची किंमत ठरविणें व आपल्या संघांत इतरांना प्रविष्ट करून घेणें या गोष्टी संघाच्याच स्वाधीन होत्या; अशा अनियंत्रित संघटनांकडून जनतेवर जुलूम झाला; म्हणून देशामध्यें किंवा एकाद्या शहरामध्येंहि मालाच्या उत्पादनासाठीं एकाच धंद्यांतील सर्व कारागिरांचा एकच संघ उत्पन्न झाला तर आजहि अशा संघांकडून समाजावर जुलूम होईल. अशा संघामध्यें मालाची किंमत कामकऱ्यांच्याच तंत्रानें ठरत असल्यामुळें माल विकत घेणारांचें अतिशय नुकसान होईल, अल्पसंख्याकांवर होणाऱ्या जुलुमाला कायदेशीर स्वरूप प्राप्त होईल, संघांतून बाहेर पडणाऱ्या असंतुष्ट मजुराला कामावांचून उपाशीं मरण्याची पाळी येईल, स्पर्धेच्या अभावीं प्रगतीचें कार्य बंद पडेल आणि कामकऱ्यांचे कष्ट कमी होतील अशी नवी यांत्रिक योजना शोधून काढावयाचा प्रयत्नहि होणार नाहीं.

गेल्या वीस वर्षांत कामकऱ्यांची संघटना करावयाचे बरेच प्रयत्न करण्यांत आले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत फ्रान्सनें भीतभीतच पहिला प्रयत्न केला; नंतर इंग्लंडमध्यें आणि बेलजममध्यें असे प्रयत्न झाले; उत्साहानें, दृढनिश्चयानें व स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न जेथें झाले तेथें या कार्याला यशच येत गेलें. हें कार्य समाजांत क्रांति घडवून आणणारें आहे. इटलीची परंपरा अत्यंत उज्वल आहे, आजपर्यंत समाजसुधारणेच्या कार्यांत नेहमीं इटलीनेंच पुढाकार घेतला आहे म्हणून हें कार्य प्रथमत: इटलींतच साध्य झालें पाहिजे. या सामाजिक क्रांतीमुळें कामकरीवर्गाचें दास्यविमोचन होणार आहे, संपत्तीच्या उत्पादनामध्यें नवजीवनाचा संचार होणार आहे, समाजांतील सर्व वर्गांचें कल्याण होणार

आहे आणि राष्ट्राची आर्थिक उन्नति होणार आहे. आज भांडवलवाले धन-संचयाच्या मार्गे लागलेले आहेत. कोणत्याहि प्रकारचें काम करावयास लागूं नये आणि चैन तर भोगावयास मिळावी, हाच या धनसंचयांतील त्यांचा हेतु असतो; असें होऊं नये व सर्वांनीं सदोदित कार्यमग्न असावें असा भावी संघ-टनेचा हेतु आहे. आज श्रीमंतींत लोळत असलेल्या सर्वच लोकांनीं ही संपत्ति स्वतःच्या कर्तबगारीवर मिळविलेली नाहीं; अशा लोकांना दूरदर्शित्व नसतें, कसलीहि काळजी नसते, म्हणून त्यांच्या उद्योगधंद्यांचें दिवाळें वाजतें; हे दोष ज्यांचे ठिकाणीं नसतील असेच लोक कामकऱ्यांच्या संघटनेचे व्यवस्थापक म्हणून निवडले जातील. आज अनेक कारखान्यांमध्यें निरुपयोगी अशा चैनीच्या वस्तु निर्माण करण्यांत येत आहेत; म्हणून कांहीं धंद्यांमधील मजुरांना भरपूर वेतन मिळतें तर इतरत्र त्यांना पुरेसा रोजमुरा मिळत नाहीं. ही विषमता अत्यंत अन्यायाची आहे; ज्या मजुरांना कांहीं तास काम करण्याबद्दल ठरींव वेतन मिळतें ते आपल्या कामांत चुकारपणा करतात, कारण मनःपूर्वक काम करण्यांत त्यांचा कांहीं फायदा नसतो. अशी अदाधुंदी संघटनेमध्यें खात्रीनें दूर करण्यांत येईल.

कामगार लोकांच्या संघटनेचीं सामान्य तत्त्वें:—या संघटनेंत सामील होणाऱ्या प्रत्येक मनुष्याला संस्थेशीं असलेला आपला संबंध तोडावयाची मुभा असली पाहिजे; मात्र असें करतांना संबंध तोडणाऱ्या व्यक्तीनें संस्थेला धक्का आणतां कामा नये. संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाच्या निवडणुकीमध्यें प्रत्येक घटकाला समान हक्क असले पाहिजेत; या मंडळाकडे कांहीं ठरींव काळपर्यंतच अधिकार असले पाहिजेत; हा काळ पुरा व्हावयाचे अगोदरहि हें मंडळ अधि-कारावरून दूर करणें शक्य असलें पाहिजे; संघटना स्थापन झाल्यावर तिजमध्यें प्रविष्ट होण्याची सर्वांना मोकळीक असली पाहिजे. प्रविष्ट होऊं इच्छिणारानें प्रवेशाचेवेळीं संस्थेच्या भांडवलांत भर टाकलीच पाहिजे असा निर्बंध असतां कामा नये; मात्र प्रत्येकानें आपल्या वार्षिक नफ्यांतील कांहीं भाग संस्थेच्या निधीमध्यें टाकून आपल्या हिश्याच्या भांडवलाची भरपाई केली पाहिजे. संस्थेचा सांधिक निधि अभेद्य व चिरस्थायी असला पाहिजे. जीवनाला अवश्य इतकें वेतन प्रत्येकाला मिळालेंच पाहिजे; ज्या प्रतीचें आणि जितकें काम व्यक्तीला देण्यांत येईल त्या मानानें कामाचीं हत्यारें व साधनें पुरविण्यांत आलीं पाहि-जेत. याच तत्त्वांच्या पायावर संघटनेची उभारणी झाली पाहिजे, म्हणजे

आरंभीं कामकऱ्यांना स्वार्थत्याग करावा लागला तरी परिणामीं त्यांचें हितच होईल. संस्थेचें सांधिक भांडवल अभेद्य आणि चिरंतन असलें पाहिजे हें तत्त्व अत्यंत महत्वाचें आहे. तुमचें दास्यविमोचन झालेलें आहे याचें हें प्रत्यंतर आहे, वर्तमान व भविष्य यांना जोडणारा हा दुवा आहे; या तत्त्वांचें विवेचन करावयास एक वेगळेंच प्रकरण लिहावें लागेल. कामकऱ्यांच्या संघटनेचा सर्वांगीण विचार, हा विषय या ग्रंथांत घालावयाचा माझा संकेतच नाहीं. परमेश्वरकृपेनें आणखी कांहीं दिवस जगलों वांचलों तर या विषयावर मी एक वेगळा ग्रंथच लिहिणार आहें आणि तो तुम्हांला सादर करण्यांत येईलच. कामकऱ्यांच्या संघटना याच तत्त्वांवर उभारण्यांत आल्या पाहिजेत असें मला अनेक वर्षांच्या अभ्यासानंतर आढळून आलें आहे. ह्या तत्त्वांचा तुम्ही मन:पूर्वक अभ्यास करा.

पण संघटना स्थापन करावयासाठीं भांडवल कोठून आणावयाचें ?

हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे; या विषयाचें विवरण स्पष्टपणें करावें अशी माझी फार इच्छा आहे; पण तसें करणें आतां शक्य नाहीं; या प्रश्नासंबंधानें कामकरी वर्गाचीं कर्तव्यें कोणतीं आणि जनतेचीं कोणतीं, एवढेंच मी दाखवून देणार आहें.

संघटनेसाठीं लागणारें भांडवल तुम्हींच (कामकऱ्यांनींच) जमविलें पाहिजे; यासाठीं तुम्हीं कांहीं रक्कम शिलकींत टाकली पाहिजे; स्वार्थत्यागाशिवाय असें भांडवल जमणें शक्य नाहीं. कामकऱ्यांची दारिद्र्यावस्था मला माहीत आहे; तरी यांपैकीं कित्येकांना नियमित वेतन मिळतें व कांहीं चांगल्या कारागिरांना साधारण मजूरांपेक्षां जास्त वेतन मिळतें; रोजच्या खर्चांत काळजीपूर्वक काटकसर करून, दहा वीस कामकऱ्यांनीं आपली बचत एकत्र केल्यास हें भांडवल संस्थेला आरंभ करावयास पुरेसें होईल. अशा रीतीनें संघटित होणें हें आपलें कर्तव्य आहे व यामुळेंच आपलें दास्यविमोचन होणार आहे, अशी जाणीव ज्यांचे मनांत होईल त्यांना काटकसर करणें जड जाणार नाहीं. इंग्लंडमध्यें कांहीं कामकऱ्यांनीं एक संघ स्थापन केला, तेव्हां त्यामध्यें सामील होणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें रोजीं एक आणा संस्थेला भांडवल म्हणून द्यावा असें ठरलें होतें; सध्यां ह्या संस्थेची सांपत्तिक स्थिति उत्कृष्ट आहे. फ्रान्समध्यें व इतरत्र अनेक कामकऱ्यांनीं जिवापाड काबाडकष्ट करून व रोज थोडथोडी बचत करून अशा संस्था निर्माण केल्या आहेत—त्यांचा इतिहास अत्यंत मनोरंजक व उत्साहदायक

आहे*. आपण जें करीत आहों त्यामुळेंच आपलें कल्याण होणार आहे अशी संस्थेमधील सर्व व्यक्तींची निष्ठा असेल तर अशा संस्थेला उत्तरोत्तर उन्नतावस्थाच प्राप्त होत गेली पाहिजे. संस्थेला आरंभीं जितकें भांडवल लागतें तितकें जमविणें हें काम फारसें अवघड नाहीं, संस्थेंत सामील होणाऱ्या कामकऱ्यानें संस्थेला भांडवल म्हणून स्वतःची लहानशी शिल्लक द्यावी अथवा कामाला लागणारा कच्चा माल किंवा हत्यारें द्यावींत म्हणजे संस्थेला सहज आरंभ होणार आहे. स्वतःबद्दल इतरांचे मनांत विश्वास व आदर उत्पन्न व्हावा अशा प्रकारचें तुमचें वर्तन असेल तर तुम्हांला स्वतःच्या नातलगांकडून अथवा व्यवसायबंधूंकडून संस्थेसाठीं कर्जाऊ रकमा मिळूं शकतील; संस्थेला कर्जाऊ रकमा देणारांना संस्थेचे भागीदार समजण्यांत यावें; संस्थेला होणाऱ्या फायद्यामध्यें त्यांना योग्य

---

* **टीप**—१८४८ मध्यें पियानो तयार करावयासाठीं एक संस्था स्थापावी या हेतूनें कामकऱ्यांची एक मोठी सभा भरली होती; या सभेनें फ्रेंच सरकाराकडे ३००,००० फ्रँक कर्जाऊ मागितले. सरकारनें ही मागणी फेटाळून लावली म्हणून सभा बरखास्त करण्यांत आली; कांहीं दृढनिश्चयी कामकऱ्यांनीं कोणाचीहि मदत न घेतां अशी संघटना स्थापन करावयाचा उपक्रम केला; त्यांचेपाशीं भांडवल नव्हतें, बाजारांत त्यांना पतहि नव्हती; पण त्यांच्या अंतःकरणांत निष्ठा होती.

त्यांचेपैकीं कांहीं जणांनीं सुमारें २,००० फ्रँक किंमतीचीं हत्यारें व सामान संस्थेमध्यें आणिलें. प्रत्येकाकडून १० फ्रँक अशा वर्गणीनें चालू भांडवल जमविण्यांत आलें. १८४९ मध्यें संस्थेपाशीं २२९ फ्रँक ५० सेंटाइम जमले व मग संस्था स्थापन झाली असें जाहीर करण्यांत आलें.

पहिले दोन महिनेपर्यंत कामकऱ्यांना रोजीं दीड आणा वेतन मिळत असे. त्यांनीं आपले कपडे व भांडीं गहाण टाकलीं व या पैशांवर गुजारा केला.

संस्था स्थापन झाल्यापासून दोन महिन्यांनीं पहिली विक्री झाली. हा आनंदाचा दिवस मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. कर्जाची फेड झाली व उधारी वसूल करण्यांत आल्यानंतर संस्थेमधील प्रत्येक व्यक्तीला ६ फ्रँक ६ सेंटाइम मिळाले—यांपैकीं प्रत्येकानें ५ फ्रँक मजुरीदाखल घ्यावे व उरलेले पैसे सहभोजनांत खर्च करावे असें ठरलें; संस्थेचे १४ चालक आपल्या बायकांमुलांसह या भोजनासाठीं एकत्र जमले होते. भोजनाचा खर्च दर कुटुंबामागें १ रुपया झाला.

यापुढें एक महिनाभर त्यांना दर आठवड्याला ५ फ्रँक इतकीच मजुरी मिळत असे. जून महिन्यांत एका भटाऱ्यानें ४८० फ्रँक किंमतीचा एक पियानो विकत

वांटा असावा. अनेक धंद्यांना लागणारा कच्चा माल फार स्वस्त असतो आणि अशा धंद्यांना आरंभ करावयास फारसें भांडवलहि लागत नाहीं. आपलें दास्यविमोचन झालेंच पाहिजे अशी प्रबल इच्छा तुमचे अंतःकरणांत असेल तर संघ स्थापन करावयासाठीं लागणारी साधनसामुग्री तुम्हांला कोठेहि मिळूं शकेल; यश हें प्रबळ इच्छाशक्तीवरच अवलंबून असतें, संस्थेचें भांडवल संघांतील कामकऱ्यांनींच आपल्या निढळाच्या घामानें संपादित केलेलें असेल अथवा आपल्या इमानीपणाच्या पतीवर कर्जाऊ मिळविलें असेल तरच संस्थेचें काम सुरळीतपणें चालणें शक्य आहे. ज्या राष्ट्रांनीं स्वतःच्या रक्ताचा अभिषेक करून स्वातंत्र्य संपादन केलेलें असतें तींच राष्ट्रें आपलें स्वातंत्र्य अबाधित राखूं शकतात; त्याचप्रमाणें कामकऱ्यांनीं रात्रंदिवस मेहनत करून व काटकसरीनें राहून शिल्लक टाकलेल्या रकमांच्या भांडवलावर स्थापन केलेल्या संघाची व त्यांतील कामकऱ्यांची सदैव भरभराट होत असते, हेंच भांडवल इतर

---

घेतला, त्याजपाशीं रोख रकम नव्हती म्हणून त्यानें संस्थेला रोजची भाकर कांहीं काळपर्यंत पुरवावी असें ठरलें. कामकऱ्यांची पोटाची तरी काळजी भागली. ज्याला लागेल तितकी–स्वतःच्या कुटुंबाला पुरेल इतकी भाकर प्रत्येकानें घ्यावी—कोणत्याहि प्रकारचा संकोच करूं नये–असें ठरविण्यांत आलें.

संस्था स्थापन झाल्यापासून सहा महिन्यांनीं प्रत्येक कामकऱ्याला दर आठवड्याला २० फ्रॅंक मिळूं लागले. संस्थेला होणारा सर्वच फायदा अशा रीतीनें वांटला जात नसे. प्रत्येकाला जितकी रक्कम रोख मिळे त्यापेक्षां जास्त रक्कम त्याचे नांवें संस्थेच्या कायम निधीमध्यें जमा करण्यांत येत असे.

संस्थेच्या नोंदणीमध्यें १८५० डिसेंबर, ता. ३० रोजीं पुढील मजकूर लिहिलेला आहे.

संस्थेमधील कामकरी ३२

| | |
|---|---|
| घरभाडें... ... ... ... | २००० फ्रॅंक. |
| कारखान्यांतील हत्यारें व कच्चा माल | ५९२२ फ्रॅंक ६० सेंट. |
| रोकड (शिल्लक) ... ... | २२९७२ फ्रॅंक २८ सेंट. |
| उधारी (नाठाळ गिऱ्हाईक कोणी नाहीं) | ५८६१ फ्रॅंक ९० सेंट. |
| खर्च ... ... ... ... | ४७३७ फ्रॅंक ८० सेंट. |
| उसनवार (ज्यांना पसे उसने दिले आहेत त्यांनीं संस्थेला आरंभीं मदत केली होती, हे लोक याच धंद्यांतील आहेत.)... | १६५० फ्रॅंक. |
| | ३२९५० |

संस्थेची सारखी भरभराट होत आहे.

मार्गानीं मिळविलेलें असेल तर संस्थेला ऊर्जितावस्था प्राप्त होणें जवळजवळ अशक्यच असतें. १८४८ मध्यें पॅरिस येथें सरकारनें मदत देऊन कामकऱ्यांचे संघ निर्माण केले होते; त्यांची व कामकऱ्यांनीं स्वतःच्या हिमतीवर स्थापन केलेल्या संघाची तुलना केली तर आढळून येतें कीं, स्वावलंबी मजूरांच्या संघाची भरभराट होत आहे आणि सरकारच्या जिवावर स्थापन झालेले संघ कसेबसे प्राण धरून आहेत इतकेंच. परिस्थिति ही अशी आहे.

पण तुम्हीं स्वार्थत्याग केला म्हणजे इतरांनीं आपलें कर्तव्य पूर्णपणें पाळलें नाहीं तरी चालेल असा मात्र माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. दास्यविमोचन हा परमेश्वराच्या संकेताचा एक विभाग आहे याची श्रीमंत लोकांना जाणीव झाली पाहिजे; त्यांच्या मदतीनें अथवा त्यांच्या विरोधाला न जुमानतांहि हें कार्य यशस्वी होणार आहे. सुस्थितींतल्या लोकसत्तावाद्यांना हें पूर्णपणें समजून आलें आहे. हें कार्य तडीस न्यावें अशी प्रबळ व प्रामाणिक इच्छा तुम्हांमध्यें उत्पन्न झालेली आहे अशी तुम्ही या लोकांची खात्री पटवून द्याल तर त्यांचेकडून तुम्हाला खात्रीनें मदत मिळेल; कामकरी वर्गाचें बहुमत संघटना स्थापन करा-वयास अनुकूल असलें पाहिजे; या कार्याला क्षणिक लहरीचा पाठिंबा पुरणार नाहीं, त्यावर बहुजनसमाजाची निष्ठा असली पाहिजे; असें असेल तर धनिक लोकसत्तावाद्यांकडून तुम्हांला मदत मिळेल; त्यांचे सहाय्यानें तुम्हाला पत मिळेल किंवा संघाकडून माल उत्पन्न व्हावयाचे अगोदर त्यांचेकडून तुम्हांला अगाऊ रकमा मिळू शकतील; किंवा कामकऱ्यांच्या संघटनेला मदत करावया-साठीं वेगळ्या पेढया त्यांचेकडून स्थापन केल्या जातील; कांहीं उदार मनाचे कारखानदार आपल्या कामकऱ्यांना स्वतःच्या नफ्यांतील वांटेकरी करतील आणि आजची रोजमुऱ्याची पद्धत व भविष्यकालांतील कामकऱ्यांच्या स्वतंत्र संघटनेची पद्धत, या दोन पद्धतींच्या मधल्या पायरीला मूर्त स्वरूप देतील. अशा प्रकारच्या जनतेच्या पेढया ( Peoples Banks ) बेल्जममध्यें स्थापन झाल्या आहेत. स्वतःच्या प्रामाणिकपणाचा भरंवसा देणारास व आपल्याच दर्जाच्या दुसऱ्या एकाद्या प्रामाणिक मनुष्याचा हवाला देणारास स्कॉटलंड-मधील कित्येक पेढया कर्जाऊ रक्कम देतात. कामकऱ्यांना कारखान्याच्या नफ्यांतील वांटेकरी करणें, या पद्धतीचा अनेक कारखानदारांनीं पुरस्कार केला आहे आणि ती अत्यंत यशस्वीहि झाली आहे.

# १२. उपसंहार.

They are slaves who fear to speak for the fallen and the weak. They are slaves who dare not be in the right with two or three.

*James Russell Lowell.*

शिक्षण व प्रगति हीं कार्यें हातीं घेणाऱ्या सरकारलाच खरें राष्ट्रीय सरकार म्हणतां येईल. स्वतंत्र व एकजूट झालेल्या जनतेवर राज्य करणाऱ्या सरकारला कामकरी वर्गाचा प्रश्न सोडविणें भाग आहे आणि राष्ट्रीय सरकारचें हें पवित्र कर्तव्य आहे. जनतेला अनेकप्रकारें मदत करण्याचें राष्ट्रीय सरकारलाच सामर्थ्य आहे. सरकारनें जनतेच्या उन्नतीचा प्रश्न हातीं घेतल्यास अन्याय व अत्याचार होणार नाहींत, नागरिकांनीं संपादन केलेली संपत्ति जप्त करण्यांत येणार नाहीं, जनतेच्या वेगवेगळ्या वर्गांमध्यें द्वेषभाव उत्पन्न होणार नाहीं—अशा प्रकारचा द्वेषभाव जागृत करणें अन्यायाचें आहे, अनीतिमय आहे आणि राष्ट्राला परिणामीं घातक आहे; या प्रकारांमुळें राष्ट्राच्या प्रगतीचा मार्ग बंद होतो हें आपणांस फ्रान्सच्या उदाहरणावरून दिसून येतें.

सरकारनें कामकऱ्यांना पुढील मार्गांनीं एकदिलाची मदत केली पाहिजे:–

सरकारी अधिकाऱ्यांनीं कामकऱ्यांच्या संघटनेला जाहीर रीतीनें मान्यता द्यावी, लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सभेमध्यें संघटनेच्या मूलतत्वांवर वादविवाद करविण्यांत यावें आणि मागें सांगितलेल्या तत्त्वांनुसार जी संघटना स्थापन करण्यांत आलेली असेल तिला कायद्यानें मान्यता द्यावी; म्हणजे जनतेचें मत अशा संघांना अनुकूल होईल.

दळणवळणाच्या मार्गांत सुधारणा करावी आणि मालाची ने आण होण्याच्या मार्गांत जे अडथळे असतील ते सर्व दूर करण्यांत यावें.

सार्वजनिक वखारी व दुकानें स्थापण्यांत यावींत, कामकऱ्यांनीं आपल्या संघामध्यें तयार केलेल्या मालाची किंमत अदमासानें करून, अशा संस्थांनीं संघाला त्या किंमतीइतक्या रकमेच्या, स्वतःच्या नांवाच्या हुंड्या द्याव्या, या हुंड्या बाजारांत वटवितां येतील अशा असाव्या. म्हणजे रोकड मिळविण्या-साठीं तयार झालेला माल कमी किंमतींत विकून टाकण्याचा प्रसंग संघावर येणार नाहीं.

सार्वजनिक कार्यासाठीं व्यक्तीला ज्या सवलती देण्यांत येतात त्याच अशा संघांना देण्यांत याव्या.

सरकारांतून न्याय मिळविणें आज अत्यंत खर्चाचें होऊन बसलें आहे, न्यायाच्या पाठीमागें लागल्यानें साधारण मनुष्याचा नाश होतो आणि गरी-बाला तर न्याय मिळण्याची आशाच नसते, म्हणून न्यायखात्याची रचना जास्त सोयीची करण्यांत आली पाहिजे.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे व वारसाचे कायदे अधिक सोयीवार करण्यांत आले पाहिजेत.

आज चालू असलेली प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांची पद्धत गुंतागुंतीची आहे आणि तिची बजावणी करावयास सरकारला फार खर्च येतो व जनतेलाहि ती महाग पडते, ही पद्धत पूर्णपणें बदलून टाकून फक्त प्राप्तीवरील कर मात्र घ्याव-याचा, अशी व्यवस्था झाली पाहिजे. मानवी जीवन पवित्र आहे. जीवना-शिवाय प्रगति व कर्तव्यपूर्ति शक्य नाहीं. म्हणून जीवनाला आवश्यक अशा सर्व गोष्टी घेतां येतील इतकी प्राप्ति मनुष्याला होऊं लागेपर्यंत त्याचेवर कोण-त्याहि प्रकारचा कर बसतां कामा नये.

राष्ट्रानें शिक्षणाचें व जनतेच्या प्रगतीचें कार्य हातीं घेतल्यावर धर्मगुरूंना पोसण्याची कांहींच जरूर राहणार नाहीं—म्हणून धर्मकार्यासाठीं त्यांच्या ताब्यांत असलेली सर्व मालमत्ता राष्ट्रानें आपल्या कबज्यांत घेतली म्हणजे राष्ट्रकार्यासाठीं फार मोठी रक्कम एकदम हातीं येईल. या रकमेमध्यें आणखी अनेक प्रकारें भर टाकतां येईल, पडीत असलेल्या सुपीक जमिनी आणि रेल्वे व इतर सार्वजनिक कार्यांपासून होणारा नफा, गांवपंचायतींची खासगी मालमत्ता,[1]

---

१ ही मालमत्ता कायद्यानुसार ग्रामपंचायतीच्या ताब्यांत असते. त्या गांवांत राहणाऱ्या गोरगरीबांना मदत करण्यांत तिचें उत्पन्न खर्च करावयाचें असतें. राष्ट्रसत्तेनें ही मालमत्ता आपल्या ताब्यांत घ्यावी या म्हणण्याचा अर्थ इतकाच कीं, तिच्या उत्पन्नाचा व्यय सर्वत्र गोरगरीबांचे साठींच होईल अशी व्यवस्था राष्ट्रानें करावी.

ज्या मामलतेच्या वारसासंबंधानें अतिशय घोंटाळा आहे त्या, वगैरे सर्व संपत्ति राष्ट्रसत्तेनें आपल्या ताब्यांत घ्यावी. असा हा प्रचंड राष्ट्रीय फंड उभारण्यांत आल्यावर राष्ट्राच्या बौद्धिक व आर्थिक प्रगतीसाठीं त्याचा उपयोग करण्यांत यावा.

हा राष्ट्रीय फंड जमल्यानंतर त्याचा अपव्यय होणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत आली पाहिजे; ज्यांचें शील चांगलें आहे आणि जे आपल्या धंद्यांत वाकबगार आहेत अशा कामकऱ्यांनीं मागें सांगितलेल्या तत्वांच्या अनुरोधानें एकादी संघटना स्थापन केली असेल तर अशा संस्थेला शेंकडा दीड दोन टक्के व्याज घेऊन या फंडांतून रक्कम कर्जाऊ कां देण्यांत येऊं नये! राष्ट्रानें उभारलेला एवढा मोठा फंड एकाच पिढीकरितां नसतो—त्यामधून राष्ट्राच्या भविष्यकालाचेंहि पोषण व्हावयाचें असतें आणि म्हणूनच हें राष्ट्रीय भांडवल अत्यंत पवित्र आहे असें मानण्यांत आलें पाहिजे. या फंडाचा उपयोग अनेक ठिकाणीं व्हावयाचा असल्यामुळें कोठें कोठें त्याचा अपव्ययहि होण्याचा संभव आहे, पण सर्वत्र त्याचा सद्व्ययच व्हावा अशी व्यवस्था करण्यांत आल्यावर इकडलें नुकसान तिकडे भरून येईल.

कोणत्या संस्थेला किती कर्ज द्यावयाचें हें ठरविण्याचें काम सरकारकडे नसावें किंवा मध्यवर्ती बँकेकडेहि नसावें, या कामासाठीं जागोजाग पेढ्या स्थापन करण्यांत याव्या आणि या पेढ्यांची व्यवस्था लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हातांत असावी; अशा पेढ्यांवर मध्यवर्ती राज्यसत्तेची देखरेख असावी. अशी व्यवस्था झाली तर समाजाच्या वेगवेगळ्या वर्गाची संपन्नता कायम राहील. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीकडून जो कर घेण्यांत येतो त्याचा फायदा आज फक्त एकाच वर्गाला मिळत आहे—हा प्रकार बंद होईल, ह्या कराचा संपूर्ण जनतेला उपयोग होईल, मजूरवर्गाची पत वाढेल, संपत्तीच्या उत्पादनाचें काम जास्त झपाट्यानें होऊं लागेल, मालहि उंची प्रतीचा निघूं लागेल व व्याजाचा दर हळू हळू उतरत जाईल; या मार्गानें कामगारांचा फायदा प्रत्यक्षपणें व्हावयाचा आहे म्हणून सर्व लोक उत्साहानें काम करतील, कारखाने बंद राहणार नाहींत व कामकऱ्यांना कामाचा तुटवडा पडणार नाहीं. राष्ट्रामधील संपत्तीची विभागणी अत्यंत अनियंत्रितपणानें झालेली आहे; म्हणूनच कांहीं थोड्या व्यक्ति अतिशय श्रीमान् तर बहुजनसमाज अत्यंत दरिद्री–अशी स्थिति आज दिसून येत आहे. राष्ट्रानें आपल्या संपत्तीचें एकीकरण केलें आणि संपत्तीचें उत्पादन व विभागणी स्वतःच्या हातांत घेतली तर ही अव्यवस्था खात्रीनें मोडेल आणि

राष्ट्राच्या संपत्तीचीहि वाढ होईल. माझ्या इटालियन बांधवांनों, हेंच तुमचें भवितव्य. ही सुस्थिति शक्य तितक्या लवकर प्राप्त करून घेणें तुमच्याच हातीं आहे. आपल्या राष्ट्राला महत्पद प्राप्त करून द्या ! राष्ट्राचें सामुदायिक जीवन, राष्ट्राला परमेश्वरानें नेमून दिलेली कामगिरी आणि राष्ट्राचे विचार हीं सर्व जेथें प्रगट होतील अशा लोकसत्तेची संस्थापना करा ! जनतेच्या संघामध्यें लक्षावधि लोक संघटित झालेले असले पाहिजेत, म्हणजे तुमचा शब्द हा एकदोन व्यक्तींचा शब्द नाहीं, तर लक्षावधि लोकांचा शब्द आहे असें म्हणतां येईल. तुमचा पक्ष सत्याचा आहे, न्यायाचा आहे—राष्ट्रानें तुमचें म्हणणें ऐकलेंच पाहिजे.

पण संभाळा ! युरोपांतील गेल्या तीस वर्षांच्या घडामोडीचा ज्यानें अभ्यास केलेला आहे अशा मनुष्याच्या शब्दांवर विश्वास ठेवा; अत्यंत पवित्र आणि उपयुक्त अशा कार्यांचा विध्वंस झालेला मीं पाहिला आहे; त्या कार्यांच्या नेत्यांच्या मनांत यशाची आशा उत्पन्न होते न होते तोंच कांहीं शीलभ्रष्ट व्यक्तींच्या विश्वासघातामुळें या कार्यांना अपयश आलेलें मीं पाहिलें आहे; आत्मोन्नतीशिवाय यशप्राप्ति अशक्य आहे; हक्कांची पात्रता असल्याशिवाय तुम्हांला हक्क प्राप्त होणें शक्य नाहीं; स्वार्थत्याग, दीर्घोद्योग आणि प्रीति हे हक्क मिळवावयाचे मार्ग आहेत. आपण आपलीं कर्तव्यें पालन केलेलीं आहेत किंवा तीं आपणांला नीटपणें पाळतां यावीं एवढ्याचसाठीं जर तुम्ही हक्कांची मागणी करीत असाल तरच तुम्हांला ते प्राप्त होणें शक्य आहे. स्वार्थासाठीं किंवा स्वतःला सुख प्राप्त व्हावें म्हणूनच जर तुम्हांला हक्क पाहिजे असतील तर ते तुम्हांला केव्हांहि मिळणार नाहींत. आरंभीं तुम्हांला यश मिळेल, पण पुढें मात्र तुमचे डोळे उघडतील. सुख व चैन यांचा उपयोग व्यक्तिमात्राला मिळालाच पाहिजे आणि एवढ्याचसाठीं तुम्ही आपले हक्क मिळवा, असें तुम्हांला जे कोणी सांगत असतील तेच तुमचा घात करतील. त्यांनाहि स्वार्थबुद्धि आहेच. स्वतःच्या फायद्यासाठीं ते तुमच्या शक्तींचा उपयोग करून घेतील, त्यांच्या स्वार्थाला जोंवर इतरांकडून विरोध होत आहे तोंवर तुम्ही आम्ही अगदीं एक अशी ते तुमची कल्पना करून देतील; पण तुमच्या मदतीनें त्यांचा स्वार्थ एकदां साधला, कीं मग मात्र ते तुमचा त्याग करतील आणि मिळवलेल्या संपत्तीचा व सत्तेचा आनंदानें उपभोग घेतील. गेल्या पन्नास वर्षांत हा प्रकार अनेक वेळां घडून आला आहे; फार काय, गेल्या अर्धशतकाचा इतिहास हाच आहे, आणि या शतकार्धाचें नांव सुखवाद.

आणि इतिहासाच्या ह्या पानांवरून अश्रू आणि रक्त गळत आहे. या अनर्थाला कारणीभूत झालेले लोक मीं प्रत्यक्षपणें पाहिलेले आहेत. ईश्वराला अस्तित्वच नाहीं असें म्हणणारे, सुख आणि चैन भोगणें हा मनुष्याचा हक्क आहे असें म्हणणारे, ज्यांची धर्मावर श्रद्धा नाहीं, मानवी कर्तव्यांवर व स्वार्थत्यागावर ज्यांचा विश्वासच नाहीं, असे अनेक लोक मीं पाहिले आहेत; जनता व स्वातंत्र्य ह्या पवित्र शब्दांचा उच्चार ते वारंवार करीत असत; अदूरदर्शित्वामुळें आम्हीं त्यांना आमच्या पक्षांत घेतलें; स्वतःचें सुख आणि स्वतःची चैन यांवरच त्यांची नजर होती; आमच्या कार्याला यश यावयाची त्यांनीं वाट पाहिली नाहीं, त्यांनीं तडजोडीच्या भ्याडपणाच्या मार्गाचा स्वीकार केला व संधि येतांच त्यांचेपैकीं एक एक असामी आमच्याशीं विश्वासघात करून पळ काढूं लागला आणि पुढें ते आम्हांला आपले शत्रू मानूं लागले. कर्तव्यपालनाच्या मार्गावर मनुष्यानें पाऊल टाकलें कीं लगेच त्याच्या जीवाला धोका उत्पन्न होतो, त्याला अनेक वेळां उपास काढावे लागतात; अशा अस्वस्थ जीवनाचा त्या स्वार्थी लोकांना लवकरच कंटाळा आला. मनुष्यानें आपलें आयुष्य कर्तव्यपालनांतच घालविलें पाहिजे, सर्वशक्तिमान् परमेश्वरानें मनुष्याला एक कामगिरी नेमून दिली आहे, ह्या जीवनाच्या महातत्त्वांवर त्यांचा विश्वासच नव्हता मग त्यांनीं आयुष्यभर आत्मयज्ञ करावयाचें व्रत तरी कां स्वीकारावें ? सुखामागें लागलेल्या तरुणांचा नाश झालेला पाहण्याचें दुर्दैव माझ्या कपाळीं अनेक वेळां आलेलें आहे. त्यांच्या मनांत सुखाची लालसा उत्पन्न करून देण्यांत आली होती; त्यांनीं आपल्या जीवितकर्तव्याचा त्याग केला, त्यांनीं मनुष्यजातीच्या भवितव्याचा घात केला, ते आपल्या देशाशीं फितूर झाले, त्यांनीं आत्मद्रोह केला; त्यांचे मनांत अशी हलकी इच्छा उत्पन्न झाली होती कीं, आपल्या देशावर जुलूम करणाऱ्या लोकांच्या तंत्रानें घेतलें असतां व त्यांचा स्वार्थ त्यांना आपण साधून दिला असतां आपणांसहि सुखच मिळेल. फ्रान्सच्या कामकरी लोकांनीं ता. २ डिसेंबरच्या राज्यक्रान्तीमध्यें भाग घेतला नाहीं; त्यांना सांगण्यांत आलें होतें कीं, सुखप्राप्ति हीच मानवी जीवनाची इतिकर्तव्यता होय. आणि ज्या मनुष्यानें हें सांगितलें होतें त्यानेंच त्यांची फसवणूक केली. त्याचें स्वातंत्र्य तर नष्ट झालेंच पण त्यांना ज्या सुखाची आशा लावून ठेवण्यांत आली होती तेंहि त्यांना प्राप्त झालें नाहीं. नाहीं ! माझी खात्री आहे कीं, परमेश्वर आणि त्याचें शासन यांवर अढळ निष्ठा असल्याशिवाय, नीति व आत्मयज्ञ यांशिवाय यश-

प्राप्ति होणें अशक्य आहे; ज्यांचे ठिकाणीं एकनिष्ठा व सत्यप्रीति नसेल, स्वतःचीच महती गाण्यांत ज्यांना आनंद होत असेल त्यांना यश मिळणें अशक्य आहे. अशा लोकांनीं राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं केलेल्या उठावणीला एकाद्या बंडापेक्षां जास्त मोठें स्वरूप प्राप्त होणार नाहीं; आपणांस क्रान्ति पाहिजे आहे आणि ती यांचे हातून घडून येणें शक्य नाहीं; क्रान्तीचा पाया अहंकार आणि सूड या भावनांवर असतां कामा नये; खरी क्रान्ति हें धर्मकार्य आहे.

आत्मोद्धार आणि जनतेचा उद्धार हेंच प्रत्येक सुधारणेच्या चळवळींचें ध्येय असलें पाहिजे, समाजघटनेमध्यें घडून येणाऱ्या प्रत्येक क्रान्तीचा हाच हेतु असला पाहिजे. मनुष्याची राहणी सुधारली म्हणजे त्याची उन्नति झाली असें म्हणतां येत नाहीं; आपलें रहातें घर उत्तम प्रकारें शृंगारणें एवढयानेंच मनुष्यत्वाची परिपूर्तता होत नाहीं; त्यांतील लोक गुलाम असतात, त्यांचे देहव्यापार मात्र चालू असतात, त्यांचे अंतःकरणांत पौरुष नसतें; नुसत्या वरपांगी सुधारणेनें मनुष्याची उन्नति होणें अशक्य आहे; आत्मोन्नतीशिवाय बाह्य सुधारणा व्यर्थ आहे. ती प्रेतावर घातलेल्या शृंगाराप्रमाणें आहे. कामकऱ्यांच्या संघटनेमुळें संपत्तीचें उत्पादन वाढत्या प्रमाणांत होणार आहे व संपूर्ण जनतेला उन्नत अवस्था प्राप्त होणार आहे, असी तुम्ही समाजाची खात्री पटवून दिली पाहिजे; याशिवाय आजची रोजमुऱ्यांची पद्धत बदलून तिचें जागीं संघपद्धतीची स्थापना करावी या तत्त्वाला समाजाची सहानुभूति मिळणें शक्य नाहीं. समाजाची अशी खात्री पटवून द्यावयाचा एकच मार्ग आहे आणि हा मार्ग म्हणजे संघाची स्थापना करून ते यशस्वी करून दाखविणें हा होय. प्रामाणिकपणा, परस्परांबद्दल प्रेमभाव, स्वार्थत्यागाची तयारी आणि कामाची आवड हे गुण ज्या संघांतील कामकऱ्यांमध्यें असतील त्यांना यश प्राप्त झालेंच पाहिजे. आपली स्थिति सुधारावी, आपली प्रगति व्हावी अशी तुमची इच्छा असेल तर प्रथमतः आपली प्रगतीला पात्रता आहे हें तुम्हींच दाखवून दिलें पाहिजे.

परंपरा, प्रगति व संघटना या तीन गोष्टी अत्यंत पवित्र आहेत. वीस वर्षांपूर्वीं लिहिलेल्या माझ्या शब्दाचें आज मला पुन्हा स्मरण होत आहे;—— " मानवजातींच्या अनेक शतकांच्या परंपरेमध्यें परमेश्वराचें अनंत वचन प्रकट होत असतें, परमेश्वराच्या या वचनावर माझी अढळ निष्ठा आहे; त्यावरून मला बोध होतो कीं, कुटुंब, राष्ट्र व मानवजात हीं व्यक्तिमात्रानें सार्वत्रिक साध्यासाठीं यतमान होण्याची तीन कार्यक्षेत्रें आहेत, स्वतःचा उद्धार करावयाची

आणि इतरांचा उद्धार व्हावा यासाठी यत्न करावयाचीं हीं तीन कार्यक्षेत्रें आहेत. समाजाच्या उन्नतीसाठींच वैयक्तिक उन्नति प्राप्त करून घ्यावयाची असते आणि समाजाच्या उन्नतीनेंच व्यक्तीचा उद्धार साध्य होत असतो. मालमत्ता हें मनुष्याच्या भौतिक व्यवसायाचें दृश्य स्वरूप आहे मला या वचनावरून बोध होतो; मनुष्याचे सर्व राजकीय हक्क जसे त्याच्या मत देण्याच्या हक्कामध्यें केंद्रीभूत झालेले असतात त्याचप्रमाणें सृष्टीमध्यें अस्तित्वांत असलेल्या वस्तूंना विशिष्ट प्रकारचें स्वरूप देण्यामध्यें मनुष्यानें घेतलेला भाग, त्याच्या मालमत्तेमध्यें स्थूलरूपानें केंद्रीभूत झालेला असतो. आपल्या कार्यक्षेत्रांमध्यें मनुष्य स्वतःच्या हक्कांचा ज्या रीतीनें उपयोग करील त्यावरून परमेश्वर त्याचा बरेवाईटपणा ठरवील असा या वचनाचा अर्थ आहे. मनुष्याच्या अंत:करणाला जें ध्येय आज अस्पष्टपणें दिसत आहे त्याकडे त्याची जों जों प्रगति होत जाते तों तों मानुष्याचीं मूलतत्त्वें परिवर्तन पावत जातात. मानुष्याचे मूल घटक वर सांगितलेलेच आहेत; हे घटक नष्ट करणें अशक्य आहे; जनसत्तावाद्यांच्या काल्पनिक समाजघटनेला व्यावहारिक स्वरूप देणें अशक्य आहे; समाजघटनेमध्यें व्यक्तीला इतकें लीन करावयाचें कीं, मनुष्याला व्यक्तिस्वातंत्र्याचा लेशहि नसावा, ही कल्पना सर्वस्वीं अनिष्ट आहे; मानवजातीच्या बौद्धिक व नैतिक संक्रमणकाळांत अशा प्रकारचीं स्वप्नें अनेक कल्पक लोकांच्या डोक्यांत उत्पन्न होत असतात; धर्मभिक्षूंच्या संघामध्यें या प्रकारची घटना स्थापन होणें शक्य आहे; या अत्यंत संकुचित क्षेत्रांत अशी घटना स्थापन करतां येते म्हणून संपूर्ण मानवजातीमध्येंहि तसें होणें शक्य आहे असें अनुमान काढणें मात्र चुकीचें आहे. परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्राची प्रगति अखंडितपणें होत असते, ही प्रगति विचारांत व कृतींतहि होत असते, भूतकाळांत अशी प्रगति झालेली आहे आणि भविष्यकालांतहि प्रगति होत राहील, अशी माझी निष्ठा आहे. भविष्यकालीन प्रगतीची दिशा अगोदरच आंखून ठेवण्यांत कांहीं तात्पर्य आहे असें मला वाटत नाहीं. धार्मिक शिक्षणानें मनुष्याला प्रगतीचे सर्व मार्ग मोकळे करून देणें व प्रगति साधवयाचें सामर्थ्य प्राप्त करून देणें, हें अत्यंत महत्त्वाचें आहे असें माझें मत आहे. मानवी जीवन उच्चतर, अधिक प्रेममय, उदात्त आणि दिव्य करणें हेंच आपलें ध्येय आहे, मनुष्याला इंद्रियगोचर सुखांची आसक्ति लावल्यानें हें साध्य होईल असें मला वाटत नाहीं. अशा सुखापासून मनुष्याला आनंद होतो असें म्हणणें ही शुद्ध

व्याजोक्ति आहे. प्रगति साध्य करून घ्यावयाचें संघटना हें एकच साधन आहे अशी माझी खात्री झालेली आहे; संघटनेला मी इतकें महत्व देतों याचें मुख्य कारण तिजमुळें संपत्तीचें उत्पादन अधिक जोरानें होतें हें नव्हे. संघटनेमुळें मनुष्याच्या सर्व शक्तींचें संघट्टण जास्त निकटपणें होतें आणि वैयक्तिक जीवन सामाजिक जीवनाशीं साधर्म्य पावतें, म्हणूनच संघटना हें प्रगतीचें एकच साधन आहे असें मीं म्हटलें आहे. संघटनेमध्यें सामील होणाऱ्या सर्व व्यक्ति पूर्णपणें स्वतंत्रच असल्या पाहिजेत, त्याशिवाय संघाला यश प्राप्त होणें शक्य नाहीं; राष्ट्रांच्या सघामध्यें सामील होणारीं सर्व राष्ट्रें स्वतंत्रच असलीं पाहिजेत आणि त्यांना आपली जगांतील कामगिरी जाणावयाचें सामर्थ्य असलें पाहिजे. अन्नवस्त्र मिळवावयासाठीं मनुष्याला दिवसभर राबावें लागणें अत्यंत अनिष्ट आहे, आपल्या श्रेष्ठ शक्तींचा विकास करावयासाठीं त्याला रिकामा वेळ मिळालाच पाहिजे. जीवनकलहांत आपलें अस्तित्व कायम राखणें हेंच मनुष्याचें जीवितकर्तव्य आहे, सुखांचा उपभोग घेणें हा मनुष्यमात्राचा हक्क आहे, असें कोणीं बोलूं लागलें म्हणजे मात्र माझ्या छातींत धडकी भरते. या तत्त्वांमुळें मनुष्याचे मनांत अहंकार उत्पन्न होतो, उदात्त भावनांचा नाश होतो, सत्यासाठीं हवा तो छळ सोसण्याचें धैर्य नाहींसें होतें, मानवजातीच्या उज्वल भविष्याचे सर्व आधार उपटून टाकले जातात.

" मानवजातीचें चैतन्य आज नि:सत्व झालें आहे; कारण सर्वांना सामान्य अशी धर्मनिष्ठाच अस्तित्वांत नाहीं; कारण धरा आणि स्वर्ग, परमेश्वर आणि मनुष्य यांचें पुनर्मीलन करणारीं तत्त्वें आज प्रचारांत नाहींत. निष्ठेच्या अभावीं मनुष्य जडवादी झाला, त्यानें स्वार्थाचें पूजन करावयास आरंभ केला. राजेरजवाड्यांनीं आणि अधम राज्यपद्धतींनीं या घातकी स्वार्थ सांप्रदायाचें अध्वर्युत्व आपलेकडे घेतलें. ज्यान त्यानें स्वत:ची सोय पहावी, हें भयंकर तत्त्व त्यांनीं शोधून काढलें; त्यांना माहीत होतें कीं, या तत्त्वाचा प्रसार विस्तृत प्रमाणावर झाला तर सर्व लोक स्वार्थी होतील; स्वार्थासाठीं तडफडणारा मनुष्य आणि गुलामगिरींत खितपत पडलेला मनुष्य यांचेमध्यें असलेला भेद अत्यंत सूक्ष्म आहे हें त्यांनीं जाणलें होतें. "

इटालियन कामगारांनो, माझ्या बंधूंनो, तुम्ही स्वार्थामागें धांवूं नका. स्वार्थत्यागानेंच तुमचा उद्धार होणार आहे.

तुमचें कार्य अत्यंत पवित्र आहे आणि तें तुम्हांला परमेश्वरानें नेमून दिलेलें आहे. मानवजातीमध्यें बंधुभाव निर्माण करणें हेंच तें कार्य. हें कार्य पूर्ण करावयाचीं आत्मोन्नति व कर्तव्यपालन हीं दोनच साधनें आहेत.

मानवी कर्तव्याचें विवरण मीं शक्य तितक्या स्पष्टपणें केलें आहे; त्यामध्यें राष्ट्रकर्तव्यांना अग्रस्थान आहे. स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवून देणें आणि देशामध्यें ऐक्य स्थापन करणें हें तुमचें कर्तव्य आहे आणि असें व्हावें हें अत्यंत अवश्य आहे. राष्ट्रानें कांहीं विशिष्ट योजना हातीं घेतल्या पाहिजेत आणि कांहीं कार्यांना उत्तेजन दिलें पाहिजे, तीं कार्यें व योजना कोणत्या हें मी सांगितलेलेंच आहे; त्या योजना व कार्यें यशस्वी व्हावींत यासाठीं राष्ट्रामध्यें ऐक्य असलें पाहिजे व राष्ट्राला स्वातंत्र्य असलें पाहिजे. स्वदेशाच्या राजकीय जीवनांत भाग घेतल्यानेंच तुमच्या सामाजिक स्थितींत सुधारणा होणार आहे. राष्ट्रसत्तेच्या निवडणुकीमध्यें तुम्हांला मत द्यावयाचा हक्क असला पाहिजे, याशिवाय आकांक्षांशीं सहानुभूति दाखविणारी व तुमच्या गरजांकडे लक्ष पुरविणारी राज्यपद्धति राष्ट्रामध्यें निर्माण होणें अशक्य आहे. जिचें अधिष्ठान रोममध्यें आहे अशी लोकसत्ता संपूर्ण इटलीच्या अनुमतीनें स्थापन होऊन तिजकडून राष्ट्रघटनेचा मसुदा निर्माण केला जाईल व राष्ट्रामधील सर्व नागरिकांच्या प्रगतीची दिशा दाखविली जाईल—अशी लोकसत्ता स्थापन होईपर्यंत तुमची स्थिति सुधारण्याची बिलकूल आशा नाहीं. राजकीय सुधारणा व सामाजिक सुधारणा यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं असा आपल्या मनाशीं निश्चय करून जर तुम्ही म्हणूं लागाल कीं " देशाची राज्यघटना कोणत्याही प्रकारची असो, आमचें दास्यविमोचन घडवून आणण्याचें सामर्थ्य आमच्या ठिकाणीं आहे, " तर मात्र तुम्ही दास्यशृंखलांमध्यें अधिक जखडले जाल व तुमचें दास्यविमोचन कधींही होणार नाहीं. फ्रान्समधल्या समाजसत्तावाद्यांचा असाच प्रकार झाला.

संयुक्त व स्वतंत्र अशा राष्ट्राची संस्थापना करणें हें आणखी एका दृष्टीनें आवश्यक आहे हें मी तुमची रजा घेण्यापूर्वी तुम्हांस दाखवून देणार आहें.

तुमचें दास्यविमोचन एकाच तत्त्वाच्या आधारावर होणार आहे आणि हें तत्त्व म्हणजे कुटुंबांतील ऐक्यभाव हें होय. आज कुटुंबाचा अर्धा विभाग ह्या ऐक्यांतून बहिष्कृत करण्यांत आलेला आहे. हा विभाग म्हणजे कुटुंबांतील स्त्रीवर्ग हा होय; स्त्रीपासूनच मनुष्याला स्फूर्ति व समाधान मिळतें; बालकांच्या

शिक्षणाची जबाबदारी स्त्रियाच संभाळीत असतात; असें असूनहि नागरिकत्वाच्या दृष्टीनें आणि राजकीय व सामाजिक दृष्ट्या स्त्रीवर्ग हा पुरुषवर्गापेक्षां हीन दर्जाचा ठरविण्यांत आला आहे. पवित्र सत्याच्या आधारावर तुम्ही आपल्या दास्यविमोचनासाठीं प्रयत्न करीत आहां, म्हणून कुटुंबाचें ऐक्य नष्ट करणाऱ्या या अन्यायाचा प्रत्येक स्थलीं व प्रत्येक प्रसंगीं तुम्हीं निषेधच केला पाहिजे.

स्त्रीवर्गाचें दास्यविमोचन आणि कामकरी वर्गाचें दास्यविमोचन हे दोनहि प्रश्न सारख्याच महत्वाचे आहेत असें तुम्हीं मानिलें पाहिजे. यामुळेंच तुमच्या कार्याला सार्वलौकिक सत्याचें पावित्र्य प्राप्त होणार आहे.

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥

गीता १८.७३.

कागद, शाई वगैरे मुद्रणसाहित्याचें
विश्वसनीय ठिकाण
सुदामा पेपरमार्ट, पोष्टासमोर, फोर्ट मुंबई.

"....स्वभाषादिकांचा, जगीं मान व्हावा,...."

रामदास.

श्री. नाथमाधव, श्री. सरदेसाई, श्री. जोगळेकर वगैरे नामांकित लेखकांनी अनेक उत्कृष्ट ग्रंथ लिहून गेल्या दोन तीन वर्षांत महाराष्ट्र साहित्यसमृद्धींत अमोलिक भर टाकिली आहे.

श्री. गो. स. सरदेसाई यांची रियासतकार या नात्यानें वाङ्मयभक्तांस ओळख करून देण्याची जरूरी नाहीं. त्यांनीं अलिकडे प्रसिद्ध केलेली उत्कृष्ट बांधणीचीं अशीं दोन पुस्तकें—मराठी रियासत मध्यविभाग ३ (पानपत प्रकरण) व ब्रिटिश रियासत पूर्वार्ध ह्यामुळें त्यांच्या पूर्वीच्या रियासतीच्या भागाप्रमाणेच ऐतिहासिक वाङ्मयांत मोठीच भर पडली आहे. पानपत प्रकरणासंबंधीं केसरींतील परीक्षणामध्यें असें म्हटलें आहे कीं, या प्रकरणांत श्री. सरदेसाई यांची भाषा व ऐतिहासिक विवेचनपद्धति परिणतीला पोंहोंचली आहे. आमच्या देशांत इतिहासाच्या अध्ययनाकरितां विलायती बखरकारांचा पांगुळगाडा टाकून देऊन श्री. सरदेसाई यांच्यासारख्या स्वभाषेंतील अधिकारी रियासतकारांवर आमचे उदयोन्मुख तरूण अधिकाधिक भार टाकीत आहेत. ही स्वाभिमानवृत्ति अभिनंदनीय आहे. श्री. सरदेसाई यांच्या इतिहासग्रंथांचा हा अमोलिक ठेवा प्रत्येकानें हस्तगत करून घ्यावा.

श्री. नाथमाधव यांनीं स्वराज्याचा श्रीगणेशा, स्व० घटना, स्व० स्थापना, स्व० कारभार व स्व० संकट अशा पांच ऐतिहासिक कादंबऱ्या सन १६४४ ते सन १६८९ पर्यंतच्या कालावर लिहिल्या असून अशाच पुढेंहि आणखी कांहीं कादंबऱ्या ते क्रमशः लिहीत आहेत. या कादंबऱ्यांत जरूर तेथें आधारभूत ग्रंथांतून उतारे दिले आहेत. त्या फारच सरस चटकदार व लोकप्रिय झाल्या आहेत असें त्यांच्या सारख्या होत असलेल्या खपावरून म्हणण्यास हरकत वाटत नाहीं.

श्री. जोगळेकर यांचे साहित्याभिमानी विद्वानांनीं वाखाणलेले व स्वदेशप्रीति उत्तेजित करणारे दोन ग्रंथ आहेत. मानवी कर्तव्यें आवृत्ति दुसरी, हें प्रसिद्ध इटालियन दे. भ. मॅझिनी याच्या डयूटीज ऑफ मॅन या ग्रंथाचे भाषांतर आहे. राष्ट्रभक्तांना मानवी कर्तव्यें हा स्वदेशधर्म शिकविणारा व क्रांतिकारक वाङ्मयांत आग्रगण्य गणला गेलेला ग्रंथ आहे " भाषांतराचें काम श्री. जोगळेकरांचे

लेखणींतून इतकें खुबिदार उतरलें आहे कीं, त्या योगानें मूळ ग्रंथाच्या सरसतेंत भरच पडली आहे. ” श्री. जोगळेकरांनी जोसेफ मॅझिनी चरित्र हें पुस्तक लिहून मराठी चरित्रग्रंथांमध्यें अपूर्व भर टाकिली आहे. स्वातंत्र्योन्मुख देशांमधील लोकांनीं मॅझिनीच्या चरित्राचें पठण केल्यास त्यांना राष्ट्रोद्धाराच्या मार्गाचा स्पष्ट बोध होईल. श्री. जोगळेकरांची भाषा मोहक, दमदार, व हृदयभेदी अशी आहे.

ह. भ. प. पांगरकर यांची अधिकारी व रसाळ लेखणी रुक्ष अशा तत्वज्ञानाकडेहि सामान्य वाचकांचेहि मन आकर्षण करून घेईल; मग श्रीएकनाथ महाराजांसारख्या भगवद्‌भक्ताचें चरित्र लिहितांना त्यांच्या लेखणींत किती माधुर्य आलें असेल याची सहज कल्पना येईल. शुद्ध व अस्खलित भाषा आणि साधु पुरुषांचे नीतिपाठ या दृष्टीनें हें पुस्तक आबालवृद्धांनीं अहर्निश मनन करण्याजोगें आहे.

स्वराज्यासाठीं जिवाचें रान करून घ्यावयास आज हिंदुस्थान तयार झालें आहे. स्वदेशहित चिंतन करणाऱ्या प्रत्येक हिंदवासीयानें ग्रेटब्रिटनची शासनपद्धति कोणत्या धर्तीची आहे हें प्रथम समजाऊन घेणें अगदीं अवश्य आहे. श्री. रं. वि. लळित यांचे ग्रेटब्रिटनची शासनपद्धति हें पुस्तक प्रत्येकानें अवश्य संग्रही ठेवावें.

प्रसिद्ध कादंबरीकार व किर्लोस्कर खबरचे सहसंपादक श्री. ना. ह. आपटे यांची सरळ भाषा व त्यांचे मार्मिक बोल महशूर आहेतच. त्यांची अजिंक्य तारा ही कादंबरी वाचून थरारून जाणार नाहीं असा वाचक विरळा. या कादंबरीची ही दुसरी आवृत्ति आहे ही एकच गोष्ट तिच्या लोकप्रियतेची साक्ष पुरविण्यास समर्थ आहे.

रशियन राजक्रांतीचा आद्यप्रणेता निकोलाय लेनिन हा एक मानवी राक्षस आहे अशी कित्येक आपमतलबी लोकांनीं जगाची समजूत करण्याचा खटाटोप आरंभिला आहे. बोल्शेव्हिझमसंबंधीं पसरलेला गैरसमज किती खोटा व निर्मूल आहे हें निकोलाय लेनिनचें चरित्र वाचल्यावांचून समजणार नाहीं. श्री. रा. गो भिडे यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेलें लेनिनचरित्र शारदाभक्तांनीं अवश्य वाचावें.

नवजीवन लाभल्याशिवाय राजकारणाला उदात्त स्वरूप येत नाहीं. त्याच-प्रमाणें नवजीवनाशिवाय सामाजिक प्रश्नांची गुंतागुंतहि सुटत नाहीं. संगीत नवजीवन या नाटकांत श्री. अस्नोडकर यांनीं खऱ्या व शुद्ध स्वरूपाच्या समाजसुधारणेची स्पष्ट दिशा दाखविलेली आहे.

मराठी वाङमयांत महात्मा गांधींचें विस्तृत चरित्र आजवर उपलब्ध नाहीं. महात्माजीसंबंधीं आजतागायत प्रसिद्ध झालेली सर्व माहिती संकलित करून श्री. सी. शि. लोटलीकर (सीताकान्त) यांनीं महात्मा गांधींचें हें विस्तृत चरित्र लिहिलें आहे. श्री. लोटलीकर यांची विवेचनपद्धति मुद्देसूद व लोकप्रिय आहे. त्यांचीं सर्वच पुस्तकें अंतःकरणापासून व निःपक्षपात बुद्धीनें लिहिलेलीं असतात; म्हणून सांगोपांग विचार करून लिहिलेलें हें पुस्तक महाराष्ट्रीयांस खात्रीनें मार्गदर्शक व प्रिय होईल.

हीं सर्व व पुढें निघणारीं पुस्तकें गणेश महादेव आणि कंपनी, प्रकाशक, ६२१ गिरगांव रोड, मुंबई यांजकडून मागवावींत.

सी. गोखले—पुणें, यांचें मुलांस आवडणारें

## अडुळसा सरबत.

मुलांच्या सर्व जातीच्या खोकल्याच्या विकारावर अप्रतीम गुणकारी असल्याबद्दल डॉ. भडकमकर वगैरे विद्वानांनीं प्रशंसा केली आहे.
किं. १॥ रु. ट. ख. नि.

र. ड. १। रु. ] सुवर्णराज गुलकंद [ ट. ख. ६ आ.

कडकीवर उत्तम शक्तिवर्धन शिफारसपत्रें नेहमीं येतात.

पत्ता:—जोशी आणि सन्स, यांचेंघर.

गिरगांव बॅकरोड, मुंबई.

# ब्राह्मी तेल.

—-०:०—-

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर—जागरण करणारे—नाटकी, सर्कसवाले, तारमास्तर, स्टेशनमास्तर वगैरे व मानसिक श्रम करणारे—विद्यार्थी, वकील, डॉक्टर, जज्ज वगैरे लहानथोर स्त्री पुरुषांस वापरण्यास योग्य, यानें ज्ञासामुळें गेलेले केस पुनः येतात. मो. बा. १८२, म. बा. ८१०, ल. बा. ८६, पॅ. पो. ख. निराळा. व्यापारी लोकांस सवलतीनें मिळेल.

| बाळबाळंतिणींकरितां औषधें | | पौष्टिक औषधें | |
|---|---|---|---|
| बाळंतकाढा नं. १ किं. | ८१४ | सूतशेखररस | तो. ६ रु. |
| बाळंतकाढा नं. २ ,, | ८१४ | नागेश्वररस | ,, ६ रु. |
| द्राक्षासव बाळंतिणीकरितां | ८१४ | सुवर्णमालिनी वसंत | ६ रु. |
| कुमारी आसव | ८१४ | ,, ,, नं. १ | १२ रु. |
| प्रतापलंकेश्वर | तो. २ रु. | पूर्णेंदुरस | १२ रु. |
| वातविध्वंस ,, | ४ रु. | मन्मथरस | ११ रु. |
| बाळकडू बा. | ८३ | चतुर्मुख. | १० रु. |
| दशमूलकाढा बा. | १८२ | लक्ष्मीविलास | १५ रु. |
| महावातास्त्रतेल | १ रु. | वसंतकुसुमाकर | १५ रु. |

शिवाय टिकाऊ काढे, आपवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें वगैरे पांचशेवर औषधें तयार आहेत. सविस्तर माहितीचा क्याटलॉग सहा आणे आले असतां आणि लहान क्याटलाग व रुग्णपत्रिका एक आणा आला असतां पाठवूं.

टेलिफोन नंबर २२७९ किंवा ९८२४.

**दत्तात्रय कृष्ण सांडु ब्रदर्स,**
दुकान—ठाकुरद्वार, मुंबई नं. २
कारखाना चेंबूर जि. ठाणें.

धी लिमये ब्रदर्स लिमिटेड

यांचे कडे

# सर्व प्रकारचे मायर्स पंप

अत्यंत स्वस्त भावानें मिळतात.

Take off your Hat to "The Myers!"

BEST PUMP ON EARTH.



त्याच प्रमाणें सर्व प्रकारचीं शेतीचीं आऊतें ऑइल इंजिनें व इंजीनवर चालणारीं सर्व प्रकारचीं यंत्रें, बोर्डो मिश्रण वगैरे हरएक प्रकारचीं पीकांवरील रोगांवर औषधें, स्प्रेइंग मिश्रणें वगैरे माल पूर्ण खात्रीचा व स्वस्त मिळतो माहिती मागवा अगर भेटा.

धी लिमये ब्रदर्स लिमिटेड.

हमाम स्ट्रीट फोर्ट मुंबई.

पोष्ट बॉक्स नंबर ६८४

# अमृतांजन.

हें ठणका, कळा, वेदना इत्यादि व्याधींवर अचुक गुणकारी आहे. आज २५ वर्षें याच्या एकसारख्या वाढत्या खपावरून याची सहज कल्पना होते. लाखों कुटुंबें आज अमृतांजन वापरीत आहेत; कारण तें सर्व प्रकारच्या वेदना, मुरगळणें, संधिवात, कफ, सूज आणि अशा प्रकारच्या पुष्कळ व्याधि निखालस बऱ्या करितें. म्हणून ज्यांनीं हें अद्याप अनुभवलें नसेल त्यांनीं खात्री करून घ्यावी. किं. १० आणे. व्ही. पी. खर्च निराळा.

अमृतांजन डेपो, फोर्ट, मुंबई.

शरीरांतील रक्त बिघडल्यानें सर्व रोगांची
उत्पत्ति होते म्हणून रक्त शुद्ध ठेवणें
प्रत्येकाचें कर्तव्य आहे. बिघडलेलें
रक्त शुद्ध करण्याचा
खात्रीचा इलाज म्हणजे

**डॉ. वामन गोपाळ यांचा**

आयोडाइज्ड

# सार्सापरिला

घेणें हाच होय

असें लक्षावधी लोकांनीं ६० वर्षांचे अनुभवानें ठरविलें आहे.

**आणि म्हणून निरनिराळ्या प्रदर्शनांतून त्यांस सोन्याचीं व चांदीचीं पदकें बक्षीस मिळालीं.**

याचे सेवनानें उपदंश किंवा त्यापासून होणारे इतर रोग जसे पक्षघात, संधिवात, अंगावर काळे डाग पडणें, अंग सुजणें, शरीरांत आग होणें, अंगावर देवीसारखे फोड उठणें वगैरे विकार पार नाहींसे होतात.

**बाटलीची किं. १-४-०. चार बाटल्यांनीं उत्तम गुण येतो. चार बाटल्यांची किं. ४-८-० पोस्टखर्च निराळा.**

प्रत्येक शहरीं प्रसिद्ध व्यापाऱ्यांकडे मिळेल.

**डॉ. गौतमराव केशव आणि सन्स,
ठाकुरद्वार, मुंबई.**

मुंबई इलाख्यांतील पहिले एम्. डी.

# डॉ. अण्णा कुंटे.

यांचीं गुणकारी औषधें.

**बालग्रहांतक.**
(मुलांचे आंकडी अपस्मारावर औषध.)

**अर्शःकुठार मलम.**
(मूळव्याधीचे मोडावर मलम.)

किंमत प्रत्येकीं एक रुपया. पोस्टेज माफ.

मुंबई येथील सर्व केमिस्ट अँड ड्रगिस्ट यांचे दुकानीं मिळतील.

**धी गणेश फार्मसी, मुंबई, नं. ४**

---




तापावर
बाटली घेतानां
**कर्णिक** यांची
हीच बाटली
मागवा.

कर्णिक ब्रदर्स, गिरगांव-मुंबई.